

चरित्र
१३०४
२११६

१९६०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय - चरित्र
क्र. १३०४

REFBK-0010997

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....... ............
........... नों: दि: ................

# सेनापति बापट-दर्शन

[ पूर्वार्ध ]

कै. आपटे गुरुजी

प्रस्तावना
प्रल्हाद केशव अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८८८
शाखा (स्थलप्रत)

प्रका
REFBK-0010997
ग. । मन्दिर
गिरगाव, मुंबई ४

मूल्य पांच रुपये

प्रकाशक :
**विष्णु गजानन परचुरे**
**ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर**
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुम्बअी ४

आवृत्ति पहिली
१२-११-१९६०

© १९६०, वी. पी. आपटे

मुखपृष्ठ सजावट :
**श्री. रघुवीर मुळगांवकर**

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुम्बअी ४

# प्रस्तावना

सेनापति बापटांच्या ऐंशीआव्या वाढदिवशीं त्यांच्या महान् चरित्राचा हा पूर्वार्ध मराठी जनतेच्या हातीं ठेवतांना मला अत्यंत हर्ष होत आहे. आपटे गुरुजींनीं लिहिलेल्या या चरित्राचें हस्तलिखित सेनापतींचे चिरंजीव श्री. वामनराव बापट ह्यांच्याजवळ पुष्कळ वर्षांपासून पडून होतें. त्याचा सुगावा मला लागतांच मी तें तावडतोब हस्तगत करून श्री. गजानन परचुरे ह्यांच्याकडे प्रकाशनाला दिलें. हें सगळें काम अतिशय झटपट झालें, म्हणूनच तें सिद्धीस गेलें.

सेनापतींचीं यापूर्वीं दोन चरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत. एक श्री. लालजी पेंडसे ह्यांनीं लिहिलेलें आणि दुसरें सेवकसेवानंद बाळूकाका कानिटकराचें. स्वतः सेनापतींनीं आपलें 'आत्मचरित्र' कवितेंत लिहिलेलें आहे. तें अनुष्टुप् छंदांत असून अटमासें हजार ओळींत आहे. त्यांत ते म्हणतात :

चमत्कारमयी माझी कहाणी मज वाटते
मदर्थ हरिचे कष्ट पाहुनी प्रेम दाटतें.

सेनापति सांगतात त्याप्रमाणें त्यांची जीवनकथा अनेक अद्भुतरम्य चमत्कारांनीं भरलेली आहे; पण हे सारे चमत्कार अद्याप प्रकाशांत आलेले नाहींत, ह्याचाच विषाद वाटतो. सेनापति स्वतःसंबंधीं तर चकार शब्द काढीत नाहींत. पूर्वायुष्याबद्दल त्यांना बोलावयाला लावणें महा कठीण कर्म आहे. मी तो प्रयत्न करून पाहिला. पण हातीं कांहीं लागलें नाहीं. त्यामुळें सेनापतींच्या चरित्रांतलें अत्यंत रोमहर्षक पर्व अज्ञातांत रहाणार असें राहूनराहून मला भय वाटतें.

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यांनीं आपल्या सर्वस्वाचा होम केला, असे दोनच महाराष्ट्रीय महापुरुष तुमच्याआमच्या भाग्यानें अद्याप आपल्यामध्यें आहेत. एक स्वातंत्र्यवीर सावरकर आणि दुसरे सेनापति बापट. क्रांतिशास्त्राचे धडे दोघांनीं एकाच वेळीं विलायतेमध्यें घेतले. वयाच्या सोळाव्या वर्षीं भगूर येथें आपल्या घरांतील अष्टभुजा देवीपुढें स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं 'देशाचें स्वातंत्र्य

परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतांमारतां मरेतों झुंजेन' अशी ज्याप्रमाणें शपथ घेतली होती, त्याप्रमाणें वयाच्या विसाव्या वर्षीं पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतील आपल्या खोलींत नंग्या तलवारीवर हात ठेवून सेनापति बापटांनीं पुढीलप्रमाणें शपथ घेतलीः

"मी—पांडुरंग महादेव बापट—भवानी आईची—या नंग्या समशेरीची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञा करतों कीं माझ्या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठीं मी आजपासून यावज्जीव कायावाचामनानें झटेन आणि तिची हांक येतांच तिच्या सेवेसाठीं धांवत येईन. या कामीं मला देहाचा होम करावा लागला तरी मी फिरून याच भरतखंडांत जन्म घेईन व अपुरें राहिलेलें काम करून दाखवीन. ही माझी प्रतिज्ञा पुरी करण्यास माझा श्रीहरि मला जरूर ती बुद्धि, युक्ति आणि शक्ति देवो—वंदे मातरम्."

विलायतेस गेल्यावर सेनापति बापटांनीं एडिंबरो विश्वविद्यालयाच्या 'क्वीन्स रायफल्स्' या पलटणींत एक वर्ष लष्करी शिक्षण घेतलें. 'हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य' ह्या विषयावर त्यांनीं त्या ठिकाणीं इतकें ज्वलज्जहाल भाषण केलें कीं त्यामुळें सर्वत्र खळबळ उडाली. मुंबई विश्वविद्यालयानें त्यांची शिष्यवृत्ति बंद करून टाकली. त्यानंतर एडिंबरो येथील वाङ्मयमंडळापुढें भाषण करतांना 'परकीय राज्यकर्ते नि हिंदी लोक ह्यांच्यामधील स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं इतर अनेक साधनांबरोबर ह्या गोलिकायंत्राचाहि उपयोग एखादे वेळीं आम्हांला करावा लागेल!' असें म्हणून आपल्याजवळचें भरलेलें पिस्तूल दाणकन् त्यांनीं अध्यक्षाच्या पुढें टेबलावर आदळलें. त्यामुळें सारी सभा हादरून गेली.

त्यानंतर शिक्षण—अभ्यास बाजूला सारून सेनापति बापट सुप्रसिद्ध क्रांतिकारक श्यामजी कृष्णवर्मा ह्यांच्या 'इंडिया हाऊस'मध्यें येऊन दाखल झाले. तेथें भारतीय क्रांतिकारकांच्या रोजच्या रोज बैठका भरत. तिकडे भारतांत वंगभंगाच्या चळवळीचा प्रचंड धूमधडाका चालू होता. ब्रिटिश सरकार हातांत दडपशाहीचा वरवंटा घेऊन बसलेंच होतें. पंजाबचे सिंह लाला लजपतराय ह्यांना त्या वेळीं स्थानबद्ध करण्यांत आलें. त्यामुळें सर्व भारतांत संतापाचा प्रचंड ज्वालामुखी फुटला. विलायतेंतल्या भारतीय क्रांतिकारकांच्या अंगाची तर लाही लाही झाली. सेनापतींच्या क्रोधाला मर्यादा राहिली नाहीं. ते म्हणाले, 'मी लॉर्ड मोर्ले यांना गोळी घालून ठार मारतों, नाहीं तर पार्लमेंटची बैठक चालू असतां तेथें जाऊन बॉंब टाकतों अन् सारें पार्लमेंट हाऊस उडवून देतों!' ह्या त्यांच्या संकल्पापासून त्यांना परावृत्त करतांना त्यांच्या सहकाऱ्यांच्या नाकीं नऊ आले.

'माझी भारतमाता—माझी आई पारतंत्र्यांत आहे, तिला मी कशी मुक्त करीन?' हा एकच निदिध्यास सेनापतींना लागून राहिला होता. त्याखेरीज त्यांच्या डोक्यांत दुसरा विचारच नव्हता.

आईवरी विपत्ती, आम्ही मुलें कशाला?
बंदींत मायभू ही, आम्ही खुले कशाला?
जखडून बांधियेली, वघवे तिच्या न हाला
तिज फांस नित्य फटके, हृदयांत होय काला.
रक्ताळलें शरीर, भडका जिवांत झाला
आईस सोडवाया, येणार कोण बोला?

बॉंबगोळा हें जागतिक क्रांतिशास्त्रांतलें एक महान् अस्त्र म्हणून त्यावेळीं समजलें जात होतें. त्या अस्त्रनिर्मितीची विद्या शिकण्यासाठीं सेनापति हे पॅरिसला गेले. तेथें त्यांना एक रशियन युवती भेटली. तिनें त्यांना रशियन भाषेंतील बॉंब गोळ्याच्या कृतीसंबंधीच्या सर्व वाङ्मयाचा तर्जुमा इंग्रजींत करून दिला. श्यामजी कृष्णवर्मा आणि वीर सावरकर ह्यांच्या सांगण्यावरून १९०८ सालीं सेनापति बापट हें बॉंबगोळे तयार करण्याचें सारें वाङ्मय आणि पिस्तुलें घेऊन मुंबई बंदरांत दाखल झाले.

तेथून ते सरळ कलकत्त्याला गेले. त्या वेळीं सारा बंगाल पेटला होता. बंगाली क्रांतिकारकांची आणि त्यांची गुप्त भेट झाली. पण विलायतेंत ठरलेल्या कार्यक्रमापेक्षां निराळाच कार्यक्रम बंगाली क्रांतिकारकांनीं सुरू केला होता. एखाद् दुसरा इंग्रजी अधिकारी मारून क्रांति होणार नाहीं. त्यासाठीं जनतेची तयारी व्हावयाला पाहिजे. योग्य संधि आली म्हणजेच बंडाचा झेंडा उभारणें योग्य होईल, असें सेनापतींनीं त्यांना सांगितलें. पण तें त्यांना मानवलें नाहीं. म्हणून सेनापति निराश होऊन पुण्याला परत आले. आणि लोकमान्य टिळकांना भेटून आपला कार्यक्रम त्यांनीं त्यांच्यापुढें मांडला. पण त्यानंतर लागलीच लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली.

बॉंब गोळ्याची विद्या सेनापतींनीं प्रथम भारतांत आणली खरी, पण तिचा बंगालमध्यें दुरुपयोग होऊं लागला. तेथें हत्याकांडाला प्रारंभ झाला नि भलतींच माणसें बळी पडूं लागलीं. माणिकतोळा येथें बॉंब गोळ्याचा गुप्त कारखाना निघाला होता. तो सरकारनें हुडकून काढला. त्यांत अनेक क्रांतिकारकांना पकडलें.

त्यांपैकीं एक नरेंद्रनाथ गोस्वामी हा माफीचा साक्षीदार झाला आणि त्यानें सेनापति बापट हेच बॉंब कटाचे मुख्य सूत्रधार आहेत असें सांगून टाकलें. ती बातमी वृत्तपत्रावरून सेनापतींना पुण्यामध्यें कळतांच त्याच दिवशीं ते अदृश्य झाले.

१९०८ पासून ते १९१३ पर्यंत म्हणजे जवळजवळ पांच वर्षेपर्यंत सेनापति हे अज्ञातवासांत होते. त्यांना पकडण्यासाठीं इंग्रज सरकारनें जंग जंग पछाडले. पण ते कांहीं त्यांच्या हातीं लागले नाहींत. त्यांनीं मोगलाईत कांहीं दिवस काढले. कांहीं खानदेशांत. कांहीं इंदूर संस्थानांत. कांहीं गुजरातेंत अन् कांहीं उत्तर भारतांत. ह्या अज्ञातवासांत त्यांना नाना तऱ्हेचीं नामांतरें, वेषांतरें आणि व्यवसाय करावे लागले. आचारी, शेतकरी, कंपॉझिटर, प्रेसमन, विद्यार्थी, शिक्षक अशीं नाहीं नाहीं तीं सोंगें त्यांना घ्यावीं लागलीं. एकदां तर धारच्या हायस्कुलांत सातव्या इयत्तेंत विद्यार्थी म्हणून त्यांनीं नांव घातलें आणि अलाहाबाद विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक परीक्षेला बसून ते पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. त्याचें वर्णन त्यांच्याच शब्दांत सांगतों :

जाहलों बल्लव कुठें, कुठें कृषक जाहलों
मुद्रायंत्री कुठें, कोठे शालाध्यापक जाहलों.
अध्यायकहि झालों मी, सातवी शिकलों पुन्हा
दिली परीक्षा; पहिला वर्ग मेळविला पुन्हा

लग्न झाल्यापासून सेनापतींचा आपल्या पत्नीशीं कधींच संबंध आला नाहीं. आपल्याला अज्ञातवासांत एकंदर किती दिवस रहावें लागेल ह्याचा कांहीं नेम नव्हता. मग आपल्यासाठीं आपल्या पत्नीनें कां हालअपेष्टा भोगाव्यात? या कल्पनेनें त्यांनीं ह्या कालखंडांत आपल्या पत्नीला आणि एका मित्राला पत्रें लिहून उभयतांनीं विवाह करून सुखी व्हावें अशी त्यांना विनंति केली. सेनापतींच्या उदात्त चारित्र्याचा हा परमोत्कर्षच होय. आपल्या पांच वर्षांच्या अज्ञातवासांतील जीवनाची साद्यंत कथा जर सेनापतींनीं लिहिली असती तर ती खरोखरच एक अद्भुतरम्य कादंबरी झाली असती. अखेर एका माणसाच्या विश्वासघातामुळें सेनापति पकडले गेले. पण एक महिन्यापेक्षां अधिक काळ त्यांना अटकेंत रहावें लागलें नाहीं. बंगालमधील अत्याचारांशीं त्यांचा कांहींहि संबंध नव्हता अशी सरकारची जेव्हां खात्री झाली तेव्हां नुसता जामीन अन् जातमुचलका घेऊन त्यांना सोडण्यांत आलें.

त्यानंतरचा १९१४ ते १९२१ पर्यंतचा सेनापतींचा काळ वृत्तपत्रव्यवसायांत

आणि समाजसेवेंत गेला. हातांतून पिस्तूल आणि बॉंब टाकून त्यांनीं लेखणी, झाडू आणि खोरें घेतलें.

पोथ्या यंत्रें नष्ट झालीं, नष्ट झाली कृतिस्मृति
घरीं आणूनि हरिनें नवी आदेशिली कृति
दिला झाडू दिलें खोरें, दिलें खापर तें करीं
रस्ते गटारें झाडावीं दिली ही मज चाकरी
चाकरी करितांही जें लिहिलें बहु त्यांतुनी
बहुसें नष्ट मी केलें एक्या खेदमयीं दिनीं.

स्वतःला ते भंगी—ब्राह्मण म्हणून म्हणवून घेत. पारनेरांत आणि पुणें शहरांत रोज सकाळीं हातांत खराटा घेऊन गटारें झाडतांना आणि ढकलगाडींत कचरा आणि मैला भरून वाहून नेतांना ज्यांनीं त्यांना त्यावेळीं पाहिलें, त्यांना त्यांच्या माहात्म्याची तेव्हां क्वचितच कल्पना आली असेल. झाडूचें तंत्र महात्मा गांधींनीं भारतांत आणलें अशी जी पुष्कळांची समजूत आहे, ती चूक आहे. बॉंबगोळ्याप्रमाणेंच झाडूच्या शास्त्राचे ह्या देशांतले जनक सेनापति बापटच होत.

१९२१ सालापासून सेनापतींच्या जीवनांतील एका अत्यंत महत्त्वाच्या कालखंडाला प्रारंभ झाला. पुणें जिल्ह्यांतील मुळशी पेट्यांत धरण बांधून मुंबईला वीज पुरवण्याची एक मोठी योजना टाटा कंपनीनें काढली. ह्या धरणाच्या पाण्यांत सबंध मुळशी पेट्यांतील चौपन्न गांवें बुडून दहा हजार मावळे देशोधडी लागणार होते. पंधरा हजार खंडी पीक बुडणार होतें. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं सारा महाराष्ट्र खडबडून जागा झाला. त्यानें सत्याग्रही लढा पुकारला आणि त्या लढ्याचें नेतृत्व सेनापतींकडे आलें. किंबहुना 'सेनापति' ही पदवी ह्याच सत्याग्रहापासून त्यांना प्राप्त झाली.

'मुळशी सत्याग्रह' हें महाराष्ट्राच्या इतिहासांतील एक अत्यंत तेजस्वी प्रकरण होय. ह्या सत्याग्रहाची पार्श्वभूमि ऐतिहासिक होती. श्री शिवरायांच्या शूर मावळ्यांवर हें आक्रमण होतें. त्यामुळें सेनापतींचा महाराष्ट्राभिमान असा कांहीं उचंबळून आला म्हणतां! समर्थ रामदासांचा जणुं कांहीं त्यांच्यांत संचार झाला. त्यांनीं टाहो फोडून महाराष्ट्राला सांगितलें कीं, 'अरे, हा तुमच्या शिवबाचा महाराष्ट्र. ज्या मावळ्यांनीं आपल्या रक्ताचे सडे घालून येथें स्वराज्य स्थापलें, आनंदवनभुवन निर्मिलें, त्या मावळ्यांचे ते अनंत उपकार स्मरून तरी आजच्या महाराष्ट्रानें त्यांचे उपकार फेडावेत!'

त्यांनीं महाराष्ट्राला आवाहन केलें :

शिवरायाचे तुम्ही मराठे, तुमचा शिवराय
प्रतापशाली आहे तुमचा निःसंशय काय
वीरपिंड हा तुम्हां लाभला धन्य तुम्ही धन्य
या पिंडानें तुम्ही जाहलां वीर वीरमान्य
मरहट्टे हे 'हट्टें मर' या ब्रीदा जपणारे
हटातटानें झुंज झुंजतां झुंजीं खपणारे
शक्तियुक्तिचे युक्तिशक्तिचे खेळ खेळणारे
हट्टें मरतिल, हट्टी परि हे कधीं न वळणारे
हे असे जगीं गाजले,
शत्रु माजले, जिहीं भाजले,
ते तुम्ही वीरपिंडाचे
गाजलां धनी खंडाचें
गाजलां भक्त वंडाचें
थंड आजला कसे? उठा घ्या शत्रूची हजिरी!

सेनापतींना महाराष्ट्रामधून फक्त तीन हजार सत्याग्रही पाहिजे होते. म्हण[illegible] त्यांनीं महाराष्ट्राच्या काळजालाच हात घातला.

महाराष्ट्र तेजस्विता नाहिं मेली
महाराष्ट्र तेजस्विता ही निजेली;
महाराष्ट्र तेजस्विता जागवाया,
पुन्हां एकदां बंधनीं या चला या

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले
खरा वीर वैरी पराधीनतेचा
महाराष्ट्र आधार या भारताचा.

सेनापतींची ही हांक महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांमधें निनादली. आणि शेक[illegible] सत्याग्रही मुळशीच्या बचावासाठीं धांवून आले. एकवीस सालच्या रामनवमी[illegible]

सत्याग्रह सुरू झाला. पण त्या टाटाविरोधी सत्याग्रहाला सरकारविरोधी लढ्याचें स्वरूप आलें. सरकारनें सत्याग्रह्यांची धरपकड करून त्यांना येरवड्याच्या तुरुंगांत घालण्याचा सपाटा लावला. सेनापतींनीं त्या तुरुंगाला 'स्वराज्याश्रम' हें नांव दिलें. तुरुंगांत मुळशी सत्याग्रह्यांचा जास्तींत जास्त छळ करावयाचें सरकारनें ठरविलें. निवडक लोकांना नागवे करून त्यांच्या पाठींवर आणि ढुंगणांवर वेताचे फटके बसूं लागले आणि त्यांच्या चामड्याच्या चिंधड्या लोंबूं लागल्या. रक्तामांसाचे ओघळ जमिनीवर सांडूं लागले. सेनापतींना तें दृश्य बघवेना. द्रौपदीचें वस्त्रहरण होतांना भीमाची जी स्थिति झाली, तीच त्यांची झाली. त्यांनीं आपला सारा राग महाकष्टानें गिळून टाकला.

अम्ही पांडवांसारखी शिस्त पाळूं,
मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं !

तीन वेळां कैदेची शिक्षा भोगून ते १४ ऑक्टोबर १९२४ रोजीं बाहेर आले. सेनापति हे स्वभावतः सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते. स्वातंत्र्य रणाशिवाय मिळत नाहीं. मारण मारणाखेरीज मोक्ष नाहीं हें त्यांचें तत्त्वज्ञान. पण सहकाऱ्यांची सामुदायिक शिस्त पाळून सेनापतींनीं अहिंसात्मक सत्याग्रहाचें निष्ठापूर्वक परिपालन केलें.

येथें सेनापतींच्या 'सत्याग्रहशास्त्रा'चें थोडेसें दिग्दर्शन करणें जरूर आहे. त्यांच्या मतें सत्याग्रह दोन प्रकारचा असतो. एक 'साम' सत्याग्रह आणि दुसरा 'शुद्ध' सत्याग्रह. त्यांच्यांत पुन्हां दोन पोटभेद. एक प्राथमिक, दुसरा प्रागतिक. प्राथमिक 'साम' सत्याग्रह म्हणजे शत्रूच्या पायांवर डोकें ठेवून त्याला विनवणें नि तो सांगेल ती शिक्षा भोगणें. प्रागतिक 'साम' सत्याग्रह म्हणजे शत्रूला न दुखवतां त्याची मालमत्ता नष्ट करणें. आतां 'शुद्ध' सत्याग्रहांतील प्राथमिक प्रकार म्हणजे शत्रूला नुसतें जखमी करणें. आणि प्रागतिक प्रकार म्हणजे शत्रूला ठार मारणें. भगवद्गीतेच्या आधारावर सेनापतींनीं हें आपलें सत्याग्रहशास्त्र निर्माण केलें होतें.

तीन वर्षेपर्यंत सेनापतींनीं 'साम' सत्याग्रहाचा अवलंब केला. त्यांतून कांहींहि निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां त्यांनीं सर्वांना बाहू उभारून सांगितलें कीं आतां मी तुमच्या 'साम' सत्याग्रहाच्या बंधनांतून मुक्त झालों. यापुढें मी माझ्या 'शुद्ध' सत्याग्रहाच्या मार्गानें जाणार. त्याबरोबर, त्यांच्या सर्व मोठमोठ्या सहकाऱ्यांनीं जीव मुठींत धरून पळ काढला. 'शुद्ध' सत्याग्रहाच्या अग्नि-

दिव्यांतून जाण्यास फक्त पांच वीर तयार झाले. देव, मोडक, गोरे, आभळे नि कुकडे. ह्या वीरांचीं नांवें सुद्धां आज महाराष्ट्राला माहीत नाहींत. पण धर्मराज सेनापति, अर्जुन देव, भीम गोरे, नकुळ–सहदेव मोडक–आभळे–कुकडे असे हे पांडव शुद्ध सत्याग्रह करण्यासाठीं हातांत पिस्तुल, तलवारी आणि जंबिये घेऊन पौडाला आले, आणि त्यांनीं मुळशी धरणाच्या कामावर आग-गाडींतून जाणाऱ्या कामगारांवर हल्ला करून त्यांना जखमी केलें. गाडीचा एंजिन-ड्रायव्हर मार्टिन नांवाचा एक गोरा होता. त्याच्या पायावर सेनापतींनीं गोळीं मारून त्याला जखमी केलें. आणि नंतर हे सारे शुद्ध सत्याग्रही पोलीसाच्या स्वाधीन झाले.

त्यानंतर त्या सहा जणांवर पुण्याच्या सेशन्स कोर्टांत खटला भरण्यांत आला. सेनापतींनीं ज्यूरीला उद्देशून अत्यंत प्रभावी भाषण केलें. खुनाच्या आरोपांतून ज्यूरीनें त्यांना दोषमुक्त केलें. फक्त हत्यारें वापरल्याबद्दल दोषी ठरविलें. पण न्यायाधीशांनीं ज्यूरीचा निर्णय मान्य न करतां फेरतपासणीसाठीं तो खटला मुंबई हायकोर्टाकडे पाठविला. तेथें सर्वांना दोषी ठरवून जबर शिक्षा ठोठावण्यांत आल्या. सेनापतींना सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली आणि सिंध-हैद्राबादच्या तुरुंगांत पाठवण्यांत आलें.

येथून पुढें सेनापतींच्या आयुष्यांतलें कारागृहपर्व सुरू झालें. सात वर्षांची शिक्षा भोगून ते १९३१ सालीं सुटले. तत्क्षणीं त्यांना महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष करण्यांत आलें. त्यावेळीं कॉंग्रेसची चळवळ अतिशय जोरांत होती. त्याच वेळीं पुण्याचे सध्याचे महापौर वासुदेवराव गोगटे ह्यांनीं मुंबईचे गव्हर्नर हॉटसन ह्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां कॉंग्रेसवाल्यांनीं गोगट्यांचा निषेध करावा अशी सेनापतींना विनंती केली. ती सेनापतींनीं अमान्य केली. ते म्हणाले, ‘कॉंग्रेसची अहिंसेची भूमिका मला मान्य आहे. मीं ती सोडली नाहीं. पण माणुसकी म्हणून कांहीं वस्तु आहे. इतरांनाहि स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार आहे. त्यांचें स्वातंत्र्य काढून घेण्याची आपण कां इच्छा करावी ? ती हिंसा होईल.’

त्यानंतर थोड्या दिवसांनीं रत्नागिरी येथें याच संदर्भात भाषण करतांना सेनापति म्हणाले, ‘कॉंग्रेसचा अहिंसात्मक कार्यक्रम कांहीं त्रिकालाबाधित नाहीं. इतिहासाची तशी शिकवणूक नाहीं. जरूर तर माझ्या देशबांधवांच्या रक्ताचा गंगानदीएवढा पूर मी वहावयाला लावीन असें महात्माजींनीं गोलमेज परिषदेच्या वेळीं इंग्रज मुत्सद्यांना बजावलें. या गंगेशीं कधींकधीं शत्रूच्या रक्ताच्या यमुनेचा आणि शत्रूला फितुर झालेल्या स्वबांधवांच्या रक्ताच्या सरस्वतीचाही संगम व्हावा लागतो

असें मी सांगतों.' ह्या त्यांच्या भाषणाला सरकारनें आक्षेप घेऊन त्यांच्यावर खटला भरला. त्यांत पुन्हा त्यांना सात वर्षांची शिक्षा झाली. १९३७सालीं काँग्रेस सरकार अधिकारावर आलें तेव्हां त्यांना बंधमुक्त करण्यांत आलें. सारांश, १९२४ पासून ते १९३७ पर्यंत जवळजवळ चौदा वर्षें त्यांनीं कारागृहांत काढलीं.

काँग्रेसचें राज्य अनेक प्रांतांत स्थापन झालें. अंशतः देशांत स्वराज्य आलें. पण अजून स्वातंत्र्य आलें नाहीं. तें आणावयाचें म्हणजे देशांतील जनतेंत ऐक्य निर्माण व्हावयाला पाहिजे. भांडणें, हेवेदावे आणि दुही नष्ट व्हावयाला हवी. त्यासाठीं पराकाष्ठेचा त्याग करावयाला पाहिजे. त्याचा मुहूर्त स्वतः सेनापतींनीं करावयाचा ठरविला. आणि २३ जुलै १९३९ रोजीं मुळामुठा नदीच्या संगमांत आपण जलसमाधि घेणार अशी त्यांनीं घोषणा केली. त्या त्यांच्या घोषणेनें केवळ महाराष्ट्रच नव्हे तर सारा भारतवर्ष हादरून गेला. बेळगांवच्या तुरुंगांत असतांनाच हा विचार त्यांच्या डोक्यांत तयार झाला. आपल्या पुत्राला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात, 'जलसमाधि बरी का जेलसमाधि बरी? जेलसमाधींत मी असून नसल्यासारखाच आहें. पण जलसमाधीनें या देहाची वाट लागून देवकार्यार्थ दुसरा देह मिळेल. दुनियेच्या बऱ्यासाठीं दुनियेला कायमचा रामराम स्वखुषीनें ठोकण्याची बऱ्याच जणांची तयारी असेल तर दुनियेचें बरें होतें असा दुनियेचा अनुभव आणि दुनियेचा इतिहास सांगतो. म्हणून माझ्या जेलसमाधीपेक्षां माझ्या जलसमाधीनें दुनियेचें अधिक बरें होण्याचा संभव आहे.'

ठरलेल्या तारखेच्या आधींच जलसमाधि घ्यावयास ते मुळामुठेच्या संगमावर गेले. पण त्यांच्या मित्रांनीं त्यांना नदीच्या कांठावर धरून ठेवलें. तेव्हां ते म्हणाले, 'मी कांहीं वैतागानें आत्महत्या करीत नाहीं. मला देशांतलीं भांडणें आणि जातीयता बघवत नाहीं. तुम्ही भांडणेंहि मिटवीत नाहीं आणि मला मरूंहि देत नाहीं.' तेव्हांपासून सेनापति म्हणत असतात, 'जिवंत बापट त्या दिवशीं मेला. आतां फक्त कुडी आहे. देवाच्या मनांत मी बलिदान करावें असें दिसत नाहीं.' स्वातंत्र्याच्या शेवटच्या लढ्यांत सेनापतींची प्रकृति ठीक नव्हती. तथापि, 'चले जाव'च्या आंदोलनाला त्यांचा संपूर्ण पाठिंबा होता. भारतमाता आतां स्वतंत्र होते आहे हें बघून त्यांच्या आत्म्याला परम संतोष होत होता. तरी देखील पंचेचाळीस सालीं वऱ्हाडांत एक राजद्रोही भाषण केल्याबद्दल एक वर्षाची शिक्षा भोगून ते आलेच.

प्रस्तुत चरित्रांत येथपर्यंतचा सर्व भाग आपटे गुरुजींनीं अत्यंत प्रभावी आणि

ओघवती वाणीनें वर्णन केलेला आहे. पंचेचाळीस सालापासून आजतागायत आतां पंधरा वर्षे होतात. सेनापतींच्या चरित्रांतील या कालखंडाला 'महाराष्ट्र खंड' हें नांव देतां येईल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांत-रचनेच्या विचाराला प्रारंभ झाला. संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढें आली. पण काँग्रेसश्रेष्ठींनीं तिला विरोध केला. त्यामुळें सेनापतींच्या अंतःकरणाला सर्वांपेक्षां जास्त वेदना झाल्या. प्रत्यक्ष संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होण्यापूर्वी सेनापतींनीं महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत दौरे, प्रभातफेऱ्या काढून, व्याख्यानें देऊन आणि शेकडों छापील गाणीं आणि पत्रकें वांटून ह्या प्रश्नाबाबत लोकमत जागृत करण्याचा निकरानें प्रयत्न केला.

पंचावन्न सालीं गोमंतक मुक्तीचा लढा महाराष्ट्रानें केला. त्यांत सेनापति अग्रभागीं होतेच. नंतर १८ नोव्हेंबर १९५५ रोजीं मुंबई येथें संयुक्त महाराष्ट्राच्या सत्याग्रहाचा लढा सुरू झाला. त्याचें सेनापतिपद त्यांनाच देण्यांत आलें. त्या निमित्तानें ते दोन दिवस कारागृहांत होते. गेल्या पांच वर्षांत संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या प्रत्येक अवस्थेंत सेनापति भीष्माचार्यांप्रमाणें अग्रभागीं तळपत होते. ह्या आंदोलनांतील त्यांचीं कांहीं वक्तव्यें अत्यंत प्रखर आणि निर्भय आहेत.

संयुक्त महाराष्ट्राला सर्वांत मोठा विरोध कोणाचा असेल तर तो पंडित नेहरूंचा ही त्यांची ठाम समजूत आहे. म्हणून प्रत्येक व्याख्यानांत ते नेहरूंवर हल्ला चढवीत. शिवाजी पार्कवरील एका सभेंत ते म्हणाले, 'पंडित नेहरूंनीं लोकशाहीचा खून केला आहे. जो खून करतो त्याला फांशीची शिक्षा मिळते. पण ती शिक्षा मी नेहरूंना देत नाहीं. कारण मी वेदांती असल्यानें, माझा फांशीवर विश्वास नाहीं. म्हणून मी त्यांना बडतर्फीची शिक्षा देतों.' दुसऱ्या एका व्याख्यानांत ते म्हणाले कीं, 'महात्मा गांधींनीं आपल्या आयुष्यांत सर्वांत मोठी चूक कोणती केली असेल तर ती ही कीं नेहरूंना त्यांनीं आपले वारसदार नेमलें.' आणि कामगारमैदानावर परवांच भरलेल्या सभेंत ते म्हणाले, 'नेहरू, पंत, मोरारजी आणि सदोबा पाटील हे महाराष्ट्राचे चार दुष्मन् आहेत. त्यांच्यापासून सावध रहा.' संयुक्त महाराष्ट्र समितीला सेनापतींचा पहिल्यापासून शेवटपर्यंत आशीर्वाद होता म्हणूनच मुंबईसह महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या लढ्यांत तिला अपूर्व यश प्राप्त झालें अशी माझी श्रद्धा आहे.

सेनापतींच्या ऐंशी वर्षांच्या आयुष्याचें एकच रहस्य मला जें दिसतें तें हें कीं काळाचीं चिन्हें ओळखण्याच्या कामीं एकदांहि कधीं त्यांच्या हातून चूक झाली नाहीं. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे प्रयत्न प्रारंभीं सशस्त्र

क्रांतिकारकांनीं सुरू केले. त्यांत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बरोबर सेनापति हे अग्रभागीं होतेच. त्यानंतर लोकमान्यांच्या स्वराज्याच्या मोहिमेंत ते दाखल झाले. अहिंसेच्या तत्त्वावर सेनापतींचा मर्यादित विश्वास असूनहि महात्मा गांधींच्या अनत्याचारी असहकाराच्या चळवळींत त्यांनीं हिरीरीनें भाग घेतला. १९१७ सालीं रशियांत क्रांति झाली आणि लेनीनची साम्यवादी राजवट आली. तेव्हां तिचें महाराष्ट्रांत जर कोणी स्वागत केलें असेल तर तें सेनापतींनीं.

ते म्हणाले, 'रशियांत कोट्यवधि श्रमजीवींच्या संसाराची होळी होत होती. तेथें आतां दिवाळी येत आहे. प्रत्येकाचा विकास होईल. सर्वांच्या जीवनांत आनंद व प्रकाश होईल.' असें म्हणून 'लेनिन–मिक्श्चर' म्हणजे डाळेंकुरमुरे खाऊन श्रमजीवी जनतेच्या क्रांतीचा तो दिवस त्यांनीं साजरा केला. नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनीं कॉंग्रेस सोडल्यानंतर जो 'फॉरवर्ड ब्लॉक' पक्ष काढला, त्यांत महाराष्ट्रांतून प्रथम जर कोण दाखल झालें असेल तर ते सेनापति. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यांत महात्माजींपेक्षां सुभाषचंद्रांचा वांटा जास्त आहे असें त्यांचें मत आहे.

स्वातंत्र्यासाठीं आपल्या सर्वस्वाचें हवन करणाऱ्या ह्या महापुरुषाच्या जीवनाला तेवढीच महत्त्वाची दुसरी बाजू आहे. गीतेचें तत्त्वज्ञान त्यांच्या रोमरोमांत भिनलें असल्यामुळें स्थितप्रज्ञतेच्या अवस्थेला जाऊन ते पोहोंचले आहेत. आज भारतांत त्यांच्याइतके अध्यात्माच्या उच्च भूमिकेवर वावरणारे फार थोडे पुरुष आहेत. साने गुरुजींनीं त्यांचें फार सुंदर वर्णन केलें आहे. "त्यांच्या सर्व कृतींत श्रीहरि भरलेला आहे. त्यांच्या जीवनाला देशभक्तीचा वास आहे. पण देशभक्तीला देवभक्तीनें अधिकच मधुर केलें आहे. सेनापतींची ओळख महाराष्ट्राला अद्याप व्हावी तशी झाली नाहीं. ते फुलाहून कोमल अन् वज्राहून कठोर आहेत. त्यांच्या ठिकाणीं वीराची वीरता अधिक आहे कीं संन्याशाची संन्यस्तता अधिक आहे हें मी काय सांगूं? ते निसर्गाप्रमाणें आज बनले आहेत. क्षणांत रडतील, क्षणांत हंसतील. सूर्यप्रकाशासारखे ते कोठेंहि जातील. जेथें जातील तेथें फुलवतील. मलिनता दूर करतील. देशाला आणि महाराष्ट्राला जागें करावयाला त्यांनीं सारें दिलें आहे. त्यासाठीं त्यांनीं पिस्तूल घेतलें, झाडू घेतला, लेखणी घेतली. अशांचें उतराई कसे होणार? सेनापति म्हणजे मला शिवाजी, रामदास व तुकाराम ह्यांची त्रिमूर्ति वाटते. सेनापति म्हणजे लोकमान्य, महात्माजी व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें अपूर्वमधुर मिश्रण वाटतें. भक्ति, ज्ञान व सेवा यांची ही त्रिपदा गायत्री आहे.'

यापेक्षां सेनापतींच्या महान् व्यक्तिमत्वाची अधिक समर्पक ओळख काय करून द्यावी? आपटे गुरुजींनीं अत्यंत तन्मयतेनें आणि भक्तिभावानें लिहिलेलें सेनापतींचें हें चरित्र महाराष्ट्राच्या भीष्माचार्यांचें यथार्थ दर्शन घडवील यांत काय शंका? सेनापतींच्या चरित्राचा उत्तरार्ध लिहावयाला आज आपटे गुरुजी हयात नाहींत याचें दुःख वाटतें. पण तें कार्य करण्यास कोणी तरी समानधर्मा पुढें येईलच.

शिवशक्ति
१२ नोव्हेंबर १९६०

प्रल्हाद केशव अत्रे

# सेनापति बापट-दर्शन

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | जनमनाला विजेचा धक्का | १ |
| २ | कोडें | ५ |
| ३ | व्रतबंधापूर्वी | ८ |
| ४ | स्वतंत्र देशाची हवा | १७ |
| ५ | सशस्त्र-क्रान्ति-पथावर | २५ |
| ६ | प्रत्यागमन | ३१ |
| ७ | अज्ञातवास | ३८ |
| ८ | परिस्थितीचें परीक्षण | ४९ |
| ९ | पुनश्च हरिः ॐ | ५६ |
| १० | पहिला सामुदायिक सत्याग्रह | ६३ |
| ११ | मुळशीचा लढा | ६७ |
| १२ | डावावरी डाव ते | ७७ |
| १३ | सेनापति-सूत्रचालक-सर्वाधिकारी | ८२ |
| १४ | से. बापट आणि येरवड्याचें कारागृह | ९० |
| १५ | सेनापतींचे संदेश | १०४ |
| १६ | मुळशीचा पूर्णविराम | १२२ |
| १७ | तत्त्वाकरितां तप | १३४ |
| १८ | तत्त्वाकरितां पुनश्च तप | १३७ |
| १९ | बलिदानाची उत्क्रांति | १४८ |

अनुक्रमांक
क्रमांक ....
ग्रं. क्र. १०२२०
... स्थळप्रत.
... दि: ...

# जनमनाला विजेचा धक्का

पुण्याच्या दैनिक त्रिकाळ पत्रांत ता. २२–५–१९३९ रोजीं ठळक अक्षरांत

*'सेनापति बापट जलसमाधि घेणार !'*

अशी बातमी प्रसिद्ध झाली. या बातमीबरोबर जलसमाधीची तारीख १३–७–१९३९ ही दिली होती. 'मुळामुठा नदीचा संगम' हें स्थळ सांगितलें होतें.

या बातमीनें पुण्याच्याच नव्हे तर सर्व महाराष्ट्रांतील जनतेला जबर धक्का बसला. वर्तमानपत्रांनीं स्फुटें लिहून बापटांना असें न करण्याविषयीं विनंती केली. पुष्कळांनीं त्यांना वृत्तपत्रांतून अनावृत्त पत्रें लिहिलीं. कोणी त्यांच्या या कृत्याला वेड्यांत काढलें, कोणी याला त्रागा म्हटलें, कोणी त्यांच्या जलसमाधीला आत्महत्या हें नांव दिलें. वर्तमानपत्रांत किंवा जाहीर सभेंत जे लिहीत नाहींत अथवा बोलत नाहींत अशा असंख्य जनतेनें, 'काय हा विक्षिप्तपणा !' असें आपल्या मनाशीं म्हटलें. हल्लीं पुढाऱ्यांत एकी नाहीं त्यामुळें स्वराज्य दुरावतें आहे, म्हणून राजकीय पुढाऱ्यांच्या हृदयाला हलवावें म्हणून सेनापति बापट हे जलसमाधि घेणार हें ऐकून 'एकीवर हा उपाय नव्हे' असें जो तो म्हणूं लागला. पुण्यास प्रचंड सभा भरून बापटांना असें न करण्याविषयीं विनंति करण्यांत आली.

एकीसाठीं पुढाऱ्यांच्या हृदयाला हलविण्याकरितां जलसमाधि घेणारा हा पुरुष लोकविलक्षण असला पाहिजे असें कोणालाही वाटेल. 'स्वातंत्र्याकरितां सशस्त्र क्रान्ति करावी' असें म्हणणारे बापट, जलसमाधीसारख्या आत्मक्लेशाच्या मार्गाचें अवलंबन कां करावयास सिद्ध झाले हें समजून घेण्यासारखें आहे.

हें चांगल्या रीतीनें समजून घेण्याकरितां सेनापति बापटांचें चरित्र अवलोकन केलें पाहिजे.

से. बापटचरित्राचा सर्वांगीण भव्यपणा उकलून दाखविणारा श्रेष्ठ ग्रंथ पुढें पाठीमागें निर्माण होईल; तेथपर्यंत आम्हांला बापट कसे दिसले हें पहाण्यास हरकत नाहीं.

"क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषयामतिः।
तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम्॥"

कविकुलगुरु कालिदासानें रघुवंश लिहिण्यास आरंभ करतांना म्हटलें आहे, कीं "कोठें सूर्यापासून उत्पन्न झालेला रघुवंश आणि कोठें लहानसहान विषयांत चालणारी माझी अल्पमति! मला वाटतें कीं मूर्खपणामुळें मी दुस्तर असा महासागर लहानशा होडींतून तरून जाण्याची इच्छा करीत आहें." कालिदासाचे हे शब्द वाचून विद्यार्थीदशेंत आम्हांला असें वाटलें कीं कालिदासानें हे शब्द केवळ विनयानें लिहिले आहेत. कारण रघुराजांचा यथार्थ गौरव कालिदासानें जितका प्रभावी वाणीनें केला आहे, तितका इतरत्र आपणांस क्वचितच आढळतो. परंतु आज से. बापट यांचें चरित्र लिहावयास आरंभ करतांना आमचे मनांत सेनापतींचें भव्य चरित्र उभें राहून तेंच कालिदासाचे शब्द आठवले. रघुराजाच्या शीलाची, पराक्रमाची परंपरा मनांत येऊन त्याचें चरित्र यथार्थपणें आपले लेखणींतून वठेल का, अशी क्षणभर शंका मनांत येऊन कालिदासानें हे शब्द विनयानें लिहिले नसून, रघुराजाच्या भव्य पराक्रमापुढें कालिदास खरोखरच विनम्र होऊन हे शब्द त्याच्या मुखांतून निघाले असावे. क्षणभर रघुराजाच्या तेजामुळें तो दडपला गेला असावा. पण ही त्याची स्थिति फार वेळ राहिली नाहीं. लगेच तो म्हणतो, 'प्राचीन कवींनीं आपल्या वाग्विभवानें रघुवंशांतील राजाचें चरित्र अगोदर वर्णून ठेवलेंच आहे. तेव्हां वेजें पाडलेल्या मण्यांत सूत्राचा जसा सहज प्रवेश होतो, त्याप्रमाणें या थोर पुरुषाच्या चरित्रांत मला प्रवेश करतां येईल.'

अगोदरच रघुवंशांतील राजांचीं चरित्रें जर प्राचीन कवींनीं आपल्या वाग्विभवानें लिहिलीं होतीं, तर कालिदासाला तीं पुन्हा वर्णन करण्याचें काय कारण होतें? थोडा विचार केला म्हणजे असें आढळून येतें कीं, थोर पुरुषांच्या चरित्राकडे पहाण्याची प्रत्येकाची दृष्टि भिन्न भिन्न असूं शकते व अशा भिन्न भिन्न दृष्टीनें लिहिलेलीं त्याच पुरुषांचीं चरित्रें भिन्न रुचि असलेल्या जनतेला आकर्षक वाटतात.

सेनापति बापटांचीं चरित्रें आज आमच्या माहितीप्रमाणें दोन उपलब्ध आहेत. एक लालजी पेंडसे यांचें व दुसरें श्री. बाळुकाका कानिटकर यांचें. बाळुकाकांनीं लिहिलेलें चरित्र बरेंच मोठें असून त्यांत बापटांच्या चरित्राची बहुतेक माहिती आली आहे. त्यांतून जी माहिती आज गाळली गेली आहे ती पुढेंमागें कदाचित् प्रसिद्ध होईल. आज या दोन चरित्रांच्या साहाय्यानें बापटवाङ्मयाचा परिचय करून घेऊन व त्यांत मला बापटांच्या सहवासाचा जो थोडासा लाभ मिळाला, त्याची भर घालून हें चरित्र लिहिण्याचें मी धाडस करीत आहें. धाडस म्हणण्याचें कारण असें कीं, बापटांचें चरित्र इतकें तेजस्वी व खोल आहे कीं त्याचा यथार्थ ठाव मला लागला आहे असें मला वाटत नाहीं. शिवाय बापटांच्या संबंधानें त्यांच्या चहात्या मंडळींत इतक्या अवास्तव कल्पना पसरल्या आहेत कीं त्या कल्पनांना अनुरूप असें चरित्र लिहावयाचें तर तें अरेबिअन नाईट्सपेक्षांहि अद्‌भुत प्रसंगांनीं नटवावें लागेल. थोर पुरुषांचें चरित्र अद्‌भुत नसतें असें नाहीं, पण त्यांचा अद्‌भुतपणा सामान्य जनतेच्या कल्पनेहून निराळ्या गोष्टींत असतो. त्यामुळें यथार्थ लिहिलेलें चरित्र पुष्कळदां जनतेला रोचक होत नाहीं. सामान्य लोकांच्या बापटांसंबंधानें ज्या ज्या अवास्तव कल्पना झालेल्या आहेत, त्याप्रमाणें आम्ही हें चरित्र लिहणार नसून आम्हाला बापट जसे दिसले, त्याला अनुसरून त्यांचें चरित्र कथन करण्याचा हा उपक्रम आहे.

हल्लींचा काळ स्वातंत्र्ययुद्धाच्या ऐन घाईगर्दीचा आहे. ज्यावेळीं हिंदी स्वातंत्र्याची कल्पना राष्ट्रीय वृत्तीच्या पुरुषांत उत्पन्न झाली त्या वेळेला स्वातंत्र्ययुद्धास आरंभ झाला असें म्हणूं. तो काळ आमच्या मतें चिपळूणकरांच्या निबंधमालेचा होय. हा काळ थोडाफार १९०८ सालापर्यन्त, काळ पत्रांतील शिवरामपंत परांजपे यांच्या अलौकिक वाग्विभवाचा होय. या काळात स्वातंत्र्याचे पोवाडे निर्माण झाले. स्वातंत्र्यवीराचीं गीतें गायली गेलीं. गुलामगिरीची चीड भेदक आणि उपरोधिक वाणीनें उत्पन्न करण्यांत आली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे युद्धाचा तो वासंतिक काल होय. या कालांत

"गातात सृष्टीचें सौंदर्य भाट ।
चैत्रवैशाखाचा ऐसा हा थाट ॥"

या काळांत आपल्याला चिपळुणकरांचें, काळकर्त्या परांजप्यांचें, खाडिलकरांचें, पूर्वीच्या भालाकाराचें वाग्वैभव दृष्टीस पडतें. अनेक कवींनीं व शाहिरांनीं ह्या काळात स्वातंत्र्यगीतें गाऊन, जनमन हालवून सोडलें. पुष्कळांना तें लिखाण

वाचून स्वातंत्र्याकरितां आत्मयज्ञ करण्याची इच्छा उत्पन्न झाली. कांहींनीं आपल्या संसारावर त्यागाचे निखारे ठेवले. कल्पनातीत हालअपेष्टा मोसल्या. पण तो काळ आतां राहिला नाहीं. आपण फार पुढें गेलों आहों. कवीच्या कल्पनेंतून आपण सत्यसृष्टीवर उतरलों आहोंत. चिपळूणकर—परांजप्यांची स्वातंत्र्याची कल्पना आज राहिलेली नाहीं. प्रतिक्षणीं ती वाढत आहे. हिंदभूला आतां शाब्दिक स्वातंत्र्य मिळवून भागणार नाहीं. इंग्रजांचे ऐवजीं उद्यां हिंदी लोक अधिकारी म्हणून आले, फार काय, पण उद्यां हिंदी मनुष्य व्हाईसरॉय झाला, तरी हिंदी जनता संतुष्ट होणार नाहीं. स्वातंत्र्य ह्या शब्दानें भुलून जाण्याचे दिवस आतां उरले नाहींत. या शब्दाच्या आत ज्या ज्या कल्पना येतात त्यांची विंचरणी दर दिवशीं होत आहे. व्यावहारिक स्वातंत्र्याचें सत्य स्वरूप आपल्याला दिसून आलें आहे. असें तें स्वातंत्र्य मिळविण्याच्या मार्गांत नुसते गोरे लोक उभे आहेत असें नाहीं. आपलेच ज्ञातिबांधव विविध दृष्टिकोन घेऊन त्या स्वातंत्र्याच्या आड क्षणोक्षणीं येऊन थडकत आहेत व स्वातंत्र्ययुद्ध अधिकाधिक बिकट करीत आहेत. अशा वेळीं भावनेचे कड किंवा शब्दांचे गुंजारव ज्यांत इतस्ततः भरपूर पसरले आहेत अशा तऱ्हेचें चरित्राचें लिखाण स्वातंत्र्ययुद्धांत प्रत्यक्ष काम करणाऱ्याला कितीसें मार्गदर्शक होणार?

"प्रसंग हा तडातडी<br>
करा विवेक तातडी।"

अशा वेळीं थोर पुरुषांच्या चरित्रांतून जे मार्गदर्शक गुण व प्रसंग आपणाला दिसतील तेवढेच घेऊन जर आपल्या मताप्रमाणें निरूपण केलें तर तें आजच्या काळांतील तरुणांना मार्गदर्शक होईल.

बापटांचा काळ बहुतेक संपलेला आहे आणि स्वातंत्र्ययुद्धाचा भविष्यकाळ त्यांच्या काळाहून निराळा आहे. अशा काळांत त्यांनीं जे जे उपक्रम केले ते अक्षरशः पुढच्या काळांत उपयोगी पडतीलच असें नाहीं. रामाचा धनुष्यबाण, शिवाजीची तलवार, किंवा समर्थांचे मठ आजच्या काळांत जरी उपयुक्त नसले तरी रामचरित्र, शिवचरित्र किंवा समर्थचरित्र आजहि आपल्याला उत्साह देतील इतकेंच नव्हे तर मार्गदर्शनहि करतील. थोर पुरुषांच्या चरित्रांतील मार्ग सदैव मार्गदर्शक नसले तरी त्यांच्या चरित्राचें रहस्यमय निरंजन मार्गदर्शक असतें. बापट हे अनेक दृष्टींनीं अलौकिक थोर पुरुष आहेत. महाराष्ट्रावर त्यांच्या चरित्राची विलक्षण छाप पडली आहे. स्वपक्ष परपक्ष, शत्रु मित्र या सर्वांस

त्यांच्याविषयीं एकसारखाच आदर आहे. ते कोणाचा ज्याप्रमाणें द्वेष करीत नाहींत तसेंच त्यांचाही द्वेष अगर मत्सर कोणी करीत असेल असें वाटत नाहीं. निदान त्यांच्याबद्दल वावगें लिहिण्याची वा बोलण्याची कोणाचीहि आज छाती नाहीं. कारण त्यांचें मन व चारित्र्य गंगाजलाप्रमाणें भव्य, उदात्त व निर्मल असें आहे.

# २

# कोडें

सेनापति बापट हे महाराष्ट्रीय राजकारणांत एक कोडें होऊन बसले आहेत. ते निश्चित कोणत्या पक्षाचे आहेत हें सामान्यतः सांगतां येत नाहीं. आपण कोणत्या पक्षाचे आहोंत याबद्दलची स्पष्ट कल्पना बापट यांना स्वतःला पूर्णपणें आहे, यांत संशय नाहीं. त्यांच्या बुद्धींत जरी गोंधळ नाहीं तरी देशांतील निरनिराळ्या पक्षांना त्यांचें कोडें पूर्णपणें उलगडलेलें नाहीं. त्यामुळें प्रत्येक पक्षास ते आपले आहेत असें वाटतें. पण लगेच बापटांच्या दुसऱ्या कांहीं कृति पाहून हे आपले नव्हेत असाही बोध होतो.

नवयुवकांना बापट हे ऐतिहासिक पुरुष वाटतात. त्यांचा बापटांशीं निकट सहवास असा क्वचितच आला आहे. एक प्रखर बुद्धिमत्तेचा, विलक्षण शौर्याचा, अद्‌भुत धडाडीचा, स्वार्थत्यागी क्रांतिकारक पुरुष एवढीच तरुणांची त्यांच्यासंबंधानें आज कल्पना आहे. कांहीं वर्षांपूर्वीं पुण्यास संगमावर ते जिवंत जलसमाधि घेणार होते, हें कांहीं तरुणांना माहीत आहे. परंतु एवढा मोठा लढवय्या कांहीं विशेष कारण नसतांना दिवसा उजेडी पाण्यात जीव देण्यास तयार होतो याचें कोडें तरुणांना पडलेलें आहे. त्यांच्याविषयीं आज आदर वाटतो, पण जवळ जाण्याचें धैर्य पुष्कळ तरुणांना होत नाहीं. यामुळें तरुणाचें कोडें तसेंच राहिलें आहे.

बापट हे नखशिखान्त खादीधारी आहेत. हरिजनांकरितां ते तळमळतात. गांधीजींना अत्यंत आवडीचें असें जें सफाईचें काम तें ते अविरतपणें करतात.

फुरसत सांपडली म्हणजे सूत काढण्यांत आनंद मानतात. शक्य तितके सत्यप्रतिज्ञ रहातात. मनांत येईल तें स्पष्ट बोलतात, या गुणामुळें गांधीवाद्यांना बापट आपले वाटतात पण—

"अहिंसा सदा सर्वदा सत्यधर्म।
असें मानिनी ते करीती अधर्म॥"

हे बापटांच्या तोंडचे खणखणीत उद्गार ऐकले कीं गांधीवाद्यांना ते आपले नव्हेत असें वाटतें.

सावरकरांबद्दल बापटांना आपलेपणा वाटतो. त्यांच्या गुणगौरवांत ते सामील होतात. हिंदुधर्माचा विलक्षण अभिमान त्यांचे ठिकाणीं आहे. केळकरांबद्दल अनुदार उद्गार त्यांचे तोंडून निघत नाहींत. मुंज्यांची मदत त्यांनीं अनेक वेळां घेतली आहे. शिवाय गांधींच्या अनासक्तियोगावर बापटांनीं प्रखर टीका केली आहे, हें पाहून हिंदुसभावाल्यांना बापटांबद्दल जिव्हाळा वाटूं लागतो न लागतो तोंच बापटांचें तिरंगी झेंड्यावरचें प्रेम, हिंदुमुसलमान एकी, गांधींकरितां प्राणांतिक उपोषण करण्याची तयारी हे प्रकार पाहिले कीं हा पुरुष आपला नव्हे, त्याच्याबद्दल आदर ठेवावा पण त्याला जवळ करूं नये, अन्तरंगांत तर घेऊंच नये, असें हिंदुसभावाल्यांना वाटल्यास नवल तें काय?

बापटांचा सशस्त्र क्रांतीवरील विश्वास, गरिबांबद्दलची विलक्षण कळकळ, भांडवलवाल्यांचा धनोन्माद उतरविण्याकरितां त्यांनीं केलेला अट्टाहास या गोष्टी पाहिल्या म्हणजे कम्युनिस्टांना वाटतें, बापट आपले आहेत बरें का? पण बापटांच्या तोंडांतून 'हरीची चाकरी' इत्यादि शब्दप्रयोग बाहेर पडले, सूत काढण्यात बापट घेत असलेला आनंद पाहिला म्हणजे कम्युनिस्टांना वाटतें कीं हा पुरुष गरिबांचा कैवारी असला तरी आपल्या पक्षांत खास बसत नाहीं.

बापटांनीं आजपर्यंत केलेलीं तीव्र भाषणें, सशस्त्र क्रांतीचा केलेला पुरस्कार, प्रसंगविशेषीं हातीं घेतलेलें पिस्तूल आणि बॉंबच्या कृति समजावून घेऊन त्याचा केलेला प्रसार या गोष्टी पाहून क्रांतिकारक म्हणविणाऱ्यांना त्यांची सलगी करावीशी वाटते पण बापटांचें गांभीर्य, उच्छृंखलपणाचा अभाव, निर्वाणीचा प्रसंग येईपर्यंत शस्त्र हातीं न धरण्याचा बाणा, मतभेदाचे प्रश्न शस्त्रानें सोडविण्यापेक्षां एकमेकांच्या समजुतीनें सोडविण्याकडे बापटांचा कल या गोष्टी दृष्टीस पडतांच क्रांतिकारक त्यांना आदरपूर्वक नमन करून दूर जातात.

एवंच काय, बापटांच्या घरीं पक्षभेदाची चावडी गाजत राहिली आहे असें

दिसावयाचें नाहीं. मोठमोठाले वेत करून त्यावर चर्चेचा कीस पडत आहे असें आढळावयाचें नाहीं. त्यांचे निःसीम भक्तही त्यांचेबरोबर गुप्त खलबतें करीत बसले आहेत असें कोणी पाहिलें आहे असें नाहीं. सर्व कारभार खुला. माणसें येतात, जातात पण सगळ्यांच्याजवळ मनमोकळेपणानें हसणें, बोलणें, थट्टामस्करी करणें असे प्रकार बापटांचे घरीं आढळून येतील. बापटांच्याबद्दल विलक्षण कल्पना घेऊन जो कोणी त्यांच्याकडे जातो, त्याला त्यांचें नित्य जीवन पाहून एक कोडेंच पडतें. हा पुरुष थोर आहे याबद्दल कोणालाच संशय राहात नाहीं, परंतु हा नक्की काय आहे हें मात्र सांगणें कठीण वाटून पुष्कळांना बापटांचें जीवन हें एक कोडेंच पडतें.

वरील विवेचन वाचलें म्हणजे बापट हे विलक्षण पुरुष आहेत, ब्रह्माप्रमाणें नेति नेति असेंच त्यांचें वर्णन आपणाला कदाचित् करावें लागेल. तरीपण कांहीं गोष्टींच्या व्याख्या करतां आल्या नाहींत तरी त्यांचें वर्णन करणें शक्य असतें. त्याप्रमाणें बापटांचा जीवनक्रम आत्तांपर्यंत कसा झाला, त्यांनीं कोणतीं कोणतीं वळणें घेतलीं, त्यांचें ध्येय कोणतें, व त्या ध्येयाप्रत त्यांचा जीवनौघ कसा जात आहे हें पहाणें ज्याप्रमाणें मनोरंजक होईल त्याप्रमाणेंच बोधप्रदही होईल. न सुटणारीं कोडीं मन शान्त केलें, दृष्टि सूक्ष्म केली, आपले पूर्वग्रह जरा बाजूला ठेवले म्हणजे सुटत नाहींत असें नाहीं. मोठमोठ्या लोकांना पडलेलें बापटांचें कोडें सोडवून पहाण्याचा आपण थोडासा प्रयत्न करूं या. थोरांच्या चरित्रांत शिरावयाचें तर आपली नेहमींची संकुचित वृत्ति जरा बाजूला ठेवली पाहिजे. विचारांच्या मंदगतीला थोडी अधिक चालना दिली पाहिजे आणि वारंवार कठीण गोष्ट समोर आली कीं, अडणाऱ्या बुद्धीला सूक्ष्म बनवून तिचे ठायीं आकलनशक्ति उत्पन्न केली पाहिजे म्हणजे थोरांच्या चरित्रांत आपला थोडाबहुत प्रवेश होऊं शकतो. समुद्राच्या मध्यावरचा खोलांतला खोल ठाव आपल्याला घेतां आला नाहीं, तरी किनाऱ्यापासून फार लांब नाहीं अशा समुद्रप्रान्ताचा ठाव घेणें अगदींच अशक्य नाहीं. आणि पाणबुडे अशी माहिती देतात कीं तुम्हांला सागरांतील रत्नें हवीं असतील तर फार दूरवर गेलेंच पाहिजे असें नाहीं. थोडीशी दमछाट केली व जरा धिटाईनें बुडी मारली तर पुष्कळशीं रत्नें हातीं येतात. तेव्हां बापटांसारख्या थोर चरित्राचें अवगाहन करण्याचें धाडस कां आपण करूं नये?

## ३

# व्रतबंधापूर्वी

हिंदुधर्मात मुलाची मुंज ८।९ वर्षांचे वेळीं करीत असतात. तो जर क्षत्रिय असला तर हा मुंजीचा काळ थोडा लांबतो. मुंजीला व्रतबंध असें एक नांव आहे. व्रतबंधापूर्वीचा बालकाचा काळ स्वच्छंदीपणाचा असतो. स्वच्छंदी म्हणजे स्वैर नव्हे. खावें प्यावें, इच्छेस येईल त्याप्रमाणें वागडावें, एखाद्या गोष्टीचा प्रसंग-विशेषीं आईबापांजवळ छंद घ्यावा, सवंगड्यांच्या चेष्टा कराव्या, कोठेंही जावें, बसावें, भीड ना भीति, अभ्यासाचा जाच नाहीं, आईबापांचें फारसें दटावणें नाहीं, त्यांतून जरा जर कोणी बोललें तर बालकाचें बल जें रोदन त्याचा आश्रय करावा, अशा कालांत बालकाच्या शरिराची अकुंठित अशी वाढ होत असते. मन निष्पाप असतें. भीतीमुळें उत्पन्न होणाऱ्या संकुचित वृत्तीची छाया तेथें पडलेली नसते. फक्त शरिराची वाढ करणें आणि संस्कारक्षम अशी बुद्धि स्वच्छ ठेवणें, एवढेंच निसर्ग या वयांत करीत असतो.

मुलगा ८।९ वर्षांचा झाला कीं त्याचे बोबडे बोल शुद्ध होऊं लागतात. त्याच्या-मध्यें पूर्वीचा मोकळेपणा जरा कमी होऊं लागतो. भीतीची कल्पना त्याला यावयास लागली म्हणजे त्याच्यावर संस्कार करण्याची वेळ आली, विद्याग्रहणास तो पात्र झाला, असें समजून गुरुजन त्याची मुंज अथवा व्रतबंध करतात. त्याच्या-मागें शरीरशुद्धीचे, मनःशुद्धीचे आणि वाणीशुद्धीचे नियम लावून देतात, आणि त्या नियमबंधनांतून पुढें त्याचें तेजस्वी आयुष्य निर्माण होतें.

बापटांचें मौंजीबंधन लौकिकरीत्या वयाच्या ८।९ वर्षी झालें असलें तरी त्यांच्या जीवनाच्या खऱ्या व्रतबंधाचा काळ ते बी. ए. च्या वर्गांत गेल्यावर आला. म्हणून बापटांमध्यें बालपणाचा जो हूडपणा ३ ऱ्या ४ थ्या वर्षीं सुरू झाला तो बी. ए. च्या वर्गांत जाईपर्यंत कायम होता. त्यांच्या जीवनाला वळण असें कांहींच नव्हतें. त्यांच्या जीवनांतील या काळांत पूर्वयोजना अशी कांहींच नव्हती. म्हणून या प्रकरणाला आम्ही व्रतबंधापूर्वी असें नांव दिलें आहे. या काळांत बापट कसे वागलेसवरले हे आतां आपण क्रमाक्रमानें पण जलद गतीनें पाहूं. आपणाला त्यांच्या बाललीलाचें वर्णन करावयाचें नाहीं, किंवा त्यांच्या हातून घडलेल्या

प्रत्येक बारीकसारीक कृतींत मोठेपणाचा शोध करून हातीं लागलेल्या कणांना मोठें बनवून दाखवावयाचें नाहीं. या कालांत हिंडतांना जर कांहीं थोडे सुवर्णकण आपल्या हातीं लागले तर तेवढेच आपण काळजीपूर्वक टिपून घेऊं.

बापटांचा जन्मता. १२ नोव्हेंबर १८८० रोजीं झाला. त्या दिवशीं कार्तिकी एकादशी असल्यामुळें पुष्कळांना तो दिवस शुभ वाटण्याचा संभव आहे. कारण त्या दिवशीं देवावर आलेलें संकट एकादशी देवीनें स्वपराक्रमानें दूर केलें, अशी पुराणांत कथा आहे. दैत्यांच्या दंडनीतीमुळें त्रासून देव एका गुहेंत जाऊन बसले होते. तेथें सर्वांच्या श्वासामधून एकादशी निर्माण झाली. हा प्रकार थोडासा अद्‌भुत वाटण्याचा संभव आहे. परंतु पुराणांत ज्या कथा आहेत त्या पुष्कळशा लक्षणानें सांगितलेल्या असतात. त्यांचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नसतो. आज आपल्या राष्ट्रांत पारतंत्र्याला त्रासून यांतून सुटका कशी होईल याबद्दल पुष्कळ लोक एकत्र जमून बोलत असतात. त्यांच्याच तीव्र श्वासांतून ऊर्फ भावनेंतून टिळक-गांधी-बापट निर्माण झाले असें जर कोणी म्हटलें तर तें अगदींच वावगें होणार नाहीं. एकादशी जशी देवांच्या श्वसनांतून निर्माण झाली, तसेंच बापटही महाराष्ट्राच्या निःश्वसनांतून निर्माण झाले अशी कोणी कल्पना केली तर ती अगदींच चुकीची असें आपण म्हणणार नाहीं.

बापटांचा जन्म नगर जिल्ह्यांतील पारनेर गांवीं झाला. दौंडपासून मनमाड-पर्यंतचा भूप्रदेश हा गंगा, प्रवरा, भीमा इत्यादि नद्यांनीं पवित्र करून सोडला आहे. अनेक साधुसंतांनीं आपला तपश्चर्येचा काल याच ठिकाणीं घालविला. फार काय सांगावें, मराठी भाषेचें अद्‌भुत लेणें जी ज्ञानेश्वरी ती पारनेरपासून फार दूर नसलेल्या नेवासें गांवांतच लिहिली गेली. नाहीं म्हटलें तरी निसर्गाचा आणि प्रांताचा इतिहास मनुष्याच्या जीवनावर थोडातरी परिणाम करतोच. त्याप्रमाणें बापटांवरही तो थोडाबहुत झाला असला पाहिजे. बापटांचे वडील महादेवराव अथवा दादा सब रजिष्टरखात्यांत नोकर होते. ते करारी स्वभावाचे असल्यामुळें अधिकाऱ्यांशीं त्यांचें सूत फार दिवस रहाणें शक्य नव्हतें. एके दिवशीं वरिष्ठांशीं फाटून बापटांचे वडील राजिनामा देऊन पारनेर गांवाजवळ असलेल्या डोंगरांतल्या एका देवळांत जाऊन बसले. त्यांनीं एकदां जें घर सोडलें तें कायमचेंच. सारा जन्म त्यांनीं गणपतीच्या आराधनेंत घालविला. वडील जमदग्नीचा अवतार तर आई गंगाबाई अत्यंत सालस व गरीब. बापटांमध्यें या दोन्ही गुणांचा संयोग आपणाला पहावयास मिळतो. ते जितके तापट तितकेच गरीब व ममताळू आहेत.

*विद्याभ्यास*

रीतीप्रमाणें योग्य वेळीं ते शाळेंत गेले. ८–९ वर्षीं त्यांची मुंज झाली. पुढें वडिलांच्या एका मित्राच्या आग्रहावरून त्यांना इंग्रजी शिकवायचें ठरलें. तो अभ्यास बापटांनीं येवल्याचे डॉ. साठये यांच्या मदतीनें केला. पण घरीं अभ्यास कितीसा होणार ? मित्रानें बापटांची बुद्धिमत्ता पाहून पुण्यास आपल्या घरीं ठेवून घेण्याचें सुचविलें. अशा रीतीनें १८९७ सालपर्यंत बापटांचें इंग्रजी ६ वी पर्यंत न्यू स्कूलमध्यें शिक्षण झालें. श्री. अण्णासाहेब भोपटकर वगैरे मंडळी त्यांची सहाध्यायी होती. १८९७ सालच्या प्लेगमध्यें चिंतोपंत देव वारले. त्यामुळें बापट पुनरपि घरीं आले. दोन वर्षें अशींच गेलीं. वडील सदैव गणपतीच्या पूजेअर्चेंत दंग. घरीं वडील माणसांचा विशेष धाक नाहीं आणि बापटांचा मूळचा स्वभाव खेळकर, खोडकर आणि थोडासा भटक्या; यामुळें कांहीं काळ हे कुसंगतींत बुडतात कीं काय असें आप्तेष्टांना वाटूं लागलें. परंतु जो दैवी संपत्ति घेऊन आला तो आड-मार्गांत फार वेळ रहात नाहीं. तो लवकरच आपलें ध्येय ओळखतो. तसेंच बापटांच्या बाबतींत झालें. आपण घसरत आहोंत असें त्यांस दिसून येतांच ते सावध झाले आणि अभ्यासास मनापासून लागले. मग काय ! आगगाडी एकदां रुळांवर आल्यावर, मग ती वेगानें कां बरें चालणार नाहीं ? नंतरच्या थोड्या काळांत बापटांनीं खूप चांगला अभ्यास केला व १८९९ सालीं मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. संस्कृत स्कॉलरशिप मिळेल अशी त्यांना कल्पनाही नव्हती. जग-न्नाथ शंकरशेटची संस्कृत स्कॉलरशिप जेव्हां त्यांना मिळाली तेव्हां त्यांचा खूप बोलबाला झाला. मुंबई युनिव्हर्सिटींत ह्या स्कॉलरशिपला फार महत्त्व दिलें जातें. ही मिळविण्यासाठीं पुष्कळ हुशार मुलांची धडपड चालू असते. यामुळें ती ज्याला मिळते, त्याचा लौकिक चटकन होतो. तसेंच बापटांचें झालें. डेक्कन कॉलेजांत १९०० सालच्या आरंभाला त्यांनीं जेव्हां प्रवेश केला त्यावेळीं संस्कृत स्कॉलर म्हणूनच विद्यार्थ्यांत त्यांची ओळख झाली. कॉलेजांतील पुढील चार वर्षांत त्यांनीं एकामागून एक परीक्षा दिल्या आणि ते १९०३ सालीं डिसेंबर महिन्यांत बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. ह्या काळांत बापटांनीं काय केलें ? त्यांनीं कांहीं विशेष कमावलें असें नाहीं. मागें म्हटलेंच आहे कीं, बापटांचा मूळचा स्वभाव एक नंबरचा खेळाडू, अचपळ, थोडासा खोडकर. मनसोक्त खेळावें, सवंग-ड्यांच्या खोड्या काढाव्या, रात्रीं गप्पा मारून जागरणें करावीं, कोठें अन्याय दिसला तर न्यायाची बाजू घेऊन खूप भांडावें, चळवळ करावी, इतके सगळे उद्योग करूनहि जो वेळ राही त्यांत मग पुस्तकाकडे पहावें. बापटांच्या डोळ्यांकडे

जर पाहिलें, तर त्यांची दृष्टि भेदक आहे हें स्पष्टपणें कळतें. त्यांना कोणी सहसा फसवूं शकत नाहीं, माणसाची परीक्षा ते सहज करतात. मनुष्याचें मन वाचणें ही गोष्ट सर्व विद्यांत अत्यंत अवघड. ती ज्याला सहज साध्य, त्याला सामान्य विषयांचे अभ्यास सहज साधले असल्यास नवल तें काय? या ठिकाणीं असा एक प्रश्न येतो कीं, बापट जर उनाड होते तर त्यांचा अभ्यास सहजासहजीं कसा झाला? मन एकाग्र झाल्याशिवाय अभ्यासही नीट होत नाहीं, हें आपण सर्व जाणतों आणि उनाड मुलाचें मन एकाग्र करून घेणें ही अत्यंत कठीण गोष्ट. मग बापटांच्या बाबतींत असें कसें झालें? पुस्तकें चाळतां चाळतां त्यांना विषय आकलन करतां आला, आणि खेळांत गुंतलेल्या बुद्धीला वाचलेले विषय धारण करणें कसें शक्य झालें, असा प्रश्न उत्पन्न होतो. या ठिकाणीं आपण एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं उनाड मुलांत सर्व उनाड मुलें सारखीं नसतात. उनाडा उनाडांत देखील फरक असतो. चोर दरवडेखोरांत देखील आपण फरक पहातों ना! कांहीं चोर द्रव्यलालसेनें चोरी करतात, तर कांहीं गरिबांचे कैवारी म्हणून सावकारांना लुटतात, मारवाड्याचीं नकें कापतात व मिळविलेल्या धनाचा ते गरिबांकरिता विनियोग करतात. उनाड मुलें देखील दोन प्रकारचीं असतात. काहीं मुलें खेळांत जीं रमतात तीं त्यांतून निघूंच शकत नाहींत. खेळावर त्यांची आसक्ति असते. खेळ सोडून त्यांनीं पुस्तक हातीं घेतलें तरी त्यांच्या नजरेसमोरील खेळाची कल्पना जात नाहीं. हातांत नांवाला पुस्तक धरतील व चित्त असेल पुढच्या खेळाच्या रचनेंत गुंतलेलें. अशा मुलांना खेळासक्त म्हणतां येईल.

### *अनासक्त स्वभाव—*

बापट या वर्गांतील नव्हते. बापट खेळत, हिंडतफिरत, याचें कारण त्यांच्या अंगांत उपजत मोठें चैतन्य आहे. तें चैतन्य त्यांना एके जागीं स्थिर राहूं देत नाहीं. असें जरी आहे तरी एखाद्या विषयाच्या ठिकाणीं कांहीं जणांची जशी आसक्ति असते तशी त्यांची कोणत्याच गोष्टींत नसे. कोणी खेळावयाला बोलावलें खेळत रहातील, पोहावयास बोलावलें पोहत रहातील. कोणी त्यांतून गप्पा काढल्या तर घरीं जेवावयास जावयाचें आहे ह्याचें भानही त्यांस रहाणार नाहीं. 'पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा!' खेळावयास किंवा गप्पा मारावयास कोणी नाहीं असें पहातांच ते पुस्तक हातीं घेतात व त्यांत खेळांइतकेच रममाण होतात. जितक्या एकाग्र चित्तानें ते टेनिसचा खेळ खेळत किंवा जितक्या



मराठी ... ... ग्रंथालय.

मन लावून ते नदींत बुड्या मारीत तितक्याच एकाग्रतेनें ते संस्कृत अगर गणिताचें अध्ययन करीत आणि तेथें त्यांची सहज समाधी लागे. अशा विद्यार्थ्यानें केलेलें थोडें वाचन परीक्षा पास होण्यास पुरें झालें असल्यास नवल तें काय ? बापटांची स्मरणशक्ती वा एकाग्रता जितकी असामान्य तितकीच त्यांची विवेचक बुद्धीहि असाधारण आहे. तत्त्वग्राही मन विषयांचा भेद करून त्याचा ठाव पाहिल्याशिवाय रहात नाहीं. त्याप्रमाणें बापटांचें प्रत्येक विषयांतलें अध्ययन हें खोल बुडी मारून ठाव घेणारें होतें. त्यामुळें त्यांची छाप इतरांवर पहातां पहातां पडे. इतर मुलांना साहजिकच आश्चर्य वाटे कीं, सारा दिवस उनाडकी करणारा हा मुलगा थोडा वेळ पानें चाळतो काय आणि रात्रंदिवस अभ्यासांत गढलेल्या मुलांना मागें टाकून पुढें जातो काय ? सामान्य बुद्धीचे विद्यार्थी अभ्यास खूप करतात. अभ्यासांत पुष्कळ वेळ घालवितात. पण त्यांचें अध्ययन खोल नसून वरवरचें असतें. वाईटच उपमा द्यावयाची तर ते पुस्तकांतील माहिती गिळतात व परीक्षेंत ती ओकतात. आणि बापटांसारखे तत्त्वग्राही विद्यार्थी पुस्तकांतील माहिती एकाग्रतेनें ग्रहण करतात, विवेचकशक्तीच्या पाचकरसांत ती कालवून तिचें रक्त बनवून तिचें परिवर्तन स्वतंत्र विचारांत करून ते जगाला देतात. यामुळें पुस्तकांतील तीच माहिती वाचकाला अभिनव वाटते व चटका लावते. बापटांनीं थोड्या वेळांतच सहाध्यायी तरुणांची अशी खात्री पटवून दिली कीं, ही व्यक्ति असामान्य कोटींतील आहे. अभ्यासाची गोष्ट सोडली तरी दुसऱ्याहि बाबतींत बापटांनीं डेक्कन कॉलेजांतील मंडळींचीं मनें आपल्याकडे वेधून घेतलीं होतीं. त्यांचा सत्यवक्तेपणा, फटकळपणा, आणि तितकाच प्रेमळपणा अनेकांच्या अनुभवास आला. त्यामुळें कांहींचें प्रेम त्यांच्यावर बसलें तर कांहींना त्यांची भीति वाटली. गुरुजनांना त्यांच्या बुद्धीचें व स्पष्टपणाचें कौतुक वाटे. पण प्रसंगीं हा आपलाही मुलाहिजा ठेवणार नाहीं अशी त्यांना धास्ती वाटत होती. अनेकदां टोपी न घालण्याच्या क्षुल्लक प्रकरणावरून कॉलेजांतील प्रोफेसरांची हजेरी घेण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. यामुळें त्यांस वसतिगृहांतून सहा महिने बाहेर रहावें लागलें.

इकडे अधिकाऱ्यांच्या रागाचा पारा जितका वर चढला होता तितकाच दुसरीकडे त्यांच्या मित्रांच्या सहानुभूतीचाही पारा चढून या कठीण काळांतील बापटांचे दिवस हां हां म्हणतां लीलेनें निघून गेले. 'जे गुण बाळा ते जन्मकाळा' अशी आपल्यांत एक म्हण आहे. आजही ते सरकारला जितके भयंकर वाटतात तितकेच ते लोकांच्या आदरास पात्र झाले आहेत.

वर सांगितलेंच आहे कीं बापटांनीं आपल्या गुणांनीं अनेकांचीं मनें

आपल्याकडे वेधून घेतलीं होतीं. कांहीं त्यांच्या शीलाचें कौतुक करीत. कांहीं म्हणत, एवढी बुद्धिमत्ता हा मुलगा टेनिस खेळून फुकट घालवितो. कोणी म्हणत. फटकळपणामुळें यांनीं आपली भावी उत्कर्षाची संधी फुकट घालविली आहे, तर कांहींजण त्यांच्या बाणेदारपणाची वाखाणणी करीत. सर्वत्र गुलामी वृत्ति पसरली असतां हा तेजस्वी पुरुष आपली मान वर ठेवूं शकतो ही काय लहानसहान गोष्ट आहे ?

## *आशास्थान*

बापट ज्याप्रमाणें लोकांचे नजरेंत भरले, चर्चेचे व रागालोभाचे विषय झाले, त्याचप्रमाणें कांहींचें आशेचें स्थानही झाले होते. सेल्बी वगैरे प्रोफेसरांस वाटे, हा विद्यार्थी मनांत आणील तर बी. ए. त पहिला नंबर पटकावून कॉलेजचें नांव काढील. पण —? हा मनांत आणील तर ना! सहाध्यायी मित्रांना वाटे कीं हा मनांत आणील तर आय्. सी. एस्. होऊन जाईल. पण ह्याचें मन वळवावें कोणी? त्याच्याजवळ जरा गंभीरपणानें बोलायला जावें, तर तो पडतांपडतां आपल्यालाच उडवून देतो. दुसरे कांहीं विद्यार्थी तेथें होते. ते परिस्थितीचा, विशेषतः देशाच्या गंभीर परिस्थितीचा, गांभीर्यानें विचार करीत. आपली मायभू पारतंत्र्यांत आहे. आम्ही तिचे पुत्र तरुण आणि सुदृढ आहोंत. तिचे पाश तोडणें आमचें कर्तव्य नाहीं काय? ते पाश तोडावयाचे मनांत आणलें, तरी ते काय सामान्य आहेत? अनेकांनीं एकत्र येऊन गांभीर्यानें विचार केला पाहिजे, धोरण ठरविलें पाहिजे, संघटणेचीं जाळीं पसरविलीं पाहिजेत, तेव्हां कोठें कार्याला आरंभ होतो. ही संघटना करावयास असामान्य शक्तीचा पुरुष पाहिजे. तो कोठें बरें मिळेल? असा विचार करतांना त्यांच्या दृष्टीपुढें कधीं कधीं बापटांची मूर्ति उभी राही. मग त्यांना वाटे, होय. पाहिजे तसाच पुरुष आहे हा. पण हातीं लागेल तेव्हां खरा. तो गंभीर विचार करावयास थांबतो तरी कोठें? खेळण्याखिदळण्यांत तो आपलें अमूल्य आयुष्य खर्च करीत आहे. क्षणभरही परिस्थितीचा विचार करीत नाहीं. घोडें गुणाचें, पंचकल्याणी आहे, ह्यांत संशय नाहीं, परन्तु फार अवखळ. त्याला गाडीला जुंपावयाचें कसें व कोणी? असा विचार अनेकदां कांहीं मंडळींत चाले. शेवटीं एका धाडसी माणसानें तें काम आपल्या हातीं घेण्याचें ठरवलें. तो म्हणाला, 'मी जाळें टाकतों, पाहूं या मासा हातीं लागला तर.' त्याला यशाची फारशी खात्री नव्हती. तरी पण निश्चयी धाडस त्याचे ठिकाणी होतें व एक दिवस त्यानें बापटांना गांठलेंच. बापटांच्या पाठीवर त्यानें हात मारून त्यांना आपल्या खोलींत नेलें,

दाराला कडी घातली आणि निश्चयी व धीरगंभीर स्वरांत बोलण्यास आरंभ केला. बापट म्हणजे साऱ्या मुलुखाचे खट्याळ. पण बोलणाऱ्या व्यक्तीच्या गांभीर्यानें तेही एकदम गंभीर झाले व मग तो जें जें बोलला तें तें त्यांनीं एकाग्र मनानें, मन व हृदय मोकळें ठेवून ऐकलें. तो गृहस्थ नक्की काय शब्द बोलला हें कोण बरें सांगूं शकणार? प्रत्यक्ष बापटांनाही ते शब्द सांगतां येतील असें नाहीं. कारण जगाला सांगण्याकरितां म्हणून त्यांनीं ते शब्द ऐकलेच नव्हते. बोलणाऱ्याच्या मनाशीं ते एकरूप झाले होते. मातेच्या स्तनाला भुकेलें बालक लागलें, म्हणजे तिच्या हृदयांतील पयाचा प्रवाह बालकाच्या पोटांत कसा उतरतो ह्याची आठवण बालकाला कोठें रहातें बरें? तो तें ग्रहण करण्यांतच इतका गुंग झालेला असतो कीं स्तनांतून दूध निःशेष होईपर्यंत त्याला जगाचें भानच रहात नाहीं. तीच स्थिति त्यावेळीं बापटांची झाली होती. त्यावेळीं आकाशांत प्रलय-कालचा झंजावात जरी सुटला असता, किंवा पुष्पक आणि आवर्तक या नांवाच्या प्रचंड मेघांनीं पृथ्वी दुभंग करणारा गडगडाट केला असता तरी बापटांना तो ऐकूं आला नसता; इतके ते त्या पुरुषाच्या मनाशीं तन्मय झाले होते. दिव्यावर दिवा लागावा त्याप्रमाणें त्या पुरुषाच्या देशाभिमानाची जिवंत ज्योत बापटांच्या जीवनाचे वातीस लागून ती जी एकदां पेटली ती आज ४० वर्षें अखंड तेवत आहे. अशी ज्या वाणीची शक्ति ती किती प्रभावी असेल बरें? त्या पुरुषानें नक्की काय म्हटलें हें जरी सांगणें अशक्य असलें तरी त्याचा भावार्थ कांहींसा असा असावा. 'तात्या, तूं काय करतो आहेस? सभोंवार देशाला आग लागली आहे, ती तुला दिसत नाहीं काय? ती दिसत असती तर तूं खेळांत दंग झाला नसतास. खोड्या काढण्यांत आनंद मानला नसतास. तुला देवानें अपूर्व बुद्धिमत्ता व शक्ति दिलेली आहे. ती एक ठेव तुजकडे आहे. तिचा योग्य उपयोग न करशील तर कर्तव्य न करणाऱ्या ट्रस्टीला जी शिक्षा होते त्याच्या अनंतपट शिक्षा देव तुला केल्याशिवाय राहील काय? चल, ऊठ. उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान् निबोधत। मी सांगतों ती शपथ घे व आपलें मातृभूमी-संबंधीं कर्तव्य करण्यास लाग. हा संधिकाल आहे. मारीच आणि सुबाहु दैत्यां-पासून यज्ञाचें रक्षण करण्याकरितां रामलक्ष्मणांना ज्यावेळीं बला-अतिबला विद्यांची विश्वामित्र ऋषींनीं दीक्षा दिली तो काळही असाच संधिकाळ होता. सूर्य आपलें कर्तव्य करून देशाची भीषण परिस्थिति अवलोकन करून तुम्हाला जागृत रहा-ण्याविषयीं संदेश देऊन जात आहे. चल उठ, आणि सूर्याला साक्षी ठेवून शपथ घे कीं आजन्म माझा देह, बुद्धि व मन हीं मी देशाला देईन आणि त्याची

सेवा करतांना येणाऱ्या सर्व विपत्ती आनंदानें सोशीन. अखंड देशसेवा हा माझा मंत्र आणि तो मंत्र सिद्ध करण्याचें साधन म्हणजे मी तुला ही जी समशेर देतों ती होय,' असें म्हणून त्या पुरुषानें बापटाच्या हातीं समशेर दिली. त्यांनीं ती निमूटपणानें ग्रहण करून आजन्म सेवेचें व्रत त्या शुभकालीं घेतलें.

*ओघ बदलला*

तो दिवस व तो संधिकाल बापटांना आपल्या आयुष्यांतील जीवनाला कलाटणी देणारा वाटला. त्याच्याइतका पवित्र दिवस त्यांना दुसरा कोणताही वाटत नाहीं असें दिसतें. त्या प्रसंगाची आठवण झाली म्हणजे बापटांचा ऊर अजूनही भरून येतो. त्या प्रसंगाला अनुलक्षून ते म्हणतात,

**विधि झाला दिनकरीं,**
**दीक्षा मज दिली तयें।**
**मांगल्यमय तें नातें,**
**केलें श्रीहरिनें स्वयें॥**

ह्या क्षणापासून बापटांचें तेज अलौकिक रीतीनें चमकूं लागलें. एखाद्या हिऱ्याला पैलू पाडून त्याचें तेज प्रकट करावें, तसें या विधीनें केलें. देशसेवेचें पाणिग्रहण याच क्षणीं त्यांनीं केलें आणि या वधूला त्यांनीं सर्वस्व अर्पण केलें. देशसेवा, जनसेवा, यांचें त्यांना या वेळेपासूनच वेड लागलें. यानंतर त्यांनीं सांसारिक गोष्टींकडे लक्ष असें दिलेंच नाहीं. ते प्रेमवेडे झाले. आणि हें वेड आज ४० वर्षें सतत टिकून आहे. बापटांच्या जीवनांत अनेक लहानमोठे प्रसंग येऊन गेले आहेत. परंतु त्या प्रसंगांनीं निर्माण केलेले अनेक रस हे एका देशप्रेम रसाभोंवतींच फिरत असतात, असें त्यांच्या जीवनाकडे बघून वाटतें. त्यांचें देशप्रेम किती भावनामय व उत्कट आहे याची कल्पना सामान्य माणसाला यावयाची नाहीं. त्यांच्याच सारखीं कोणत्या तरी प्रेमानें वेडीं झालेलीं माणसें आपण जर बघितलीं, तरच बापटांच्या प्रेमाची कांहींशी कल्पना आपणांस येऊं शकेल. आपण प्राचीन कालचें उदाहरण घेतलें तर सावित्रीचें घेतां येईल. ज्याक्षणीं तिनें सत्यवानाला प्रथम पाहिलें व मनानें त्याला वरलें, तो क्षण तिनें परम मांगल्याचा मानला आणि त्यानंतर तिच्या सत्यवानावरील प्रेमाच्या आड ज्या ज्या गोष्टी आल्या त्यांना तिनें धैर्यानें तोंड देऊन आपलें सत्त्व राखलें.

तुकाराम महाराज आपल्या पांडुरंगभक्तीचें वर्णन करतांना देखील पतिव्रता स्त्रियांच्या प्रेमाची उपमा घेत ते म्हणतात,

"पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण ।
आम्हा नारायण तैशा परी ॥"

रामदास स्वामी अनेक ठिकाणीं म्हणतात,

"मज रघुनाथा वेगळें कांहींच प्रिय नाहीं ।"

ही भाषा हृदयाच्या खोल खोल जागेंतून निघाली आहे. बापटांचें देशप्रेम वरील जातीपैकींच आहे. त्याची वाच्यता ते सहसा करीत नाहींत. पतिव्रता स्त्री आपल्या पतीच्या नांवाचा जप मनांत करीत असली तरी त्याची वाच्यता ती सहसा करीत नाहीं. तिचें प्रेम हें तिच्या कृतींत अनेक अंगांनीं व्यक्त होतें. तसेंच बापटांचें झालेलें आपणास दिसतें. आतां यापुढें त्यांच्या जीवनांत आपणाला ते देशप्रेमानें मत्त झालेले दिसतील. अशा माणसांच्या बारीकसारीक कृतींची तार्किक छाननी करावयाची नसते. दूर उभें राहून त्यांचा आपल्या ध्येयाशीं जो सुखसंवाद चालतो तो ऐकावा व पुनीत व्हावें. त्यांच्याकडे सहानुभूतिपूर्वक जर पहाण्याची आपण संवय केली तर मात्र आपलें जीवनही पवित्र झाल्याशिवाय रहाणार नाहीं. सहानुभूतीचा अर्थ मात्र आपण समजावून घेतला पाहिजे. येथें तिचा अर्थ अनुकंपा नव्हे. अनुकंपेनें बापटांच्या चरित्राकडे पहाण्याचें कारणच नाहीं. सहानुभूति म्हणजे सह अनुभूति. बापटांना सहानुभूति दाखवावयाची म्हणजे त्यांच्या भावनेबरोबर आपण जावयाचें व त्यांच्याबरोबर त्यांना उत्पन्न होणाऱ्या संवेदना अनुभवावयाच्या. हें काम पहिल्यानें जरी थोडें कठीण वाटलें, तरी आपणामध्यें चित् अंश असल्यामुळें त्यांच्या भावनेशीं समरस होण्याला आपणाला फारसा वेळ लागणार नाहीं.

महाविद्यालयांतील बापटांचा काल असाच फुकट जातो कीं काय अशी भीति होती. परन्तु शेवटच्या क्षणीं कां होईना, त्यांच्या जीवनाचा ओघ पार बदलून टाकण्याचा प्रसंग आला. गंगानदी प्रथम पश्चिमवाहिनी होती. परन्तु एका महान् तपस्व्याच्या प्रचंड उद्योगानें तिचा ओघ बदलला. ती पूर्ववाहिनी झाली व मग तिनें उत्तर हिंदुस्थानचा प्रदेश सुपीक करून टाकून अनेक जीवांचा ती आधार बनली. बापटांच्या जीवनाचा ओघही असाच १९०३ सालीं बदलला व हा पवित्र गंगौघ ४० वर्षें "राष्ट्रीय दुर्गुण धूत चालला मोक्षसागराकडे" असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# ४

# स्वतंत्र देशाची हवा

रघूच्या अभ्यासक्रमाचें वर्णन करतांना कालिदास म्हणतो, रघूनें लिपी शिकल्यानंतर, नदीमुखांतून ज्याप्रमाणें समुद्रांत प्रवेश करावा, त्याप्रमाणें वाङ्मयांत प्रवेश केला. बापटांचें बी. ए. चांगल्या रीतीनें पास होणें, हें त्यांचा पुढील मार्ग खुला करून देण्यास कारणीभूत झालें. परीक्षा पास झाल्यावर एम्. ए. अगर एल्एल्. बी. चा अभ्यास करण्याचा बापटांचा बेत ठरला. रोजच्या खर्चाकरितां आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंत त्यांनीं नोकरी धरली. इतक्यांत कोणीतरी त्यांना विलायतेला शिक्षणार्थ जाण्याकरितां मंगळदास नथूभाईंनीं स्कॉलरशिप ठेवली असल्याचें सांगितलें. जास्त चौकशीअंतीं असें कळलें कीं ही शिष्यवृत्ति औद्योगिक शिक्षणाकरितां ठेवली आहे. वाङ्मयापेक्षां औद्योगिक शिक्षणाची आपल्या देशाला अधिक गरज आहे, हें ध्यानांत घेऊन बापटांनीं त्या शिष्यवृत्तीकरितां अर्ज केला व मेकनिकल इंजिनिअरिंग हा विषय निवडला. योगायोगानें सर्व जमून त्यांना ती शिष्यवृत्ति मिळाली. त्याच्या भरीला हिंदु एज्युकेशन फंडांतून कांहीं साहाय्य मिळालें. तें देण्यांत लो. टिळक व कै. नानासाहेब देशमुख यांचा हात होता. टिळकांचें लक्ष नेहमीं बी. ए. पास होणाऱ्या हुषार विद्यार्थ्यांवर असे. बापटांच्या हुषारीची व बाणेदार स्वभावाची माहिती टिळकांना होतीच. म्हणून त्यांनीं त्यांच्या हातीं असलेल्या हिंदु एज्युकेशन फंडांतून मदत देवविली. बापट त्या मदतीच्या आधारावर विलायतेला गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं स्कॉटलंड देशांतील एडिंबरो गांवच्या एका सुप्रसिद्ध यंत्र विद्यालयांत नांव घातलें आणि तेथें राहून अभ्यास करण्यास आरंभ केला.

### *विलायती वातावरण*

हिंदुस्थानपेक्षां विलायतचें वातावरण अगदीं भिन्न आहे यांत संशय नाहीं. येथली हवा उष्ण तर तेथली थंड. येथें सूर्यप्रकाश नेहमीं स्वच्छ मिळतो तर तेथें सूर्याचें दर्शन क्वचितच होतें. येथें बर्फ हा पदार्थ फक्त उन्हाळ्यांतच थंड पेयाबरोबर दिसावयाचा तर विलायतेंत बर्फ पडत नाहीं असा दिवस क्वचित्

आढळायचा. प्राकृतिक हवामानांत जितका फरक तितकाच वैचारिक वातावरणांतही खूपच फरक आढळतो. हिंदुस्थानांत स्त्रीपुरुष सभासंमेलनांत खेळीमेळीनें वागतांना बापटांना आढळत नसत. स्त्रियांचें दालन निराळें, पुरुषांचें निराळें. नाटक पहायला गेलें तरी स्त्रियांची जागा स्वतंत्र. लग्नविवाहादि समारंभांत स्त्रीपुरुष जरा जवळ येतात. पण तेथेंही मर्यादा पाळली जाते. याचे उलट विलायती वातावरण असतें. तेथें स्त्रीपुरुष खेळीमेळीनें वागतात. जेवायला बसले तरी पुरुष एकीकडे, बायका एकीकडे, असे बसत नाहींत. उलट बायकांनीं बायकांत व पुरुषांनीं पुरुषांत बसूंच नये अशी तिकडची सामाजिक रीति आहे. नातें नसलेले स्त्रीपुरुष फिरायला बरोबर एकटींच गेलीं तर त्यांत कोणाला विचित्र वाटत नाहीं. अशा तेथल्या वातावरणांत हिंदी तरुण जेव्हां जातो, त्यावेळेला तो क्षणभर सामान्य शिष्टाचाराचा, तेथील स्त्रियांच्या वागणुकीचा, निराळा अर्थ करतो व मग कठीण प्रसंगांत अडकला जातो. येथल्या स्त्रियांपेक्षां तेथील स्त्रिया अधिक लाघवी, मोकळ्या, असल्यामुळें येथील तरुणांना त्यांचेविषयीं मोह उत्पन्न होतो; व मग तो ज्या कार्याकरितां तेथें गेला तें विसरून जाऊन भलत्याच फंदांत पडतो व आपल्या आयुष्याचें, बापाच्या पैशाचें व पत्नी असेल तर तिच्या जीवनाचें मातेरें करतो.

### *वैचारिक स्वातंत्र्य*

विलायतेचें राजकीय वातावरण सामाजिक वातावरणासारखें स्वतंत्र आहे. ज्या गोष्टी आपण तोंडावाटें काढण्यास कचरतों त्या कल्पना तेथील लोक सर्रास उघड बोलतात. क्रांति शब्दानें तेथील अधिकारी बिचकत नाहींत. प्रस्थापित राज्यपद्धतीला कलाटणी द्यावी, ती बदलून टाकली पाहिजे, अशा तऱ्हेची भाषा तेथें सहज पचूं शकते. लेख, भाषणें किंवा चर्चा ह्यानें राजद्रोह उत्पन्न होतो असें सरकार व्यवहारांत मानीत नाहीं. भाषेमुळें उत्पन्न होणाऱ्या राजद्रोहाविरुद्ध तेथें कायदा आहे. परंतु त्याचा सरकार अलीकडे उपयोग करीत नाहीं. प्रत्यक्ष बंड करीपर्यंत अगर हातांत पिस्तूल घेऊन कोणावर धावून जाईपर्यंत तेथील सरकार क्रान्तिकारक विचाराच्या लोकांकडे दुरूनच पहातें. त्यांना हात लावीत नाहीं. मात्र त्यांच्या विचारांची व हालचालींची नोंद ठेवीत असतें. यामुळें विलायतचें वातावरण स्वतंत्र विचार बोलण्याला अनुकूल आणि पोषकच असतें. येथून गेलेले नवयुवक तेथील लोकांच्या चर्चा जेव्हां ऐकतात, तेव्हां क्षणभर ते चकित होतात. पुढें असली भाषा त्यांच्या अंगवळणीं पडते व मग ते कोणत्या तरी

मंडळांत जाऊन मिळतात. जे भावनावश असतात असे कांहीं विद्यार्थी या स्वतंत्रतेच्या चळवळींत दाखल होऊन पुढें नानाविध अडचणींत, संकटांत अगर जाळ्यांत गुंतून जातात. हीं संकटें अगर जाळीं व्यक्तिमात्राच्या उन्नतीच्या आड येत असलीं तरी देशाच्या हिताच्या आड येतात असें नेहमींच म्हणवत नाहीं. परंतु युरोपांत गेलेल्या कांहीं तरुणांची स्थिति मात्र आज अत्यंत हलाखीची, करुणास्पद अशी झालेली आहे. देशस्वातंत्र्याच्या संबंधाच्या कांहीं विचित्र कल्पना त्यांनीं मनांत बांधलेल्या असतात व तदनुषंगानें होणारे त्यांचे प्रयत्न हे कधींकधीं इतके विलक्षण व अव्यवहारी असतात कीं त्यांना कशांतच यश येत नाहीं. ब्रिटिश हेरखात्याच्या नजरेंतून ते न सुटल्यामुळें सामाजिक व्यवहारांतही त्यांना स्थान रहात नाहीं. कालान्तरानें त्यांचा हिंदुस्थानचा संबंधही सुटतो आणि आपल्या देशाची उन्नति व्हावी म्हणून ज्यांनीं आपल्या तारुण्याचा होम केला, असे कित्येक लोक आज युरोपांत निराशेंत दिवस काढीत भटकत आहेत. त्यांतले कांहीं इतके विचित्र डोक्याचे आहेत कीं त्यांच्याबद्दल आपणाला सहानुभूति वाटली तरी त्यांच्याबरोबर चालणें अशक्य होऊन बसतें. अशा रीतीनें विलायतेंतील स्वतंत्र हवेचा दुष्परिणाम तरुण मंडळीवर सामाजिक व राजकीय बाबतींतही होतो.

बापट हे देशप्रीतीनें पेटले होते. त्यांची स्वातंत्र्यलालसा अनुपमेय होती. तरीदेखील त्यांची गणना चक्रम् लोकांत होत नव्हती. ते थोडे निर्भीड व धीट असल्यामुळें एकदोन प्रसंगीं त्यांनीं मर्यादा ओलांडली असें म्हणतां येईल. पण एकंदरीनें त्यांनीं आपला यापुढचा आयुष्यक्रम त्यांच्या पद्धतीनें विचारपूर्वक असाच आंखला व तदनुरोधानें त्यांचीं पावलें कशीं पडत गेलीं हे आपण हळुंहळुं पाहूं.

### *भाकरी आणि कवड्या*

राष्ट्राच्या उद्धाराकरितां यंत्रविद्येच्या शिक्षणाची आवश्यकता आहे म्हणून त्यांनीं मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा कोर्स घेतला हें आपण पाहिलेंच आहे. पण त्याबरोबरच स्वतःला एक जीवनाचा व्यवसाय म्हणूनही त्यांनीं यंत्रविद्या शिकावयाचें ठरविलें. देशभक्ति हा धंदा होऊं शकत नाहीं आणि राजकीय कामें करून पोट चालत नाहीं. पोट हें प्रत्येकाच्या पाठीमागें लागलेलेंच आहे. तेव्हां राजकीय अगर सामाजिक कामें करणारानें पोटाकरितां म्हणून एक स्वतंत्र विद्या अवगत करून घेतलीच पाहिजे, ही गोष्ट पुष्कळ तरुण विसरतात. लोकाग्रणींच्या मोठमोठ्या मिरवणुकी त्यांनीं पाहिल्या आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या मोठमोठ्या

मेजवान्या अवलोकिल्या म्हणजे भावनाप्रधान तरुणांना वाटतें कीं आपण पोटाचा असा धंदा करण्याचें कांहींच कारण नाहीं. पण ही त्यांची चूक आहे. लोकप्रियतेचा भर सारखा रहात नाहीं. ज्यांचें लोकमान्यतेचें वैभव ते पहातात, त्यांचा स्वतःचा म्हणून कांहींतरी एक व्यवसाय असतोच. लोकमान्य टिळकांचा केसरी हा व्यवसाय होता. त्यामुळें त्यांना राजकारणाचा उद्योग करीत असतां पोटाची ददात नव्हती. शिवरामपंत परांजप्यांची तीच गोष्ट. मोतीलाल, दासबाबू वगैरे जे राजकारणांत पडले, त्यांनाही एक व्यवसाय होता. कोणताही व्यवसाय न करतां मनुष्य सार्वजनिक काम करूं लागला तर त्याला पुढें पस्तावा झाल्याशिवाय रहात नाहीं. आतां कोणी यावर असें म्हणेल कीं, मनुष्य पोटाच्या पाठीमागें लागला तर सार्वजनिक काम तो कसें बरें करूं शकेल? गोष्ट अगदीं खरी आहे. पोटापुरता धंदा करणें वेगळें आणि वैभवाकरितां, इस्टेटीकरितां धंदा करणें वेगळें. रोजच्या भाकरीकरितां मनुष्याला फारसा उद्योग करावा लागत नाहीं. तो करीत त्याला सार्वजनिक कार्यास वेळ देतां येतो. म्हणून पोटाकरितां धंदा हा राष्ट्रसेवेच्या आड येतो असें समजण्याचें कारण नाहीं. बापट हे सार्वजनिक कार्य करीत असतां नेहमीं पोटाकरितां कांहीं तरी एक व्यवसाय करीत असत. याला ते 'भाकरीकरितां कवड्या' म्हणत असत. या शब्दसमूहांत त्यांचें तत्त्वज्ञान भरलें आहे. भाकरी म्हणजे निव्वळ हातपाय चालविण्याकरितां लागणारा पदार्थ आणि कवड्या म्हणजे साध्यांतल्या साध्या संसाराला लागणारें द्रव्य. त्यांनीं जें आजपर्यन्त मिळविलें तें एवढेंच. 'कांहीं मिळवी मग जेवी' असा रामदासांचा दंडक होता. महंमद पैगंबरानें देखील आपल्या अनुयायांना असा स्पष्ट आदेश दिला होता कीं, प्रत्येक मुसलमानानें जीवनोपयोगी अशी एक तरी कला शिकलीच पाहिजे व या आदेशाला अनुसरूनच औरंगजेब बादशहा एवढा सम्राट असून, आपल्या पोटाचा खर्च तो टोप्या विकून काढीत असे.

## *बंदुकीचें शिक्षण*

यांत्रिक विद्या शिकत असतां त्यांच्या डोळ्यापुढें हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सतत उभा असे व हें स्वातंत्र्य शस्त्रानें मिळेल हा त्यांचा सिद्धांत असल्यामुळें त्यांनीं बंदुकीचें शिक्षण घेण्याकरितां एडिंबरो येथें 'क्वीन्स रायफल्स' या लष्करी तुकडींत आपलें नाव नोंदविलें. विलायतेंत हत्यारें बाळगणाऱ्याला आपल्या इकडच्याप्रमाणेंच परवाना लागतो. पण हा परवाना इकडच्या वाघाच्या परवान्याइतकाच सुलभतेनें मिळतो. आत्मरक्षणाकरितां, शिकारीकरितां किंवा पुढें लष्करांत शिरून

हुद्याची नोकरी मिळविण्याकरितां पुष्कळ लोक बंदुकीचें शिक्षण घेतात व हें शिक्षण घेण्याकरितां ठिकठिकाणीं शेकडों मंडळें स्थापन झालेलीं असतात. आपल्या राष्ट्रांतील लोक शस्त्रविद्येंत प्रवीण असावेत अशी तेथील सरकारची इच्छा असल्यामुळें तें लोकांना असे क्लब स्थापण्यास उत्तेजन देत असतें. यामुळें या क्लबामध्यें पुष्कळ हौशी जवान आपला प्रवेश करून घेतात. विलायतेच्या हुकुमाबरहुकूम हिंदुस्थानांतही रायफल क्लब आहेत. पण त्यांच्या वाढीला सरकार उत्तेजन देत नाहीं आणि हत्याराचें लायसन्स देण्यांत जितक्या अडचणी आणतां येतील तितक्या हिं. सरकार आणीत असतें. याचें कारण येथील रहिवाशांवर इंग्रजांचा विश्वास नाहीं. येथें बंदूक नुसती हातांतहि धरायला न मिळाल्यामुळें पुष्कळांना तिचें मोठें कौतुक वाटतें. यामुळें विलायतेंत गेल्यावर बंदूक पिस्तुल मोकळेपणानें वापरण्याचें स्वातंत्र्य दिसतांच तरुण मनुष्य रायफल्स क्लबमध्यें हौसेनें जातात.

ग्रं. क्र.

## *निर्भय व सडेतोड व्याख्यान*

विलायतेमध्यें संस्था फार. आपल्या शरिरांत ज्याप्रमाणें रक्तवाहिन्यांचें व ज्ञानतंतूंचें जाळें पसरलेलें आहे त्याप्रमाणें विलायतेंत संस्थांचीं जाळीं आहेत. देश स्वतंत्र असल्यामुळें भिन्नभिन्न मतांना व अभिरुचीला तेथें भरपूर वाव मिळतो. अशा अनेक क्लबांपैकीं 'टेंपरन्स क्लब' म्हणजे मितमद्यपान प्रसार मंडळ नांवाच्या संस्था तिकडे बऱ्याच आहेत. या मंडळाचे चालक मोठे सात्विक प्रवृत्तीचे असतात. विलायतेंत मद्यपान हें व्यसन गणलें जात नाहीं. तर रोजच्या जेवणांत इतर पेयांबरोबर मद्याला एक स्थान आहे, नव्हे, महत्त्वाचें स्थान आहे. यामुळें पुष्कळ लोक मद्यपी बनून आपला संसार उध्वस्त करतात. याला आळा पडावा म्हणून 'टेंपरन्स क्लब' सारखे क्लब मितमद्यपानाचा प्रसार करीत असतात. तिकडे मद्यपान निषेधाची चळवळ चालविणें कठीण आहे. कारण देश पडला थंड. यामुळें शरीर गरम ठेवण्याकरितां मद्याची आवश्यकता त्या लोकांना भासते. आपल्या इकडच्याप्रमाणें मद्यपान निषेध चळवळ करणारा कोणी शुक्राचार्य तिकडे निघाला नाहीं. यामुळें 'मितमद्यपान करा' एवढाच जर उपदेश असेल तर तेथें ऐकला जातो. अशाच एका क्लबाच्या संस्थापकांनीं बापटांना आपल्या मंडळाचे सभासद करून घेतले होते. पण मितमद्यपान तर राहोच पण मद्याला जो आजपर्यंत कधीं शिवला नाहीं असा पुरुष क्लबला आदर्शवत् वाटला असल्यास नवल काय? या क्लबमध्यें जाऊन बापटांनीं कांहीं मोठें

काम केलें असें नाहीं, परंतु या क्लबमध्यें एक डिंगलवॉल नांवाचे स्वतंत्र मजूर पक्षाचे आणि समाजवादी मताचे कार्यकर्ते बापटांना भेटले. या भेटींतूनच पुढें बापटांच्या जीवनक्रमाला नवें वळण लागलें. म्हणून या क्लबचा नामनिर्देश येथें करावा लागला. या डिंगलवॉल साहेबांनीं बापटांना हिंदुस्थानच्या परिस्थिती-संबंधानें एक व्याख्यान देण्याची विनंती केली. इंग्लंडमध्यें अधिकारारूढ असलेला मनुष्य बहुधा कट्टर साम्राज्यवादी असतो. फार तर उदार पक्षाला एखादे वेळीं कांहीं वर्षे स्थान असतें. पण मजूरपक्षाला असें स्थान मिळणें त्यावेळीं दुरापास्त होतें. आणि जरी मिळालें तरी तें फार वेळ टिकत नसे. मजूर पक्षांतच साम्राज्यविरोधी लोक असतात आणि हे अधिकारारूढ पक्षाला नेहमीं विरोध करीत असतात. पदोपदीं त्यांची अडवणूक करतात. हिंदुस्थान-सारख्या अंकित देशाचा राज्यकारभार त्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें चालविला जात नाहीं, अशी टीका अधिकारारूढ पक्षावर समाजवादी पक्षाला करावयाची असते. ती टीका सयुक्तिक असावी म्हणून हिंदुस्थानच्या परिस्थितीची ज्याला चांगली माहिती आहे अशा माणसांच्या व्याख्यानाचा योग ही मजूर पक्षाची मंडळी बापटांच्या काळीं सहसा दवडीत नसत. वरील धोरणास अनुसरून डिंगलवॉल साहेबांनीं बापटांना म्हटलें कीं, हिंदुस्थानची खरी परिस्थिति आम्हा इंग्रजांना चांगलीशी कळतच नाहीं. साम्राज्यवादी पत्रांतून हिंदुस्थान-विषयक जो कांहीं त्रोटक वृत्तांत सरकारी चष्म्यांतून येतो, तेवढाच आम्ही वाचतों. तुम्ही प्रत्यक्ष हिंदुस्थानचे रहिवासी. इंग्रजांच्या राज्यांतील सुखदुःखें तुम्हाला जितकीं माहिती तितकीं दुसऱ्या कोणाला असणार ? तरी हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधीं आमच्या मंडळींपुढें व्याख्यान द्यावें. थोडेसे आढेवेढे घेतल्यावर बापटांनीं तें कबूल केलें. आढेवेढे घेण्याचें कारण बापटांना व्याख्या-नबाजीचा शोक नाहीं. अगदीं गरज पडल्याशिवाय ते सहसा सार्वजनिक सभेंत बोलत नाहींत. तुमची पहिली विनंती किंवा आग्रह ते सहज लीलेनें उडवून देतात. एकदां तुरुंगामध्यें आम्ही असतां कांहीं मंडळींनीं बापटांना गीतेवर रोज प्रवचन करण्यास विनंती केली. तें ऐकतांच त्यांनीं ती विनंती हसण्यावारी नेली व म्हणतात, 'अरे मला काय रे येतें ? मला तूं एखादा झाडू दे म्हणजे पहा बरॅक कशी छान झाडतों ती. मी भंगी ब्राह्मण आहें बरं का ! आपल्या येथें हे पहा मास्तर बसले आहेत. मास्तर म्हणजे विद्वान असा मास्तर शब्दाचा इंग्रजींत अर्थ आहे. आपण त्यांचेंच प्रवचन करूं व ऐकूं,' असें म्हणून ते लगेच मास्तरांच्या प्रवचनाची तयारी करूं लागले. अशी गंमत बापट नेहमीं करतात.

डिंगलवॉल साहेबांची विनंती प्रथम जरी अमान्य केली तरी हिंदुस्थानची कैफियत समजदार इंग्रज लोकांपुढें मांडण्याची संधी चालून आली आहे, तेव्हां तिचा फायदा आपण घेतला पाहिजे, या विचारानें त्यांनीं व्याख्यान देण्याचें मान्य केलें. विलायतेंत जरी मतप्रचाराला स्वातंत्र्य असलें, तरी तेथील श्रोतृगण मोठा चिकित्सक असतो व त्याची माहिती प्रमाणांनीं दिली असल्याशिवाय, त्याच्या प्रत्येक महत्त्वाच्या उद्‌गाराला चांगला आधार असल्याशिवाय, जनता त्याचें भाषण ऐकावयास तयार होत नाहीं. भाषेच्या फुलोऱ्यापेक्षां आंकड्यांनाच [फॅक्ट्स् ॲण्ड फिगर्स] तेथें अधिक महत्त्व; यामुळें आपण जें व्याख्यान देऊं व त्यांत जे सिद्धान्त मांडूं तें चांगल्या आधारावर अधिष्ठित असले पाहिजेत, असा विचार करून बापटांनीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधीं मिळतील तीं उत्तमोत्तम पुस्तकें जमा केलीं. डिग्बी, रानडे, दादाभाई नवरोजी अशांचे ग्रंथ त्यांनीं व्याख्यानांत आधारास घेतले. कारण हे ग्रंथकार सत्याचा अपलाप होऊं नये म्हणून जपणारे होते. आपल्या म्हणण्याला बळकटी यावी म्हणून सरकारी पत्रकांतून आंकडे घेत असत. यामुळें सरकारचे दांत सरकारचेच घशांत घालणें सोपें जाई. मेहनतीइतकीच या लोकांची विवेकशक्ति दांडगी असल्यामुळें ते ग्रंथ मोठे भारदस्त असे झाले आहेत. हे ग्रंथ वाचीत असतां हिंदुस्थानच्या कहाणीचें भयप्रद चित्र बापटांच्या नजरेसमोर स्पष्टपणें उभें राहिलें. पारतंत्र्याची बेडी दुःसह आहे, एवढेंच त्यांनीं आजपर्यन्त ऐकलें होतें. परंतु ही गोष्ट जेव्हां आंकड्यांनीं सिद्ध झालेली त्यांना दिसली, तेव्हां मायभूच्या परिस्थितीची भयानकता त्यांचे पुढें उभी राहून क्षणभर ते हादरले, नेत्रांतून त्वेषाच्या ठिणग्या उडाल्या व त्वेषाचे भरांत त्यांनीं आपल्या व्याख्यानाचा सारांश लिहून काढला. कारण उगीच कोणी कांहींतरी ऐकीव माहितीवरून गैरसमज करून घेऊं नये. हें भाषण त्यांनीं प्रचंड श्रोतृसमाजापुढें अति आवेशयुक्त पद्धतीनें खणखणीत वाचून दाखविलें. विषय British Rule in India हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचें राज्य हा होता. हें व्याख्यान अतिशय चांगलें वठलें. व्याख्यान देऊन बापटांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं लगेच तें छापून काढलें व त्यांतील कांहीं प्रती हिंदुस्थानांत रवाना झाल्या. याचा परिणाम काय झाला, बापटांचा जीवनौघ कसा बदलला, त्यांचीं पावलें सशस्त्र क्रान्तीच्या मार्गानें कशीं पडत गेलीं, त्यांना नवीन मित्र कसे, कोठें भेटले हे पुढील प्रकरणांत पाहूं.

'हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचें राज्य' या व्याख्यानानें बापटांची कीर्ति पसरली. एडिंबरोच्या हेरिएट—वॉट महाविद्यालयाच्या वाङ्मयीन मंडळातर्फे व्याख्यान

देण्याविषयीं बापटांना निमंत्रण आलें. यावेळीं व्याख्यानाचा विषय, 'इसवी सन दोन हजार सात मधील हिंदुस्थान' हा होता. हेंही व्याख्यान टणटणीत झालें. पण याहीपेक्षां समारोप रोमांचकारी झाला. व्याख्यानाचा समारोप करतांना बापट म्हणाले,

'परकीय राज्यकर्ते व हिंदी लोक यांमधील स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं इतर अनेक साधनांबरोबरच या गोलिका यंत्राचा उपयोग आम्हाला कधींकाळीं करावा लागण्याचा संभव आहे. नाहीं कोणी म्हणावें?' अशा आशयाचा जाज्वल्य समारोप बापटांनीं करून जवळचें भरलेलें पिस्तुल जोरानें अध्यक्षांचे टेबलावर आदळलें. सर्व सभा स्तिमित झाली. अध्यक्ष गरम झाले व म्हणाले, 'मिस्टर बापट, हा इतका प्रकार तुम्ही केलात. डोकें ठिकाणावर आहे ना? या तुमच्या कृत्याबद्दल न्यायासनासमोर उभें राहून जाब द्यावा लागेल. याद राखून ठेवा.' अशा तेऱ्हेची दमदाटीची भाषा वापरून त्यांनीं पिस्तुल ताब्यांत घेतलें. पण इंग्लंडांत भाषास्वातंत्र्य असल्यामुळें मुकाट्यानें पिस्तुल पोष्टानें परत आलें.

या ठिकाणीं कांहीं बुद्धिमान रशियन तरुणी हजर होत्या. बापटांची तारुण्यांतील ती तडफ, धीरोदात्त मुद्रा, आणि ती वृत्ति! त्यांना त्यांचेविषयीं आदर उत्पन्न झाला व त्यांनीं अत्यंत विनयशीलपणानें उत्कृष्ट भाषणाबद्दल त्यांचें अभिनंदन केलें. स्त्रिया या भावनाप्रधान असतात. शूर, धाडसी, प्रांजल स्वभावाच्या पुरुषाच्या कृती पाहून त्यांचे मनांत चटकन आदर उत्पन्न होतो. कधींकधीं आदराच्या पलीकडची पायरी ओलांडली जाते व त्याला भक्तीचें स्वरूप येतें. या स्त्रियांपैकीं वैद्यकीचा अभ्यास करणाऱ्या एका तरुणीनें आपली सहामाही बुडवून बापटांना पहिजे असलेल्या रशिअन भाषेंतील टिपणांचें इंग्रजी भाषान्तर करून दिलें. या प्रसंगाला अनुलक्षून बापट आपल्या पद्यमय आत्मचरित्रांत लिहितात,

**—'सहामाही बुडवुनी भाषान्तरित तीं तिणें।**
**केली स्नेहार्थ सेवार्थ धन्य धन्य तिचें जिणें॥'**

बापट सांगत असतात कीं हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचें राज्य हा निबंध वाचल्यास परिणाम काय होईल हें मी ओळखून होतों. पण देशाची दुर्दशा पुढें दिसत होती. अशा वेळीं स्वास्थ्यसंरक्षणाचा विचार मनांत ठरेच ना!

यावेळीं त्यांच्या मनांत जो आगीचा डोंब उठला तो अजून विझलेला नाहीं. परवां परवा त्यांनीं लिहिलें आहे,

**'रक्ताळलें शरीर, भडका जिवांत झाला।**
**आईस सोडवाया येणार कोण बोला?॥'**

## ५

# सशस्त्र-क्रान्ति-पथावर

एडिंबरो येथें बापटांनीं मजूर पक्षातर्फे तेथील हेमंत व्याख्यानमालेंत British Rule in India या विषयावर जें निर्भीड व्याख्यान दिलें त्याच्या छापील एक हजार प्रती काढून त्या सर्वत्र वाटण्यांत आल्या. तें व्याख्यान मुंबई युनिव्हर्सिटीकडे आल्यावर तेथील अधिकाऱ्यांनीं याबद्दल बापटांना जाब विचारला. त्याला बापटांनीं उत्तर दिलें, 'आपण जी शिष्यवृत्ति मला देतां ती यंत्रशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां. तो अभ्यास मी चांगल्या प्रकारें करीत आहें. अभ्यास करून जो वेळ मला रहातो तो वेळ मी कसा खर्च करावा हें आपण मला सांगूं शकत नाहीं. देशासंबंधीं माझें कर्तव्य माझ्या पद्धतीनें करण्यास मी स्वतंत्र आहें.' मुंबई युनिव्हर्सिटी ही सरकारमान्य व कांहीं अंशीं सरकारी पद्धतीनें चालणारी संस्था. अशी संस्था आपल्या मालकाविरुद्ध बोलणाराला मदत कशी देणार ? तिनें सहाजिकच बापटांची शिष्यवृत्ति बंद केली.

*पैसा कोणाचा ?*

या ठिकाणीं प्रश्न असा येतो कीं, मुंबई युनिव्हर्सिटी बापटांना जी शिष्यवृत्ति देत होती ती मंगळदास नथुभाई या हिंदी गृहस्थाच्या पैशांतून—इंग्रजांच्या पैशांतून नव्हे. मंगळदासांनीं ही शिष्यवृत्ति देशहितबुद्धीनेंच ठेवली होती. बापटांनीं British Rule in India हें व्याख्यान देशहितबुद्धीनेंच दिलें होतें. मुंबई युनिव्हर्सिटीला शिष्यवृत्ति बंद करण्याचा काय अधिकार होता ? गोष्ट खरी, पण मत्ता आमची अन् सत्ता इंग्रजांची. इंग्रजांविरुद्ध ब्र काढण्यानें आपल्या अस्तित्वावर गदा येते हें पाहून मुं. यु. च्या अधिकाऱ्यांनीं मदत थांबविली यांत नवल नाहीं. मग धनिकांनीं पैसे सरकारमान्य संस्थेस द्यावे का ? प्रथम प्रथम लोकांना अनुभव नव्हता म्हणून असे पैसे सरकारमान्य संस्थेकडे सहज खेचले गेले. परंतु या संस्थांचें पारतंत्र्य प्रगतीस अडथळा करतें हें दृष्टीस पडल्यावर लोक सावध झाले. आपले पैसे स्वतंत्र संस्थांच्या स्वाधीन करूं लागले. हिंदु एज्युकेशन फंड हा असाच कांहीं कारणानें निघाला.

## पुढें काय ?

बापटांनीं सरकारमान्य संस्थेशीं फारकत करून घेतल्यावर पुढें काय करावयाचें हा प्रश्न उभा राहिला. रूढ मार्गांचा तिरस्कार येणें व क्रांतीला वाच्यता देणें हें जितकें सोपें तितकें त्या विचाराप्रमाणें पावलें टाकणें सोपें नव्हे हा अनुभव प्रत्येक जातीच्या क्रांतिकारकास आल्याशिवाय राहात नाहीं. कारण क्रांतिकारकांतही जाती व विचारपंथ असतातच.

## भिन्न पंथ

ब्रिटिशाचें राज्य नको, आपलें हवें, ही गोष्ट मान्य झाल्यावर तें राज्य काढून कसें टाकावयाचें व नवें कसें स्थापन करावयाचें हा प्रश्न उभा राहिला कीं त्याबरोबर अनेक मतभेद डोकावूं लागतात. हे मतभेद निर्माण होण्याचीं दोन प्रमुख कारणें असतात. पहिलें भिन्न दृष्टिकोन व दुसरें शक्तीची मर्यादा. प्रत्यक्ष कामाला हात घालतांना जो तो आपल्या शक्तीचा अंदाज घेतो. राज्य उलथून टाकावयाचा रूढ मार्ग एकच. तो म्हणजे सशस्त्र बंड. तें करण्यांत आरंभापासून धोका असतो. बंडाची कल्पना गोड, आकर्षक कोणाला वाटत नाहीं? ती गुप्त मंडळी, त्यांच्या भुयारांतील सभा, त्यांचे बहुरुपी वेष, ती शस्त्रांची जमवाजमव, त्या हुलकावण्या, खालीं शस्त्रागार व वर देऊळ, त्यात क्रांतिकारक साधू, तीं गुप्त लिपींतील अगर गुप्त भाषेंतील पत्रें इत्यादि प्रश्न तरुण मनाला आकर्षित करतात. अद्‌भुताकडे बालमनाची वृत्ति सहजच खेचली जाते. तरुण हे शरिरानें बाल नसले तरी क्रांतीच्या राजकारणांत ते बालच असतात. हा गुप्त क्रांतीचा मार्ग युद्धकथांप्रमाणें रम्य व अद्‌भुत असला तरी प्रत्यक्ष आचरावयाला अत्यंत बिकट होय. म्हणून प्रत्यक्ष आचार करावयाची वेळ येते त्यावेळीं या मार्गाकडे थोडेच लोक वळतात, बरेच लोक कमी धोक्याचा मार्ग पत्करतात. ते म्हणतात कीं या जवळच्या पण धोक्याच्या मार्गानें जाण्यापेक्षा लांबचा पण बिनधोक्याचा मार्ग बरा. बिनधोक्याच्या मार्गात जाणारांत दोन पक्ष पुन्हा उद्‌भवतात. एक म्हणतो, अपण अर्जविनंत्यांच्या द्वारेंच स्वराज्य मिळविण्याचा प्रयत्न करूं. सरकारनें केलेले कायदे ढिले करण्याकरितां आम्ही आमची बुद्धि चालवू. कायदे कितीही कडक असले तरी सूक्ष्म दृष्टीला त्यांच्यांत फट दिसतेच. त्या फटींतून प्रवेश करून आम्हांला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण करून घेऊं. इंग्रजात सुद्धां कांहीं महात्मे असतातच. त्यांचें मन आपल्या पक्षाकडे वळवून त्यांच्यामार्फत आपण ब्रिटिश पार्लमेंटांत स्वराज्याचा ठराव आणून पास करून घेऊं. दुसरा पंथ जो असतो तो म्हणतो कीं इंग्रज

कितीही उदार असले तरी इंग्लंडच्या हिताच्या वेळीं सर्व एकच होतात. तेव्हां परक्यांवर विसंबण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. स्वावलंबानें आपली शक्ति वाढविली पाहिजे.

*"शक्तीनें मिळती राज्यें"*

स्वदेशीचा स्वीकार, परदेशी वस्तूंवर बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण इत्यादि मार्गानें लोकांत हल्लींच्या राजकीय परिस्थितीबद्दल असंतोष उत्पन्न करून संघटना वाढवून सरकारवर दडपण आणूं. नाक दाबलें कीं तोंड उघडतें. देशांत असंतोष फैलावलेला सरकारला परवडणार नाहीं व मग कांहीं तरी हक्क सरकारला देणें प्राप्त होईल. हे हक्क मिळाले म्हणजे त्यांच्या बळावर आपण अधिक संघटना करूं व पुढचा हप्ता मागूं. या मार्गानें आपली प्रगति झपाट्यानें होईल. या मार्गांत येणारे लोक स्वतंत्र धंद्याचे असतात. सरकारचा रोष उत्पन्न केल्यानें जो धोका उत्पन्न होतो तो विशेष भयंकर नसल्यानें तो सहन करण्याची, वर्ष दोन वर्ष शिक्षा भोगण्याची या लोकांची तयारी असते. याच्यापेक्षां अधिक जहाल, अधिक धाडसी, प्रत्यक्ष जीवित धोक्यांत घालण्याची ज्यांची तयारी असे सशस्त्र क्रांतिकारी जे असतात ते म्हणतात, हे तुमचे असंतोष उत्पन्न करण्याचे व अर्जविनत्यांचे मार्ग स्वराज्य मिळविण्याला पुरेसे नाहींत. स्वराज्य म्हणजे काहीं सामान्य गोष्ट नव्हे. जें राज्य इंग्रजांनीं आपले प्राण पणास लावून मिळविलें तें राज्य ते कांहीं सुखासुखी सोडणार नाहींत. त्याकरितां प्राणांतिक युद्धच केलें पाहिजे.

"हा खेळ जीवजीवांचा  
खेळावा वीर रसाचा"

तेव्हांच इंग्रज येथून हलूं शकेल.

वर सांगितलेल्या तीन विचारसरणींपैकीं तिसऱ्या विचारसरणीचे बापट होते. ही विचारसरणी मान्य असलेल्यांत सावरकर होते. पण सावरकर व बापट ह्यांच्य मनाच्या ठेवणींत फार मोठा फरक होता व तो हल्लीं अधिक स्पष्ट झाला आहे. सावरकर म्हणत, सशस्त्र क्रान्ति मान्य.

'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें?' हें तर आमचेंच पद्य. तेव्हां क्रांतीबद्दल दुमत नाहीं. पण ती केव्हां करावयाची, याबद्दल मतभेद होईल. क्रान्तीची संघटणा पुष्कळ दिवस केली पाहिजे. सर्व गोष्टी तयार झाल्या म्हणजे मग एक

दिवस सर्वांनीं उठावणी करावयाची तोंपर्यंत शान्तपणानें योजनापूर्वक तयारी करीत रहाणें आपलें कर्तव्य आहे. यावर बापट म्हणत कीं ती विचारसरणी मान्य. पण प्रसंगच तसा आला तर चुणुक दाखवायला मनुष्यानें मागें घेऊं नये. अशी चुणुक दाखविल्यानें एकदम यश येत नाहीं ही गोष्ट खरी, पण लोक जागे होतात व आपल्या विचारसरणीचे लोक आपणास येऊन मिळतात.

बापट आणि इतर जहाल विचारांचे लोक 'इंडिया हौस' मध्यें एकत्र झाले व तेथें पुढच्या कार्यक्रमाविषयीं बराच खल झाला. तेथें नरम गरम भेद पडलेच. बापटाना नरम विचारसरणी पटेच ना. त्यांच्या हृदयांत कल्लोळ उठले होते. रक्त तापलें होतें. ते कृति करायला अधीर झाले होते. त्यावेळीं ते आवेशानें म्हणाले, तुम्ही आपल्या मार्गानें जा, मी आपल्या मार्गानें जातो.

### *मार्ग धरला*

वर 'इंडिया हौस' चा नामनिर्देश आला आहे. हिंदुस्थानांत शामजी कृष्ण वर्मा या नांवाचे कच्छी गृहस्थ होते. ते एका संस्थानांत कांहीं वर्षें दिवाणजी होते. त्यांचेजवळ पैसा पुष्कळ होता व तो देशहितार्थ खर्चण्याची त्यांना बुद्धि होती; आपले जहाल विचार हिंदुस्थानांत पचले जाणार नाहींत, हें पाहून ते लंडनला जाऊन राहिले. जहाल मार्गाचा पुरस्कार करणाऱ्या तरुणाला ते स्कॉलरशिप देत असत. सावरकरांनाही त्यांनीं विलायतेंत जाण्याकरितां १९०६ सालीं मदत दिली होती. लंडनमध्यें 'इंडिया हौस' या नांवाचे घर त्यांनींच घेतलें होतें. त्या घरांत क्रान्तिवादी तरुणांना ते आश्रय देत. बापटांना व्याख्यानाकरितां याच गृहस्थानें हिंदी राजकारणाचीं पुस्तकें पुरवलीं होतीं. या शामजींनीं बापटांना त्यांच्या कार्याकरितां मदत म्हणून रु. २००० दिले होते.

'इंडिया हौस' मधील या चर्चेनंतर बापट जे निघाले ते थेट फ्रान्समध्यें जाऊन पॅरिसमध्यें राहिले.

### *क्रान्तिकारकांचें संकेतस्थान*

पॅरीस हें शहर सौंदर्याकरितां जगांत प्रसिद्ध आहे. सौंदर्याकरितां ज्याप्रमाणें प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणेंच ऐषआराम, चैन ज्यांना करावयाची त्यांना पॅरीससारखें जगांत दुसरें शहर नाहीं. चैनीचे सर्व आधुनिक प्रकार तेथें आढळतात. त्यामुळें जगांतील सुखवस्तु व गुलहौशी लोक पॅरीसमध्यें चैन करण्याकरितां लाखो रुपये बरोबर घेऊन जातात व तेथें अनेक तऱ्हेचे विलास करतात. हे विलास

पुष्कळ वेळां नीतिबंधनास धरून नसल्यामुळें पॅरीसचा थोडा बदलौकिकही झालेला आहे. सर्पाजवळ ज्याप्रमाणें शरिराचा नाश करणारें विष असतें त्याप्रमाणें अत्यंत तेजस्वी, मौल्यवान असा मणी असतो असें म्हणतात. पॅरीसमध्यें गुलहौशी, चैनी, विलासी लोकच तेवढे येतात असें नाहीं. विलासी लोकांप्रमाणेंच अत्यंत पुरोगामी लोकांचें संकेतस्थान पॅरीस हेंच आहे. फॅशनमध्यें तें जसें पुढें आहे त्याप्रमाणें विचारांतही तें पुढें असतें. जगांतील निरनिराळे क्रांतिवादी पॅरीसमध्यें येऊन नेहमीं रहातात. तेथें त्यांना रहाण्यास आश्रय मिळूं शकतो. नाना देशींचे लोक तेथें येत असल्यामुळें क्रान्तिवाद्यांना विचारसरणीची देवाणघेवाण पॅरीसमध्यें करतां येते. ही पॅरीसची कीर्ति ऐकून बापट तेथें गेले.

रशियामध्यें बाँबचें अस्त्र नुकतेंच तयार झालें होतें. दहशतवादी लोकांना या अस्त्राचा फार उपयोग होई. करायला सोपें, खर्चाला कमी असें हें अस्त्र आपणाजवळ असावें, इतकेंच नव्हे, तर त्याची कृतीही आपणांस माहीत असावी अशी इच्छा १९०७ च्या क्रान्तिवाद्यांत उत्पन्न झाली असल्यास नवल तें काय? बापट ही विद्या शिकण्याकरितां पॅरीसला आले. लवकरच त्यांना ही विद्या शिकविणारा गुरु भेटला. नवीन अस्त्राचा अभ्यास पद्धतशीर सुरू झाला. त्याकरितां एक साबणाचा कारखाना त्यांना मिळाला होता. कांहीं काळानंतर रशियांतून तीन गृहस्थ पॅरीसला आले. त्यांच्याजवळ नव्या अस्त्राची विद्या श्रेष्ठ दर्जाची होती. शिवाय या विद्येच्या अभ्यासाचीं टिपणेंही त्यांचेजवळ होतीं. ही मंडळी ज्याप्रमाणें नव्या विद्येंत प्रवीण त्याप्रमाणें त्याचें धैर्य, त्याग, चिकाटी व आत्मविश्वास या गोष्टी असामान्य होत्या. आपल्या तारुण्यांतील जोम ते पॅरीससारख्या गुलहौशी शहरांतील विलासांत खर्च न करता आपल्या राष्ट्राच्या भावी कल्याणाच्या दिशेनें करावयाच्या उद्योगांत खर्च करीत असलेले पाहून, बापटांचा त्यांच्याविषयींचा आदर दुणवला. तिघां रशियन देशसेवकांत एक वृद्ध होता. पण त्याचा उत्साह सर्वांत अधिक. तो बोले थोडें, पण करी पुष्कळ. त्याच्याकडे पाहून बापटांना, माझ्या राष्ट्रांत असे लोक निपजतील का, असें वाटे. बापट म्हणतात कीं, मी जें हें काम हातीं घेतलें होतें तें काम सामान्य नव्हतें. तें काम करावयास मनुष्य तशाच तळमळीचा पाहिजे. ज्याचा चैनीकडे ओढा आहे, भोगाकडे धांवणारी मनाची प्रवृत्ति ज्याला आवरतां येत नाहीं, किंवा ज्याचें शरीर निरोगी, दणकट नाहीं अशीं माणसें कितीही बुद्धिमान असलीं तरी त्यांचा कांहींएक उपयोग नाहीं. उलट अशीं कामें अशा असंयमी लोकांकडून नेहमीं बिघडतात. तात्पर्य काय, सशस्त्र क्रांति असो किंवा निःशस्त्र

क्रांति असो, कोणतेंही राष्ट्रकार्य हें संयमपूर्ण सेवाभावानें केलें तरच तें यशस्वी होतें. अधीर व विलासी अशा लोकांकडून कोणतेंच मोठें कार्य होत नसतें, हा सिद्धांत कोणत्याही नरम गरम सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्या मंडळींनीं हृदयाशीं बाळगावा.

नव्या गोलिका यंत्राची माहिती जी रशियन लोकांजवळ होती, त्याचीं छाया-चित्रें बापटांनीं आपल्या बंगाली मित्राकडून घेवविलीं. कारण बापटांना रशियन येत नव्हतें. ही विद्या बापटांना आली पण आपल्या लोकांत ह्या विद्येचा प्रसार व्यापक प्रमाणावर होण्याकरितां या टिपणांचें भाषान्तर कोण करणार? नुसती रशियन भाषा जाणणारे लोक इंग्लंड व पॅरीसमध्यें कमी नव्हते. परंतु हे लोक समानधर्मी जर नसले तर सगळाच व्यूह बाहेर पडायचा. म्हणून आपल्या विचारांची रशियन व इंग्लिश भाषा जाणणारी व्यक्ति त्यांना हवी होती. सुदैवानें त्यांची एक रशियन मैत्रीणच या दोन भाषा जाणणारी निघाली. बापटांनीं एडिंबरो येथें हिंदुस्थानच्या परिस्थितीसंबंधीं जें जहाल भाषण केलें तें ऐकून ज्या तीन स्त्रियांना बापटांविषयीं आदर व कौतुक वाटलें त्यांपैकीं ही एक होती. या तरुण मुलीला बापटांनीं बर्लीन येथें बोलावून घेतलें व तिच्या स्वाधीन तीं रशियन भाषेंतील टिपणें केलीं व भाषान्तर तिजजवळ मागितलें. ही तरुणी त्यावेळीं कॉलेजमध्यें टर्म भरीत होती. पण बापटांच्या स्नेहार्थ व हिंदुस्थानच्या सेवेकरितां म्हणून तिनें आपली एक टर्म बुडवून ती एडिंबरोला गेली व इंग्लिश-मध्यें भाषान्तर करून बापटांना दिलें. या तिच्या त्यागाबद्दल व औदार्याबद्दल बापट तिजबद्दल नेहमीं आदरयुक्त उद्गार काढीत असत.

या प्रसंगावरून आपणास असें दिसून येतें कीं आपण निश्चयपूर्वक धाडस करून कोणत्याही बिकट कामांत पाऊल टाकलें म्हणजे हळुंहळूं मार्ग दिसत जातो, इतकेंच नव्हे तर अकल्पित मदतही आपणास मिळते. आपल्या कार्याच्या पवित्रपणाबद्दल व ईश्वरी हात त्यांत असल्याबद्दल खात्री वाटूं लागते. खरें पहातां त्या रशियन आचार्यांचा व बापटांचा अर्थाअर्थीं काय संबंध किंवा त्या रशियन तरुणीनें आपलें नुकसान करून, थोडेसें धाडस करून हें काम तरी काय म्हणून करावें? दोघांची भाषा एक नव्हती, देश, धर्म एक नव्हता, हितसंबंध एक नव्हते, तरीदेखील बापट व या मंडळींत विलक्षण स्नेहाकर्षण उत्पन्न होऊन त्यांनीं एकमेकांस बंधुभावानें पाहिलें. हा बंधुभाव उत्पन्न झाला कसा? याला उत्तर एकच कीं, रशिया काय किंवा हिंदी काय, दोघेही माणसें होतीं व स्वातंत्र्य ही चीज दोघांनाही समान संकटामुळें अभिप्रेत होती.

त्यामुळें एकानें दुसऱ्यास मदत केल्यास नवल नाहीं. या मदतीचा बापटांच्या मनावर फार फार परिणाम झाला आहे. बंधुभाव हा धर्मावर अवलंबून नाहीं, जातीवर तर नाहींच नाहीं, याचा प्रत्यय त्यांना आलेला होता. अनुभवलेल्या सुखदुःखांची आठवण चटकन विसरून जाण्याजोगे बापट हे मतिमंद किंवा स्वार्थी नाहींत. यामुळें हिंदी राजकारणाचा विचार करतांना ते जातीयवादाच्या खालच्या गलिच्छ भूमिकेवरून करीत नाहींत, तर राष्ट्रभक्तीच्या उच्च पर्वत-शृंगावर चढून करतात. तेथून त्यांना मानवतेचें अफाट वातावरण दिसतें.

या प्रसंगानंतर बापट लवकरच हिंदुस्थानांत आले. येतांना ते आपल्या-बरोबर कांहीं नवीन अस्त्रें, त्या विद्येचीं टिपणें वगैरे घेऊन आले. येतांना शामजी कृष्ण वर्मांनीं त्यांना आशीर्वाद दिला.

## ६

## प्रत्यागमन

Whose heart has never within him burned
As home his foot-steps he hath turn'd
From wandering on a foreign strand ?

बापट जुलै १९०४ मध्यें इंग्लंडला गेले व मार्च १९०८ मध्यें परत आले. पावणेचार वर्षांचा दीर्घकाळ परदेशांत घालविल्यावर कोणा मानवी हृदयास घरीं जावेंसें वाटणार नाहीं? त्यांचीं मातापितरें वृद्ध होत चाललीं होतीं. तरुण पत्नी यक्षपत्नीप्रमाणें पतीच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. देशांत होमकुंड पेटलें होतें. बंगाली लोकांचें वंगभंगाचें दुःख सर्व राष्ट्रानें आपलें म्हटलें होतें. स्वावलंबन का अर्जविनंत्या, या पक्षांत रणें माजलीं होतीं. तरुण चक्कीबरोबरच तुरुंगांत पिसले जात होते. त्यांच्या अंगांतून गळणाऱ्या प्रत्येक रक्ताच्या थेंबांतून अनेक तेजस्वी तरुण निर्माण होत होते. कांहीं मंडळींनीं सशस्त्र बंड उभारावयाचें ठरविलें होतें. अशा या काळांत बापट परत फिरले होते. त्यावेळीं अरबी समुद्र

जरी प्रशान्त होता तरी बापटांना तो खवळल्यासारखाच वाटत होता. त्यांची आगबोट संथपणानें जरी प्रवास करीत होती, तरी ती खूप हेलकावे खात आहे असेंच त्यांना वाटलें. बापटांच्या हृदयांत रक्त सळसळत होतें. तरी त्याच रक्तांत विचारांचीं बीजें असल्यामुळें आपली राष्ट्रनौका समुद्रांत डोलली तरी अविचाराच्या खडकावर जाऊन आदळूं नये असें त्यांना वाटत होतें.

अशा मनःस्थितींत बापट मुंबई बंदरांत उतरले. आपल्या बुद्धिमत्तेला अनुरूप अशी एखादी आय्. सी. एस्. सारखी सरकारमान्य परीक्षा देऊन ते जर परत येत असते तर—त्यांचें स्वागत करावयाला मुंबईतील प्रतिष्ठित नागरिक प्रतिष्ठित पोषाक करून त्या काळांत गेले असते. त्यांची गाडी त्या फुलांच्या हारांनीं भरली असती. त्यांच्या सन्मानार्थ सभा झाल्या असत्या. पण आज बापट परत आले त्यावेळीं त्यांना घेण्याला कोणी आलें होतें का? जणूं कांहीं नातें नाहीं, गोतें नाहीं, इष्टमित्र नाहीं. ते असहाय्य होते! त्यांच्या मित्रांचा गोतावळा लहान नव्हता. त्यांच्यावर प्रेम करणारीं माणसेंही पुष्कळ होतीं, पण तीं प्रगट होणें शक्य नव्हतें.

तुझामाझा भाऊपणा जगजाहीर नसावा
लोभ अन्तरीं असावा—

असें म्हणणारे दिलाचे दिलदार होते पण त्यांना गुप्तपणानें रहाणें प्राप्त होतें. राजसत्तेविरुद्ध ज्यानें कंकण बांधलें त्याला स्नेही नाहीं, सोबती नाहीं, इष्टमित्र नाहीं, त्याला एकाकी जीवनच कंठावें लागतें. आपल्या बरोबरीच्या लोकांना पानसुपाऱ्या होत आहेत, भोजनाचीं निमंत्रणें येत आहेत, माळा गळ्यांत पडत आहेत हें पाहिल्यावर आपण हा बिकट पंथ उगाच घेतला आहे असा विचार पुष्कळांच्या डोक्यांत डोकावून जातो. पण ज्यांनीं अंधपणानें यज्ञकंकण बांधून घेतलें नाहीं, ज्यांनीं इतिहास, नीतिशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला आहे, अशांचीं मनें बाह्य उपचारानें फसत नाहींत. ते कर्तव्यानंदाला मोठी किंमत देतात. ते कचाप्रमाणें मनांत म्हणतात,

'अनुभवलेल्या सुखदुःखांची व खांद्याला खांदा लावून केलेल्या प्रतिज्ञांची आठवण क्षणमात्र टिकणें याला बुद्धीचा मंदपणा म्हणतात. असलें हें बुद्धिमांद्य म्हणजे सर्व दुःखांचें माहेरघर मी समजतों. म्हणून कालच्या आणि उद्यांच्या विचाराला न साजेल असें वर्तन माझ्या हातून होणें शक्य नाहीं.'

अशा तऱ्हेचा विचार करीत बापटांनीं मुंबईत प्रवेश केला. ज्याच्या डोक्यांत

भावी उन्नतीचा प्रकाश त्याला प्रकाश नसलेल्या गृहांतच उतरावयाला मिळणार. राष्ट्राच्या जीवनाला सौख्याची स्थिरता ज्याला आणावयाची त्याला स्वतःला स्थिरता कसची लाभणार ?

## *क्रान्तिकारकांच्या शहरांत*

बापट मार्च १९०८ अखेर आले. ते थोड्या दिवसांनीं कलकत्त्याला गेले. मुंबईच्या एका टोंकापासून बंगालच्या दुसऱ्या टोंकाकडे त्यांना जावयाचें होतें. मुंबई म्हटली म्हणजे नेमस्तांचें माहेरघर. अर्जविनंत्यांकरितां सुश्लिष्ट शब्दांचा कारखाना मुंबईच्या राजकारणी लोकांनीं उघडला होता. तेथें शब्दांची घासाघीस चालून नेमस्त विचारांचा कीस पडत होता, तर कलकत्त्याला दुसराच कारखाना उघडला होता व तेथें विचारांचा कीस पडत नसून बॉंब गोळ्यांकरितां लोखंडाचा पडत होता.

बापट कलकत्त्यांत आले. इंग्रजांनीं येथें व्यापाराची पहिली पेढी घातली नसली तरी राज्य करावयाचा आरंभ येथेंच केला होता व तेथेंच आज त्या राज्याच्या आवाढव्य इमारतीस सुरुंग लावण्याची तयारी होत होती. बापटांच्या स्मृतिपटलावरून हा इतिहासाचा पट सरकत गेला. क्रान्तीचे अध्वर्यु बापटांना भेटले. बापटांनीं पाठविलेल्या टिपणावरून नवीन अस्त्राची निर्मिति बंगाल्यांनीं विस्तारानें केली होती व ते त्याचा उपयोग करण्यास सिद्धहि झाले होते. कलकत्त्यांत आल्यावर बापटांनीं लवकरच बंगाली क्रान्तिकारकांची गांठ घेतली. तेव्हां त्यांना आढळून आलें कीं या कामांत फार मोठाली मंडळी पडली आहेत. कार्याचा विस्तारहि फार दांडगा झाला आहे. तयारीहि सामान्यपैकीं आढळली नाहीं. बंगाली लोक जात्या भावनाप्रधान. एका बंगालचे दोन बंगाल सरकारनें केले त्यामुळें आमचा देश फोडला, बंगाली राष्ट्र फोडलें असें त्यांना वाटू लागलें. सुरेन्द्रादि मोठमोठ्या वक्त्यांनीं भावनेचा पारा आपल्या भाषणांनीं कडेलोटाला नेला. भाषणबंदी, सभाबंदी, संस्थाबंदी, प्रेसअॅक्ट इत्यादि भयंकर बंधनें आज जीं कोणत्याहि चळवळीला पडलेलीं आहेत, तीं त्यावेळीं मुळींच नव्हतीं. त्यामुळें विद्यार्थ्यांत व तरुण मंडळींत चळवळीचा फैलाव हां हां म्हणतां झाला. वर्तमान-पत्रांनीं कायद्याच्या अखेरच्या मर्यादेपर्यंत जितकें कडक बोलतां येईल तेवढें बोलून घेतलें होतें. युगांतरानें तर उघड सशस्त्र क्रांतीचा प्रचार सुरू केला होता. वंदे मातरम् पत्रांत अरविंदबाबूंची लेखणी युक्तिसंगत जहाल विचार प्रकट करीत असे, तर युगांतरांतील लेखकांची लेखणी तुफानीच होती असें म्हणावें

लागेल. त्यांच्यांत युक्तिसंगतपेक्षां उघड बंडाचाच उपदेश केलेला असे. यामुळें सर्व बंगाल येथून तेथून पेटून गेला होता. सभा डेप्युटेशनवर संतुष्ट रहाणाऱ्या तरुणांनीं उघड क्रांतीचा मार्ग स्वीकारला. या कामांत ज्यांना बंगाली भाषेंत 'भद्र' लोक म्हणतात किंवा आपण ज्याला 'पांढरपेशा' म्हणतों तोच प्रामुख्यानें होता. हे लोक सुशिक्षित होते. अनेक शास्त्रांत पारंगत होते. पैसा जवळ होता. नव्या क्रांतीचें वेड लागल्यामुळें त्यांच्यांत धाडस आलें होतें. रसायन व पदार्थविज्ञानांत पारंगत असे मोठेमोठे शास्त्रज्ञ या क्रांतिकारकांच्या पाठीशीं होते. प्रथम त्यांनीं तलवारी व पिस्तुलें जमा केलीं. परंतु लवकरच बापटांच्या संगतींत असलेले बंगाली लोक नव्या अस्त्रांची माहिती घेऊन आले. बाबू हेमचंद्र दास व मिर्झा अब्बास हे १९०७ अखेर बॉंबची माहिती व त्याची कृति शिकून कलकत्त्यांत आल्यावर त्यांनीं पुष्कळ लोक या विद्येंत तरबेज केले. इतकेंच नव्हे तर बरेच बॉंबगोळे तयार करून माणिकतोळा नांवाच्या बागेंत पुरून ठेवले.

पुढील कार्याबद्दल क्रांतिकारकांच्या नेत्यांत चर्चा चालत असे. कोणताहि जहाल विचाराचा समाज मोठा झाला कीं त्यांत नरमगरम असे दोन भेद पडतातच. त्यांच्यांत प्रत्यक्ष कृति केव्हां व कशी करावयाची याबद्दल विचार चालला असतां कांहीं लोक म्हणाले कीं, आपल्या हातांत जें अस्त्र आलें आहे त्याचा उपयोग ताबडतोब करावा. दुसरे म्हणाले, तसें नाहीं. मोठ्या क्रांतीची तयारी आपण चांगली करूं व एकाच वेळीं सर्व देशांत मोठें बंड उभारूं. लहानसहान स्फोटांनीं आपलें कार्य बिघडेल व सर्व डाव हुकेल. अशी ही चर्चा तरुण मंडळींत चालली असतां बापट तेथें गेले. सर्व परिस्थिति त्यांनीं नीट अवलोकन केली. तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं, येथें विचारापेक्षां विकाराचाच प्रभाव अधिक आहे. एवढ्या कष्टानें मिळविलेली विद्या हे लोक भावनेच्या भरांत कांहींतरी करून फुकट घालवितील. त्यांनीं क्रान्तिकारक तरुणांना सांगितलें कीं, "इंग्रजांचें सामर्थ्य कमी लेखूं नका व आपल्या सामर्थ्याची कल्पना अवास्तव करून घेऊं नका. इंग्रजांनीं लहानमोठे प्रसंग अनेक पाहिले आहेत. ते या धक्क्यानें क्षणमात्र हादरले तरी लवकरच सावरतील. आपल्याहि लोकांत अजून शिस्त मुरावयाची आहे. तेव्हां घाई करून एकदम ह्या अस्त्राचा उपयोग लहानसहान कामांत करूं नका. वैयक्तिक खून करून थोडी दशहत बसेल. पण इंग्रजी जात निधड्या छातीची व त्यापेक्षां अधिक चिकाटीची आहे. एकाचा कांटा काढला तर त्याची जागा घ्यायला त्यांच्याजवळ अनेक लोक आहेत. पण आपण जर सर्व राष्ट्राचें उत्थान केलें तर मात्र त्यांचें कांहींहि चालणार नाहीं. हें कार्य १।२ दिवसांत

होण्यासारखें नाहीं. धीरानें सतत क्रांतिकारक विचारांचा फैलाव करीत राहिलें पाहिजे"

तरुण मंडळी म्हणाली, "बापट, तुमचे विचार पटतात पण आम्ही आतां फार पुढें गेलों आहोंत. आमच्या आणाबापथा होऊन गेल्या आहेत. आतां मागें फिरायला सवड नाहीं. शिवाय ज्या लोकांच्या पैशाचा आम्हाला आश्रय ते म्हणतात, तुम्ही प्रत्यक्ष कांहीं अद्भुत करून दाखविल्याशिवाय पुढें मदत चालू रहाणार नाहीं. पैशाचा झरा आटला कीं साराच ग्रंथ आटोपला. इतके तरुण लोक आपला उद्योग सोडून आमच्याकडे आले आहेत त्यांचा योगक्षेम कसा चालवावयाचा ?"

हा प्रश्न ऐकतांच बापट स्तंभित झाले. पैसेवाल्यांच्या आहारीं क्रांतिकारक गेले. क्रान्तीची रचना सशास्त्र झाली नाहीं. बुद्धिवंतांच्या हातांत तिचें सूत्र राहिलें नाहीं, हें पाहून बापट खिन्न झाले. चळवळीचा अधःपात त्यांनीं आपल्याच प्रज्ञाचक्षूंनीं पाहिला.

पॅरीस ते कलकत्ता एवढा प्रदीर्घ प्रवास केल्यानें व मनावर विचारांचें ओझें असल्यानें बापटांचें प्रकृतिस्वास्थ्य बिघडलें असल्यास नवल नाहीं. कलकत्त्यास आल्याबरोबर दुसरेच दिवशीं बापटांना ताप आला. हा ताप ते परत भुसावळला आल्यावर वाढला. त्यांचे मित्र दास्ताने व त्यांच्या घरच्या मंडळींनीं बापटांची उत्तम प्रकारें शुश्रूषा केली म्हणून ते जिवावरच्या दुखण्यांतून वांचले. भुसावळ-हून ते पारनेरला गणेशखिंडींत वडिलांकडे गेले. तरी दोन महिने त्यांना तापानें सोडलें नाहीं. मध्यंतरीं एका लग्नाला ते मामांच्याकडे गेले. नंतर वडिलांच्या सांगण्यावरून त्यांनीं बायकोला घेऊन पुण्याला बिऱ्हाड थाटलें.

सार्वजनिक कार्यांत विशेषतः गुप्त चळवळींत, अगर सशस्त्र क्रांतीचे कामांत सर्वांत जर कोणती गोष्ट मनुष्याला नडत असेल तर आजार होय. नेहमीं प्रवास करावा लागत असल्यामुळें पाणी बदलतें. खाण्याला नेहमींच चांगले पदार्थ मिळत नाहींत, कमीजास्ती कांहींतरी होतेंच. मग प्रकृति बिघडते. पोटशूळ, अपचन, आंव, हिंवताप इत्यादि रोग मनुष्याला हैराण करतात आणि मग हातीं घेतलेलें कार्य तडीस जाण्याला अडचणी येतात. विश्रांति व औषधोपचार उघड करतां येत नाहींत. यामुळें पुष्कळदां क्रांतिकारक हैराण होतो अगर पोलिसांच्या ताब्यांत जातो. पण असा प्रसंग सुदैवानें बापटांवर आला नाहीं. पुण्यास आल्यावर बापटांच्या पत्नीला वाटलें कीं, आपण आतां चांगला संसार थाटूं. पण नवें संकट दत्त म्हणून उभें राहिलें. पुण्यास आल्याबरोबर पुढें काय करावयाचें हा

विचार तरुण बापटांच्या मनाला त्रास देऊं लागला. बंगाली लोक घाई करणार ती आपल्याला पसंत नाहीं. काँग्रेसचें नेमस्त राजकारण, तेंहि आपणाला मान्य नाहीं. तेव्हां करावें काय? शेवटीं ते लोकमान्यांकडे गेले. लोकमान्य म्हणजे सर्व नवविचारांच्या तरुणांचें मायपोट होतें. लोकमान्यांनीं कोणाला आश्रय दिला नाहीं?

"आहे तरी सर्वां ठायीं
पाहों जातां कोठेंच नाहीं."

अशी लोकमान्यांची स्थिति होती. नेमस्तांबरोबर ते राजकीय सुधारणांची मामुली चर्चा करीत. सामाजिक बाबींवरून सुधारकांशीं भांडत, तर दुसरीकडे क्रांतिकारकांचे विचार ते ऐकून घेत. वेळींच इशारा देत. कांहीं चुकलें तर सावरावें कसें हें सांगत व कांहीं अडलें तर कोणा तळमळीच्या माणसाचें नड्डं देत नसत. सशस्त्र क्रान्तीचा ते पुरस्कार करीत नव्हते, तरीपण कोणी असें धाडस करीत असला तर मात्र त्याच्या उत्साहावर पाणी टाकीत नसत. यामुळें खऱ्या तळमळीचे क्रांतिकारक टिळकांना वडील समजून त्यांचा सल्ला घेत. कांहीं अडलें तर त्यांच्याच आश्रयानें जात. कोणी अर्वाच्यपणा केला तर टिळक त्याचा निषेध करीत. पण त्याची अडचण दूर केल्याशिवाय कधींहि रहात नसत. गोल्डस्मिथनें खेडेगांवांतील धर्मोपदेशकाचें फार बहारीचें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, हा धर्मोपदेशक म्हणजे सबंध गांवचा पिता होता. गरिबांचा अन्नदाता, उनाडांचा नियंता, मुलांचा पिता असे. त्याचप्रमाणें लोकमान्यांचीहि स्थिति होती. बापटांनीं लोकमान्यांबद्दल पुढें कांहीं वर्षांनीं एका पद्यांत आपला आदर जो व्यक्त केला आहे, तसा आदर त्यांनीं फार थोड्यांबद्दल दाखविला असेल. वस्तुतः बापटांची विचारप्रणाली टिळकांच्या विचारसरणीपेक्षां अगदीं भिन्न होती. तरी देखील बापटांना टिळकांकडे जाऊन आपलें हृद्गत ओकावें असेंच वाटत होतें. जेथें मनाचा मोठेपणा आहे तेथें मतमतांतर व पक्षाभिनिवेश पार लोपून जातात. कांहीं वर्षांपूर्वींची गोष्ट. कम्युनिस्ट मंडळी त्यावेळीं सरकारी अवकृपेस पात्र झाली होती. हे कम्युनिस्ट काँग्रस व त्यांतील श्रीमंत वर्गावर वेळीं अवेळीं तुटून पडत. अशा एका कम्युनिस्टावरतीं वर्ध्यास कांहीं वर्षांपूर्वीं दुपारीं वॉरंट बजावलें जाणार होतें. तत्पूर्वीं तो जमनालाल बजाजनां भेटावयास आला. त्यावेळीं जमनालालनीं त्याला जवळ घेऊन त्याच्या पाठीवरून हात फिरविला. मागच्या आतांची काळजी करूं नको असा त्यास धीर

दिला. त्याला प्रेमानें जेवावयास घालून पाठवून दिलें व त्यानेंहि जमनालालजींना जातांना नमस्कार करून निरोप घेतला. हा प्रसंग आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला. आपलीं मतें भिन्न असलीं तरी तरुणांची तळमळ वडील माणसांनीं जाणली पाहिजे. त्यांच्या अधिरतेबद्दल जरी प्रसंगविशेषीं निषेध केला तरी त्यांच्या पाठीवरून ममतेचा हात फिरविणें हें आपलें कर्तव्य आहे, अशा तऱ्हेच्या विचारसरणीचीं माणसें टिळकजमनालालजींप्रमाणें क्वचितच असतील.

टिळकांनीं बापटांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें. त्यावेळीं काळकर्त्या परांजप्यांवर सरकारनें खटला भरला होता. म्हणून ते मुंबईस जाण्याच्या गडबडींत होते. जातांना त्यांनीं बापटांना बजावलें, "मी लवकर येतों. आपण सिंहगडावर जाऊं व तेथेंच स्वस्थपणें बोलूं, तेथपर्यन्त कांहींएक करूं नका." टिळक मुंबईला गेले ते सहा वर्षें परतच आले नाहींत. पुढील बेत मनांतल्या मनांतच राहिले. येथपर्यन्त बापटांना बंगाल्यांतून निघून दोन महिने झाले होते. बापटांची पाठ फिरली न फिरली तोंच श्री. खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चक्रवर्ती यांनीं मॅजिस्ट्रेट किंगफर्ड यांचेवर म्हणून जो बॉंब फेकला तो त्यांचेवर न पडतां दुसऱ्याच बायांना लागला व त्यामुळें खुदीराम बोस पकडले गेले व लवकरच माणिक तोळा बागेंतील क्रांति उघडकीस आली. त्यांत नरेन्द्रनाथ गोस्वामी हा माफीचा साक्षीदार बनला आणि भडाभडा क्रान्तिकारकांचीं सर्व अंगें प्रत्यंगें सांगत सुटला. त्यामुळें शेकडों माणसें पकडलीं गेलीं. नरेन्द्र गोस्वामीच्या साक्षींत असें बाहेर आलें कीं, पी. अेम्. बापट नांवाच्या मुंबईच्या इसमानें बॉंबची सर्व कृति इंग्लंडहून लिहून आणली आणि तिचा बंगाल्यांत प्रसार केला. त्या साक्षींत त्यानें असेंहि सांगितलें,

'आतां कांहीं घाई करूं नका, वैयक्तिक खून करणें इष्ट नाहीं असा इषारा पी. अेम्. बापट यांनीं दिला होता.'

ही साक्ष चालू असतां नरेन्द्र गोस्वामी यानें ज्यांचीं नांवें घेतलीं त्यांच्यावर वॉरंटें सुटून ठिकठिकाणीं धरपकड सुरू झाली. या सुमारास बापट आपल्या डेक्कन कॉलेजांतील श्री. देवभानकर नांवाच्या मित्राकडे दोन दिवस गेले होते. ही बातमी पोलीसांना लागतांच त्यांनीं डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल बेनसाहेब यांना म्हटलें कीं, 'श्री. देवभानकरांना आमचे ताब्यांत द्या.' प्रिन्सिपॉल साहेबांनीं पोलीसांना सांगितलें कीं, देवभानकरांना काय विचारायचें असेल तें मजसमोर विचारा. मी मुलाला तुमचे ताब्यांत देणार नाहीं.' यामुळें देवभानकर बचावले.

श्री. देवभानकरांकडून आल्यानंतर बापट दि. २४ जून १९०८ रोजीं टिळकांना रात्रीं भेटले व पुन्हा दुसरे दिवशीं भेटावयाचें ठरलें. इतक्यांत ज्ञानप्रकाशांत नरेन्द्र गोस्वामी याची साक्ष व त्यांत बापटांचा उल्लेख आला. लगेच श्री. देवभानकर ती हकीकत बापटांना सांगण्यास धावत आले. त्यांच्या सहकार्यानें बापटांनीं पत्नीला भावाकडे पाठविण्याची व्यवस्था केली व २५ रोजीं सायंकाळीं त्यांनीं पुणें सोडलें.

त्या वेळेपासून बापटांच्या आयुष्याचा रोमांचकारी चलत्‌चित्रपट जो सुरू झाला आहे तो अजून चालू आहे. १९०८ नंतर कांहीं वर्षें त्यांना वनवास व अज्ञातवास असे दोन्हीही एकाच वेळीं भोगावे लागले. तो कथाभाग पुढील प्रकरणांत येईल. हें प्रकरण संपविण्यापूर्वीं प्रिन्सिपॉल वेनच्या बाणेदारपणाचें कौतुक करावेसें वाटत असतां हें सांगितलें पाहिजे कीं, प्रिन्सिपॉल युरोपियन होता म्हणून पोलिसांनीं त्यांचें ऐकलें. गुलामगिरींत असा बाणेदारपणा कोणी दाखवीत नाहीं याचें एक कारण असें असतें कीं, अशा माणसानें जर वेन साहेबांचें अनुकरण केलें तर त्याची पाठराखण करायला कोणी नसतें. समर्थांनीं म्हटलें आहे कीं, समर्थाघरच्या श्वानाला सुद्धां मान मिळतो. अशाहि परिस्थितींत जे आपला बाणेदारपणा राखतात ते धन्य होत.

# ७

# अज्ञातवास

सत्याग्रहाचें अभिनव तंत्र निघण्यापूर्वीं सशस्त्र क्रान्तींत गुप्तपणा, अज्ञातवास, हुलकावण्या या गोष्टी शिष्टसंमत समजल्या जात. इंग्रजींत एक असें वचन आहे कीं, Everything is fair in Love and War-लढाईमध्यें सूक्तासूक्त असें कांहींच नाहीं. हिंदुस्थानांत सत्य व कृतयुगांत धर्मयुद्ध म्हणून एक प्रकार असे. धर्मयुद्धाच्या नियमान्वयें शत्रूला पूर्वसूचना देणें, तो घायाळ झाला असतां किंवा बेशुद्ध असतां हल्ला न करणें, असे नियम असत. शिवाय

द्वंद्वयुद्धांत कमरेखालीं वार करावयाचा नाहीं असेंहि समजलें जाई. हा नियम पाश्चात्य वीरपुरुषहि प्राचीन काळीं पाळीत.

*To hit below the belt*

म्हणजे कमरेखालीं वार करणें हा धर्मयुद्धशास्त्रांत अधर्म समजला जाई. परंतु भारतीय युद्धापासून धर्मयुद्ध हा प्रकार बंद पडला. भीमानें दुर्योधनाच्या मांडीवर ज्यावेळीं गदेचा प्रहार केला, त्यावेळीं बलराम खूप संतापला. त्याला आंवरतांना श्रीकृष्णानें सांगितलें कीं, कृतयुग संपलें आहे व कलियुग लागलें आहे. म्हणून धर्मयुद्धाची कल्पना आतां गेलेली आहे. तेव्हां रागावण्यांत अर्थ नाहीं. युरोपांतील नाईट लोकांच्या लोपाबरोबरच धर्मयुद्धाची कल्पना गेली. आतां शत्रूला नामोहरम करण्याकरितां प्रतिपक्ष वाटेल ते उपाय योजतात. तरी देखील धर्मयुद्धांतील कांहीं अवशेष राहिले आहेत. ते म्हणजे वकिलाला कैद न करणें, युद्ध सुरू झालें म्हणजे त्याला पासपोर्ट देऊन स्वगृहीं जाण्यास मदत करणें वगैरे.

बापट हे सशस्त्र क्रान्तिवादी असल्यामुळें त्यांनीं इंग्रज सरकारशीं जें युद्ध सुरू केलें त्यांत अतर्धान पावणें ही गोष्ट युद्धशास्त्राच्या नियमान्वयें योग्य ठरते. आपण या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, गांधीयुगाचा अवतार झाल्यापासून युद्धाबद्दलच्या आपल्या कल्पनेंत पुष्कळ फरक पडला आहे. या नव्या कल्पना घेऊन आपण बापटचरित्राचें अवलोकन करावयाचें नाहीं. १९०८ सालच्या काळाचा आपण विचार करीत आहोंत. तेव्हां त्या काळच्या कल्पनांप्रमाणें आपण बापटचरित्राकडे पाहूं.

## *प्राचीन, अर्वाचीन पुरुषांचे अज्ञातवास*

मागच्या प्रकरणांत बापट हे एकाएकीं अदृश्य कसे झाले हें आपण पाहिलें. हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ते 'अंडरग्राऊंड' गेले किंवा भारतीय शब्दप्रयोग करावयाचा तर त्यांनीं अज्ञातवास पत्करला असें म्हणावें लागेल. बापटांच्या अज्ञातवासाचें वर्णन करण्यापूर्वी आपण कांहीं पौराणिक अज्ञातवासांचा विचार करूं. पांडवांचा अज्ञातवास सुप्रसिद्ध आहे. द्यूतांतील एक अट अशी होती कीं जो पक्ष डाव हरेल त्यानें १२ वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास पत्करावयाचा. १२ वर्षें वनवास पांडवांना दुःखद झाला. पण एक वर्षाचा अल्पावधीचा अज्ञातवास त्यांना अत्यंत दुःसह असा वाटला. तो कां तें आपण

पुढें पाहूं. महाभारतांतील नलोपाख्यान प्रसिद्ध आहे. या नलाला देखील वनवास काढल्यावर ऋतुपर्णाच्या घरीं बाहुक म्हणजे सारथ्याच्या रूपानें रहावें लागलें. ऐतिहासिक काळांत शिवाजी महाराजांना आग्र्याहून निसटून महाराष्ट्रांत येईपर्यंत ८-१० महिने अज्ञातवासांतच काढावे लागले. राजारामालाहि रायगड सोडून जिंजीपर्यंत जातांना कांहीं महिने अज्ञातवास कंठावा लागला. इंग्लंडच्या इतिहासांत दुसऱ्या चार्ल्स् राजाचा अज्ञातवास प्रसिद्धच आहे. ह्या दिवसांत तो इतका कंटाळला होता कीं, पार्लमेंटाशीं भांडण करण्याचें टाळतांना तो म्हणत असे कीं, "मला पुन्हा प्रवास करण्याची इच्छा नाहीं."

पौराणिक किंवा ऐतिहासिक अज्ञातवासाचा काल बहुतकरून सुदीर्घ असत नाहीं. एक वर्षाचा काल हाच पुष्कळदां दुःसह होतो. कारण शत्रु आपणाला हुडकून काढण्यासाठीं टपून बसलेला असतो. यामुळें मन क्षणोक्षणीं धास्तींत रहातें. स्वस्थ बसणें नाहीं, स्वस्थपणें झोप नाहीं. फार काय, स्वस्थपणानें दोन घांस खाववत नाहींत. अशा मनःस्थितींत मनुष्य दिवस कसे काढणार? शरिराचे हाल एकवेळ मनुष्य काढील परंतु मनाचे हाल तो फार वेळ काढूं शकत नाहीं. मानसिक यातना नेहमींच दुःसह असतात. त्या इतक्या कीं मनुष्य प्रसंगविशेषीं आत्महत्याहि करतो. अज्ञातवासांत असलेला शत्रु बाहेर काढण्याकरितां शत्रु नाना तऱ्हेच्या युक्त्या योजीत असतो. दुर्योधनानें पांडवांना बाहेर काढण्याकरितां विराटाच्या धेनुहरणाची कल्पना काढली व गंमत अशी कीं, ती त्याची युक्ति सफल झाली व पांडव योग्य वेळेच्या आंत प्रकट झाले का नाहीं हा एक नेहमींचाच विवाद्य विषय होऊन बसला. कित्येक वेळां तेजस्वी पुरुषाच्या कृतीच त्याचा माग काढण्यास शत्रूला मदत करतात. उदाहरणार्थ, भीमानें कीचकाचा जो वध केला, त्यावरून दुर्योधनाला जबरदस्त संशय आला कीं एवढ्या बलाढ्य कीचकाचा वध करण्यास पांडवांशिवाय दुसरा कोण समर्थ आहे? राजारामाचे वेळीं त्याच्या पायावर पाणी घातलेलें पाहतांच मोंगल सरदारास हा कोणी बडा इसम असावा असा संशय आल्याशिवाय राहिला नाहीं. खऱ्या थोर लोकांची गोष्ट अशी असते कीं त्यांचा थोरपणा कोणत्या ना कोणत्या कारणानें व्यक्त झाल्याशिवाय रहातच नाहीं. तो जर शूरवीर असला तर अनाथावर जुलूम झालेला त्यानें पाहिला कीं, त्याच्यानें आपलें तेज प्रकट केल्याशिवाय रहावत नाहीं. तो जर विद्वान असला तर केव्हांतरी त्याच्या तोंडून विद्वत्ताप्रचुर अशी भाषा अगर संदर्भ बाहेर पडल्याशिवाय कसा राहील? तो जर कलाकुशल असला तर साध्या साध्या गोष्टी करतांना त्याचें कलानैपुण्य बाहेर

पडेलच. ही गोष्ट ध्यानांत ठेऊन दमयन्तीनें नळाला हुडकून काढण्याची युक्ति योजली. तिची गोळी बरोबर लागूं पडली. नळाचें सारथ्य व पाकनैपुण्य चटकन बाहेर आलेंच. म्हणून अज्ञातवासांत नेहमीं रहाणें गुणी जनांना अशक्य होतें.

### *अज्ञातवासांतल्या गोष्टी ऐकावयाला गोड*

बापटांनीं अज्ञातवासांत नाना तऱ्हेचीं रूपें धारण केलीं. कधीं आचारी तर कधीं शेतकरी—कधी कंपॉझिटर तर कधीं प्रेसमन—कधीं विद्यार्थी तर कधीं शिक्षक, अशा रूपांत ते वावरत असत. परंतु त्यांचें मूळचें स्वरूप मधूनमधून प्रकटे व मग त्यांना एके ठिकाणीं रहाणें अशक्य होई. ही स्थिति पुष्कळ अज्ञातवासांत रहाणाऱ्या मंडळींची होते. शेवटीं करावें तरी काय, असें त्यांना होऊन जातें. अज्ञातवासांतील रोमांचकारी प्रसंग ऐकणें पुष्कळ वेळां मोठें मनोरंजक असतें. शिळोप्याच्या वेळीं या गप्पा ऐकणें मोठें गोड वाटतें. परंतु ज्याला या स्थितींतून जावें लागतें त्याचे कष्ट त्यालाच माहीत.

### *अडचणीच अडचणी.*

बापट पुण्याहून जे निघाले ते तडक नगरला गेले. तेथें आपल्या घरीं न जातां मावशीच्या घरीं उतरले. तेथें जुळवाजुळव करून त्यांनीं मोंगलाईचा रस्ता धरला, व ते औरंगाबादेला गेले. या योजनेंत त्यांना त्यांच्या मित्रांचें सर्वतोपरी चांगलें साहाय्य झालें. अज्ञातवासांत हिंडणाऱ्यांना पुष्कळदां पायीं प्रवास करावा लागतो व तोहि आडवाटेनें. जोडे हरवतात अगर फाटतात व मग कांटे रुततात. ते काढायला सुई जवळ नसते. चालण्याची फार संवय नसल्यामुळें पाय सुजून येतात. सुजलेल्या पायांवरूनच बंगाल्यांत खुदीराम बोसला पकडलें होतें. अरण्यांतून प्रवास करीत असतां अशुद्ध पाणी पिण्यांत येतें, व मग ताप भरतो. कित्येक वेळां हगवण लागते किंवा डोकेदुखी सुरू होते. अशा एक ना अनेक आधीव्याधी उत्पन्न होतात. अशा वेळीं कोणी जर आश्रय दिला तर हा पाहुणा कोण, कुठला, अशा नसत्या चौकश्या लोक करतात. त्यांना समर्पक उत्तरें तरी किती द्यावयाचीं ? अशा उत्तरांत जरा जर गडबड दिसली तर लोकांत कुजबुज सुरू होते व ती पोलीसांत जाण्यास वेळ लागत नाहीं. मग अज्ञातवासी मनुष्याला तेथून पुन्हा अन्तर्धान पावावें लागतें. प्रकृति नीट राहिली तर ठीक, कारण आजारी असतांना त्याचें स्वरूप उघडें होऊन तो पकडला जातो. वासुदेव बळवंत फडके असेच पोटदुखीनें आजारी होऊन देवळांत निजले होते. तेथें ते

पकडले गेले. मनुष्याचें मन कितीहि खंबीर असलें तरी तो एकदां आजारी पडला, विशेषतः तापावर ताप त्यास येऊं लागला किंवा त्यास जुलाब होऊं लागले तर त्याचें पूर्वीचें धैर्य राहात नाहीं. प्रवासांत प्रसंगोपात्त कल्पनेच्या बाहेर खर्च करावा लागतो. पुष्कळ नाणें जवळ ठेवणें शक्य नसतें. १०० च्या नोटा ठेवल्या तर त्या मोडण्याची पंचाईत. सोन्याच्या लगडी प्रवासांत धोका उत्पन्न करण्यास कारणीभूत होतात. एकूण काय, सर्वत्र अडचणीच अडचणी.

*प्रसंग पहिला.*

थोडेसे पैसे घेऊन बापट जे नगरहून निघाले ते औरंगाबादला एका सज्जन गृहस्थाच्या घरीं आचारी म्हणून राहिले. हा गृहस्थ बापटांना ओळखीत होता. पण एकमेकांनीं दोघांस ओळख अशी दिलीच नाहीं व आचारी व मालक हें नातें बरपांगीं कायम ठेवलें आणि तें एक दिवस नाहीं तर पक्के १० महिने. अशा तऱ्हेनें वागणें त्या गृहस्थाला किती कठीण गेलें असेल याची कल्पनाच करावी. बापटांचा थोरपणा त्यास माहीत होता. त्यामुळें तो जर आदरानें वागूं लागला तर घरांत कुजबुज सुरू व्हावयाचीच. बायका मोठ्या चौकस असतात. त्यांच्या नजरेंतून कांहीं सुटणें कठीण असतें. अशा स्थितींत १० महिनेपर्यंत बापटांनीं तेथें दिवस काढले हें केवढें आश्चर्य! प्रत्यक्ष त्यांना जे कष्ट पडले, ती गोष्ट सोडली तरी त्यांना क्षणोक्षणीं किती आत्मसंयमानें रहावें लागलें असेल याची कल्पनाच केलेली बरी. घरांतील मुलें अभ्यास करतांना चुका करीत असतील, चुकीचें स्पेलिंग किंवा अशुद्ध संस्कृत कविता म्हणत असतील, त्यामुळें तें सर्व निमूटपणानें ऐकून घेणें बापटांना किती दुःसह झालें असेल! पुरुष मंडळी बाहेर गेली असतां घरीं आलेली तार अगर इंग्रजी पत्र कोणाकडून वाचून घ्यावें अशी चर्चा बायकांत चालू असतां, 'मी वाचून दाखवितों,' असें न म्हणणें, याला केवढा आत्मसंयम पाहिजे बरें! बायका कामावरून कमीजास्त बोलायच्याच. 'तुला जर स्वयंपाक नीट येत नाहीं, तर लहानपणीं विद्या कां रे नाहीं शिकलास? गोरा गोमटा अन् कपाळकरंटा' वगैरे भाषा ऐकावी लागली असेल. समोर वर्तमानपत्रें व पुस्तकें पडलीं आहेत. महाराष्ट्रांत आपल्यामागें काय घडलें आहे, हें जाणण्याची उत्सुकता आहे. अशा स्थितींतहि अज्ञानाचें सोंग कायम ठेवणें बापटांना किती कठीण झालें असेल बरें? पण त्यांनीं हें सर्व सोसलें. कां बरें? त्या डेक्कन कॉलेजांतील पवित्र सायंकाळीं त्यांनीं जी शपथ घेतली त्या शपथेस अनुसरूनच आपण सर्व विपत्ती सोसल्या पाहिजेत असें

त्यांचें सत्यप्रतिज्ञ मन क्षणाक्षणाला बजावीत होतें. यामुळेंच तो कठीण काळ ते काढूं शकले.

इतकें जपूनहि यावयाचा तो प्रसंग आलाच आणि बापटांना औरंगाबाद सोडावें लागलें.

*आश्चर्यकारक मदत*

बहिर्जी नाईकाचें वर्णन आपण वाचतों कीं त्याची चाल इततकी जलद व हालचाली इतक्या विद्युत्वेगानें होत कीं आज तो पन्हाळ्याला आहे असें ऐकलें तर उद्यां खानदेशांत शिरल्याची बातमी यावी. बापटांनीं औरंगाबादेहून मुक्काम हलविला व तो कोठच्या कोठें बडवाणीच्या संस्थानांत नेला ! हें संस्थान खानदेशच्या उत्तरेस इंदूर संस्थानाला चिकटून आहे. तेथें त्यांनीं आपला मुक्काम एका कंत्राटदाराकडे ठेवला. पतिपत्नींनीं बापटांची व्यवस्था उत्तम ठेवली. बापटांचा मित्रपरिवार मोठा आहे. त्यांच्या धडामोडीच्या आयुष्यांत त्यांना जर कोणाची मदत झाली असेल तर मित्रांची. हे मित्र सर्वच कांहीं त्यांच्या मताचे होते असें नाहीं. कांहीं सरकारी नोकर, तर कांहीं सरकारी नोकरांपेक्षां अधिक राजनिष्ठ असे लोकहि बापटांना चहातात. ज्यांनीं सी. आय्. डी. चें काम फुकट वा पगार घेऊन केलें असे लोकहि बापटांचें नांव काढलें कीं आपला सर्व स्वभाव विसरून बापटांना मदत करण्यास तयार असत. हें असें कसें होतें हा एक प्रश्नच आहे. बापटांच्या चरित्रांतील हा अद्भुतरम्य भाग आहे. अद्भुत गोष्टींवर प्रकाश पडत नाहीं असें नाहीं. बापटांचें मन गंगाजळाप्रमाणें निर्मळ आहे. गंगाजळ हें मानवी देहाला घातक ठरणाऱ्या कृमींचें विध्वंसन करणारें असलें तरी त्याची निर्मलता कोणालाहि भुलविते. देशाच्या शत्रूचे बापट हे शत्रु असले तरी ते कोणाचाहि द्वेष अगर तिरस्कार करणार नाहींत. त्यांच्या भाषणांत व्यक्तिगत दोषांचा उपरोधिक आविष्कार आढळणार नाहीं, यामुळें बापट ह्या व्यक्तीचा प्रतिपक्षी द्वेष करीत नाहीं. शिवाय मनुष्य म्हणून जो आहे त्याला मनांतून परकीय राज्य थोडेंच आवडतें ? लाभाच्या मोहानें पुष्कळ लोक परकीयांचे बूट चाटतात व स्वकीयांवर भुंकतात. एका संस्थानांतील रावबहादुर दिवसा कचेरींत बसून टिळकांच्या केसरीला संस्थानी हद्दींत बंदी करण्याचा हुकूम सोडीत, कोणी देशभक्त त्यांच्या राज्यांत आला तर त्याला घालवून देत. पण रात्रीं चोरून आपल्याच कारकुनाकडला केसरी आणून, खिडक्या बंद करून, शिपायाला दरवाजावर बसवून, आपल्या मुन्सफाबरोबर वाचीत,

सरकारवर बोटें मोडीत, टिळकांचें कौतुक करीत. हा कार्यक्रम उरकला कीं, तो केसरी लांब लिफाफ्यांत बंद करून शिपायाबरोबर कारकुनाकडे जाई. सकाळ झाली कीं हे दोघे वॉरलोन वसूल करण्याकरितां आणि रिक्रूटांची जबरदस्तीनें भरती करण्याकरितां मोहिमेवर निघत. त्यांच्या स्वार्थाला धक्का लागला नाहीं म्हणजे मग पुष्कळ लोक देशभक्तांच्या उपयोगी पडण्यास राजी असतात. अशाच लोकांनीं बापटांना आश्रय दिल्यामुळें सरकारला त्यांचा संशय येत नसे.

### *संकटांत सुद्धां परहितावर लक्ष*

बडवाणीला फार दिवस रहाणें शक्य झालें नाहीं, कारण गांवांत हत्यारांबद्दल धरपकड चालू होती. तेव्हां विषाची परीक्षा तेथें पहाणें इष्ट नव्हतें. पुष्कळ निर्वासितांना आपल्यामुळें आपल्या आश्रयदात्यावर तोहमत येऊं नये याबद्दल जपण्याचें भान रहात नाहीं. ते आपलीच तेवढी सोय पहातात. बापट हे संतकोटींतील देशभक्त. ते आपल्या सोयीपेक्षां दुसऱ्याचें सुखदुःख अधिक पहाणारे. तेथें धोक्याची सूचना मिळतांच स्वतःच्या बचावापेक्षां आश्रयदात्याच्या हितावर लक्ष ठेवून ते निघून गेले.

### *कांहीं चरित्र अज्ञातच रहाणार*

कांहीं न करतां रिकामा असणारा मनुष्य लोकांच्या डोळ्यांत येतो व मग चौकशी सुरू होते. शहरांत रहावें तर उघडकीस येण्याचा संभव फार. म्हणून इंदूर संस्थानांत जंगलांत शेती करून रहाण्याचा बापटांनीं संकल्प केला व त्या उद्योगांत ते महिनाभर गुंतले न गुंतले तोंच धारानगरीला त्यांना जावें लागलें. कां म्हणून विचारणें योग्य नाहीं. क्रान्तिकारकांचें पुष्कळसें चरित्र त्याच्याबरोबर जळून जाणारें असतें. त्यांची नजर यशावर असते, आपल्या कीर्तीवर नसते. एका नाटकी क्रान्तिकारकाची गोष्ट अशी सांगतात कीं, त्याला क्रान्तीच्या यशापेक्षां इतिहाससंशोधकांची काळजी जास्त. डॉन क्विक्झोटचा तो अवतार होता. त्याला वाटे, आजपर्यंत इतिहासांत जे मोठे क्रांतिकारक झाले त्यांपेक्षां आपण कांहीं अलौकिक पुरुष आहों. तेव्हां आपलें प्रत्येक कृत्य, त्याचा हेतु–योजना, त्यांतील मदतगार वगैरे सर्व इतिहासकारांना कसें माहीत होणार म्हणून त्यानें क्रांति यशस्वी होण्यापूर्वीं आत्मचरित्र लिहून ठेवलें होतें. व तें बाड एक दिवस पोलीसला सांपडून त्याचा कट बाहेर पडला व त्याला शिक्षा झाली. पोलीसांना माहीत होतें कीं हा वाघाचें कातडें पांघरलेला कोल्हा आहे, पण आपण मोठी

शिकार पकडली असें दाखविण्याकरितां त्यांनीं त्याला भयंकर मनुष्य म्हणून लेखनावरून ठरविलें. आमचा डॉन क्विक्झोट पक्का मुजोर. तो म्हणूं लागला, 'पकडलें तर हरकत नाहीं. माझ्या लेखावरून माझ्या क्रांतिकारक कल्पना केवढ्या होत्या यावरून तरी माझें स्मारक होईल.' बापट अशा वीरांपैकीं नव्हते. त्यांचें पुष्कळसें चरित्र त्यांच्याबरोबरच लुप्त होणार. कालिदासानें आदर्श मुत्सद्दी राजाचें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं, त्याच्या योजना इतक्या गुप्त असत कीं त्या फळावरून अनुमानाव्या लागत.

औरंगाबादेहून बापट १९०९ च्या मे त निघाले ते बडवाणी संस्थानांत आले आणि १९१० पर्यंत तेथें राहून धारला गेले. तेथें त्यांची पुंजी संपली. बांधलेली शिदोरी कोठपर्यंत पुरणार ? मनुष्यास शेवटीं त्याची बुद्धिमत्ताच उपयोगी पडते. 'मुद्राराक्षस' नाटकांत एक श्लोक आहेत. त्यांत वीर म्हणतो, 'जाऊं दे सैन्य गेलें तर ! त्यांत तरी एवढें काय आहे ? शत्रूला खडे चारावयास लागणारी माझी बुद्धिमत्ता मला सोडून गेली नाहीं म्हणजे झालें."

## *जे. आबासाहेब रामचंद्र*

पुढचा मार्ग पहावा म्हणून बापट समानधर्मा शोधीत हिंडत होते. तों त्यांना कळलें कीं जे. आबासाहेब रामचंद्र नांवाचे महान् कारस्थानी साधनसंपन्न गृहस्थ गुजराथेंत बिलिमोरी गांवीं रहातात. ते मोठे क्रांतिकारक असून त्यांच्या अनुयायांचे जाळें दूरवर पसरलेलें आहे. आपण एकदां एका पंथांत शिरलों म्हणजे आपल्या विचाराचे लोक हळुहळु भेटूं लागतात. पण थोडा परिचय झाला म्हणजे ध्यानांत येतें कीं आपल्या व त्यांच्या विचारांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. स्वभावभेद तर असतोच. पण आवडीनिवडी, दृष्टिकोनहि भिन्न असतात. कोणाचा स्वभाव लब्धप्रतिष्ठित असतो. ते चार भावनाप्रधान तरुण जमा करून आपलें आसन ठोकून गुरुत्व करतात. कांहींच्या स्वभावांत दुष्टावा, मत्सर, सूड या भावना असतात. त्यांना रक्ताची चटक असते. कांहींना प्रत्येक गोष्टीला गूढत्व देण्याची इच्छा असते. गूढप्रेमी माणसें साधें दोन आण्याला मिळणारें रेल्वे टाईम टेबल सतरा कुलुपांत ठेवून, दारावर पहारा ठेवून तें चाळतील. हे लोक मुख्य गोष्टीपेक्षां अवडंबराला जास्त महत्त्व देतात. टिळकांच्या वेळीं टिळकांना व्याख्यानाला जावयाचें म्हणजे ते चटकन पगडी डोक्यावर ठेऊन निघत. तर त्यांच्या प्रभावळींतील कांहीं लोक इस्तरीचा अंगरखा, लालचुटुक जोडा, रेशमी उपरणें, व्यवस्थित घडी करून, हळुवार पावलें टाकीत, विडा चघळीत जिना उतरून

टांग्याकरितां वाट पहात उभे रहात. लोकसेवा हा प्रधान हेतु नसे. जामानिमा, आपला बडेजाव ही गोष्ट ते अगोदर पहात. जी गोष्ट टिळकांच्या पंथांत तीच क्रांतिकारकांत आढळे. ज्या गृहस्थाचा शोध करीत बापट आले त्यांचें नांव पहा किती गूढ—जे. आबासाहेब रामचंद्र. नांवावरून हे कोणत्या प्रांतांतले हें चटकन ओळखतां यावयाचें नाहीं. जे. आबासाहेब रामचंद्र म्हणजे मद्रासी वाटावे. पण आबासाहेब हे नांव मद्राशांत नाहीं. म्हणजे येथूनतेथून गूढपणा. दुसरी गोष्ट आबासाहेबांची. आपणच आपलेमागें साहेब लावून प्रतिष्ठा घेतली. नांवानंतर रहाण्याचें ठिकाण गुजराथ. मनुष्य महाराष्ट्रीय. तिसरी—रहाणींत सर्वत्र गूढपणा. भेट चटकन व्हावयाची नाहीं. वेळ ठरवावी लागे. त्याप्रमाणें सतरा पहाऱ्यांतून जावें तेव्हां एकान्तांत भेट व्हावयाची. या गूढ वातावरणामुळें भेटीला येणाऱ्या मनुष्यावर वचक बसून हे गृहस्थ किती थोर, खोल मुत्सद्दी आहेत असें वाटावें.

शेवटपर्यंत ह्या माणसाचा पुरा पत्ता लागलाच नाहीं. ह्यानें देशभक्तीनें प्रेरित होऊन अनेक स्वदेशी धंदे सुरू केले होते व अनेक तरुणांना त्यांत गुंतविलें होतें. धंदा करायचा तर धंद्यासारखा करीत नसत. घटकेंत शेअर काढून भांडवल जमवीत तर दुसऱ्या घटकेला भांडवलासाठीं लॉटरी उघडीत. कारखाना-धंदा-लॉटरी-व्यापार ह्या गोष्टी चालू असतां गूढ अशी क्रान्तिकारक घटनाहि आपण तयार करीत आहों असा भास उत्पन्न करीत. ह्यामुळें त्यांच्याभोंवतीं अनेक भावनाप्रधान तरुणांचा घोळका रहात असे. अशा या गृहस्थांना बापट जाऊन भेटले. बापटांना वाटलें, ह्या गृहस्थाकडून आपणाला मदत, थोडा वेळ आश्रय किंवा मार्गदर्शन मिळेल. बापटांना दुटप्पी, गूढ असें बोलतांच येत नाहीं, त्यामुळें आबासाहेबांचा आणि बापटांचा स्नेहसंबंध वाढूं शकला नाहीं. इतकेंच नव्हे तर आबासाहेबांच्या गूढ वागणुकीचा त्यांस तिरस्कार आला व अशा माणसापासून कांहींएक लाभ आपणास व्हावयाचा नाहीं अशी खूणगांठ बांधून बापट दोन दिवस तेथें राहून निसटले. बापटांविषयीं मागें मी एकदां असें म्हटलें आहे कीं, त्यांना मनुष्याची पारख चटकन करतां येते. हाच त्यांचा गुण ह्यावेळीं प्रत्ययास आला. गूढ, आडपडद्याच्या, विलक्षण कारस्थानी माणसाच्या हातून कधींहि मोठें कार्य व्हावयाचें नाहीं. लहानसहान गोष्टींत ते आपली चमक दाखवितात. पण त्या अगदींच टाकाऊ असतात. बापट आबासाहेबांना सोडून जे निघाले ते पुनः धारला आले. ह्या ठिकाणीं त्यांच्या आयुष्यांतील एक मोठा—त्यांचा विशिष्ट स्वभाव दर्शविणारा—प्रसंग घडला. धार येथें एक सामाजिक अन्याय दूर करण्याकरितां त्यांनीं अनेक खटपटी केल्या. विद्यार्थी म्हणून त्यांना आपले

नांव शाळेंत घालावें लागलें. शाळेंत नांव घातल्यावर ते अलाहाबाद युनि० च्या मॅट्रिकच्या परीक्षेस बसले व तेथें पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. त्यामुळें त्यांच्या ओळखी होऊन योजिलेल्या कार्यांत यश मिळालें. ह्या ठिकाणीं बापट हे स्वतः एका संकटांत होते. पण तें संकट त्यांनीं बाजूला ठेऊन एक सामाजिक अन्याय दूर करण्याकरितां दीर्घ कालपर्यन्त अनेक उलाढाली केल्या आणि आपल्या परोपकारी वृत्तीचा प्रत्यय जगास आणून दिला. राजकारणाच्या उलाढालींत गळ्याइतके खोल गेले असतांहि टिळकांनीं जगन्नाथ महाराजांचें हित साधण्याचा बाणा सोडला नाहीं. पौराणिक काळांत स्वतः बलरामानेंहि वनवास भोगीत असतां कर्कोटक नागाचा प्राण वांचवण्याचा-प्रयत्न करीत असतां स्वतःवर संकट ओढून घेतलेंच. पांडवांनीं वनवासांत एका ब्राह्मण कुटुंबावरील संकट दूर करण्याकरितां बकासुराशीं झुंज घेतलीच. खऱ्या थोर पुरुषांचीं लक्षणें सर्वकाळीं सारखींच असतात.

### *इष्टापत्ति*

आबासाहेब रामचंद्रांचा संबंध बापटांनीं तोडला पण त्यांनीं बापटांचा पिच्छा कांहीं सोडला नाहीं. आपले गूढ उद्योग चालवीत असतां आबासाहेब सरकारच्या तावडींत सांपडले. तेव्हां त्यांनीं असें सांगण्यास सुरुवात केली कीं, मला पुष्कळ क्रान्तिकारक तरुण माहीत आहेत. त्यांना मी पकडूनहि देईन. पण सरकारनें मला कोणत्याहि प्रकारची इजा करतां कामा नये. या वेळेपर्यंत नाशिक कटाचा खटला होऊन गेला होता. 'अभिनव-भारत' संस्थेंतील मंडळींचा पुरा पत्ता लागला होता. विलायतेहून आलेलीं २२ पिस्तुलें आतां सांपडलीं होतीं. टिळकांना पकडल्यावर जिकडेतिकडे शांतता पसरली होती. टिळकांचे बरेचसे अनुयायी वाङ्मयांत गढून गेले होते. मनोरंजनाचा तो काळ होता. सरकारची दडपशाहीची आणि सूडाची इच्छा पुष्कळशी भागली होती. अशा वेळीं सरकारला देशांत समाधान हवें होतें. बापटांसारखी जी थोडीशी मंडळी फरारी होती ती जर सांपडली तर सरकार "निर्वीरमुर्वीतलम्" होणार होतें. म्हणून त्यांनीं आबासाहेबांच्या म्हणण्याला रुकार दिला. तो मिळतांच आबासाहेब बापटांच्या पाळतीवर राहिले. आबासाहेबांच्या कंपूतल्या बापटांविषयीं प्रेम वाटणाऱ्या इसमानें बापटांना कळविलें कीं, तुमचा पत्ता मुंबईच्या पोलीस कमिशनरला कळला आहे. तरी तुम्ही आपली जागा सोडून जा. या निरोपानुसार बापट आपली जागा सोडून मथुरामार्गें काशीस गेले. तेथें ते जवळजवळ १०

महिने होते. एके दिवशीं त्यांच्या बडवाणीच्या मित्राचें पत्र आलें कीं, आबासाहेबाकडून एक दूत आला आहे. तो म्हणतो, 'बापटांचा पत्ता न द्याल तर व्हिन्सेन्ट साहेब येथें येऊन त्रास देईल.'

आपल्याकरितां मित्रास त्रास होऊं नये म्हणून बापट परत इंदूरला आले. तेथें आबासाहेबांचा बाळया त्यांना भेटला. त्याला बापटांनीं सांगितलें कीं, पोलिसाचे स्वाधीन होण्याचे अगोदर मला माझ्या मित्रमंडळींना भेटूं दे. कारण त्यांनींच माझें आजपर्यंत रक्षण केलें आहे. बाळयानें बापटांना दोनचार दिवस गप्पागोष्टींत गुंतवून ठेऊन पोलीसला वर्दी दिली. मुंबईहून मोठी पोलीसपार्टी बड्या अधिकाऱ्यासह आली. पोलीस कमिशनर व्हिन्सेन्ट प्रत्यक्ष आला होता. त्यांनीं बापटांना अचानक पकडलें आणि मुंबईस आणलें. तेथें अनेक चर्चा झाल्या. गोड बोलून क्रान्तिकारकांसंबंधीं पुढची माहिती काढण्याचा पोलिसांनीं प्रयत्न केला. अखिल हिंदुस्थानचे मुख्य पोलीस अधिकारी क्लिव्हलँड साहेब व बंगाल पोलीसचे अधिकारी डेनहॅम साहेब ह्यांची मुलाखत बापटांशीं घडवून आणण्याकरितां बापटांना दिल्लीस नेलें. तेथें बरीच चर्चा झाली. त्यांना सोडण्याच्या अटींचा बराच खल झाला. सरकारनें पाहिलें कीं बापट क्रान्तिकारक असले, इंग्रजी राज्याचे शत्रु असले तरी मनुष्य उमदा, प्रामाणिक आणि स्पष्टवक्ता आहे. अज्ञातवासांत हिंडून हिंडून थकलाहि आहे. वैयक्तिक खून करणें याला पसंत नाहीं, ही गोष्ट बंगालच्या क्रांतिकारकांच्या साक्षींतून बाहेर आली होती. तेव्हां बापटांना आज सोडून द्यावें. त्यांच्यावर नुसती नजर ठेवावी आणि १९०५ पासून चालत असलेल्या क्रान्तीच्या नाटकावर पडदा टाकावा.

पोलीसांनीं बापटांकडून जामीन घेऊन, 'आम्ही बोलावूं तेव्हां या' असें सांगून सोडून दिलें. १९०८ मध्यें बापट जे पळाले ते ४॥ वर्षांनीं पुनरपि आपल्या मंडळीत येऊन दाखल झाले. या वेळीं त्यांचें बाह्य स्वरूप पालटून गेलें होतें. त्यांची दाढी खूप वाढली होती. डोळ्यांतील पूर्वीचें तेज कमी झालें होतें. औदासीन्याची दाट छाया तोंडावर पडली होती. अशा वेषांत ते पारनेरला आपल्या मातापितरांकडे आले. त्या वेळीं घरच्या मंडळींना आश्चर्यानंद किती झाला असेल याची कल्पना करावी. हा आनंद राम वनवासांतून आल्यानंतर जसा निर्मल होता तसा मात्र बापटांच्या आगमनाचे वेळीं इष्टमित्रांना वाटणें शक्य नव्हतें. पोलीसांची वक्र दृष्टि त्यांच्यावर होती. जुने मित्र पांगले होते. गेल्या २–२॥ वर्षांच्या दडपशाहीनें लोक भयभीत व निरुत्साही झाले होते. 'तात्या घरीं आला. आतां तरी तो सुखानें नीट राहील का?' असा विचार मातापितरांच्या मनांत

येत होता. त्यांच्या पत्नीला आजपर्यंत पतीची पुरती ओळख नव्हती. गरीब बिचारी अव्याज भाबडी मुलगी! तिला राजकारण, क्रांतिकारकांच्या योजना, ध्येयवाद, कांहींएक माहीत नव्हतें. आर्य स्त्रियांच्या समजाप्रमाणें पतीला देव मानून त्याची सेवा करणें एवढेंच ती जाणीत होती. अशा स्थितींत ती असतां बापटांनीं अज्ञातवासांतून तिला पत्र लिहिलें होतें कीं, तुला वाटल्यास तूं पुनर्विवाह कर. माझी मोकळीक आहे. हे शब्द बापटांनीं ज्या उच्च भूमिकेवरून लिहिले ती तिला कशी समजणार? या पत्रानें तिचें हृदय दुभंग झालें होतें. त्यांत आज बापटांच्या आगमनानें आशेचे तृणांकुर पुनरपि अंकुरले होते. तो मातापितरांच्या आणि पत्नीच्या भेटीचा प्रसंग रोमांचकारी होता. तेथें वैखरी वाणीला जागाच नव्हती. एकमेकांना आलिंगून अश्रू ढाळणें एवढेंच शक्य होतें. नाहीं का?

**टीप :** हें प्रकरण कांहीं ठिकाणीं गूढ व अस्पष्ट झालें आहे. पण सर्व खुलासा करण्याचा काल अजून यावयाचा आहे. बऱ्याचशा गोष्टी इतिहासांत जमा झाल्या असल्या तरी कांहीं व्यक्ती अजून हयात आहेत. सर्व प्रसंगांची सुसंगत हकिकत आज प्रयत्न करूनहि मिळाली नाहीं. क्रांतिकारक पुरुषाचें कांहीं चरित्र त्याच्याबरोबरच नाहींसें होतें हें व्यवहाराला धरूनच आहे.

## ८

# परिस्थितीचें परीक्षण.

अंगाची लाही करणारा उन्हाळा संपत येऊन सहस्रधारांनीं जलवर्षाव करणारा पावसाळा सुरू होण्याच्या अगोदर मध्यंतरींचा कांहीं काळ अत्यंत वाईट जातो. मनुष्याला गुदमरल्यासारखें होतें. धड उन्हाळा नाहीं, धड गारवा नाहीं, ही स्थिति सहन केल्याशिवाय पहिल्या पावसाचा आनंद मनुष्याला लुटतां येत नाहीं. बाहेरगांवीं ही स्थिति कठीण वाटत नाहीं. परंतु मुंबईंत फार कठीण असते. जी गोष्ट निसर्गाच्या वातावरणांत घडते तीच राजकीय वातावरणांतहि प्रत्ययास येते.

१९०७ च्या सप्टेंबरपासून १९०८ च्या अखेरपर्यंतचा काळ त्याचप्रमाणें १९०८ पासून १९१५ साल उजाडेपर्यंत महाराष्ट्राला गुदमरल्यासारखें झालें होतें.

बापट पोलीसांच्या अटकेंतून देहानें घरीं आले. नातेवाईक मंडळी त्यांना भेटली. वनवास अज्ञातवास संपला ही गोष्ट खोटी नाहीं परंतु देहाचे कष्ट संपले म्हणून सुस्कारा टाकावा अशी बापटांची मनःस्थिति नव्हती. आणि ती असेल तरी कशी? लांबचा प्रवास करून आपण घरीं आलों म्हणजे आपणाला आनंद वाटतो. पण केव्हां? जेव्हां यश, कीर्ति किंवा धन घेऊन येऊं त्यावेळेला. आय्. सी. एस्. ची परीक्षा नापास होऊन मुलगा घरीं आला असेल किंवा धंद्यांत मिळविलेलें द्रव्य प्रवासांत हरवून गृहस्थ आला असेल तर त्याला प्रवास संपल्याचें सौख्य वाटेल का? त्याची मनःस्थिति कशी बरें असेल? त्याला खाणें पिणें गोड लागणार नाहीं. मायाममतेच्या शब्दांची माधुरी त्यास चाखतां येणार नाहीं. हें झालें कसें याचाच तो विचार करीत बसेल. ज्या गोष्टी घडल्या त्याला आपण किती जबाबदार, परिस्थितीला किती दोष द्यावा, याहून कांहीं निराळी गोष्ट करावयास हवी होती का? इत्यादि प्रश्न त्याला भंडावून सोडतात. जी गोष्ट प्रपंचांत घडते तीच नेहमीं राजकारणांत घडते.

बापट घरीं आले तेव्हां चार दिवस बरपांगी गंमतीनें घालविल्यावर त्यांचे तासन् तास एकांतांत चिंतन करण्यांत जात. डोकें फिरावयाची वेळ येई. पुढें काय, हा प्रश्न उभा राही. त्यांनीं त्या पवित्र सायंकाळीं डेक्कन कॉलेजांत घेतलेली स्वदेशसेवेची शपथ त्यांचे पाठीस हात धुवून लागली होती. ते जातील तेथें ती त्यांना भंडावून सोडीत होती. ते मनांत म्हणत, 'मी आतां करूं तरी काय? जें करावयाचें तें सर्व केलें. पण फांसेच उलटे पडले, त्याला उपाय काय?' याच वेळीं त्यांचे मनांत प्रकाश पडला. आणि त्यांचा गुदमरणारा जीव नव्या विचाराच्या थंड हवेनें शांत झाला. मागें वर्णन केलेल्या उन्हाळ्याचे शेवटीं जीव गुदमरून जात असतांना आकाशांत एखाद्या सायंकाळीं मेघमंडळांत वीज चमकावी व थंड पाण्याचे दोन थेंब अंगावर पडावे त्यावेळीं मनुष्याला जसा आनंद होतो तसा बापटांना झाला. त्यांनीं विचार केला कीं देशाची चाकरी ज्याप्रमाणें हातांत शस्त्र घेऊन शत्रूशीं लढण्यानें होत असते, त्याचप्रमाणें आपल्या लोकांच्या अंगांत गुलामगिरीमुळें उत्पन्न होणारे दोष नाहींसे करण्याकरितां आपण जर यत्न केले तर ती देखील देशाची चाकरीच होईल. हा विचार त्यांचे मनांत येतांच आरंभ कोठून करावा हा प्रश्न त्यांस पडलाच. सांडलें तेथेंच शोधलें पाहिजे. स्वराज्य सांडलें प्रथम खेड्यांत, तेव्हां खेड्यापासूनच आपण आरंभ

करूं या, असें त्यांच्या मनानें घेतलें. आणि त्यांनीं लगेच्च दुसऱ्या दिवसापासून हातांत फावडे, केरसुणी आणि टोपली घेऊन घरें आणि आळीरस्ते साफ करण्यास सुरुवात केली. ते आपणास भंगी—ब्राह्मण म्हणूं लागले.

ह्या ठिकाणीं पांढरपेशांचे मनांत असा प्रश्न येतो कीं, स्वराज्याचा आणि रस्ते झाडण्याचा संबंध काय? केळकर, सावरकर, मुंजे वगैरेंनीं झाडू तरी हातांत घेतला आहे का? त्यांची बुद्धि कमी आहे का? त्यांचा त्याग हिणकस आहे का? त्यांची देशभक्ति पहिल्या दर्जाची नाहीं का? या थोर सज्जनांना स्वराज्याकरितां झाडू हातांत घ्यावासा वाटला नाहीं मग बापटांना कां वाटतो? गांधीहि झाडूचेंच समर्थन करतात. गांधींची गोष्ट जाऊं दे. ते शूरमर्द मराठे जातींत उत्पन्न न झाल्यानें तलवारीचा आणि स्वराज्याचा संबंध त्यांना कळत नसेल. पण बापट हे '**मर्द मराठे**' आहेत. सशस्त्र क्रान्तीवर त्यांचा विश्वास आहे. असें असतांना झाडू-स्वराज्याचा हा कार्यक्रम त्यांनीं कां उचलावा? इतिहासांत याला दाखला नाहीं. असे प्रश्न मनांत येणें साहजिक आहे. यावर आपण थोडा प्रकाश पडतो का पाहूं.

बापट काय किंवा गांधी काय, हे तीनचार वर्षें विलायतेंत राहून आलेले होते. स्वतंत्र देशांतील माणसें कशीं वागतात हें त्यांनीं डोळे उघडून पाहिलें होतें. तेथें त्यांस असें आढळून आलें कीं ते लोक विलक्षण स्वच्छ आहेत. घाणीची त्यांस विलक्षण चीड आहे. तेथील स्त्रीपुरुष आपलीं घरें स्वच्छ ठेवण्याचा जेवढा प्रयत्न करतात तेवढाच तेथील म्युनिसिपालिट्या सार्वजनिक रस्ते घरासारखे स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करतात. सभोंवतालचें वातावरण स्वच्छ असलें म्हणजे आपलें मनहि निर्मळ व उदात्त होत जातें. ज्यावेळीं हिंदुस्थानांत खऱ्या धार्मिक वृत्तीचा उत्कर्ष झाला होता त्यावेळीं येथील लोकांचीं घरेंदारें आणि सार्वजनिक जागा परमपवित्र ठेवल्या जात होत्या. पण आज सगळ्याच बाजूनें अवनति झालेली आहे. गेल्या १० वर्षांत बापटांनीं देशांतील परिस्थिति डोळे उघडे ठेवून अवलोकन केली होती. क्रान्तीच्या बिकट पथावरील मार्गक्रमण करीत असतांना महात्माजींप्रमाणें त्यांनाहि असें सहज वाटलें असेल कीं स्वराज्य तें काय, आपण एका वर्षांत कमवूं. पण स्वराज्याच्या पवित्र कार्यासाठीं लोकांचीं मनें जीं उदार व निर्भय व्हावयास पाहिजेत तीं नाहींत. त्याला काय करावें? लोकांचीं मनें स्वार्थ, मत्सरानें कुजलेलीं आहेत व बाहेर पहावें तर लोकांच्या मनाचें प्रतिबिंब ज्यांत पडलें आहे असे गलिच्छ रस्ते, मोऱ्या, गटारें जिकडेतिकडे दिसतात. तेव्हां साहजिकच बापटांना प्रथम वाटलें कीं ही बाहेरची घाण काढूं आणि नंतर मनाची घाण हळुंहळुं काढण्याची संवय लोकांना लागेल. जें काम लोकांनीं

१०.९.५७.

करावें असें आपणास वाटतें त्या कामाला सुरुवात आपण स्वतः करावी हा प्रचारशास्त्रांतला पहिला नियम आहे. बापट हे आचारशील पंडित असल्यानें त्यांनीं लगेच हातांत झाडू घेतला आणि घरें झाडण्यास सुरुवात केली यांत नवल नाहीं. घर आणि अंगण साफ केल्यावर ते पारनेर गांवांतील रस्तेहि हळुंहळुं झाडावयास लागले. सकाळीं हें काम ६ तास केल्यावर मग स्नान वगैरे करून ते भोजन उरकीत. भोजनोत्तर थोडी विश्रांति घेतल्यावर स्वाध्यायाला आरंभ करीत. बापटांचा स्वाध्याय कोणता होता बरें ?

## *स्वाध्याय*

हिंदुस्थानांतील प्रत्येक पुढारी आपल्या शांततेच्या काळांत मनन करण्याकरितां 'गीता' ग्रंथ हातीं घेतो. गीता वाचीत असतां तो आत्मसंशोधन करीत असतो. आपले पूर्वग्रह आणि अहंकार वृत्ति बाजूला ठेवून तो गीता वाचावयास लागला म्हणजे रोज नवीन नवीन प्रकाश त्याला दिसूं लागतो. ज्यांना आपण उपजत थोर पुरुष जन्माला आलों असें वाटत असतें, आपल्या बुद्धिमत्तेच्या तोडीचा पुरुष पौर्वात्य अगर पाश्चिमात्य जगांत झालाच नाहीं, आपल्या पराक्रमास इतिहासांत तोड नाहीं, असें ज्यांना वाटतें त्यांना गीता माऊलीशीं सुखसंवाद करण्याची गरज नाहीं. परंतु टिळक, बापट आणि गांधी अशी ग्वाही देतात कीं, गीतेनें आम्हास शांति दिली, गीतेनें आम्हास प्रकाश दिला. तिनें आमचें मन उन्नत केलें. बापट रोज गीता आणि ज्ञानेश्वरी वाचीत. सत्यपरिस्थितीचा—विशेषतः पारनेर गांवांतील लोकस्थितीचा—विचार करून लोकांकरितां मार्गदर्शक असे कांहीं अभंग ते लिहीत. आणि सायंकाळीं ज्ञानेश्वरीवर खेडवळ मंडळींना प्रवचन देत. त्यांतील उपदेश अगदीं साधासुधा, चटकन हृदयांत भिनणारा आणि परिस्थितीला अनुरूप असा असे. रोज नवीन नवीन विषय घ्यावे, लीनता धारण करून मन सूक्ष्म करून न कळत लोकांच्या हृदयांत शिरावें. भावनेचे कढ, शब्दांचे फटाके या प्रवचनांत लोकांना ऐकूं येत नव्हते. तर लोकांना अन्तर्मुख होण्यास शिकविलें जात होतें. यावेळीं बापटांनीं खरोखर माऊलीचा अवतार धारण केला होता. आई जशी बालकाला गोड बोलून, चुचकारून शिकविते त्याप्रमाणें बापट जनतेला आपल्या अभंग वाणीनें शिकवीत असत. ह्या प्रवचनांतून ते लोकांना कोणती संथा देत हें पाहाण्यासारखें आहे. या संथेचें महत्त्व कळण्यास बापटांसारखेंच आपण आपलें मन देशाच्या खऱ्या हिताच्या संशोधनबुद्धीनें भारून घेतलें पाहिजे.

बापट सायंकाळीं ५ वाजतां ज्ञानेश्वरीवर प्रवचन केल्यानंतर श्रोत्यांच्या नित्यजीवनाला उपयोगी असें थोडेसें प्रवचन करीत. त्यांचे श्रोते गांवांतील प्रतिष्ठित नागरिक नसून अडाणी, कुणबी, त्यांचीं बायकामुलें किंवा अस्पृश्य लोक असत. त्यांना ते सांगत, 'बाबांनो, तुम्ही अशिक्षित राहूं नका. अशिक्षित राहिल्यानें तुम्हास कोण फसवतो हें ज्याप्रमाणें कळत नाहीं त्याप्रमाणें तुमचें भलें कोण करतो हेंहि तुम्हास कळत नाहीं.'

"मुलामुलींना शिकवा, डोळस हा व्हावा सर्व जन।"

आपल्यावर राज्य करणारा साहेब आपल्या घरच्या मंडळींना अशिक्षित ठेवीत नाहीं. म्हणूनच तो आपल्यावर राज्य करीत आहे.

"साहेबाचे घरीं सर्व शीकताती, पहा ते करिती राज्य थोर।"

हा उपदेश बापट अभंगवाणींत करून, नंतर त्या अभंगावरती उदाहरणें देऊन प्रवचन करीत. श्रोत्यांना तुकारामाचे अभंग माहीत होते. त्याची सरळ वाणी त्यांच्या परिचयाची होती. त्याच्या नम्रपणाचे पडसाद बापटांच्या पुढील अभंगांत उमटतात—

"ऐका, ऐका माझे चाकराचे बोल, तुम्हासी देतील गोड फळ।"

हा अभंग बापटांच्या तोंडून ऐकला म्हणजे त्यांना तुकारामाचा

"सकलांचे पायां माझें दंडवत, आपुलालें चित्त शुद्ध करा।"

हा अभंग आठवे. बापटांची ती तन्मयता, तो साधा तुकारामासारखा वेष, गरिबांच्या कल्याणाकरितां अखंड लागलेली तळमळ, हीं पाहून श्रोत्यांना तुकाराम-महाराज प्रत्यक्ष अवतरले आहेत असें वाटल्यास नवल काय!

## *देशाचा विचार*

शिक्षणासंबंधीं ते जसें प्रवचन करीत, त्याचप्रमाणें देशसेवेचेंहि शिक्षण ते आपल्या नित्याच्या प्रवचनांत देत.

"देशाचा संसार माझे अंगावरी, ऐसें थोडेंतरी चालूं द्या हो।"

ह्या अभंगांत केवढा थोर उपदेश किती साध्या आणि गोड वाणीनें केलेला आहे बरें! वेदान्ताचें सार ज्याप्रमाणें उपनिषदाच्या साध्या सोप्या मधुर वाणींत उतरलेलें आहे त्याप्रमाणें राष्ट्रभक्तीचें सार ह्या अभंगांत उतरलें आहे. अशा

तऱ्हेचा उपदेश करीत असतां त्यांची निरहंकार वृत्ति पदोपदीं दृष्टीस पडे. ते म्हणतात,

"हरी बोले, मी तो बोलावणें करी । तुम्हासी पाचारी हरीसाठीं ॥
हरीसाठीं तुम्हा बोलावणें केलें । आले वा न आले मज काय ॥"

ह्या ठिकाणीं आपण परमेश्वराच्या हातचें यंत्र आहोंत, अशी त्यांची जी कल्पना झाली ती पुढच्या आयुष्यांत सारखी टिकलेली आहे. बापटांच्या श्रोत्यांनीं देशभक्तांचीं व्याख्यानें पुष्कळ ऐकलीं होतीं. त्यांत विद्वत्ता असे, माहितीहि भरपूर असे, अलंकारिक भाषा असे. हावभावाला, अर्थानुअर्थी अभिनयाला कमतरता नव्हती पण बापटांच्या वाणींतील जिव्हाळा त्यांना क्वचितच दिसत असे. उंची पोषाखानें अथवा जाड्या विद्वत्तेनें ते दबून जात. पण तो वक्ता त्यांना आपल्यांतला वाटत नसे. आज लोकांना प्रत्यय आला कीं, आपला वडील बंधु ममतेनें आपल्याला आपल्या हिताचे चार शब्द सांगतो आहे. बापटांचीं तीं कळकळीचीं प्रवचनें ज्यांनीं ऐकलीं असतील ते खरोखर धन्य होत! अजूनहि पारनेरचे कित्येक लोक पूर्वींची ती आठवण काढून गहिंवरून जातात. ते कां बरें गहिंवरणार नाहींत? बापट जे शब्द बोलत ते त्यांच्या हृदयाच्या खोल खोल जागेंतून बाहेर पडत होते.

### *पितरांची समजूत*

बापटांच्या ह्या प्रवचनाचा कार्यक्रम बापटांच्या मातापितरांना रुचत असे. आपला मुलगा ब्राह्मणाचें कर्म जें अध्ययन-अध्यापन त्यांत रमलेला पाहून गणेशभक्त वडिलांना आनंद व अभिमान वाटल्यास नवल नाहीं. परंतु बापटांचा सकाळचा रस्ते झाडण्याचा कार्यक्रम मात्र त्यांस बिलकुल पसंत नसे. ब्राह्मण्यास आपला मुलगा कमीपणा आणीत आहे असें त्यांस वाटावें. रूढ मार्गानें जी मंडळी जातात त्यांना आचाराचें रहस्य कळेनासें होऊन बाह्य गोष्टीलाच ते महत्त्व देतात. ब्राह्मणाचें मुख्य कर्तव्य जनतेस मार्गदर्शन करणें हें आहे. जनतेचे आचारविचार ज्यावेळीं शुद्ध होते, व्यवहाराच्या जलौघांत चिखल सांचून पाणी ठायीं ठायीं तुंबलें नव्हतें तोंपर्यंत ब्राह्मणांनीं वेदान्ताचा उपदेश जनतेला करीत राहणें वावगें नव्हतें परंतु कालांतरानें हिंदु लोकांचे आचारविचार गढूळ झाले. त्यांचें नियंत्रण करणारा स्वदेशी राजा राहिला नाहीं तेव्हां समाजांत उच्चनीच भाव उत्पन्न झाला. जीवनाला उपयोगी अशीं सर्व कर्में पवित्र नि सारख्या

योग्यतेचीं पण शरीरश्रमाची किंमत उतरली आणि वाणी व लेखणीला भलती किंमत येऊन आचारशुद्धि गढूळ झाली. अशा वेळीं लोकांचे आचार पुनरपि शुद्ध करून देणें हें ब्राह्मणाचें कर्तव्य ठरतें. सेनापतीनें युद्धाचें मार्गदर्शन करावें हें सर्व ठीक; पण सैन्य घाबरलें, त्यांची निष्ठा राहिली नाहीं म्हणजे सेनापतीनेंच सर्वांच्या पुढें जाऊन धडाडीनें युद्धांत उडी घेतली पाहिजे. हें ओळखलें म्हणूनच बापटांनीं झाडू घेतला. परंतु त्याचें रहस्य इतर ब्राह्मणांस कळलें नाहीं. त्यांनीं वडिलांचें मन कलुषित केलें. वडिलांना क्षणभर राग आला. तेव्हां बापटांनीं मोठ्या गोड शब्दांत त्यांची समजूत घातली. ते म्हणाले, "बाबा, तुम्ही श्री गणपतीची पूजा करतांना त्याची बैठक साफ करीत नाहीं का? मीहि देवाची बैठक अशीच साफ करतों. तुम्ही लहान बैठक साफ करतां. देवाची बैठक लहान तशी विशालहि असते. हा गांव त्याची बैठक नाहीं का? सर्व विश्वांत देव भरून राहिला आहे ना?" गणपति अथर्वशीर्षाचे पाठ करून गणपतीच्या विशाल रूपाचें ज्ञान बाबांना झालें होतें. अथर्वशीर्षातील श्लोकांचे पडसाद मुलाच्या उत्तरांत पडलेले पाहून त्यांचे वडील एकदम गप्प झाले. त्यांना आपल्या मुलाची थोरवी कळून आली. ते मनांत त्यावेळीं म्हणाले असतील, 'मी गणपतीची पूजा करतों पण त्या पूजेचें रहस्य माझ्या मुलानेंच खरें जाणलें. विलायतेंत जाऊन रहाण्यानें अगर क्रांतिकारक विचारानें हा भ्रष्ट झालेला नाहीं. उलट अग्नींत तापलेल्या सुवर्णाप्रमाणें हें निर्मल सोनें मला देवानें दिलें आहे.'

तरुण मंडळींनीं बापटांच्या ह्या वागणुकीपासून धडा घेतला पाहिजे. दोन पिढ्यांच्या विचारांत अंतर हें पडायचेंच. अशा वेळीं आपल्या आचारविचाराचें, उच्च हेतूचें रहस्य आपल्या मातापितरांना जर कळलें नाहीं तर त्यांना अडाणी, मूर्ख, स्वार्थी ठरवून त्यांना कठोर शब्दानें ताडण करणें हें केव्हांहि युक्त नाहीं. मागच्या पिढीच्या खांद्यावर आपण उभे राहिलों आहोंत म्हणूनच आपल्याला दूरचा प्रदेश दिसून आपल्या दृष्टीला अधिक व्यापकपणा आलेला आहे. जे जे थोर पुरुष आजपर्यंत होऊन गेले ते नेहमीं आपल्या वडील माणसाजवळ नम्रतेनेंच वागत आले आहेत. रामदासांचें आपल्या मातोश्री अगर वडील बंधूजवळचें वर्तन, शिवाजी महाराजांची शहाजीच्या जवळची वागणूक, किंवा आधुनिक काळांतल्या जवाहरलालजींचें मोतीलालजींजवळचें वर्तन नेहमीं अदबीचें, आदराचें असे. आमच्या चरित्रनायकानें या बाबतींत तरुण पिढीला फारच उत्कृष्ट धडा घालून दिला आहे.

९

# पुनश्च हरिः ॐ

अज्ञातवासांतून परत आल्यावर बापटांनीं १९१५ पर्यंतचा काळ पारनेर येथें आपल्या घरीं घालविला हें आपण मागच्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. या काळांत त्यांनीं स्वाध्याय व अध्यापन हे दोन उद्योग निश्चित केले होते. ह्या काळांत त्यांस अंतर्मुख होऊन बरेंचसें अत्मसंशोधन करतां आलें. त्याचें फळ म्हणून चैतन्यगाथेंतील पुष्कळ भाग लिहिला गेला. २-२॥ वर्षे घरीं घालविल्यानंतर बापट पुण्यास आले. तो प्रसंग असा—

*टिळकांची सुटका*

१९१४ च्या जून महिन्यांत टिळक दीर्घ कारागृहवास संपवून स्वगृहीं आले. त्याबरोबर अनेक लोकांच्या हृदयांत राजकीय जागृतीचे अंकुर फुटूं लागले. ते फुटूं नयेत, टिळकांचा आणि लोकांचा संबंध तुटावा म्हणून मुंबई सरकारनें असा जाहीरनामा काढला कीं, टिळकांनीं जोंपर्यंत आपलीं मतें व चळवळ करण्याचे भयंकर मार्ग बदलले नाहींत तोंपर्यंत सरकार त्यांना आपले शत्रु समजतें आणि सरकारची अशी इच्छा आहे कीं, टिळकांशीं कोणी राजनिष्ठ प्रजेनें, सरकारी नोकरानें अथवा निमसरकारी संस्थेनें संबंध ठेवूं नये वगैरे.

ह्या हुकमामुळें टिळकांशीं जनतेचा असलेला संबंध हळुं हळुं तुटणार होता, कारण असा नुसता हुकुम काढून स्वस्थ न रहातां त्यांचे घराजवळ चौकी बसवून टिळकांकडे येणाऱ्या जाणाऱ्यांचीं नांवें सरकारी नोकर टिपून घेऊं लागले. टिळकांनीं पाहिलें कीं, अशानें सामान्य जनता आपल्यापासून दूर जाईल, म्हणून त्यांनीं लगेच एक पत्रक काढून असें जाहीर केलें कीं, मोर्लेमिंटो सुधारणा देऊन लोकमताला सरकारनें मान देण्याचा उपक्रम केला आहे. हा उपक्रम आमचें पूर्ण समाधान करूं शकत नसला तरी सरकारनें हें प्रगतिपथावर पाऊल टाकलें आहेत, यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांत माझ्या गैरहजेरींत जे अत्याचार घडून आले, ते माझ्या स्वभावाला विरुद्ध असे आहेत. त्यानें हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं. जर्मनीशीं इंग्लंडचें जें युद्ध सुरू आहे त्यांत हिंदी प्रजेनें शक्य

तेवढीं सरकारला मदत करावी असें मला वाटतें व याकरितां सर्व जातीच्या व वर्गांच्या लोकांची सभा पुण्यास भरविण्यांत यावी वगैरे वगैरे.

ह्या जाहीर पत्रकानें सरकारचें समाधान होऊन त्यानें आपला जाहीरनामा मागें घेतला आणि वाड्याजवळचा पहारा उठविला. त्याबरोबर देशांत एकदम नवचैतन्य संचारलें.

टिळकांचा मार्ग आतां खुला झाला. राष्ट्राचें प्रचंड गतिचक्र जें आज ६ वर्षें बंद पडलें होतें, तें फिरूं लागल्यावर त्याच्याशीं संलग्न असलेलीं लहानमोठीं चक्रें भराभर फिरूं लागलीं. राष्ट्रीय सभेंत शिरण्याच्या गोष्टी निघूं लागल्या. त्यावर खूप रणें माजलीं. होमरूलची चळवळ निघाली. याकरितां टिळकांचे मोठमोठे दौरे निघाले. लहानमोठ्या असंख्य सभा भरूं लागल्या. अशा या काळांत बापटांना साहजिक वाटलें कीं, राजकीय क्षेत्रांत पुनरपि उतरण्याचा काळ आला आहे. म्हणून ते पारनेर सोडून पुण्यास आले. पुण्यास आल्यावर ते साहजिकच टिळकांना भेटले.

टिळकांनीं सुटून आल्यावर पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ती ही कीं, जे राजकीय चळवळीचे धागे तुटले होते ते सांधून देण्यास त्यांनीं आरंभ केला. नवा पूल नुकताच बांधलेला असला किंवा एखाद्या पुलाची नुकतीच दुरुस्ती झाली असली तर त्यावरून आगगाडी मंद गतीनें जाते. त्यावेळीं काम ओलें असतें. त्यामुळें दणदण चालणाऱ्या गाडीचा वेग पुलास सहन न होऊन तो खचून जाण्याचा संभव असतो. जी गोष्ट जड सृष्टींत तीच मानवी व्यवहारांत. टिळक आले त्यावेळीं पुष्कळ अनुयायी पांगले होते. कोणी निराश झाले होते, कोणी दडपशाहीमुळें हाय घेतली होती, कोणी विपरीत काळांतील धक्के सहन न होऊन त्यांचें मतपरिवर्तन झालें होतें. असे हे दुरावलेले लोक टिळकांना एकत्र करावयाचे होते. टिळकांच्या भोंवतीं सरकारनें हेरांचें जाळें पसरलें होतें. त्यामुळें राजकीय क्षेत्रांत उतरतांना टिळकांना फार जपून वागावें लागे. दूर गेलेले लोक जवळ आणून त्यांना धीर द्यावा लागला. कोणाचे अश्रू पुसावे लागले. कोणाचा गैरसमज दूर करावा लागला. ज्या कोणाला कोठें आश्रय मिळत नव्हता, पोटाची सोय होत नव्हती, अशा सर्वांना टिळकांनीं आपल्या पंखाखालीं घेऊन आपल्या प्रेमाची ऊब दिली आणि त्यांच्यांत पुनरपि आत्मविश्वास जागृत केला.

बापटांचें चरित्र व चारित्र्य टिळकांना कळून चुकलें होतें. बापट त्यांना येऊन भेटतांच त्यांनीं त्यांच्याशीं खूप चर्चा केली व सांगितलें, तुम्ही मजजवळ येऊन राहा. बापटांसारख्या सशस्त्र क्रान्तिवाद्याला टिळकांनीं एकदम आश्रय देणें युक्त

नव्हतें. म्हणून त्यांना चित्रमयजगतांत कांहीं दिवस नोकरी देण्यांत आली. आणि सरकारची नजर निवळतांच ऑगस्ट १५ तारखेस त्यांची मराठा पत्राच्या संपादक मंडळांत नेमणूक केली. कांहीं दिवसांनीं 'मराठा'चे उपसंपादक सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. वामनराव जोशी यांनीं मराठा सोडल्यावर त्यांच्या जागीं बापटांना नेमण्यांत आलें. बापट यावेळीं मराठाचें मुख्य काम पहात असले तरी नांव तात्यासाहेब केळकरांचेंच होतें. सावरकरांच्या क्रान्तिपक्षांतील एक घटक म्हणून डॉ. भटांना ५ वर्षांची शिक्षा झाली होती. शिक्षा भोगून ते परत आल्यावर टिळकांनीं त्यांनाहि आश्रय देऊन बापटांचे हाताखालीं मराठ्यांत काम दिलें.

या काळांत बापटांनीं सफाईचें काम सोडलें नाहीं. मोऱ्या, गटारें, शौचकूप व रस्ते झाडण्यास आरंभ केला. लोकांना हा सर्व प्रकार विपरीत वाटे. त्यांच्यावर टीकाहि होऊं लागली. ह्या टीकेला चैतन्यगाथेंत अभंगांमधून त्यांनीं उत्तर दिलें आहे.

याच वेळीं होमरूल लीगचें डेप्युटेशन घेऊन लो. टिळक विलायतेस जाण्यास निघाले होते. सरकारनें प्रथम परवानगी देऊन आयत्या वेळीं परवाना रद्द केला. यामुळें टिळकांसकट सर्वच मंडळी खट्टू झाली. टिळक म्हणाले कीं, मी ब्रिटिश जनतेला सांगतों कीं जर्मनीशीं लढण्याकरितां मी हिंदुस्थानांतून पाहिजे तेवढें सैन्य देतों. फक्त तुम्ही लोकांत उत्साह उत्पन्न करण्याकरितां स्वराज्याचें आश्वासन द्या. इंग्रज लोक त्यावेळीं महान् संकटांत पडले होते. यशाची खात्री नव्हती. अशा वेळीं टिळकांसारख्या लोकप्रिय पुढाऱ्यानें जर सैन्यभरतीचें आश्वासन दिलें तर ब्रिटिश जनता आपल्या प्रधानमंडळावर दडपण आणून हिंदी जनतेला स्वराज्यविषयक आश्वासन देणें भाग पाडील; व हें तर नोकरशाहीला नको होतें. म्हणून त्यांनीं टिळकांचा परवानाच रद्द केला. यामुळें पुढील मार्ग खुंटले. लोकांना वाटूं लागलें कीं, पासपोर्ट रद्द करून सरकारनें आपल्या पुढाऱ्याचा अपमान केला आहे. बापटांनाहि तसेंच वाटत होतें. नुसतीं मनगटें चावीत बसण्याचा बापटांचा स्वभाव नव्हता. त्यांनीं लगेच त्यावेळच्या राजकीय पुढाऱ्यांसमोर विजापूर प्रान्तिक सभेंत एक कार्यक्रमच ठेवला. तो असा—

१. सरकारकडे लो. टिळकांना पासपोर्ट देण्याबद्दल निर्वाणीचा खलिता पाठविणें.

२. तो परवाना न मिळाल्यास सैन्यभरतीविरुद्ध मोहीम सुरू करून म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड व कौन्सिलवर बहिष्कार घालून पासपोर्ट मिळेपर्यंत बहिष्कार चालविणें.

हा ठराव विषयनियामक कमेटींत नापास झाला. परिषदेचे अध्यक्ष कै. विठ्ठलभाई पटेल होते. म. गांधीहि आले होते. ठराव फार जहाल आहे असें मत कै. विठ्ठलभाईंनीं दिलें व तें सर्वांनीं मान्य केलें.

त्या परिषदेनंतर पुण्यास आल्यावर लो. टिळकांनीं बापटांना बोलावून घेतलें. "आतां सत्याग्रह घडवून आणण्याचा आणखी प्रयत्न करूं नका. तुम्हांला सत्याग्रहाची जाहीर मोहीम व मराठा पत्राचें संपादकत्व या दोन गोष्टी एकाच वेळीं करूं देणें मला शक्य नाहीं." वगैरे पुष्कळ समजुतीनें सांगितलें. पण तें बापटांना पटलें नाहीं. ते म्हणाले, "मला आणखी थोडा प्रयत्न करून पहावयाचा आहे. म्हणून मी मराठा सोडणेंच इष्ट समजतों." अशा प्रकारें बापटांचा मराठाशीं असलेला संबंध सुटला.

## *जुलुमाचा प्रतिकार*

विज़ापूरची परिषद संपवून बापट आपल्या मित्राबरोबर कॅम्पकडे जात होते. वाटेंत महायुद्धाच्या रिक्रूटभरतीचा एक लष्करी डेपो होतो. या शिबिराच्या आंत एक कानडी मुलगा रडत होता व त्याला एका बाईनें मिठी मारली होती असें दृश्य त्यांना दिसलें. त्यांनीं आपल्या कानडी मित्राला हें काय चाललें आहे असें विचारतांच तो म्हणाला कीं हा रिक्रूटचा डेपो आहे. कांहीं भानगड असेल. 'चला, आपण काय भानगड आहे तें पाहूं—' असें म्हणून बापट फाटक उघडून आंत गेले. फाटकावरच्या लष्करी माणसानें अडविलें नाहीं. बापटांबरोबर बरीच मंडळी आंत शिरली. चौकशीअंतीं कळलें कीं, तो मुलगा जबरदस्तीनें आणला गेला होता. त्याला रिक्रूट व्हावयाचें नाहीं म्हणून तो रडत होता. त्याची बहीण 'भावाला सोडा' म्हणून याचना करीत होती. हें कळल्यावर बापटांनीं ठरविलें कीं, त्या मुलाला सोडविण्याचा प्रयत्न करावा. बहीणभावाची भेट झाल्यावर पोलिसानें त्याला खोलीकडे चालविलें. बापट त्याचा हात धरून म्हणाले, "मलाही न्या अगर त्याला सोडून द्या." पोलिसानें त्या तरुणाला ओढीत नेलें व त्याबरोबर बापटहि गेले. थोडें अंतर गेल्यावर बापटांचे मित्र डॉ. भट वगैरेंनीं त्यांना मागें ओढलें. बापट म्हणाले, कलेक्टरला येऊं द्या. तो माझ्या थोडा ओळखीचा आहे. तो आल्यावर काय होईल तें पाहूं. नाहींतर हे प्रकरण योग्य रीतीनें संपवूं. बापटांचें त्यांच्या मित्रांनीं ऐकलें नाहीं व त्यांना उचलून नेऊन कॅंपांत कोंडून ठेवलें. कल्पना करा, ती लष्करी छावणी होती. तेथला कायदा असामान्य हुकुमाशिवाय आंत शिरणाऱ्याला गोळ्या घालण्याचा.

अशा स्थितींत कोणीहि मनुष्य जुलमाचा त्वेष येऊनहि क्षणभर कचरतोच. पण,

> मयूरवांनीं जेव्हां प्रखरतर चंडांशु तपतो ।
> रविग्रावा तेव्हां अनलसम तेजास वमतो ॥

तसें बापटांचें झालें. वेळ अधिक जाता तर बापटांवर गोळीच झाडण्यांत आली असती. पण खऱ्या वीराला कारागृह काय, गोळी काय? तो जुलमाचा प्रतिकार केल्याशिवाय रहात नाहीं. मागें रावसाहेब पटवर्धनांना नगरच्या कलेक्टरनें बोलावून सांगितलें कीं, तुमचे लेख डिफेन्स ऑफ इण्डियाखालीं येतात हें माहीत आहे ना? रावसाहेबांनीं चोख उत्तर दिलें,

"कायदा पाहून मी लेखणी हातीं घेत नाहीं. माझ्या राष्ट्राच्या हिताचें जें असेल तें मी लोकांना सांगणार. कायदा वगैरे तुम्ही पहा." याला म्हणतात तेजस्विता. मागें १९३० सालीं सोलापुरांत लष्करी कायदा जारी होता व जुलूमहि भरपूर होत होता. कायदेभंगाची मोहीम चालू होती पण ती संथ पाण्यांत चालली होती. लष्करी कायद्याच्या तुफानी समुद्रांत शिरण्यास कोणीच धजत नव्हतें. पण बापटांनीं एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणें

> महाराष्ट्र तेजस्विता नाहिं मेली ॥

तें लवकरच प्रत्ययास आलें. पुण्याच्या राष्ट्रीय पाठशाळेचे तेजस्वी अध्यापक श्री. वा. वि. साठे हे राष्ट्रीय निशाण घेऊन लष्करी कायदा जारी असलेल्या सोलापुरास निघाले. त्यांचेबरोबर कांहीं दुसरे वीर होतेच. एकूण काय, जुलमाचा प्रतिकार करण्याचा स्फुलिंग जोंपर्यंत राष्ट्रांत आहे तोंपर्यंतच राष्ट्र जिवंत आहे असें म्हटलें पाहिजे. राष्ट्राचा इतिहास म्हणजे दुसरातिसरा नसून अशाच तेजस्वी प्रसंगांचा बनत असतो.

अशाच कांहीं प्रसंगावरून लोकमान्यांजवळ बापटांचे कडाक्याचे वाद झाले. बापटांनीं म्हणावें, हे जुलूम आपण कसे सहन करावे? इतरांचें एक असो. पण तुमच्यासारख्या निधड्या छातीचा मनुष्य कसे सहन करतो? इतरांची मला पर्वा नाहीं, पण तुमचा तरी मला पाठिंबा हवा. लोकमान्यांनीं बापटांची तेजस्विता पाहून मनांत म्हणावें, "आहे, राष्ट्रांत तेज आहे. इतरत्र मुत्सद्दीपणाच्या नांवाखालीं जो बावळटपणा—हिजडेपणा मला दिसतो त्यापेक्षां बापटांची उतावळी वीरता बरी." अशा रीतीनें मनांतल्या मनांत त्यांचें कौतुक करून, टिळक प्रथम बापटांना म्हणत, "बाबारे, तूं म्हणतोस तें सर्व खरें. पण जुलमाच्या

प्रत्येक कृत्यावर औषध लावीत बसण्यापेक्षां जुलुमाचें मूळ जें पारतंत्र्य तेंच आपण उखडून टाकूं व तें करण्याला लोकांचें संघटण केलें पाहिजे." यावर बापट थोडेसे चिडून म्हणत, "याला १०० वर्षें देखील पुरावयाचीं नाहींत. तेथपर्यंत आम्ही जागच्या जागीं जळत रहावें काय?"

"तुमच्यासारखीं माणसें ज्या राष्ट्रांत हरघडीला पैदा होत आहेत त्याला १०० वर्षें कशाला पाहिजेत? हें तेज एकत्रित करण्याची माझी खटपट चालू आहे. त्याला तुमच्या शक्तीचा नेट द्या. आपली भावना आवरा. भावना वाफेसारखी शक्तिप्रद आहे, पण ती संयमाच्या नळींतून गतिचक्राजवळ नेली पाहिजे. तुम्ही मेकॅनिकल इंजीनिअर आहांत ना?"

"पण मी तो कोर्स मीं मध्येंच सोडून दिला—"

"मग वाऱ्यावर आपली अद्‌भुत शक्ति सोडून देणार काय?"

यावर बापटांनीं चिडून म्हणावें, "पण मला हें पटत नाहीं. अन्याय आपल्याला सहन होणार नाहीं. मी त्यावर माझी सर्व शक्ति खर्चून तुटून पडणार."

"जा. तूं वीर पुरुष आहेस. घणाघाईच्या युद्धांत आपली सेना घेऊन शत्रुसैन्यावर तुटून पडण्याची तुझी योग्यता आहे. पण तुझ्या ह्या अद्‌भुत शौर्यास लायक काळ यावयाचा आहे. १०० वर्षें तूं अगोदर जन्माला आलास, दुसरें काय?" अशा अर्थाचा संवाद दोघांत व्हावा. लोकमान्यांचा पाठिंबा आपल्याला नाहीं म्हणून बापट खिन्न होऊन जिना उतरत व लोकमान्य 'असल्या वीररत्नाला साजेसें काम द्यावयाला मजजवळ नाहीं' म्हणून खिन्न होऊन आरामखुर्चीवर मान टाकून दीर्घ श्वास सोडीत. या वेळेपर्यंत बापटांनीं मराठा सोडला होता. ते ज्ञानकोशांत होते. तेथून त्यांची बदली मुंबईला झाली.

## *मुंबईच्या भंग्यांना साहाय्य*

परकीय राज्यांत अन्यायाचा प्रतिकार करण्याचे प्रसंग हरघडी येतात. मुंबईस गेल्यावर बापटांना कळलें कीं, तेथील भंगी लोकांनीं पगारवाढीकरितां संप केला आहे. भंग्यांच्या सुखदुःखांशीं बापट पारनेरपासून एकरूप झाले होते. मुंबईच्या श्रीमंत लोकांनीं ऐषआरामांत रहावें–पापी चैन करावी–व्यसनांत पैसा उधळावा आणि शहराचें आरोग्य जे रक्षण करतात त्यांना पोटापुरतेंहि मिळूं नये हा अन्याय आहे.

पूर्वी जेथें अन्याय होत असेल तेथें नाईट लोक हटकून धावत जावयाचे.

त्यांचेंच तेज आपणास बापटांत आढळून येईल. भंग्यांची बाजू घेऊन बापटांनीं रात्रीचा दिवस करून संपांत तेज आणलें. अधिकाऱ्यांशीं चर्चा व वाद केले, संप टिकविण्याकरितां स्फूर्तीचीं भाषणें केलीं, वर्तमानपत्रांत लेख लिहून गुप्त जुलूम चव्हाट्यावर आणला. सुदैवानें त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन भंग्यांना पगारवाढ मिळून गरिबांचा दुवा बापटांना मिळाला.

हिंदुस्थानचें पारतंत्र्य सशस्त्र युद्धाशिवाय नष्ट व्हावयाचें नाहीं असें बापटांना वाटत असलें तरी अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या लहानसहान साधनांचा ते अव्हेर करीत नाहींत. म्हणून पिकेटिंग किंवा परदेशी मालाच्या निरोधनासारख्या कामाला ते प्रसंगीं पुढें सरसावतात. बापटांचे दोस्त बॅ. सावरकर हे अन्दमानमध्यें खितपत पडले होते. त्यांना व त्यांच्याबरोबर यमयातना सोशीत असलेल्या स्वातंत्र्यवीरांना सोडविण्याकरितां सरकारकडे लोकांच्या सह्यांचा अर्ज करावा असें कोणी सहज म्हटलें. दुसरें काहीं करता येत नाहीं हें पाहून बापट त्या कामाला लागले. ते त्याला त्या काळांत 'अर्जबाजी' म्हणत.

एकदां कोणतेंहि काम हातीं घेतलें म्हणजे बापट गांधी-टिळकांच्या चिकाटीनें त्या कामास लागतात. त्यांनीं अर्जांचे असंख्य नमुने छापून घेऊन पुण्यामुंबईस घरोघर वाटले. महाराष्ट्रांत ह्या अर्जबाजीचें लोण तालुक्यापर्यन्त नेऊन पोहोंचविलें. स्वतः गळ्यांत, "राजबंदींच्या मुक्ततेसाठीं अर्जावर सह्या द्या," असा फलक बांधून ते पुण्यांत हिंडत. कामाचें वेड म्हणतात तें याला. अनेकांच्या अनेक प्रयत्नानें सावरकर पुढें सुटले. त्यांत ह्या अर्जांचा, लोकमताच्या दाबाचा परिणाम सरकारवर थोडाबहुत झाला असावा.

ह्या अर्जबाजीला स्वातंत्र्ययुद्धांत नैतिक महत्त्व आहे. जनमताचें केन्द्रीकरण यामुळें झालें. लोकजागृति झाली. लहानसहान काम किती आस्थेनें, तन्मयतेनें, चिकाटीनें करावें याचे धडे बापटांनीं जनतेला स्वतः कर्मयोग आचरून दिले. जें तत्त्वज्ञान ते सांगतात तें स्वतः आचरणांत आणल्याशिवाय राहात नाहींत, म्हणून त्यांची योग्यता मोठी समजण्यांत येते.

# १०

# पहिला सामुदायिक सत्याग्रह

मुळशी सत्याग्रह म्हणजे महाराष्ट्रांत स्वातंत्र्याकरितां झालेल्या अनेक लढ्यांतील एक तेजस्वी प्रकरण होय. हें प्रकरण इतकें गाजण्याची आणि दैदीप्यमान बनण्याचीं अनेक कारणें होतीं. असहकारितेचें आंदोलन सुरू झाल्यावर हिंदुस्थानांत जी संग्रामवृत्ति उत्पन्न झाली तिला महाराष्ट्रांत मुळशी लढ्यांत चांगला वाव मिळाला. वंग-भंगापासून महाराष्ट्राच्या नसानसांतून रक्त सळसळूं लागलें होतें. वैयक्तिक अनेक यज्ञ झाले. परंतु सामुदायिक लढ्यानें जी तेजस्विता उत्पन्न होते, ती व्यक्तिशः केलेल्या प्रयत्नांत दिसून येत नाहीं. यावेळीं महाराष्ट्रानें सामुदायिक लढा सुरू केला होता. दुसरी गोष्ट. या लढ्याची पार्श्वभूमि ऐतिहासिक होती. शिवाजीच्या मावळ्यांवर जुलूम होत होता. यामुळें त्या शिवाजीच्या मावळ्यांचें रक्षण करणें कृतज्ञतेच्या दृष्टीनें महाराष्ट्राला कळकळीचें वाटत होतें. तिसरी गोष्ट. ह्या लढ्याचें धुरीणत्व बापटांनीं स्वीकारलें होतें. बापट ह्या लढ्यांत उतरल्याबरोबर महाराष्ट्र खडबडून जागा झाला. बापटांमुळें फार दूरदूरची मंडळी ह्या लढ्यांत आकर्षिली गेली. बापटांचें आगमन कांहींना जितकें हवेसें वाटलें तितकेंच कांहींना नकोसें वाटलें. कारण बापट पडले सशस्त्र क्रान्तीचे पुरस्कर्ते. हा सत्याग्रह तर कांहींना आदर्श शांतिसंग्राम करावयाचा होता. परंतु बापट वचनाला जागणारे आहेत. एकदां शांतिसंग्राम करण्याचें ठरल्यावर ते त्या पद्धतीला धरूनच चालतील असा भरंवसा असल्यानें त्यांच्या धुरीणत्वाला सर्वसामान्य मान्यता मिळाली.

बापटांनीं १९०३ पासून ज्या क्रांतिकारक संग्रामाची मनांत आंखणी केली होती तो संग्राम कांहीं ना कांहीं कारणानें १९२१ पर्यंत क्षितिजाप्रमाणें प्रत्येक पावलाला दूरदूरच जात होता. त्यामुळें ते निराश होऊन मुंबईस ज्ञानकोशाचीं प्रुफें शुद्ध करीत बसले होते. दिल्लीचें तक्त फोडण्याचें ज्याच्या मनगटांत सामर्थ्य त्याला बुकीनें नारळ फोडून मनगटांतील शक्ति दाखविण्याचा प्रसंग यावा तसा प्रसंग आज त्यांचेवर आला होता.

"नखानां पांडित्यं मनगटयतु कस्मिन् मृगपतिः"

अशी आज बापटांची स्थिति झाली होती. शेवटीं अनेक वर्षांची त्यांची मनीषा फलद्रूप होण्याचा सुयोग आला. अक्रोडाच्या झाडाला मोहोर फुटून फळें येण्याचा रंग दिसूं लागला. तो प्रसंग असा—

पुणें जिल्ह्यांत 'मुळशी' या नांवाचा तालुक्याचा पोटविभाग–पेटा–आहे. ह्यांत ५४ खेडीं असून १०००० मावळ्यांची वस्ती आहे. ४०००० एकर जमिनींत भात उत्कृष्ट पिकतें. पर्जन्यदेवतेची या तालुक्यावर भरपूर कृपा आहे. २५०" पर्यंत येथें पाऊस पडतो, असें ऐकल्यावर आश्चर्य वाटणार नाहीं का? हंगामांत अंबे-मोहोर तांदुळाच्या सुगंधानें भूमि दरवळून गेलेली असते. अंबेमोहोर तांदुळाच्या सात्विक सुगंधाप्रमाणेंच ते उत्पन्न करणारे मावळे लोकहि कष्टाळू, निर्व्यसनी, निष्कपटी, सालस वृत्तीचे आहेत. ह्या पेट्यांत 'नीला' आणि 'मुळा' नद्यांचा संगम होत असल्यामुळें पेट्याला 'सुजलां सुफलां' असें म्हणण्यास हरकत नाहीं.

'सालस सज्जनांना अकारण वैरी उत्पन्न होतात' असें भर्तृहरि बोलून चुकलाच आहे. कस्तुरी मृगानें अगर अनागस हरिणांनीं कोणाचें वाईट केलें आहे का? परंतु त्यांची शिकार लोभी मानव करतातच कीं नाहीं? तशीच या मावळ्यांची शिकार करण्याचें मुंबईच्या द्रव्यलोभी व्यापाऱ्यांच्या मनांत आलें. मोठमोठ्या शास्त्रज्ञांनीं रात्रीचा दिवस करून जगत्कल्याणाकरितां जे शोध लावले त्याचा फायदा सत्ताधाऱ्यांनीं घेऊन जगाच्या सुखावर आज निखारे ठेवले आहेत. टाटा घराण्याचे मूळपुरुष जमशेट टाटा हे जितके कल्पक तितकेच देशाभिमानी होते. देशांत मोठमोठाले कारखाने सुरू करून स्वदेशी धंद्यांना उत्तेजन द्यावें असें त्यांना वाटत असे. एक दिवस पुण्याहून मुंबईस येत असतां वर्षाकालांत त्यांनीं बोगद्यांतून अपूर्व देखावा पाहिला. पर्वतशिखरावरून पाण्याचे मोठे लोट घों घों करीत दऱ्याखोऱ्यांत पडून लुप्त होत होते. टाटा ह्या नैसर्गिक देखाव्यानें तृप्त होऊन राहिले नाहींत. त्यांना असें वाटलें, कीं हें सह्याद्रीवरचें फुकट जाणारें पाणी, जर बांध घालून वर अडवून ठेवलें व त्याचा प्रवाह मोठ्या राक्षसी नळ्यांतून खालीं सोडला तर आपणाला यंत्रांच्या साहाय्यानें एवढी प्रचंड वीज निर्माण करतां येईल कीं तिच्या जोरावर मुंबईतील बहुतेक कारखाने चालू करतां येतील. इतकेंच नव्हे तर त्यांना वीज पुरून इतकी उरेल, कीं त्यानें सबंध मुंबई प्रकाशित करतां येईल. टाटांनीं आपली ही कल्पना शास्त्रज्ञांपुढें ठेवली. त्यांची अनुमति घेऊन सरकारी मदतीनें त्यांनीं लोणावळा येथें प्रचंड धरण बांधलें आणि त्या पाण्याच्या बळावर मुंबईस

वीज आणली. हा प्रयोग यशस्वी झाल्यावर धरणें बांधावयाची कल्पना पुढें टाटा कंपनीला आली, आणि ह्या कंपनीनें मुळशी पेट्यांत असेंच धरण बांधून त्याची वीज मुंबईच्या गिरण्यांकरितां न्यावयाचें ठरविलें.

ह्या धरणाची योजना सामान्य नव्हती. त्याची भिंत १५०' रुंद व २५०' उंच व्हावयाची होती. त्याची लांबी जवळजवळ अर्धा मैल होणार होती. दोन नद्यांचें पाणी जर अशा रीतीनें अडविलें तर त्या पाण्यांत मुळशी पेट्यांतील बहुतेक गांवें बुडून जाणार होतीं. १०००० लोक देशोधडीस लागणार होते. १५ हजार खंडी पीक बुडणार होतें. एकीकडे एका पेट्यांतील लोक देशोधडीला लागणार तर दुसरीकडे मुंबईत विजेच्या जोरावर गिरण्या स्वस्त दरानें चालणार. आणि आधींच श्रीमंत असलेले लोक अधिक गबर होऊन दुसरीं सह्याद्रींतील गांवें अशींच बुडवून तेथील लोकांना देशोधडीस लावणार! हा प्रसंग विचार करण्याजोगा होता. जमशेट टाटा हा वेळपर्यंत दिवंगत झाले होते. टाटा कंपनी अनेकांच्या मालकीची झाली होती. कंपनी फार मोठी म्हणजे सर्व कारभार मॅनेजरच्या हातांत. आणि ह्या मॅनेजरची दृष्टि कंपनीला नफा कसा जास्त मिळेल, आपला पगार व कमिशन जास्त कसें होईल, इकडे असतें. जमशेट टाटांचे चिरंजीव दोराब टाटा दुष्ट हृदयाचे होते असें म्हणवत नाहीं. त्यांनीं लाखों रुपये आपल्या हयातींत जातगोत न पहातां मानवी दुःखें हलकीं करण्यासाठीं खर्च केले. आणि मरते वेळीं आपल्या नातेवाईकांना जी इस्टेट ठेवली त्याच्या कितीतरी पट म्हणजे ३ कोटी रुपये जनतेच्या हितार्थ ठेवून दिले. असा मनुष्य मावळ्यांस देशोधडीला लावण्यास सिद्ध होईल असें कसें म्हणावें? पण दुर्दैवानें गोष्ट तशी घडली खरी! कंपनीचा सर्व व्यवहार मॅनेजर पहातात आणि टाटांचे जगभर इतके व्यवहार होते कीं, मुळशी पेट्यांतील अन्याय त्यांच्या कानावर क्वचितच गेला असेल. व शेवटीं सत्याग्रहाच्या चळवळीनें जो गेला असेल तोहि त्यांच्या मॅनेजर्सनीं विकृत स्वरूपांत मांडलेला असावा.

या कार्यांत कंपनी जितकी दोषी, निर्घृण ठरली तितकेंच मुंबई सरकार हेंहि निर्घृण दिसून आलें. मुंबई सरकारच्या कानावर सत्याग्रह कमेटीनें सर्व दुःखें व्यवस्थित मांडलीं. पण सरकारनें जाणूनबुजून तिकडे कानाडोळा केला आणि कंपनीचा पक्षपात करून धरण पुरें होऊं दिलें. ह्या ठिकाणीं एक प्रश्न असा उत्पन्न करतात कीं, देशांत जर कारखाने वाढावयास पाहिजेत तर त्याकरितां नैसर्गिक शक्तीचा उपयोग करावयास हवा. सह्याद्रींत पडणाऱ्या पाण्याची शक्ति कामाला लावावयाची तर कांहीं गांवें बुडणारच. गोष्ट खरी. परंतु ज्यांचीं शेतें जाणार त्यांना

देशोधडीस लावण्याच्या अगोदर त्यांच्या उपजीविकेला योग्य अशी जमीन पाहून देणें हें सरकारचें कर्तव्य नव्हतें का? एवढ्या मुंबई इलाख्यांत १० हजार एकर जमीन नाहीं असें नाहीं. पण सरकार बेदरकार होतें. आम्ही करूं ती पूर्व असा त्याचा गर्व होता. द्रव्यमदानें धुंद झालेल्या मॅनेजरला वाटत होतें कीं, मावळ्यांची आपल्यापुढें उभें रहाण्याची काय ताकद? सरकार आमच्या पाठीशीं आहे. द्रव्याच्या जोरावर कांहीं मवाली पठाण बाळगले कीं, मावळ्यांना त्यांच्या घरांतून हुसकावून लावण्यास काय उशीर? मधाचें पोळें हस्तगत करतांना मनुष्याला वाटतें कीं, चार दगड मारले कीं अल्पशक्तीच्या माश्या उडून दूर जातील आणि आपल्याला मधाची लूट सहजासहजीं मिळेल. पण मनुष्याच्या लवकरच अनुभवास येतें कीं, मधमाश्या शरिरानें नाजूक असल्या तरी अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ति त्यांच्यांत मोठ्या प्रमाणांत वसत असते आणि मधाचें पोळें काढून घेणाराचें जीवित त्या त्रस्त करून सोडल्याशिवाय रहात नाहींत. इंग्लंडमध्यें 'चिरोल'-सारख्या सर्व साम्राज्यसत्ता पाठीशीं असलेल्या पत्रपंडिताला जो अनुभव पुण्याच्या टिळकांच्या वाटेला जाऊन आला तोच अनुभव टाटा कंपनीला म्हणजे धनाढ्यांच्या द्रव्योन्मादाला मावळ्यांच्या वाटेस गेल्यावर आला. 'चिरोल केस' टिळक हरले खरे. पण ती केस जिंकणारे चिरोलसाहेब शेवटीं म्हणाले, "मी वर्तमानपत्र लिहिण्याचा धंदा आज कितीतरी वर्षें करीत आहें. या अवधींत मला खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकीं एक टिळक व दुसरे जर्मन बादशहा कैसर वुइल्यम्."

उत्तरहिंदुस्थानांत परकीयांच्या अनेक स्वाऱ्या झाल्या. पण त्यांना खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकीं एक पहिला बाजीराव. तो नादिरशहाला जाब विचारावयास निघाला. पण तो पोहोंचण्याचे आधींच शहानें आपला गाशा गुंडाळला होता. दुसरा प्रसंग पानिपतचा. भाऊसाहेब पेशवे असाच जाब विचारण्याकरितां उत्तर हिंदुस्थानांत गेले होते. गोविंदपंत बुंदेल्यानें कुचराई केली म्हणून यश आलें नाहीं. तरीपण धारातीर्थीं मरतांमरतां मराठ्यांनीं अशी कांहीं जरब परकीय लोकांना बसविली कीं, पुन्हा म्हणून काबूल-कंदहारकडून हिंदुस्थानवर स्वारी झालीच नाहीं. लढ्यांतील यशापयश पुष्कळ वेळां दैवाधीन असतें. परंतु त्यांतील कीर्ति मात्र पराक्रमावरच अधिष्ठित असते. मुळशीचा लढा जिंकला असें म्हणतां येणार नाहीं, तरीपण ह्या लढ्यांत महाराष्ट्रानें अपूर्व असें आपलें क्षात्रतेज दाखविलें. त्याचें वर्णन करावयाला खरोखर व्यासांच्या योग्यतेची लेखणी हवी आणि या संग्रामाला अभूतपूर्व तेज

चढण्याला बापटांचें तेजस्वी चारित्र्य आणि क्षात्रतेज उपयोगी पडलें. तो प्रसंग खरोखर रोमांचकारी आहे. तो यथार्थ वर्णन करणें प्रतिक्षणीं कठीणकठीण वाटत आहे. तरीपण तो जसा सांगतां येईल, तसा सांगण्याचा आपण प्रयत्न तर करूं.

# ११

# मुळशीचा लढा

मागील प्रकरणांत मुळशीला सत्याग्रह करण्याचा बेत महाराष्ट्राला कां करावा लागला हें आपण पाहिलें. आतां आपण ह्या प्रकरणांत हा मुळशी संग्राम कसा सुरू झाला व तो कोणकोणत्या अवस्थेंतून गेला आणि बापटांचा त्यांत कोणता भाग होता हें क्रमाक्रमानें पाहूं. तें पहातांना एक गोष्ट आपण लक्षांत ठेवायची आहे ती ही कीं, आपल्याला यांत मुळशी सत्याग्रहाचा साद्यंत वृत्तान्त कांहीं द्यावयाचा नाहीं. बापटांचें चरित्र कथन करतांना ह्या मुळशीचा प्रसंग जितका सांगितला पाहिजे तेवढाच आपण कथन करूं. नाहींतर मुळशी प्रकरणाचा विस्तार एवढा होईल कीं, तेंच प्रकरण बापटांचें चरित्र ग्रासून टाकिल.

बापट हे सशस्त्र क्रांतिकारक पक्षाचे पुरुष आहेत हें आपण मागें पाहिलेंच आहे. जिथें जिथें अन्याय होईल त्याचा प्रतिकार शक्य तर सामोपचारानें नाहीं तर शस्त्रानें केला पाहिजे या मताचे ते आहेत. मुळशी संग्रामाला 'मुळशी सत्याग्रह' असें नांव देण्यांत येतें. हें नांव देण्याचें कारण असें होतें कीं त्या वेळेला हिंदुस्थानांत असहकारितेची चळवळ सुरू झालेली होती. या असहकारितेंत सत्याग्रह या नांवाचें एक विशिष्ट युद्धतंत्र म. गांधींनीं अवलंबिलें होतें. या युद्धतंत्रांत असा नियम असे कीं कोणत्याहि मनुष्यावर जर दुसऱ्यानें जुलूम केला तर ज्याची न्याय्य बाजू असेल त्यानें अन्याय करणाराचा प्रतिकार केला पाहिजे. हा प्रतिकार करीत असतां त्यानें आपल्या प्रतिपक्षाला

अशी आज बापटांची स्थिति झाली होती. शेवटीं अनेक वर्षांची त्यांची मनीषा फलद्रूप होण्याचा सुयोग आला. अक्रोडाच्या झाडाला मोहोर फुटून फळें येण्याचा रंग दिसूं लागला. तो प्रसंग असा—

पुणें जिल्ह्यांत 'मुळशी' या नांवाचा तालुक्याचा पोटविभाग–पेटा–आहे. ह्यांत ५४ खेडीं असून १०००० मावळ्यांची वस्ती आहे. ४०००० एकर जमिनींत भात उत्कृष्ट पिकतें. पर्जन्यदेवतेची या तालुक्यावर भरपूर कृपा आहे. २५०" पर्यंत येथें पाऊस पडतो, असें ऐकल्यावर आश्चर्य वाटणार नाहीं का? हंगामांत अंबे-मोहोर तांदुळाच्या सुगंधानें भूमि दरवळून गेलेली असते. अंबेमोहोर तांदुळाच्या सात्विक सुगंधाप्रमाणेंच ते उत्पन्न करणारे मावळे लोकहि कष्टाळू, निर्व्यसनी, निष्कपटी, सालस वृत्तीचे आहेत. ह्या पेट्यांत 'नीला' आणि 'मुळा' नद्यांचा संगम होत असल्यामुळें पेट्याला 'सुजलां सुफलां' असें म्हणण्यास हरकत नाहीं.

'सालस सज्जनांना अकारण वैरी उत्पन्न होतात' असें भर्तृहरि बोलून चुकलाच आहे. कस्तुरी मृगानें अगर अनागस हरिणांनीं कोणाचें वाईट केलें आहे का? परंतु त्यांची शिकार लोभी मानव करतातच कीं नाहीं? तशीच या मावळ्यांची शिकार करण्याचें मुंबईच्या द्रव्यलोभी व्यापाऱ्यांच्या मनांत आलें. मोठमोठ्या शास्त्रज्ञांनीं रात्रीचा दिवस करून जगत्कल्याणाकरितां जे शोध लावले त्याचा फायदा सत्ताधाऱ्यांनीं घेऊन जगाच्या सुखावर आज निखारे ठेवले आहेत. टाटा घराण्याचे मूळपुरुष जमशेट टाटा हे जितके कल्पक तितकेच देशाभिमानी होते. देशांत मोठमोठाले कारखाने सुरू करून स्वदेशी धंद्यांना उत्तेजन द्यावें असें त्यांना वाटत असे. एक दिवस पुण्याहून मुंबईस येत असतां वर्षाकालांत त्यांनीं बोगद्यांतून अपूर्व देखावा पाहिला. पर्वतशिखरावरून पाण्याचे मोठे लोट घों घों करीत दऱ्याखोऱ्यांत पडून लुप्त होत होते. टाटा ह्या नैसर्गिक देखाव्यानें तृप्त होऊन राहिले नाहींत. त्यांना असें वाटलें, कीं हें सह्याद्रीवरचें फुकट जाणारें पाणी, जर बांध घालून वर अडवून ठेवलें व त्याचा प्रवाह मोठ्या राक्षसी नळ्यांतून खालीं सोडला तर आपणाला यंत्रांच्या साहाय्यानें एवढी प्रचंड वीज निर्माण करतां येईल कीं तिच्या जोरावर मुंबईतील बहुतेक कारखाने चालू करतां येतील. इतकेंच नव्हे तर त्यांना वीज पुरून इतकी उरेल, कीं त्यानें सबंध मुंबई प्रकाशित करतां येईल. टाटांनीं आपली ही कल्पना शास्त्रज्ञांपुढें ठेवली. त्यांची अनुमति घेऊन सरकारी मदतीनें त्यांनीं लोणावळा येथें प्रचंड धरण बांधलें आणि त्या पाण्याच्या बळावर मुंबईस

वीज आणली. ह्या प्रयोग यशस्वी झाल्यावर धरणें बांधावयाची कल्पना पुढें टाटा कंपनीला आली, आणि ह्या कंपनीनें मुळशी पेट्यांत असेंच धरण बांधून त्याची वीज मुंबईच्या गिरण्यांकरितां न्यावयाचें ठरविलें.

ह्या धरणाची योजना सामान्य नव्हती. त्याची भिंत १५०'रुंद व २५०' उंच व्हावयाची होती. त्याची लांबी जवळजवळ अर्धा मैल होणार होती. दोन नद्यांचें पाणी जर अशा रीतीनें अडविलें तर त्या पाण्यांत मुळशी पेट्यांतील बहुतेक गांवें बुडून जाणार होतीं. १०००० लोक देशोधडीस लागणार होते. १५ हजार खंडी पीक बुडणार होतें. एकीकडे एका पेट्यांतील लोक देशोधडीला लागणार तर दुसरीकडे मुंबईत विजेच्या जोरावर गिरण्या स्वस्त दरानें चालणार. आणि आधींच श्रीमंत असलेले लोक अधिक गब्बर होऊन दुसरीं सह्याद्रींतील गांवें अशींच बुडवून तेथील लोकांना देशोधडीस लावणार! हा प्रसंग विचार करण्याजोगा होता. जमशेट टाटा हा वेळपर्यंत दिवंगत झाले होते. टाटा कंपनी अनेकांच्या मालकीची झाली होती. कंपनी फार मोठी म्हणजे सर्व कारभार मॅनेजरच्या हातांत. आणि ह्या मॅनेजरची दृष्टि कंपनीला नफा कसा जास्त मिळेल, आपला पगार व कमिशन जास्त कसें होईल, इकडे असतें. जमशेट टाटांचे चिरंजीव दोराब टाटा दुष्ट हृदयाचे होते असें म्हणवत नाहीं. त्यांनीं लाखों रुपये आपल्या ह्यातींत जातगोत न पहातां मानवी दुःखें हलकीं करण्यासाठीं खर्च केले. आणि मरते वेळीं आपल्या नातेवाईकांना जी इस्टेट ठेवली त्याच्या कितीतरी पट म्हणजे ३ कोटी रुपये जनतेच्या हितार्थ ठेवून दिले. असा मनुष्य मावळ्यांस देशोधडीला लावण्यास सिद्ध होईल असें कसें म्हणावें? पण दुर्दैवानें गोष्ट तशी घडली खरी! कंपनीचा सर्व व्यवहार मॅनेजर पहातात आणि टाटांचे जगभर इतके व्यवहार होते कीं, मुळशी पेट्यांतील अन्याय त्यांच्या कानावर क्वचितच गेला असेल. व शेवटीं सत्याग्रहाच्या चळवळींनें जो गेला असेल तोहि त्यांच्या मॅनेजर्सनीं विकृत स्वरूपांत मांडलेला असावा.

या कार्यांत कंपनी जितकी दोषी, निर्घृण ठरली तितकेंच मुंबई सरकार हेंहि निर्घृण दिसून आलें. मुंबई सरकारच्या कानावर सत्याग्रह कमेटीनें सर्व दुःखें व्यवस्थित मांडलीं. पण सरकारनें जाणूनबुजून तिकडे कानाडोळा केला आणि कंपनीचा पक्षपात करून धरण पुरें होऊं दिलें. ह्या ठिकाणीं एक प्रश्न असा उत्पन्न करतात कीं, देशांत जर कारखाने वाढावयास पाहिजेत तर त्याकरितां नैसर्गिक शक्तीचा उपयोग करावयास हवा. सह्याद्रींत पडणाऱ्या पाण्याची शक्ति कामाला लावावयाची तर कांहीं गांवें बुडणारच. गोष्ट खरी. परंतु ज्यांचीं शेतें जाणार त्यांना

देशोधडीस लावण्याच्या अगोदर त्यांच्या उपजीविकेला योग्य अशी जमीन पाहून देणें हें सरकारचें कर्तव्य नव्हतें का? एवढ्या मुंबई इलाख्यांत १० हजार एकर जमीन नाहीं असें नाहीं. पण सरकार बेदरकार होतें. आम्ही करूं ती पूर्व असा त्याचा गर्व होता. द्रव्यमदानें धुंद झालेल्या मॅनेजरला वाटत होतें कीं, मावळ्यांची आपल्यापुढें उभें रहाण्याची काय ताकद? सरकार आमच्या पाठीशीं आहे. द्रव्याच्या जोरावर कांहीं मवाली पठाण बाळगले कीं, मावळ्यांना त्यांच्या घरांतून हुसकावून लावण्यास काय उशीर? मधाचें पोळें हस्तगत करतांना मनुष्याला वाटतें कीं, चार दगड मारले कीं अल्पशक्तीच्या माश्या उडून दूर जातील आणि आपल्याला मधाची लूट सहजासहजीं मिळेल. पण मनुष्याच्या लवकरच अनुभवास येतें कीं, मधमाश्या शरिरानें नाजूक असल्या तरी अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ति त्यांच्यांत मोठ्या प्रमाणांत वसत असते आणि मधाचें पोळें काढून घेणाराचें जीवित त्या त्रस्त करून सोडल्याशिवाय रहात नाहींत. इंग्लंडमध्यें 'चिरोल'-सारख्या सर्व साम्राज्यसत्ता पाठीशीं असलेल्या पत्रपंडिताला जो अनुभव पुण्याच्या टिळकांच्या वाटेला जाऊन आला तोच अनुभव टाटा कंपनीला म्हणजे धनाढ्यांच्या द्रव्योन्मादाला मावळ्यांच्या वाटेस गेल्यावर आला. 'चिरोल केस' टिळक हरले खरे. पण ती केस जिंकणारे चिरोलसाहेब शेवटीं म्हणाले, "मी वर्तमानपत्र लिहिण्याचा धंदा आज कितीतरी वर्षें करीत आहें. या अवधींत मला खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकीं एक टिळक व दुसरे जर्मन बादशहा कैसर वुइल्यम्."

उत्तरहिंदुस्थानांत परकीयांच्या अनेक स्वाऱ्या झाल्या. पण त्यांना खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकीं एक पहिला बाजीराव. तो नादिरशहाला जाब विचारावयास निघाला. पण तो पोहोंचण्याचे आधींच शहानें आपला गाशा गुंडाळला होता. दुसरा प्रसंग पानिपतचा. भाऊसाहेब पेशवे असाच जाब विचारण्याकरितां उत्तर हिंदुस्थानांत गेले होते. गोविंदपंत बुंदेल्यानें कुचराई केली म्हणून यश आलें नाहीं. तरीपण धारातीर्थी मरतांमरतां मराठ्यांनीं अशी कांहीं जरब परकीय लोकांना बसविली कीं, पुन्हा म्हणून काबूल-कंदहारकडून हिंदुस्थानवर स्वारी झालीच नाहीं. लढ्यांतील यशापयश पुष्कळ वेळां दैवाधीन असतें. परंतु त्यांतील कीर्ति मात्र पराक्रमावरच अधिष्ठित असते. मुळशीचा लढा जिंकला असें म्हणतां येणार नाहीं, तरीपण ह्या लढ्यांत महाराष्ट्रानें अपूर्व असें आपलें क्षात्रतेज दाखविलें. त्याचें वर्णन करावयाला खरोखर व्यासांच्या योग्यतेची लेखणी हवी आणि या संग्रामाला अभूतपूर्व तेज

चढण्याला बापटांचें तेजस्वी चारित्र्य आणि क्षात्रतेज उपयोगी पडलें. तो प्रसंग खरोखर रोमांचकारी आहे. तो यथार्थ वर्णन करणें प्रतिक्षणीं कठीणकठीण वाटत आहे. तरीपण तो जसा सांगतां येईल, तसा सांगण्याचा आपण प्रयत्न तर करूं.

## ११

# मुळशीचा लढा

मागील प्रकरणांत मुळशीला सत्याग्रह करण्याचा वेत महाराष्ट्राला कां करावा लागला हें आपण पाहिलें. आतां आपण ह्या प्रकरणांत हा मुळशी संग्राम कसा सुरू झाला व तो कोणकोणत्या अवस्थेंतून गेला आणि बापटांचा त्यांत कोणता भाग होता हें क्रमाक्रमानें पाहूं. तें पहातांना एक गोष्ट आपण लक्षांत ठेवायची आहे ती ही कीं, आपल्याला यांत मुळशी सत्याग्रहाचा साद्यंत वृत्तान्त कांहीं द्यावयाचा नाहीं. बापटांचें चरित्र कथन करतांना ह्या मुळशीचा प्रसंग जितका सांगितला पाहिजे तेवढाच आपण कथन करूं. नाहींतर मुळशी प्रकरणाचा विस्तार एवढा होईल कीं, तेंच प्रकरण बापटांचें चरित्र ग्रासून टाकील.

बापट हे सशस्त्र क्रांतिकारक पक्षाचे पुरुष आहेत हें आपण मागें पाहिलेंच आहे. जिथें जिथें अन्याय होईल त्याचा प्रतिकार शक्य तर सामोपचारानें नाहीं तर शस्त्रानें केला पाहिजे या मताचे ते आहेत. मुळशी संग्रामाला 'मुळशी सत्याग्रह' असें नांव देण्यांत येतें. हें नांव देण्याचें कारण असें होतें कीं त्या वेळेला हिंदुस्थानांत असहकारितेची चळवळ सुरू झालेली होती. या असहकारितेंत सत्याग्रह या नांवाचें एक विशिष्ट युद्धतंत्र म. गांधींनीं अवलंबिलें होतें. या युद्धतंत्रांत असा नियम असे कीं कोणत्याहि मनुष्यावर जर दुसऱ्यानें जुलूम केला तर ज्याची न्याय्य बाजू असेल त्यानें अन्याय करणाराचा प्रतिकार केला पाहिजे. हा प्रतिकार करीत असतां त्यानें आपल्या प्रतिपक्षाला

यत्किंचितहि शारीरिक उपद्रव द्यावयाचा नाहीं. इतकेंच नव्हे तर मनानेंहि त्याचें वाईट चिंतावयाचें नाहीं. वाईट चिंतावयाचें नाहीं याचा अर्थ असा नव्हे कीं, त्याच्या अन्यायी कार्यांत त्याला यश येवो अशी इच्छा करावयाची! त्याचें भलें होवो याचा अर्थच असा कीं त्याला अन्याय करण्याची दुर्बुद्धि न होवो. हा अन्याय होत असतांना शत्रु जो जो अपकार करील तो तो सर्व आपण शांतपणानें व धैर्यानें सहन करावयाचा. न्यायाकरितां आपण जर शारीरिक व मानसिक हाल सोसले तर शेवटीं प्रतिपक्षाच्या बुद्धींत पालट होतो व त्याला सुबुद्धि सुचते—आणि आपल्याला न्याय मिळतो.

म. गांधींचा वरील सत्याग्रह तंत्रावर पूर्ण विश्वास आहे आणि हिंदुस्थानांत स्वराज्याकरितां जो लढा आपण सुरू केला आहे त्या सत्याग्रहाचें तंत्र कॉंग्रेसकडून गांधींनीं मान्य करून घेतलें आहे. ह्या तंत्राप्रमाणें हिंदुस्थानांत लहानमोठे अनेक लढे लढले गेले. सत्याग्रहाच्या कल्पनेनें आपलें राष्ट्र ज्या वेळेला भारून गेलें होतें अशा काळांत मुळशीच्या लढ्याला तोंड फुटलें होतें. तेव्हां हा लढा सत्याग्रह पद्धतीनेंच चालवावा असें महाराष्ट्रांतील देहदंड सोसण्याची ज्यांची तयारी होती अशा लोकांना वाटत होतें. मुळशीच्या मावळ्यांवर अन्याय होतो असें दिसतांच मुळशी पेठ्यांतील तेजस्वी लोक जागे होऊन त्यांनीं हालचालीस आरंभ केला. खेडेगांवांतील लोकांना शहरांतील लोकांचा पाठिंबा असल्याशिवाय ते मोठ्या गोष्टींत हात घालूं शकत नाहींत. म्हणून मुळशीकरांनीं हें प्रकरण पुण्याच्या पुढाऱ्यांपुढें नेऊन मांडलें.

पुण्यास त्या वेळीं तात्यासाहेब केळकर, भोपटकर हे लोक कॉंग्रेसचे पुढारी होते. त्यांच्या कानावर ही बातमी येतांच त्यांनीं चिकित्सापूर्वक हें प्रकरण नीट तपासून पाहिलें. श्री. भुस्कुटे यांनीं सबंध तालुका पायीं फिरून सर्व परिस्थिति आणि आंकडेवार माहिती जमवून ठेवली होती. केळकर-भोपटकरांच्या बरोबरीनेंच काळकर्ते परांजपे, डॉ. फाटक, शंकरराव देव वगैरे मंडळी या प्रकरणाची बारकाईनें चौकशी करीत होती. केळकर-भोपटकरांना या अन्यायाचा प्रतिकार जरी करावासा वाटत होता तरी त्यांची कायदेबाज दृष्टि त्यांना सांगत होती कीं हा लढा कॉंपेन्सेशन म्हणजे पैशांची भरपाई करून घेऊन मिटवावा. श्री. देव वगैरे नव्या तरुण लोकांना त्या वेळीं गांधींनीं दाखविलेला सत्याग्रहाचा मार्ग चोखाळून पहावयाचा होता. प्रथम हे सर्व लोक एक झाले. तात्यासाहेब करंदीकर यांनीं त्यांचें पुढारीपण स्वीकारलें. आणि सत्याग्रहाचा एक प्रयोग मुळशीच्या निमित्तानें करून पाहूं या असें ही मंडळी मनांत म्हणत होती. सत्याग्रहाच्या

बाबतींत गांधींचाच सल्ला श्रेष्ठ असें समजून श्री. बाळूकाका कानिटकर, हरिभाऊ फाटक वगैरे मंडळी गांधींना भेटण्याकरितां मुंबईला गेली. गांधींचा आणि हरिभाऊंचा फारां दिवसांपासून ऋणानुबंध. या मंडळींचें सर्व बोलणें ऐकून घेतल्यावर गांधींनीं सत्याग्रहाच्या सर्व अटी नीट समजावून सांगितल्या आणि पुन्हा बजावलें कीं, 'तुम्ही मराठे लोक आहांत. शत्रु तुम्हांला चिडवूं लागला, अन्यायी जुलूम करण्याचें त्यानें सुरू केलें म्हणजे तुम्ही शारीरिक प्रतिकार केल्याशिवाय राहाणार नाहीं. सरकारला तर हेंच पाहिजे असतें म्हणजे त्यांचा जय होऊं लागतो. याकरितां जपून चाला. दुसरी गोष्ट. ज्या मावळ्यांकरितां तुम्ही हा लढा चालवणार त्या मावळ्यांना हा लढा चालवण्याची मनापासून इच्छा हवी. बाहेरची मदत तुम्ही त्यांस द्या. परंतु मुख्य भार मावळ्यांचाच असला पाहिजे.' गांधींनीं केलेला उपदेश ऐकून ही मंडळी परत फिरणार इतक्यांत ज्ञानकोशांत काम करीत असलेले बापट या मंडळींना भेटले. मुळशीची हकीकत आणि पुढचा संकल्प त्यांनीं ऐकून घेतला. प्रथम हा गांधीप्रणीत सत्याग्रह त्यांना पसंत नव्हता. म्हणून या मंडळीशीं ते थोडे थट्टेनेंच बोलले. पुढें रात्रीं त्यांनीं या गोष्टीवर खूप खूप विचार केला. आजपर्यंत मनाशीं केलेला स्वराज्याच्या लढ्याचा संकल्प त्यांच्या मनांतच राहिलेला होता. त्यांचें क्षात्रतेज सुप्त दिसत असलें तरी तें विझलेलें नव्हतें. त्यांनीं पाहिलें कीं, 'बैठेसे बिगार भली' ह्या न्यायानें स्वस्थ बसण्यापेक्षां हा गांधींचा कां होईना, सत्याग्रह कांहीं वाईट नाहीं. यश हें शेवटीं शस्त्राशिवाय मिळत नसलें तरी सत्याग्रहाच्या लढ्यांत राष्ट्राचें धैर्य वाढतें आणि स्वार्थत्यागाची वृत्ति बळावते. हा फायदा कांहीं लहानसहान नाहीं. ह्या आशेनें बापट हे लौकरच पुण्याच्या मंडळींना येऊन मिळाले. त्यावेळीं मुळशी संग्रामाची तयारी करीत असलेल्या कांहीं लोकांना बापटांसारखा बुद्धिमान आणि धैर्यशील मनुष्य भेटला म्हणून पराकाष्ठेचा आनंद झाला. त्याच्या उलट कांहीं लोक म्हणूं लागले कीं बापट बोलूनचालून शस्त्र आणि हिंसक पक्षाचे. अशा मनुष्याला गांधींच्या सत्याग्रहांत घेऊन ह्या कामाचा विचका मात्र होईल. शेवटीं भवति न भवति होऊन बापटांना सत्याग्रह मंडळांत घेण्यांत आलें. यावेळीं पुष्कळांनीं बापटांतर्फे ग्वाही दिली कीं बापटांचीं स्वतःचीं मतें कांहींहि असोत, ते शिस्तीचे मोठे भोक्ते आहेत. तेव्हां आपल्या गांधीप्रणीत सत्याग्रहांत ते स्वतःचीं मतें मिसळून ही अभिनव चळवळ दूषित करणार नाहींत. बापट अशा रीतीनें या संग्रामांत दाखल झाले. आतां प्रत्यक्ष लढा कसा लढला गेला हें पहावयाचें.

खडकीच्या लढाईनंतर महाराष्ट्रीयांनीं इंग्रजांशीं प्रत्यक्ष असा लढा महाराष्ट्र-भूमीवर दिलेलाच नव्हता. इंग्रजी राज्याविरुद्ध पुष्कळ लेख लिहिले गेले. वक्रोक्तीचीं अनेक भाषणें झालीं होतीं. लोकांमध्यें त्वेष उत्पन्न केला गेला होता. कांहीं ठिकाणीं शस्त्रास्त्रांची जमवाजमव व निशाणबाजीचे प्रयोगहि झालेले होते. क्वचित् एकदां दोनदां वैयक्तिक हल्लेहि झाले पण आव्हान देऊन प्रत्यक्ष रणभूमीवर शत्रूशीं दोन हात करण्याची संधी अजूनपर्यंत महाराष्ट्रीयांना आलेली नव्हती. आजचा प्रसंग विशेष अभिनव होता. स्वराज्यासारखी अवाढव्य कल्पना घेऊन आजचा लढा नव्हता. आजचा लढा मर्यादित स्वरूपाचा असला तरी झालेला जुलूम कल्पनेला नव्हे तर प्रत्यक्ष रोजच्या जीवनाला उपद्रव करणारा होता. भूमि सुद्धां प्राचीन महाराष्ट्रीय वीरांची होती. ह्याच भूमींत पूर्वी मोठमोठाले संकल्प करून मराठी साम्राज्याची टोलेजंग इमारत उभारविण्यांत आलेली होती. शनिवारवाड्याचा कोट अजून आम्हाला गतस्वातंत्र्याची आठवण देऊन त्याच्या प्रत्येक वीटेगणीक अनंत जिव्हांनीं हृदयद्रावक भाषणें करून आम्हा महाराष्ट्रीयांना उत्साहित करीत होता. पानपतावर निघण्याच्या वेळीं प्रत्येक मराठ्याच्या अंगांत जें स्फुरण चढलेलें होतें, ज्या मदानें मराठी घोडा खिंकाळत होता, त्याच वेगानें आज महाराष्ट्रीयांच्या अंगांत रक्त सळसळत होतें. केव्हां नोकरशाहीशीं दोन हात करतों असें सर्वांना झालें होतें. भुस्कुटे आणि शंकरराव देव त्या वेळीं ऐन तारुण्यांत होते. त्यांना हें युद्ध केव्हां सुरू होतें असें होऊन गेलें होतें. तात्यासाहेब करंदीकरांनीं ऐन तारुण्यांत आपल्या भावी वैभवाचा मार्ग सोडून समर्थ विद्यालयांत पोटावारी राहाण्याचें मान्य केलें होतें. तेजस्वी विद्यार्थी तयार करून मराठ्यांच्या प्राचीन आवेशानें लढण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा १९१० सालीं जी गारठून गेली तिला मुळशीच्या लढ्यानें 'आशांकुर' फुटले होते. या वेळीं करंदीकर पन्नाशीच्या घरांत आलेले होते. पान पिकत चाललें होतें परंतु त्यांत जीवनदायी रस पूर्वीच्याच जोमानें वहात असल्यामुळें तें सतेज दिसत होतें. कंबर बांधून मुळशीच्या धरणाजवळ उभे राहून जेव्हां लोकांचें पुढारीपण त्यांनीं स्वीकारलें त्या वेळीं लोकांना शेलारमामाची आठवण झाली. वय झालेलें, पण मनाचा खंबीरपणा न गेल्यामुळें ते ऊनतहान सोसण्याकरितां आनंदानें पुढें आले. नुसते करंदीकरच पुढें आले असें नव्हे तर त्यांच्या वयाची सुमंतादि मंडळी अशीच पुढें सरसावली होती. पूर्वी युरोपांत

आपल्या राष्ट्राचें युद्ध सुरू झालें आहे अशी द्वाही फिरवण्याकरितां जळते पलिते घेऊन राजाचे दूत फिरत असत. ते पलिते जनतेनें पाहिले म्हणजे प्रत्येक गांवांतून लढवय्यांचे तांडे खांद्यावर परशू किंवा हातांत धनुष्यबाण घेऊन राष्ट्रीय लढ्यांत हजारोंनीं हां हां म्हणतां सामील होत. तसेंच आज झालेलें दिसलें. तो काळ अत्यंत शुभकाळ होता. कोणाच्याहि मनांत यशाबद्दल शंका नव्हती. कादता पाय घेण्याची कोणीहि कल्पना केली नाहीं. सगळीकडून लहानमोठ्या तेजस्वी लोकांची भरती होत होती. त्यांत अशिक्षित मावळे व त्यांच्या स्त्रिया होत्या, ज्यांच्या ओठावरचा जार अजून वाळला नव्हता अशी तरुण मंडळी शाळा सोडून आलेली होती. बाळूकाका कानिटकर, हरिभाऊ फाटक अशांसारखी मध्यम वयाची मंडळीहि तरुणांचा पाठपुरावा करण्याकरितां पुढें आली होती. ज्यांनीं आपल्या प्रभावी वाणीनें आणि लेखणीनें सबंध महाराष्ट्र हालवून सोडला होता, स्वातंत्र्याचें ऐश्वर्य आणि पारतंत्र्याचा नरक ह्यांचीं मूर्तिमंत चित्रें ज्यांनीं आपल्या वाग्विभवानें तरुणांपुढें उभीं करून त्यांना वेडे करून सोडलें होतें असे शिवरामपंत परांजपे देखील या रणांगणावर भाग घेण्याकरितांच केवळ नव्हे तर युद्धाचें संचालन करण्याकरितांहि पुढें आलेले होते. केळकरहि सल्लामसलत देण्यास सदैव तयार होते. मुळशी सत्याग्रहाची साद्यंत हकीकत देण्याकरितां ‘ केसरी ’ तयार होताच.

सत्याग्रही युद्ध हें निःशस्त्र युद्ध असलें तरी त्यांत माणसेंहि लागतात. त्यांची जमवाजमव करणें, त्यांना शिस्त लावणें, युद्धाकरितां त्यांना समरभूमीवर नेणें, तेथें ते घायाळ झाले म्हणजे त्यांची शुश्रूषा करणें वगैरे एक ना अनेक लहानमोठीं कामें असतात. त्याकरितां पैसा पाहिजे असतो. महाराष्ट्र दरिद्री असला तरी स्वातंत्र्यप्रिय असल्यामुळें स्वातंत्र्याच्या लहानमोठ्या लढ्यांत त्याच्याकडून अनंत लहान लहान धारांनीं द्रव्यनिधि पहातां पहातां गोळा होतो. सह्याद्रीमधून ज्याप्रमाणें लहानमोठ्या अनंत धारा निघून महाराष्ट्राची भूमि शिंपून निघाली आहे त्याचप्रमाणें स्वातंत्र्यप्रिय महाराष्ट्रीय हृदयांतून औदार्याचे लहानमोठे पाझर अखंड चालत असल्यामुळें राष्ट्रीय कामांचे मळे नेहमीं शिपून हिरवेगार झालेले आपणास दिसतात. अशा रीतीनें मुळशीकरितां प्रत्यक्ष लढवय्ये मिळाले, द्रव्यनिधि मिळाला, क्रियावान प्रचारक मिळाले. काव्यें निर्माण झालीं. त्याच्या वार्ता वृत्तपत्रांतून सर्व महाराष्ट्रभर पसरल्या आणि रामनवमीला सुरू होणाऱ्या लढ्याकडे सर्व महाराष्ट्रीयांचें चित्त वेधलें.

प्रतिपक्षीहि स्वस्थ नव्हता. सत्याग्रहाच्या तंत्राची त्यांना फारशी कल्पना नव्हती.

त्यांनीं एवढेंच करविलें कीं जे जे कोणी धरणाचें काम अडवायला येतील त्यांना मारून पिटून लावावें! त्याकरितां त्यांनीं निर्दय हृदयाचे, छू म्हटलें कीं वाटेल त्यावर भाकरीच्या तुकड्याकरितां भुंकायला किंवा चावायला जे नेहमीं तयार असे पठाणी गुंड कंपनीनें चांगले पगार देऊन आणले होते. सरकारचा पाठिंबाहि तिला होताच. हा लढा प्रत्यक्ष सरकारशीं झालेला नव्हता—तो टाटा कंपनीशीं होता. यामुळें पहिल्या प्रथम सरकारी अधिकारी या लढ्याकडे बाहेरून तटस्थ-पणानेंच वागतांना दिसत व कंपनीची बाजू थोडी पडती दिसली कीं मग त्यांच्या साहाय्यार्थ धांवत.

ह्या लढ्याकरितां रामनवमीचाच मुहूर्त पसंत कां केला ह्याचें एक मोठें उद्बोधक कारण आहे. रामाचें नांव घेतल्याबरोबर हिंदवासीयांच्या डोळ्यासमोर तो रामाचा वनवास, त्याच्या पत्नीचें दानवाकडून चोरून झालेलें हरण, सामान्य वानरांच्या साहाय्यानें बलिष्ठ रावणाचा रामानें केलेला प्रतिकार आणि त्यांत मिळविलेलें यश ह्या गोष्टींचा चित्रपट डोळ्यांपुढून जातो. मावळ्यांना वनवासास लोटण्याची टाटा कंपनीची तयारी लोकांच्यापुढें होती. त्यांची जमीनहि सीतेप्रमाणेंच हरण केली गेली होती; आणि ह्याकरितां तो लढा होणार होता त्याला साहाय्यहि महाराष्ट्रांतील सामान्य लोकांचेंच होतें. ही सर्व तुलना डोळ्यांपुढें येऊन रामाप्रमाणेंच आपणास यश यावें म्हणून रामजन्माचा मुहूर्त धरण्यांत आलेला होता. ह्या ठिकाणीं सीता या शब्दाचा जमीन हा एक अर्थ आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे ही सर्व तुलना किती समर्पक आहे हें ध्यानीं येईल.

### *संग्रामाच्या तीन तऱ्हा*

इतिहासाला ज्ञात अशीं जीं राष्ट्रीय युद्धें झालीं झालीं तीं शस्त्रयुद्धेंच होत. कालमानाप्रमाप्रमाणें, मुष्टि, गदा, परशु, तलवार, बंदूक, तोफ, बॉंब अशीं एकापेक्षां एक भयंकर संहार करणारीं शस्त्रें निर्माण झालीं तरी सर्वांचें स्वरूप प्रतिपक्षाचा संहार करणें हें एकच होतें. शस्त्रांप्रमाणेंच प्रत्यक्ष लढण्याचेहि प्रकार भिन्न भिन्न होत गेले. कधीं एकट्यानें शत्रूवर चाल करून जाऊन त्याला दुखापत करणें अगर ठार मारणें हा प्राथमिक प्रकार असे. त्यानंतर छुपा हल्ला अगर गनिमी काव्यानें लढत, पुढें अनेक लोक मिळून प्रतिपक्षाच्या सैन्यावर हल्ला करून त्याला ठार मारीत. या लढाईत व्यूहरचनेला महत्त्व असे. आघाडीवर कोणी राहावयाचें, बगला कोणी संभाळावयाच्या, निशाणाचें रक्षण कोणी करावयाचें,

पिछाडीचें संरक्षण कसें करावयाचें, याचीहि योजना करावी लागे. हल्लीं चरांत बसून युद्ध करीत असतात. लांब पल्ल्याच्या तोफा बंदुका निघाल्यामुळें व त्यांना शत्रूच्या हालचालीची माहिती देणारीं विमानें असल्यामुळें शत्रु शत्रूला क्वचितच भिडतो. गोळागोळी दुरूनच चालते. अशीं युद्धें दिवसेंदिवस अधिकाधिक खर्चाचीं व दीर्घकाळ टिकणारीं होत चाललीं आहेतच पण त्याचबरोबर तीं निर्णायक अशींहि होत नाहींत. पहिलें महायुद्ध साडेचार वर्षें लढविलें गेलें. जर्मनीचा पराभव झाला असें वाटलें पण पराभव करणारांनाच तो अंतीं भोवला व शत्रूनें दहा वर्षांत पूर्वीपेक्षां आपलें बळ वाढविलें. पूर्वीचीं युद्धें तीं करणारांनाच फक्त भोंवत. सामान्य जनता त्यांपासून अलिप्त राही. हल्लींचीं युद्धें देशाच्या अंगाप्रत्यंगांत शिरून सर्व देशासच नव्हे तर जगाला महान् संकटांत टाकीत असतात. ही परिस्थिति ध्यानांत घेऊन त्यावर उपाय शोधून काढण्यांत कांहीं मंडळी गुंतली.

जगाचे व्यवहार व मनुष्यामनुष्यांत सत्त्व, रज, तम गुणांच्या कमीअधिक प्रमाणामुळें जो फरक पडतो त्यामुळें युद्ध हें अपरिहार्य आहे. कळत वा न कळत अन्याय हा व्हावयाचाच व आपल्याला जर सुखानें नांदावयाचें, जगावयाचें, तर अन्यायाचा प्रतिकार हा करावा लागतोच. हा प्रतिकार साम, दाम, दंड आणि भेद इत्यादि साधनांनीं करावा असें आजपर्यंतची सामान्य नीति सांगते. हीं साधनें वापरूनहि युद्धें भीषण व्हावयाचीं थांबत नाहींत असें पाहून युरोपांत निःशस्त्र प्रतिकाराची योजना पुढें मांडली गेली. निःशस्त्र प्रतिकारांत शस्त्र वापरीत नाहींत एवढेंच नव्हे तर जो विरोध करावयाचा त्याला हल्ल्याचें स्वरूप येऊं देत नाहींत. याला इंग्रजी शब्द Passive Resistance असा आहे. यांत मनुष्य निष्क्रियपणें वागतो. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य दुसऱ्याला गाडींतून हुसकावून लावूं लागला तर दुसरा आपली जागा न सोडतां गाडीच्या कठड्याला चिकटून राहील व सर्व मारहाण सहन करील. पण गांधीप्रणीत सत्याग्रहांत निष्क्रिय प्रतिकार येऊन सक्रिय प्रतिकारहि येईल. धरणाचें काम होऊं न देण्याकरितां तो ज्याप्रमाणें धरणावर बसून राहील व मारहाण सोशील त्याप्रमाणें मिठाच्या सत्याग्रहांत तो मीठ लुटून आणील अगर तयार करील.

गांधीप्रणीत सत्याग्रहाचें युद्ध आतां सुरू व्हावयाचें होतें. अशा युद्धाची तयारी करण्याचे नियम गांधींनीं सांगून ठेवले आहेत ते असेः

(१) सामुदायिक सत्याग्रह करण्यापूर्वी अन्यायाची कल्पना ज्याच्यावर तो जुलूम होतो आहे त्यांना प्रचार करून दिली पाहिजे. (२) प्रतिकार करणें हें

आपलें कर्तव्य आहे ह्याची जाणीव पीडितांना करून दिली पाहिजे. (३) या अन्यायाची कल्पना आपल्या इतर बांधवांस करून देऊन त्यांची सहानुभूति मिळविली पाहिजे. (४) प्रतिपक्षाला आपल्या प्रतिकाराची कल्पना नोटीस देऊन दिली पाहिजे. (५) जे लोक प्रतिकारार्थ येतील त्यांच्यांत अहिंसक वृत्ति वाढेल असें वातावरण निर्माण केलें पाहिजे.

या सर्व अटी मुळशी साहाय्यक मंडळानें रामनवमीपर्यंत पुऱ्या केल्या होत्या. भुस्कुटे वगैरे मंडळींनीं मुळशी तालुका पायीं हिंडून मावळ्यांना अन्यायाची कल्पना करून दिली होती व मावळ्यांनींहि सत्याग्रहास येण्याबद्दल आश्वासन दिलें होतें. मुळशीच्या लढ्याची कल्पना वर्तमानपत्रद्वारां हिंदुस्थानांत–विशेषतः महाराष्ट्रांत–पसरून देण्यांत आली होती. टाटा कंपनीला रीतसर नोटीसहि मिळाली होती. अहिंसक वातावरण व्याख्यानांनीं, चर्चेनें व सूचनांनीं निर्माण करण्यांत आलें होतें. याशिवाय प्रार्थना वगैरेंनीं सर्वत्र सात्विक भाव निर्माण झाला होता.

## *लहान मोठा निघे मराठा पुढती तानाजी*

चैत्र शुद्ध अष्टमीची रात्र. आकाशांत अष्टमीचा अर्धचंद्र आपल्या तेजानें झळकत होता. त्याच्याभोंवतीं लहानमोठे ग्रहगण व असंख्य तारे जमले होते. रात्रीं भोजन झाल्यावर अंगणांत सर्व मंडळी जमली—गांधींचें 'वैष्णव जन तो तेने कहिये जो पीडपराई जाणे रे।' हें पद म्हणण्यांत आलें. गीतेंतील स्थितप्रज्ञाचीं लक्षणें गायिलीं गेलीं, मावळ्यांना थोडा उपदेश करण्यांत आला. मग मंडळी आपापल्या स्थानीं गेली. पण रात्रीं झोंप कोणाला येणार ? आपल्या प्रतिकाराला कंपनी कसें उत्तर देईल, आपले स्वयंसेवक अहिंसा पाळतील का, कंपनीनें अमानुप छळ केला तर आपले लोक सहन करूं शकतील का? आजपर्यंत असल्या युद्धाची कल्पनाच कोणाला नव्हती. तरी पण योग्य त्या सूचना देण्यांत आल्या होत्या. रात्रीं बारा ते तीनपर्यंत जेमतेम मंडळींनीं झोंप घेतली. पहांटेपासून कँपमध्यें हालचाल सुरू झाली. चाराला लोक पदें गुणगुणूं लागले. हां हां म्हणतां त्याची प्रभातफेरी झाली.

हा प्रकार सहापर्यंत चालला होता. पुढें सर्व सत्याग्रहींना एकत्र बसविण्यांत आलें. त्यांना शिदोरी बांधून देण्यांत आली. ही शिदोरी म्हणजे हायस्कूल-कॉलेजमधील विद्यार्थी 'पिकनिक' ला निघतांना, शिरा-पुरी, बटाट्याची खोबरें घातलेली भाजी घेतात, अशा स्वरूपाची होती का ? स्कॉट कवीनें लष्करी शिदोरीचें

वर्णन थोडक्यांत केलें आहे. ‘As short and rude as soldier's meal.’ महाराष्ट्रांत गरिबांचे फराळाचे जिन्नस म्हटले म्हणजे चणेकुरमुरे किंवा दाणे-गूळ-खजूर. हे जिन्नस सत्याग्रहींना देण्यांत आले. त्या दिवशीं एक हजार मावळा जमला होता. त्यांचें नेतृत्व तात्यासाहेब करंदीकरांनीं स्वीकारलें होतें. सर्व मंडळी शिस्तीनें निघाली. त्यांच्याकडे कंपनीच्याच लोकांचें केवळ लक्ष होतें असें नसून सर्व महाराष्ट्रीयांचे डोळे त्यांच्याकडे लागले होते. हा लढा जर जिंकला—आमचे लोक जर कंपनीच्या जुलमास पुरून उरले तर—! मग पुढचीं जीं अनेक युद्धें स्वराज्याकरितां करावीं लागणार त्याकरितां वाढता उत्साह उत्पन्न होईल.

या लढ्याची आपणावर केवढी जबाबदारी आहे, सर्व महाराष्ट्राचे आपणाकडे डोळे लागले आहेत याची कल्पना देव-दास्ताने-भुस्कुटे यांना होती. करंदीकरांना ‘स्वप्नीं जें देखिलें होतें’ तें आज आपण प्रत्यक्ष पहात आहों असें वाटलें. झालें—सत्याग्रहाला निघण्याची वेळ झाली, हें सांगण्याकरितां क्षितिजानें सूर्याला हांक मारली. तांबडें फुटलेलें पाहून लहानमोठे मावळे निघाले. त्यांना रांगानें उभें राहणें, जोडीजोडीनें लष्करी थाटांत उभे राहा असें सांगण्यानें समजण्याजोगें नव्हतें. त्यांना हातानें धरून नीट उभें करावें लागे. मागेंपुढें होऊं नको म्हटलें कीं हा अभिनव प्रयोग पाहून त्यांना खूप हसूं येई. त्यांच्या ‘लक्ष्म्या’ समोरच होत्या. पुरुषांचीं हृदयें थोडींतरी कचरत होतीं पण स्त्रियांचे नेत्र अभिमानानें विकसित झाले होते. पुढें तात्यासाहेब करंदीकर डोक्याला रुमाल व कंबरेला उपरणें घट्ट बांधून उभे व त्यांचे मागून लहानलहान टोळ्या व त्यांचे पुढारी अशी मंडळी धरणाकडे जावयास निघाली. एका ठिकाणीं डॉ. पळसुळे व त्यांच्या-जवळ बापट आपल्या मावळ्यांसह चालले होते.

इकडे सत्याग्रही सैन्य जसें निघालें तसें कंपनीचें भाडोत्री सैन्यहि धरणावर आलें. त्यांत गवंडी, मजूर, सुरुंग लावणारे वगैरे अगणित होते. हे लोक काय विलायतेहून आलेले होते? नाहीं. या देशांतले, याच प्रांतांतले,—याच जिल्ह्यांतले होते. त्यांना, धरणाकरितां सुरुंग खणीत असतां आपण आपल्या बांधवांच्या घरादाराला सुरुंग लावीत आहों, त्यांच्या संसारसुखाचा पाया खोदून काढीत आहों, याची कल्पना नव्हती. सर्वच कांहीं निर्बुद्ध नव्हते पण त्यांचा स्वार्थ त्यांच्या मनोविकासाच्या आड येत होता. आम्ही या अज्ञानी लोकांना आजपर्यंत जवळ करून, त्यांना आपले म्हणून, सर्व देश प्रेमाच्या रज्जूनें बांधलाच नव्हता. त्यामुळें हें रण स्वबांधवांतच चाललेलें दिसलें. कंपनीचा मजूरवर्ग ज्याप्रमाणें देशी होता त्याप्रमाणें कंपनीचे लहानमोठे अधिकारीहि देशीच होते व त्यांना

साहाय्य करणारे लहानमोठे पोलिस अधिकारी सुद्धां देशी रक्ताचेच होते. त्यांच्या नातेवाईकांच्याच जमिनी पाण्यांत बुडत होत्या पण—

'सर्पापरि जन दंशाया नच भीड कुणाच्या बापा' हें तत्त्वज्ञान त्यांनीं आत्मसात् केलें होतें. मजूर आजची भाकरी मिळविण्याकरितां धडपडत होते तर त्यांना चालना देणारे लोक बंगले बांधण्याकरितां, मुलाबाळांना मोटारींतून हिंडवण्याकरितां, स्वबांधवांच्या सुखांत माती कालवावयास सिद्ध झाले होते. मनुष्यस्वभाव इतका नीच कसा असूं शकतो ? मानवी हृदय इतकें क्रूर असत नाहीं. त्याचें अज्ञान त्याचे डोळे झांकून टाकतें. त्याचें अज्ञान त्याचें शरीर बधिर करतें. मग स्वबांधवांचे उष्ण निःश्वास त्यांना शीतल वाटतात. त्यांच्या हृदयांत पालट कसा करावा याला उपाय महात्मा गांधींनीं सांगितला होता कीं, आत्मक्लेशानें हें कार्य होईल. तर बापटांच्या खोल खोल मनांत वाटत होतें,

'हें सारें नीट । परि पुरें नसे हें व्हावया पुन्हा देशभेट ॥' ते मनांत म्हणत होते, आत्मक्लेशानें, सामोपचारानें, कांहीं हृदयें विरघळलीं तरी कांहींच्या हृदयावर अज्ञानाचें कवच एवढें वाढलेलें असतें कीं तें हळुवार हातानें आपण केळ्याच्या साली काढतों त्याप्रमाणें निघणारें नव्हे. नारळाची साल काढावयाची तर कोयत्याचाच घाव पाहिजे. तरी पण हाहि प्रयत्न करून पहायला माझी हरकत नाहीं—मी तडजोडवादी आहें.

मावळ्यांचा तो प्रचंड समुदाय जो निघाला तो धरणावर गेला. तेथें निरनिराळ्या ठिकाणीं त्यांना बसविण्यांत आलें. आज कित्येक महिने ते धरणाचें काम पहात होते. तेथील मजुरांशीं त्यांच्या गप्पाहि झालेल्या होत्या. त्यांतील कांहीं त्यांचे नातेवाईक होते. पण आज तें धरण, त्या मजुरांच्या पहारी, ते सुरुंग, हें सर्व निराळ्याच रंगांत त्यांना दिसूं लागलें. अर्जुनाला कुरुक्षेत्रावर लहानपणीं ज्यांच्याबरोबर आपण खेळलोंसवरलों, ज्यांच्याजवळ आपण नम्रपणानें व आदरानें अध्ययन केलें असे बांधव व गुरुजन दिसले ना ? तोच प्रकार. क्षणमात्र दोन्हीकडची मंडळी कचरली पण मुकादमांनीं कठोर आवाजांत, 'देखते क्या ? काम शुरू कर दो—' म्हणतांच मजुरांच्या पहारी, टाक्या, हातोडे वर जाऊं लागले. कंपनीच्या गालीबहाद्दर पठाणांनीं सत्याग्रही मावळ्यांवर अभद्र शिव्यांचा मारा सुरू केला. मनुष्य एक वेळ शस्त्राचा मार सहन करील पण त्याला शिव्या सोसत नाहींत. पण सत्याग्रही वीरांना आज परत आहेर करावयाचा नव्हता. निमूटपणें सर्व कांहीं ऐकून घ्यावयाचें होतें. शिव्यांची पहिली सरबत्ती झाल्यावर

पठाणांनीं व मजुरांनीं निःशस्त्र मावळ्यांवर हल्लाच केला. त्यावेळींहि प्रतिकार करावयाचा नव्हता. केवढें संयमन त्यांना करावें लागलें असेल !

मावळे लोकांनीं आपला निर्धार सोडला नाहीं. त्यांच्या नायकांनीं त्यांना ज्या जागेवर बसविलें होतें तेथून ते एक केसभरहि सरकले नाहींत. चुनादगड घेऊन गवंडी एक दगड दुसऱ्या दगडावर बसवावयास जाई तों त्याला दगड दिसण्याच्या ऐवजीं मावळ्याची धिप्पाड छाती पसरलेली दिसे. सुरुंग्या दोन्ही हातांनीं वर उचललेली पहार हाणण्याकरितां खालीं करी तों त्याला आपल्या पायावर मावळ्याचे दोन्ही हात व भोंकावर मावळ्याची मान दिसे. दगड फोडणारा दगडाचे तुकडे करण्याकरितां जोरानें घण खालीं आणी तों आपल्या हातून दगडाचे तुकडे होण्याऐवजीं मानवी शरिराच्या चिंधड्या होतीलअसें पाहून भयभीत होऊन तो घण दूर फेकून देई.

तब्बल दोन तास असें घणाघाईचें युद्ध चालू होतें. मग कंपनीनें काम बंद केलें व मजुरांना माघारीं बोलावलें. मावळेहि परत आले. पण—

## १२

# डावावरी डाव ते

कोणताहि मोठा संग्राम सुरू व्हायच्या अगोदर देशामध्यें उत्साहाचें जें वारें निर्माण होतें त्यावेळीं वीरांना असें वाटत असतें कीं, हा संग्राम म्हणजे काय मोठी गोष्ट आहे ! दोन तासांत शत्रूला नामोहरम करूं. ‘ चीतपट, धुव्वा, संपूर्ण जय, शंभर टक्के जय—’ अशांसारखे शब्दप्रयोग प्रत्येकाच्या तोंडावर असतात. परंतु युद्धाला एकदां सुरुवात झाली, पहिली चकमक होऊन गेली, दोन्ही बाजूंचे वीर रक्तबंबाळ झाले म्हणजे प्रतिपक्षाच्या बळाविषयीं वाटणारी तुच्छता आणि आत्म-बळाविषयीं धरलेली मोठी आशा यांचा पारा थोडथोडा कमी होतो. शत्रु जर कावेबाज असला तर तो आपलें सर्व बळ एकदम रणांगणावर आणीत नाहीं. आपल्या सैन्याचा कमींत कमी नाश जास्तींत जास्त वेळांत होऊं देणें ही भीष्माचार्यांची रणनीति.



स्थळप्रत.

भीष्माचार्यांच्या आधिपत्याखालीं दहा दिवसांत कौरवसैन्याचा जितका नाश झाला नव्हता त्याच्या कितीतरी पट द्रोणाचार्यांनीं सेनापतिपद स्वीकारल्यावर पांच दिवसांत झाला, असें व्यास सांगतात. टाटा कंपनी म्हणजे एक संस्थानच! ह्या कंपनींत अनेक लहानमोठीं आणि व्यवहारचतुर बेपारी माणसें होतीं. ह्या कंपनीनें पाहिलें कीं सत्याग्रही मावळ्यांबरोबर सरकारच्या साहाय्यानें आपण जर सारखे लढत राहिलों तर सत्याग्रहींना नामोहरम करतां येईल पण त्याबरोबरच त्यांना केलेल्या दुखापतींमुळें आणि त्यांना भोगाव्या लागणाऱ्या तुरुंगांतल्या यातनांमुळें देशी लोकांत आपलें नांव बद्द होईल. हिंदुस्थानांत टाटाचें नांव स्वदेशाभिमानी कारखानदार म्हणून प्रसिद्ध झालें होतें. प्रत्यक्ष केसरींत जमशेट टाटांचा गौरवपूर्ण असा मृत्युलेख आला होता. व्यापारी माणूस इरेस पडत नाहीं. तो आपली पत म्हणजे नांव संभाळण्याविषयीं अतिशय दक्ष असतो. म्हणून तो जरी दुष्ट असला तरी नाना तऱ्हेचे डाव खेळून प्रतिपक्षाला चीत करतो. रजपुतांसारखा इरेस पडून तो आपलें बळ पणास लावीत नाहीं.

टाटा कंपनीनें जेव्हां पाहिलें कीं आपल्यासमोर असलेले सत्याग्रही हे कांहीं लेचेपेचे वीर नाहींत, आपण त्यांना धाकदपटशा देऊन पाहिलें तरी ते आपल्या मार्गावरून मागें हटत नाहींत, तेव्हां यांच्याशीं उघड सामना देण्यापेक्षां आपण आपला पवित्रा बदलावा हें बरें! कंपनीनें दोन तासांच्या लढ्यानंतर काम बंद करून तहाचें बोलणें सुरू केलें. 'अरे, तुमचें म्हणणें तरी काय? तुम्हांला हवें तरी काय? उगाच कशाला आम्हां संगे लढते आणि आपली जिंदगी खराब करते? आमच्या संगं कांहीं बात कराल कीं नाहीं?' अशी भाषा तिच्या पारशी मॅनेजरनें सुरू केली. सत्याग्रहाच्या नियमांप्रमाणें प्रतिपक्षी जर सामाच्या गोष्टी बोलूं लागला तर आपण आपला हट्टहि थोडा वेळ थांबविला पाहिजे. त्याप्रमाणें सत्याग्रही सैन्य मागें बोलावण्यांत आलें. प्रतिपक्षी पहिल्या चकमकींतच नम्र झाला हें पाहून मावळे मंडळीचा उत्साह दुणावला. पुढें पुढाऱ्यांच्या वाटाघाटी, खलबतें सुरू झालीं. तहनाम्याच्या अटी ठरविण्याकरितां पुण्याच्या केसरी ऑफिस-मध्यें दोन्ही पक्षांचे पुढारी जमले. या वाटाघाटींतून कांहीं निष्पन्न व्हावें अशी कंपनीची इच्छाच नव्हती. त्यांना लढ्याचें तीव्र स्वरूप कालहरणानें सौम्य करावयाचें होतें. त्यांत त्यांचा जय झाला. सत्याग्रहींचा पहिल्या दिवसाचा उत्साह जरी पुढें दिसला नाहीं तरी त्यांचें बळ कमी झालें नव्हतें. थोडा वेळ थांबून पुन्हा लढा सुरू झाला. पुन्हा कंपनीनें तहकुबी मागितली. धरणाचें काम अधिक करीत नाहीं. फक्त झालेल्या कामाच्या दरजा तेवढ्या भरून घेतों

वगैरे बोलणीं सुरू झालीं. सत्याग्रहींच्या तुकड्यांवर तुकड्या पाठविण्यांत येत होत्या. त्यांना मारहाण, धरपकड, गलिच्छ शिव्या यांचा प्रसाद मिळत होता. सत्याग्रही मावळ्यांबरोबर कांहीं धीट मावळी स्त्रियाहि आल्या होत्या. त्यांना चिडवून आणि भिववून लावण्याकरितां कंपनीच्या पठाणांनीं अभद्र शब्दांची सरबत्ती सुरू केली. इतकेंच नव्हे तर त्यांच्यासमोर नग्न होऊन उभे राहण्यासहि कमी केलें नाहीं. अशाच प्रसंगाला अनुलक्षून बापटांनीं पुढें एकदां म्हटलें आहे कीं,

**कसाही छळो वैरि सत्याग्रहांत। कसाही छळो वैरि कारागृहांत—॥**
**अम्ही पांडवांसारखी शिस्त पाळूं। मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं॥ ॥"**

खरोखरच सत्याग्रहींनीं मुनींच्या मनीं आपला क्रोध जाळला यांत संशय नाहीं.

वर सांगितलेंच आहे कीं, कंपनी डावावर डाव रचण्यास प्रारंभ करीत होती. इकडे धरणाचें काम बंद पाडलें खरें पण दुसरीकडे मुळशीपासून तों पौडापर्यंत कंपनीच्या कामाकरितां लहानशी रेल्वे बांधण्याचें काम सुरू झालें होतें. ह्यावरच कंपनीनें जोर देण्यास सुरुवात केली. ही गोष्ट सत्याग्रहींच्या लक्षांत येतांच बापट वगैरे मंडळींच्या नेतृत्वाखालीं कंपनीचे रूळ उपटून फेकून देण्याचा कार्यक्रम सत्याग्रहींनीं आरंभिला. याला 'शेरे सत्याग्रह' असें नांव मिळालें. या सत्याग्रहाचें नेतृत्व बापटांकडे होतें. युद्ध म्हटलें म्हणजे बापटांना किती हर्ष होतो याची कल्पना त्यांच्यासारख्या वीरालाच येऊं शकेल. शेरे सत्याग्रहाचें नेतृत्व त्यांना मिळाल्याबरोबर त्यांनीं सेनापतीच्या रणकुशलतेनें आपल्या सैन्याची रचना केली आणि सत्याग्रहास प्रारंभ केला. कंपनीची गाडी अडविली गेली. रूळ उखडून फेकण्यांत आले. त्यावेळीं पठाणांनीं सत्याग्रहींस विलक्षण हाणमार सुरू केली. त्यांत बापटांवर त्यांची विशेष वक्रदृष्टि होती. पठाणांचें बापटांशीं या काळांत जें युद्ध झालें त्यांत बापट निःशस्त्र असूनहि त्यांनीं पठाणांना आपल्या चिकाटीनें, दमदारपणानें, निश्चयानें, खरोखरच दमवलें. यावेळीं बापटांच्या अंगांत भाऊसाहेब पेशव्यांची वीरश्री संचारली होती. प्रतिपक्षाचा बळी घ्यावयाचा नाहीं अशी मर्यादा घालून घेतली असल्यामुळें बापटांनीं आपला हात आवरला इतकेंच. त्यांचा चेहरा लाल झाला होता. ते बेभान होऊन पुन्हा पुन्हा रुळाच्या मार्गावर पठाणांना चुकवून येत होते. एक वेळेला तर त्यांना पठाणांनीं निवडुंगांत फेकून दिलें पण बापट हटले म्हणून नाहींत. मराठ्यांचा बाणा, धैर्य, चिकाटी हीं सर्व आज बापटांच्या रूपानें महाराष्ट्राला दिसलीं. अशा

तेजस्वी सेनापतीच्या मागें जी सेना जाते तिच्या अंगांतहि विलक्षण धैर्य कां संचरूं नये? शेरे सत्याग्रहांत मराठ्यांचा पराक्रम चांगलाच निदर्शनास आला. तो पाहून कंपनी भेदरली. तिनें लगेच शेरे गांवाजवळचा रेल्वे रस्ता बंद करून टाकला. यामुळें या मंडळीचा सत्याग्रह थंडावला. कंपनीनें मग रस्त्यावर रूळ टाकायला सुरुवात केली. उघड्या रस्त्यावर रूळ टाकल्यानें कंपनीच्या गाडीचा पायीं जाणाऱ्या माणसांना आणि गुरांना त्रास होणार होता म्हणून हे रूळहि सत्याग्रहींनीं उखडून टाकण्यास प्रारंभ केला. तेथेंहि चकमक झाली. तेव्हां रेल्वेचें काम कंपनीनें बंद केलें.

## *उंदीर-मांजराचा खेळ*

मांजर उंदराला ज्यावेळीं पकडतें त्यावेळीं एकदम् त्याला ठार मारीत नाहीं. त्याला थोडा रक्तबंबाळ करून सोडून देतें. तो धडपड करतो. पुन्हा त्याला धरतें. प्रत्येक वेळीं तो क्षीण क्षीण बनत जातो—आणि शेवटीं मरतो. सत्याग्रहींची अशीच अवस्था करावयाचें कंपनीनें आणि सरकारनें ठरविलें होतें. सत्याग्रहींनीं काम अडवलें म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें तहाचें बोलणें लावावें. नंतर सत्याग्रही थोडे पांगले कीं चर्चा सुरू करून तहाच्या अटी उधळून लावाव्या. इतक्यांत सत्याग्रही मंडळींपैकीं कांहीं जणांवर खटला भरून त्यांना प्रथम सौम्य, पुढें अधिक तीव्र अशा शिक्षा देत जाव्या. दर वेळेला सत्याग्रहींचें बळ कमी कमी होत होतें. त्यांचे पुढारी तुरुंगांत जात होते. वारंवार होणाऱ्या तहकुबीमुळें युद्धाचा उत्साह प्रतिक्षणीं क्षीण बनत होता. तरीहि महाराष्ट्रांत या सत्याग्रहाविषयीं प्रेम असल्यामुळें नवीन तरुण सैनिकांची सारखी भरती होत होती. परंतु सत्याग्रहास साहाय्य करणाऱ्या, सल्लामसलत देणाऱ्या मंडळींतच हळुहळू मतभेद होऊं लागले.

नदीला ज्या वेळेला पूर येतो त्यावेळेला त्यामधील लहानमोठे खडक, सखल-उथळ जमीन, खांचखळगे, हे सर्व एक होऊन जिकडेतिकडे पाणीच पाणी झालेलें दिसतें. पण एकदां पूर ओसरला म्हणजे मग नदींतील लहानमोठे खडक आणि खांचखळगे आपले व्यक्तिविशेष दाखवूं लागतात. मुळशी संग्रामांत जोंपर्यंत उत्साहाचा पूर होता तोंपर्यंत नरम गरम सर्व पक्ष एक झालेले होते. पुढें कंपनीच्या डावपेंची धोरणामुळें सत्याग्रहाविषयींचा पहिला उत्साह कमी झाल्यावर मग कांहीं मंडळींनीं बोलण्यास सुरुवात केली कीं, जमिनीचा एवढा आग्रह कसला धरतां? आज टाटा कंपनी

जमिनीची मागाल ती किंमत द्यायला तयार आहे. त्याचा फायदा घ्या. या पैशानें तुम्हांला दुसऱ्या जमिनी घेतां येतील. मुळशीची जमीन तेवढी पोटाला देते आणि इतर जमीन देत नाहीं असें थोडेंच आहे? ह्याच्या उलट भावनाप्रधान मंडळी म्हणूं लागली कीं 'जान का जमीन' ह्याच्याशिवाय बात नाहीं. मावळेहि तें वाक्य उच्चारूं लागले पण तो त्यांचा नुसता शब्दोच्चारच होता. कंपनीनें ह्या ठिकाणीं भेदनीतीचाहि अवलंब केला. कंपनी म्हणे कीं मावळ्यांच्या बहुतेक जमिनी सावकारांकडे गहाण आहेत व ते बिचारे मजुरांसारखे त्यांच्याकडे (सावकारांकडे) खपतात. मग ह्यांना आमच्याकडे खपावयास काय हरकत आहे? सावकार देणार नाहीं तितकें वेतन आम्ही देऊं. मुळशीचे मावळे म्हणजे मराठे लोक. ह्या मराठ्यांपैकीं कांहींनीं ब्राह्मण—ब्राह्मणेतर वाद महाराष्ट्रांत सुरू केला होता. या लोकांच्या वर्तमानपत्रांनीं अशी हाकाटी सुरू केली कीं हा सत्याग्रह बामणांनीं अंबेमोहोर तांदुळाकरितां सुरू केला आहे. यांत गरीब मावळ्यांचें फुकट नांव करून आपला कावा साधायचा या ब्राह्मणांचा बेत आहे. मावळ्यांपुढें करंदीकर, बापट, भुस्कुटे अशांसारखी त्यागी मंडळी होती. त्यामुळें त्यांच्यांत जरी मोठी चळवळ झाली नाहीं तरी क्षणमात्र टाटा-कडून मिळणाऱ्या नुकसानभरपाईचा मोह त्यांना पडलाच. तो पडण्याचें कारण मुळशीच्या कांहीं सावकारांनीं टाटाकडून पैसे घेण्याला सुरुवात केली होती. शिवाय हे मावळे शिवाजीच्या मावळ्यांचे वंशज जरी असले तरी लढण्याची त्यांची संवय गेली होती. शिवाजीच्या काळचा प्रत्येक मराठा हा 'पुंड' नसला तरी लढाऊ खास होता. तो चार महिने शेती करी आणि पाणकाळ सरल्यावर मुलुखगिरीस जाई. तो मराठा आज शिल्लक राहिला नव्हता. आजचा मराठा धडधाकट, मजबूत मनगटाचा असला, त्याची राहणी साधी असली तरी त्याचें तेज आज दीडशें वर्षांच्या आळसानें विझलेलें होतें, हें सत्याग्रही चालकांच्या हरघडी प्रत्ययास येऊं लागलें. पुरुषांपेक्षां स्त्रियांतच जास्त तेज आढळून आलें.

या मुळशी संग्रामाच्या पहिल्या मोहिमेंत बापट, पैसाफंड रानडे, भुस्कुटे, सुमंत, देव, करंदीकर, पळसुले, सहस्रबुद्धे, वैद्य, फाटक, दामले, परांजपे, वासूकाका जोशी, भाऊ गोखले वगैरेंसारखी सुप्रसिद्ध मंडळी असल्यानें सत्याग्रहाला महत्त्व व तेज आलें होतें. शिवरामपंत परांजपे, दामले व डॉ. फाटक हे ज्या दिवशीं सत्याग्रह करून गेले त्या दिवशीं या मोहिमेची पौर्णिमा होती. डॉ. फाटक हे विद्वान, नाणावलेले, सुखांत वाढलेले डॉक्टर, दामले यांची प्रसिद्धी मुंबईच्या राष्ट्रमतापासूनच होती. त्यानंतर काळकर्ते परांजपे तर महाराष्ट्र

कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष, काळचे एडिटर, टिळकांच्या बरोबरीचे. यामुळें या वेळच्या सत्याग्रहाला तेज चढलें होतें. ज्या दिवशीं ही मंडळी गेली, त्यानंतर मग मुळशीचा कृष्णपक्ष सुरू झाला. शुक्लपक्षांत आणि कृष्णपक्षांत चांदणें सारखेंच असतें पण एकांत पूर्वरात्रीं पडतें, दुसऱ्यांत बारानंतर असतें. पहिल्यांत चंद्राची कला वाढत असते तर दुसऱ्यांत कमी होत असते. यामुळें डोळ्यांत तें भरत नाहीं पण पृथ्वीला तेज कमी मिळतें असें मात्र नाहीं.

# १३

# सेनापति-सूत्रचालक-सर्वाधिकारी

ता. १ मे १९२२ ला मुळशीला जो मोठा सत्याग्रह झाला, त्यांत तात्यासाहेब करंदीकर, शिवरामपंत परांजपे, सीतारामपंत दामले, आणि डॉ. फाटक ही प्रमुख मंडळी जेव्हां सत्याग्रहांत उतरली आणि त्यांना सहासहा महिन्यांच्या शिक्षा झाल्या त्यावेळीं जागेवर अध्यक्ष, सेनापति किंवा विशेष नाणावलेला संचालक उरला नव्हता. बापट हे नुकतेच तुरुंगांतून बाहेर आले होते. त्यांना मंडळींनीं मुळशी सत्याग्रहमंडळाचें अध्यक्षस्थान दिलें. ते पूर्वी एका विशिष्ट विभागाचे सेनापति तर होतेच. पण आतां त्यांच्याकडे सेनापतित्व, सत्याग्रहमंडळाचें अध्यक्षस्थान किंबहुना या युद्धाचें सर्वाधिकारित्व आलें. आणि आतांच त्यांच्या संग्रामनीतीस खरा आरंभ झाला. शेरे सत्याग्रहांत ते लढले परंतु त्या संग्रामाचें एकंदर धोरण ठरविण्याचा अधिकार त्यांना नव्हता. यामुळें वडील मंडळी जें ठरवितील त्याप्रमाणें वागावयाचें असें त्यांनीं ठरविलें होतें. बापटांकडे पूर्ण अधिकार येतांच त्यांनीं आपल्या मताप्रमाणें या युद्धाला वळण लावलें.

### *युद्धाची नवी नीति*

आतांपर्यंतची युद्धनीति अशी होती कीं मुळशीचा लढा आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून लढवावयाचा. पण तो प्राणांतिक लढा आहे असें कोणी मानलें

नाहीं. शिवाय हा लढा गांधींच्या सत्याग्रहनीतीप्रमाणें लढवावयाचा असें जवळजवळ निश्चित झालें होतें. या नीतीप्रमाणें जर यश आलें नाहीं तर पुढें काय? हा प्रश्नच कोणी मनाला विचारला नव्हता. जमेल तेवढें करूं, नाहीं जमलें तर पुन्हा जास्त तयारी करूं, अशी सामान्यतः लोकांची विचारसरणी होती. ह्या विचारसरणींत बापटांनीं एकदम क्रांति केली. पण ही क्रांति 'हम करे सो कायदा' या तत्त्वाला धरून त्यांनीं केली नाहीं. प्रत्येक पाऊल त्यांनीं विचारपूर्वक व जनतेचा कौल घेऊन टाकलें.

प्रथम त्यांनीं मुळशी सत्याग्रहाची समग्र हकीकत जास्त व्यवस्थेशीर लिहिली आणि अशीं पत्रकें तयार करून तीं वांटलीं, व सत्याग्रहाची प्रणाली त्यांनीं तयार केली. त्यांत 'साम सत्याग्रह आणि शुद्ध सत्याग्रह' असे दोन भेद पाडले.

साम सत्याग्रहांत कार्याच्या यशस्वितेवर भर नाहीं—अहिंसेच्या पालनावर कटाक्ष आहे. आणि शुद्ध सत्याग्रहांत यशावर कटाक्ष आहे, साधनावर नाहीं. या साधनांत साम, दाम, दण्ड, भेद हे सर्व प्रकार येतात. हा शुद्ध सत्याग्रह श्री भगवान् कृष्णापासून आजतागायत अनेक वंदनीय वीरांनीं अवलंबिला आहे अशी विचारसरणी बापटांनीं आपल्या पत्रकांत लिहून प्रसिद्ध केली. यांतच पुढच्या शुद्ध ऊर्फ सशस्त्र युद्धाची पूर्वसूचना त्यांनीं देऊन ठेवली. या पत्रकांतील तर्कशुद्ध विचारसरणी आणि सत्याग्रहाची मीमांसा वाचण्यालायक आहेत. हें पत्रक प्रसिद्ध होतांच मुळशी युद्धाचें स्वरूप आज प्रत्यक्ष जरी नाहीं तरी बीजरूपानें बदलेल असें वाटलें. मवाशींच म्हटलें होतें कीं, या साम-सत्याग्रहाला मर्यादा घालण्याची कल्पना बापटांनीं पुढें आणली. सत्याग्रह हा विरत विरत जावा ही गोष्ट त्यांना पसंत नव्हती. म्हणून त्यांनीं प्रथम आपल्या अधिकारांत अशी मर्यादा घातली कीं हा लढा पांच वर्षेपर्यंत लढला जावा. त्यांत दहा हजार माणसें कैदेंत घालावीं किंवा शंभर माणसें बळी द्यावीं. यांपैकीं एक गोष्ट जेव्हां पुरी होईल तेव्हां सामसत्याग्रह थांबावा.

आपण आपल्या अधिकारांत ही गोष्ट करण्यापेक्षां सर्व महाराष्ट्रानें या गोष्टीला मान्यता द्यावी म्हणून बापटांनीं मुळशी परिषद भरविण्याचें ठरविलें. इंग्रजी वृत्तपत्रांत मुळशी सत्याग्रहाचीं पत्रकें पाठवून खूप चर्चा केली. त्यामुळें याची माहिती परप्रांतांतहि जाऊन पोहोंचली. या लढ्यास प्रथम क्रॉनिकल पत्राचा पाठिंबा होता. परंतु 'जान का जमीन' हा प्रश्न जेव्हां निघाला तेव्हां मात्र त्या पत्रानें आपली सहानुभूति काढून घेतली आणि जमिनीबद्दल नुकसानभरपाईची रक्कम मुळशीकरांनीं घ्यावी असा त्यानें सल्ला दिला. अर्थात् यामुळें बापटांचा त्या

पत्राशीं थोडा खटकाच उडाला. इकडे मुळशी परिषदेची तयारी एका महिन्यांत करून ११ जूनला डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखालीं परिषद भरली.

## मुळशी परिषद

या परिषदेच्या वेळीं पुन्हा नवीन जोम दिसून आला. या परिषदेंतील भाषणें उत्साहवर्धक झालीं. लढा धैर्यानें लढण्याचा निश्चय दिसला. मावळ्यांच्या स्त्रियांनींहि भाषणें केलीं, त्यामुळें श्रोतृसमाज गहिंवरला. या परिषदेंत केवळ लढा लढविण्याचा ठराव बापटांना नको होता. त्यांना कांहीं कालमर्यादा ठरवायची होती. साम सत्याग्रह टाटाच्या बाबतींत उपयोगी पडत नाहीं अशी त्यांची खात्री झाली होती. मुळशी रणक्षेत्रावर जेवढ्या अधर्मीय गोष्टी करणें शक्य होतें तेवढ्या कंपनीनें आपल्या हस्तकांकरवीं केल्या होत्या. एवढेंच नव्हे तर वर वर्णन केलेला उंदीर–मांजराचा खेळ खेळून सत्याग्रहींना दमविण्याचा घाट कंपनीनें घातला होता. सेनापतींना याची चीड आली होती.

त्यांनीं मनांत म्हटलें होतें कीं, 'पुरे झाला आतां हा साम सत्याग्रह. आतां शुद्ध सत्याग्रह सुरू करण्याची वेळ आलेली आहे.' पण महाराष्ट्रांत गांधींच्या नुकत्याच झालेल्या चळवळींमुळें अहिंसेचें वातावरण निर्माण झालें होतें. तेव्हां शुद्ध सत्याग्रहाची परवानगी बापटांना यावेळीं मिळाली नसती म्हणून त्यांनीं साम सत्याग्रहाच्या मर्यादा या परिषदेंत ठरवून घेतल्या. पुष्कळ खल केल्यावर तीन लाख रुपये, तीन हजार माणसें आणि तीन वर्षांची मर्यादा अशी साम सत्याग्रहाची मर्यादा मुळशी परिषदेनें ठरवून दिली. साम सत्याग्रहाला ही मर्यादा घातली गेली ह्याचाच अर्थ असा झाला कीं पुढें काय करावयाचें तें तीन वर्षांनंतर ठरवितां येईल. अशा रीतीनें साम सत्याग्रहाच्या म्हणजेच निरपवाद अहिंसक चळवळीच्या कार्याच्या अभेद्य वाटणाऱ्या तटास भोंक पडलें.

## देशांतलें वातावरण

याच वेळीं देशांतल्या राजकीय वातावरणाला निराळें वळण लागलें होतें. गांधी १३ मार्च १९२२ रोजीं पकडले जाऊन त्यांस सहा वर्षांची शिक्षा झालेली होती. त्यांचेबरोबर किंवा आगेमागें अनेक थोर थोर पुढारी पकडले गेले होते. गांधी गेल्यावर राजकीय चळवळीला हळुहळू पण निश्चित शिथिलता येत चालली होती. चळवळीचा भर ओसरला कीं मतभेद, दृष्टिकोन हे आपापलीं डोकीं वर काढूं लागतात. असहकारितेच्या चळवळींत कौन्सिलांवर

बहिष्कार कडकपणें घातला गेला होता. बहुमतापुढें दबून ज्यांनीं तो कॉंग्रेसचा ठराव मान्य केला होता ते आतां व्यवहारी राजकारण म्हणून पळवाट काढूं लागले होते. त्यांच्यावर कट्टर असहकारवादी तुटून पडत होते. अशा ह्या काळांतच मुळशी परिषद् भरून तिनें साम सत्याग्रहाला मर्यादा घातली. बापटांना साम सत्याग्रहानें लढण्याची इच्छा होती. जो आदेश सभेनें दिला तो कसोशीनें पाळण्याची यावेळीं त्यांनीं तयारी चालविली पण या तयारीस फक्त नैतिक फळ मोठें आलें. प्रत्यक्ष व्यावहारिक जयाच्या दृष्टीनें हा संग्राम आतां हळुहळू विझतच जाणार असें दिसूं लागलें.

कारण बापट इकडे आपल्या तेजस्वी वाणीनें लोकांच्या मनांत त्यागाचें वारें भरत होते पण लोकांच्या मनाच्या पिशवीला मतभेदाचीं छिद्रें पडलीं होतीं. कॉंग्रेसच्या असहकारितेच्या ठरावांत फेर करावा कीं न करावा यावर बाहेर रणें माजून राहिलीं होतीं. अशा वेळीं वर्तमानपत्रांत मुळशीच्या लढ्याला गौण स्थान देण्यांत आलें होतें. यामुळें हा लढा जनतेला वरील वादापेक्षां कमी महत्त्वाचा वाटूं लागला. बापटांनीं मात्र यत्किंचितहि ढिलाई न करतां दौरा काढून सत्याग्रहाकरितां पैसा आणि लोक जमा करणें सुरू केलें. त्यांनीं आपल्याबरोबर एक लहानसा मेळा घेतला होता. हा दौरा पैसे आणि माणसें मिळविण्याच्या दृष्टीनें चांगला यशस्वी झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकांचीं मनें ज्यानें वेधून घेतां येतील अशा तऱ्हेचा कार्यक्रम या दौऱ्यांत असे. नाशिकपासून नागपूरपर्यंत बापटांनीं दुसरा दौरा काढून सर्व प्रांत हालवून सोडला. ते ज्या गांवाला जात तेथें त्यांच्याभोंवतीं लहानथोर, वृद्धतरुण, आपापले पक्षभेद विसरून जमा होत. तरुण मंडळी सत्याग्रहाकरितां नांवें देत. स्त्रिया आणि पुरुष पैसा आणि सहानुभूति देऊन आपला आदर व्यक्त करीत. बापटांचा कार्यक्रम वर्णन करण्यासारखाच होता.

बापटांनीं सत्याग्रहमंडळाचें काम हातीं घेतल्यावर त्यांच्या ध्यानांत आलें कीं कंपनी आज साधी हाणमार करते आहे पण सत्याग्रहाचा जर जोर झाला तर गोळीबारहि करण्यास मागें सरणार नाहीं. अशा वेळीं जर शिस्तीचे सैनिक नसतील तर प्रतिकार करणारे लोक पळून जातात आणि मग चळवळीचें नैतिक बळ कमी होऊन चळवळ ओसरते. म्हणून अशा प्रसंगाकरितां आपल्याजवळ मंडळी किती आहेत याचा अंदाज काढण्याकरितां 'गोळीबारापुढें आपली छाती पुढें करण्यास जे कोणी तयार असतील त्यांनीं आपलीं नांवें सत्याग्रह साहाय्यक मंडळाकडे नोंदवावीं' असें बापटांनीं जाहीर केलें. त्यांना

जास्तींत जास्त शंभर माणसें पाहिजे होतीं. ज्यांनीं निश्चयानें आपलीं नांवें दिलीं असतीं अशी मंडळी या वेळीं तुरुंगांत होती तरी देखील छत्तीस लोकांनीं आपलीं नांवें नोंदविलीं. तेव्हां बापटांना साहजिकच वाटलें कीं

> विश्वसलें मन जिवंत आहे थोर महाराष्ट्र
> महाराष्ट्र निजतेजें उठविल अखिल हिंद राष्ट्र

मन शांत आहे, सही करून देतांना मायाममतेचीं माणसें डोळ्यांतून पाणी काढावयास जवळ आहेत, 'अमोल काया जाइल वायां' असें सांगावयाला भिन्न दृष्टिकोनाचे सोबती आसपास असतांना छत्तीस जण निधड्या छातीनें जर पुढें येतात तर ऐन युद्धाच्या गर्दींत बेभान झाले असतां याच्या कितीतरी पट लोक मरायला तयार होतील असा बापटांना आत्मविश्वास आला. ज्या मंडळींनीं हीं नांवें दिलीं ते सुशिक्षित होते, लोकांचें पुढारीपण त्यांनीं केलें होतें. अशी मंडळी पुढें आल्यावर मावळे मंडळी मागें कधींच राहणार नाहीं. कोणत्याहि वेळीं चळवळ जी मागें जाते ती पुढारी मंडळीच्या कच खाण्यानें जाते. अनुयायांच्या भित्रेपणानें क्वचितच थांबते. कायदेभंगाच्या युद्धांत गांधींना कोणी सांगितलें कीं Nation is tired—राष्ट्र दमलें आहे, तेव्हां गांधी म्हणाले, you may be tired—the nation is not tired—तुम्ही दमलां असाल, राष्ट्र दमलेलें नाहीं. हीच गोष्ट खरी म्हणून बापटांनीं प्राणयज्ञास कोण तयार आहेत म्हणून विचारणा केली होती.

### *आक्षेपक*

टाटा कंपनीचे हस्तक, सरकारी बातमी खात्याचे प्रमुख, सत्याग्रही मंडळीबद्दल गैरसमज पसरवीत होते. त्याचप्रमाणें कॉंग्रेस पक्षांतील कांहीं मंडळींनीं या युद्धावर दोन आक्षेप घेतले होते.

पहिला आक्षेप असा होता कीं गांधींनीं तुरुंगांत जातांना 'रहाट चालवा' म्हणून विधायक कार्याचा मंत्र राष्ट्राला दिला आहे. मुळशी सत्याग्रहानें जर राष्ट्रांतील तेजस्वी लोकांचें चित्त ओढून घेतलें तर विधायक कार्यक्रमाकडे दुर्लक्ष नाहीं का होणार? याला बापटांनीं उत्तर दिलें कीं विधायक कार्यक्रम हा स्थायी कार्यक्रम आहे. तो स्वराज्य मिळेपर्यंत किंवा त्यानंतरहि सतत चालू राहील. पण मध्यंतरीं जे अन्याय लोकांवर होतील त्यांचा प्रतिकार करावयाचा नाहीं, असें कसें?

सरकारच्या बातमीखात्याच्या प्रमुखांनीं असें प्रसिद्ध केलें होतें कीं सत्याग्रही व कंपनीचे नोकर यांमध्यें थोडी दंगामस्ती झाली पण त्यांत कंपनीच्या एका मजुराला फेकलेल्या दगडाची खोक पडली याशिवाय दुखापतीचे कांहींएक प्रकार झाले नाहींत. जर झाले असते तर त्याकडे सरकारनें तत्काळ लक्ष दिलें असतें. हें धडधडीत सोळा आणे असत्य होतें. सूर्यप्रकाशाला जर अंधार म्हणावयाचा असेल तर या लढ्यांत सत्याग्रहींना दुखापत झाली नाहीं असें म्हणणें शोभलें असतें. पण कंपनीची बाजूच सजवायची होती, तेव्हां सरकारी अधिकारी तरी दुसरें काय करणार?

अरे सरकारी बातमीच्या संयोजका, मी विसरलोंच. तूं बातमीदार—यथार्थ कथन करणारा बखरनवीस नव्हेस. बातमी सजविण्याचें तुझें काम—बायकांवर हात टाकला गेला नाहीं असें तूं म्हणतोस—ठीक आहे, देव तुझें भलें करो! तूं आपलें कर्तव्य चोख बजावतो आहेस यांत संशय नाहीं. देवाला डोळे नाहींत, देव सर्वसाक्षी नाहीं, अशीच तुझी समजूत दिसते. तुझ्या पत्रांत असत्य कांठोकांठ भरून वहातें आहे—व त्याबद्दल तुला जबाब हा द्यावाच लागेल. तुमचा गुरु जो येशू ख्रिस्त तो जिवंत आहे आणि त्याचा बाप अजून मेलेला नाहीं.

कंपनीच्या तर्फे बोलणाऱ्या भाभाशेटना बापटांनीं लिहिलें, 'नक्की किती एकर जमीन बुडाली व किती मावळे देशोधडीला लागले याविषयींच्या आंकड्यांवरून मला मोडावयाचें नाहीं. प्रश्न आंकड्यांचा नाहीं. ज्यांची जमीन तुम्ही घेतली त्यांना न विचारतां, त्यांना हुसकून देण्याचा तुम्हांला हक्क आहे का? कायदा काय वाटेल तें म्हणो. कोणालाहि त्यांच्या राहत्या जमिनीवरून हांकलून देण्याच्या अगोदर त्यांचें म्हणणें ऐकून घ्यावयाला नको होतें काय? कंपनी व सरकार यांची बाजू घसरलेली आहे. म्हणून आम्हाला हुसकून लावीपर्यंत मावळे व त्यांचे साहाय्यक आपल्या जागेवरून हालणार नाहींत. सत्याग्रहींनीं तुरुंग भरा. आमचें रक्त सांडूं द्या. आमच्यांत शक्ति असेपर्यंत आम्ही लढूं. अखंड लढणें कोणालाहि—सत्पक्षालाहि—शक्य नसतें. पण अजून आम्ही थकलेलों नाहीं—आतांच तर कुठें लढ्याला सुरुवात झालेली आहे.

टाटाचें धरण हें सार्वजनिक हिताकरितां आहे असें तुम्ही म्हणतां; पण सार्वजनिक हिताची व्याख्या कोणी करावयाची? जनतेच्या प्रतिनिधींनीं का कंपनीनें व तिच्या पक्षपाती सरकारनें? ज्या असंख्य मराठ्यांना तुम्ही काम देणार त्यांच्याच नातेवाईकांना आज तुम्ही हुसकून देत आहांत, ही गोष्ट तुम्ही विसरतां.'

अशा रीतीनें बापटांनीं त्यांच्या सत्याग्रहावर आक्षेप घेणाऱ्यांना सडेतोड उत्तरें दिलीं. तीं पुष्कळशीं इंग्रजी भाषेंत आहेत. त्यांत विचारांची सांखळी, प्रतिपक्षाच्या नाजूक बाजूचें प्रदर्शन, असत्य प्रतिपादनाबद्दल हेटाळणी इत्यादि लेखनगुण चांगले व्यक्त झाले आहेत. याशिवाय नित्याचा सराव नसतांना ते सफाईदार इंग्रजी लिहूं शकतात हें दिसून आलें. पण यांत आश्चर्य कसलें? ज्याच्या विचारांत गोंधळ नाहीं व हृदयांत कळकळ आहे त्याची भाषा सहजच आकर्षक कां न व्हावी?

वर सांगितल्याप्रमाणें बापटांनीं दौरा काढून नागपूरपर्यंत सर्व महाराष्ट्र हालवून सोडला व ते परत पुण्याला आले. २ सप्टेंबरला 'सत्याग्रह-दिन' ठरला होता—व त्याकरितां त्यांना मुळशीच्या धरणावर जावयाचें होतें. सरकारचा बेत त्यांना तेथें जाऊं देण्याचा नव्हता. अगोदरच त्यांना तें अडकवून टाकणार होतें. बापटांच्या मनांत जरी मुळशीला जावयाचें फार होतें तरी पुढें जी हकीकत घडली ती तशी घडण्याला त्यांनीं स्वतः कांहीं व्यूह रचला होता असें नाहीं. बापट सांगतात कीं, 'माझा स्वभाव मोठाले गुप्त बेत करावे, व्यूह रचावे, असा नाहीं. कांहीं आश्चर्यकारक गोष्टी करून जगाला थक्क करून सोडून आत्मगौरव वाढवावा असें मला वाटत नाहीं. परंतु माझ्या आयुष्यांत अशा गोष्टी योगायोगानें घडल्या आहेत खऱ्या. मी मुंबईहून मुळशीला गुप्त मार्गानें गेलों त्याचें सर्व श्रेय माझ्या मित्रांना आहे. त्यांनीं मला न कळवतां अगोदरच सर्व योजना करून ठेवली होती—मार्ग पाहून ठेवला होता. वाहनाची व्यवस्था केलेली होती. आणि मला ते आयत्या वेळीं म्हणाले, चला! मीहि गेलों नि काय त्यांच्याबरोबर! आतां एवढी गोष्ट खरी कीं मी त्यांचा ह्या बाबतींत निषेधहि केला नाहीं किंवा त्यांना उत्तेजनहि दिलें नाहीं!'

खऱ्या वीर पुरुषाची अशी गोष्ट असते कीं तो नेहमीं निर्भय असतो. त्याचें मन निष्पाप असल्यामुळें लोक कधीं आपल्याला अपकार करतील असें त्याला वाटतच नाहीं. पापी मन हें नेहमींच चोरटें असतें आणि तें चोरट्या मार्गांनींच जात असतें. वीर पुरुष हा नेहमीं सडेतोड स्पष्टपणानें बोलत असतो. एक बोलायचें नि एक करायचें ही भाषाच त्याच्याजवळ नसते. टिळकांची गोष्ट अशीच आहे. ते पुष्कळदां गरजेपेक्षां जास्त आपल्या शत्रूजवळ बोलून जात. आपण पुढें काय करणार हें ते प्रतिपक्षाला खुशाल सांगत. कॉंग्रेसमध्यें शिरून मी ती जिंकणार असें त्यांनीं गोखल्यांना एकदां स्पष्ट सांगितलें. तेव्हां खाडीलकर त्यांना म्हणाले, इतकें स्पष्ट बोलणें ह्यावेळीं युक्त होतें का? पण त्या वेळीं टिळकांनीं लगेच

सांगितलें, आपले डाव उघडे करून, शत्रूला ते दाखवून त्याच्यावर मात करण्यांत मौज आहे. युद्ध म्हणजे खऱ्या वीराला खेळ असा वाटतो. त्यांत तो सहज रंगतो. शत्रूबरोबर उघड दोन हात न करतां गुप्तपणानें पिछाडीला जाऊन त्याच्यावर वार करणें हा त्याचा धर्म नाहीं. कारण खऱ्या वीराचें अधिष्ठान नीति आणि धर्म असतें. म्हणून गुप्त डावपेंच त्याच्या मनाला स्वभावतः पसंत पडत नाहींत. गुप्त डावपेंच करणें हा त्याचा स्वभावधर्म नसला तरी त्याच्या हातून अधूनमधून कांहीं डाव आणि कांहीं कारस्थानें होतातच. कारण सशस्त्र युद्धांत या गोष्टी अपरिहार्य असतात. असो.

मुंबईहून त्यांच्या मित्रांनीं त्यांच्याकरितां एक स्वतंत्र मोटार १५० रुपयाला ठरवून मध्यरात्रीला त्यांना बाहेर काढण्यांत आलें. ही मंडळी सकाळीं दहा वाजतां काल्याला आली. मधल्या एका चौकीवर मोटार अडविली गेली. बापटांच्या अंगावर घोंगडी होती त्यामुळें त्यांना कोणी ओळखलें नाहीं, व बरोबरीची मंडळी 'आपण त्या गांवचेच नव्हत' अशा तऱ्हेच्या गप्पा मारून तशीच पुढें गेली. धुंडिराज विष्णु देव यांनीं तीनचार दिवसांपूर्वी काल्यापासून मुळशी-पर्यंतची वाट नीट पाहून ठेवली होती. हा मार्ग जंगलांतून, डोंगरकपारींतून, दऱ्याखोऱ्यांतून, कांट्याकुट्यांतून होता. पहांटेला उठून लोहगडच्या पायथ्यापायथ्यानें पुढें जाऊन शिरोळी, शेगाळी, नांदिवली व नाणवली अशा मार्गानें वळणें घेत घेत ही मंडळी 'वळणें' गांवाजवळ सत्याग्रह कचेरीजवळ येऊन उभी राहिली. पुढें मोठी गंमत झाली. पोलीस आणि सत्याग्रही लोक बापटांची वाट पहात होते. त्यावेळीं सत्याग्रही मंडळींनीं पोलिसांना एक हुलकावणी दिली. मराठ्यांच्या रक्तांत गनिमी कावा पुरापुरा भरलेला आहे. मेंदूंतली विद्या मनुष्य विसरूं शकतो पण रक्तांतले संस्कार अनेक पिढ्या गेल्या तरी बदलूं शकत नाहींत हा प्रत्यय यावेळीं आला.

सत्याग्रह करण्याच्या पूर्वीं बापटांना सरकारनें अटक करूं नये म्हणून कँपांत अशी दवंडी पिटली गेली कीं नदीपलीकडील वेल्होळी गांवीं धरणा-पासून फार दूर अशा ठिकाणीं सेनापति येणार आहेत. तरी सर्वांनीं तेथें स्वागतार्थ जमावें. त्या गांवीं स्वागताची तयारीहि करण्यांत आली होती. त्यामुळें पोलिसांचा बडा जमाव तिकडेच गेला. परंतु कांहीं लोकांना वस्तुस्थिति सांगून ठेवण्यांत आली असल्यानें सेनापति बापट योग्य वेळीं धरणावर येऊन सत्याग्रही मंडळीबरोबर सत्याग्रह करूं शकले. नंतर मावळे आले व त्यांच्या-मागून पोलीस आले—पण अधिकारी थंडच पडले.

बापटांना लगेच चाळीस मंडळीसह पकडण्यांत आलें आणि त्यांच्यावर खटला होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली.

अशा रीतीनें मुळशी सत्याग्रहाचा सेनापति दुसऱ्यांदां तुरुंगांत गेला आणि तोहि थोडेथोडके दिवस नसून पुरे सहा महिने. त्याचा परिणाम काय झाला आणि मुळशी संग्रामाला वळण कसें लागलें हें पहाण्यापूर्वी आपण तुरुंगवासाची हकीकत ऐकूं. हा तुरुंग दुसरातिसरा कोणता नसून मुंबई इलाख्यांतच केवळ नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत अति कडक म्हणून गाजलेला 'येरवडा तुरुंग' होय. चला तर आपण ह्या तुरुंगाकडे वळूं. धडकीच भरेल तुम्हाला तें येरवडा तुरुंगाचें प्रवेशद्वार पाहून! पण या मार्गांतून हजारों लहानमोठीं शूर हृदयें गेलेलीं आहेत तेव्हां आपण त्यांचें स्मरण केलें तर आपली ही भीति या द्वारांत प्रवेश करतांना दूर होईल.

## १४

# से. बापट आणि येरवड्याचें कारागृह

पुणें शहरापासून रेल्वेलाईनच्या पलीकडे येरवडा म्हणून एक खेडें आहे. हें खेडें एका मोठ्या माळरानावर वसलें आहे. या ठिकाणची हवा मोकळी व समशीतोष्ण असून आल्हादकारक असते. विशेषतः येथें मुंबईच्या मानानें पाऊस कमी पडतो व पाण्याचा निचरा सहज होतो. यामुळें मलेरियाचा उपद्रवहि येथें नाहीं. अशा या आल्हादकारक ठिकाणीं सरकारनें डेक्कन कॉलेज बांधलें आहे. त्याचप्रमाणें अनेक श्रीमंत लोकांनीं आपले बंगले उठवले आहेत.

जेथें हवापाणी चांगलें अशा ठिकाणीं सरकार बहुधा वेड्यांचें इस्पितळ किंवा कारागृहें बांधतें. येरवड्याचे वर वर्णिलेले गुण पाहून सरकारनें तेथें एक मोठें कारागृह बांधलें. ह्याचा परिघ अर्ध्या मैलाचा आहे. हें गृह बांधून जवळजवळ एक शतक होत आलें आहे. त्यामुळें याच्या उंच व प्रदीर्घ भिंतींच्या दगडांना काळीं पुटें चढलीं आहेत. याच तुरुंगांत आजपर्यंत फार मोठमोठीं माणसें राहून

गेलीं. त्यांतील कांहीं लोक येथेंच फांशी गेले. लोकमान्य टिळकांनीं येथेंच रात्रीं ऋग्वेदाचा अभ्यास करून उत्तर ध्रुव हेंच आदिमानवाचें वसतिस्थान असलें पाहिजे हें या सुप्रसिद्ध वेदावरून ठरविलें. याच कारागृहांत गांधींनीं अनेक वर्षें काढलीं. कर्नाटकचे सिंह याच कारागारांत होते. कॉंग्रेस सरकारचें पहिलें मंत्रिमंडळहि येथेंच स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या ठिकाणीं मुंबई इलाख्यांतले सत्तेशीं लढणारे बहुतेक लोक येऊन राहून गेलेले आहेत. त्याचप्रमाणें इलाख्यांतील सर्व उन्मार्गगामी खुनी दरवडेखोरहि येथेंच आणून ठेवलेले असतात. यामुळें हें स्थान समुद्राप्रमाणें अनेक तीर्थांच्या संगमामुळें पवित्र आणि मकरांमुळें भयप्रद झालेलें आहे.

काळ्या प्रदीर्घ भिंती—भयाण शांतता—भयप्रद तांबड्या रंगाचा दरवाजा, त्याच्यावर सशस्त्र लोकांचा पहारा, इतस्ततः वावरणाऱ्या काळ्या उग्र मूर्ती, हा सर्व देखावा पाहून नवख्या मनुष्याच्या मनांत एकदम धडकीच भरते. समुद्राच्या अफाट साम्राज्याचें उग्र स्वरूप ज्याप्रमाणें अटलांटिक महासागरांत दृष्टीस पडतें त्याप्रमाणें ब्रिटिश साम्राज्याची उग्र सत्ता हिंदुस्थानांत, त्यांतल्या त्यांत मुंबई इलाख्यांत व त्यांतहि येरवड्याच्या कारागृहांत दृष्टीस पडते.

आपण तांबड्या दरवाजाच्या आंत कैदी म्हणून पोलिसांसमवेत गेलों कीं आपलें नांव टिपून घेऊन नंतर दुसऱ्या तांबड्या दरवाजाच्या पलीकडे नेतात. तेथें आपली झडती होते, म्हणजे सर्वांगीण तपासणी होते. नंतर आपणाला जेलचे कपडे देण्यांत येतात. कैद्याचा गणवेष म्हणजे लांडी तुमान, एक सदरा, लंगोटी, हातरुमाल व डोक्यावर गांधीटोपीसारखी टोपी. अर्थात् हा वेष फार जाड कापडाचा असतो. गणवेषाबरोबर आपल्याला निजण्याकरितां एक तरट, पांघरावयास कांबळें, पाणी पिण्याकरिता एक भांडें व अन्नाकरितां एक तसराळें असेहि जिन्नस देतात. नंतर क्वारंटाईनमध्यें कांहीं दिवस ठेवून मग अधिकाऱ्यांच्या सोईप्रमाणें जेलमधल्या निरनिराळ्या विभागांत ठेवतात. फार भयंकर लोकांकरितां स्वतंत्र खोल्या बांधलेल्या आहेत. तेथें दंगेखोरांप्रमाणें लोकांच्या पुढाऱ्यांनाहि ठेवतात. येरवड्यांत दोन हजार कैद्यांची सोय आहे. येथें दीर्घ मुदतीचे कैदी जसे पुष्कळ असतात तसे पुणें, नगर, सातारा, येथील अल्प मुदतीचे कैदीहि ठेवण्यांत येतात. दीर्घ मुदतीच्या कैद्यांनीं दीडदोन वर्षें येथें काढलीं कीं इतर कैद्यांवर या जुन्या कैद्यांना अधिकारी नेमतात. कायद्याप्रमाणें यांना अधिकार तसा अल्प असतो. कैद्यांची जेलच्या आवारांत ने आण करणें, रात्रीं त्यांच्यावर पहारा करणें व ते इकडेतिकडे जाणार नाहींत हें पहाणें,

हें या कैदी अधिकाऱ्यांचें काम असतें. पण येरवड्यांत मुळशी सत्याग्रहाच्या काळीं यांच्या हातांत खूप सत्ता देण्यांत आलेली होती. कैद्यांना त्यावेळीं जरबेंत ठेवण्यांत येई. कोणी कोणाशीं बोलावयाचें नाहीं, देतील तें काम निमूटपणें करावयाचें, अधिकाऱ्यापुढें मान वर करावयाची नाहीं. देतील तें खावयाचें. जो कोणी अन्नाबद्दल, कामाबद्दल तक्रार करील त्याला फितूर म्हणावयाचें व त्याला वॉर्डर लोकांनीं यथेच्छ बडवावयाचा! जेलच्या पुस्तकांच्या कायद्यांत सुधारणा व्हावयास जागा असली तरी मूलतः तो कायदा त्याच्या अंमलबजावणीइतका वाईट नाहीं. कोणाहि कैद्याला उगाच हातळविण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं. एखाद्या कैद्यानें तुरुंगाची शिस्त पाळली नाहीं तर तुरुंगाच्या मुख्य अधिकाऱ्यानें त्याची चौकशी करून त्याचें बोलणें ऐकून जेलच्या नियमाप्रमाणें ती शिक्षा पुस्तकांत नमूद करून नंतर द्यावयाची असते. ह्या शिक्षा म्हणजे तरटाचे कपडे घालावयास देणें, नुसत्या कांजीवर ठेवणें, हातांत निजतांना कडी अडकविणें, फार तर पायांत खोडा घालणें—जर अधिकाऱ्यावर हल्लाच केला तर फटके देणें. हा झाला कायदा पण प्रत्यक्षांत येरवड्यांतील कैद्याना रोज अभद्र शिव्या व बसतां-उठतां लाथाबुक्क्या मिळत. खाण्याला वाईट अन्न. यामुळें जेल म्हटला कीं त्या काळीं माणसाच्या अंगावर शहारे येत.

पर्वत एवढा दृढ पण त्याचाहि भंग वज्र करतेंच. त्याप्रमाणें नैतिक अधिष्ठानाच्या मुळशी कैद्यांनीं येरवडा प्रथम ढिला केला. अधिकाऱ्यांचा गर्व उतरवला. इतकेंच नव्हे तर त्यांना वेडेंपिसें केलें. आंत चालणारे जुलूम चवाठ्यावर आणले. ते कसे तें आपण पाहूं.

## *येरवड्यांतील कर्झनशाही*

हिंदुस्थानांत लक्षांत येणारी सामुदायिक चळवळ वंगभंगाच्या वेळीं झाली. वंगभंग हा निमित्तमात्र होता. कर्झनला अधिकारमद फार झाला होता. मी करीन ती पूर्व दिशा झाली पाहिजे, ब्रिटिश साम्राज्याचा सतत दबदबा राहिला पाहिजे, आमचा आब राखल्यावर मात्र लहानसान बाबतींत तुमच्यावर कोणी अधिकारी जुलूम करूं लागले तर हा कर्झन ते बंद करील असें कर्झन म्हणे आणि खरोखरच त्यानें पुष्कळ जुलूम बंद केले. पण त्याचा परिणाम काय झाला पहा. सत्तेच्या दिमाखानें लोक चिडले आणि अधिकाऱ्यांवर करडी नजर ठेवल्यानें अधिकारीहि चिडले. यामुळें वंगभंगाची चळवळ हां हां म्हणतां फोफावली.

येरवड्याला असाच एक कर्झनी थाटाचा जोन्स नांवाचा लष्करी पेशाचा

अधिकारी आला होता. गोरापान, नाकाडोळ्यांनीं नीटस, सहा फुटांहून अधिक उंच, बांधेसूद, दृष्टींत अहंकार पुरेपूर भरलेला. तो लांब लांब पण प्रमाणबद्ध पावलें दाबून टाकी तेव्हां वाटे, अधिकार गाजविण्यासाठींच याचा जन्म आहे. त्याच्या लवाजम्यांत जेलर, दुय्यम जेलर वगैरे युरोपिअन्स, जमादार, डॉक्टर, शिपाई, वॉर्डर वगैरे नेटिव्ह त्याचे मागें चालत–नव्हे–धावत. त्यावेळीं आपण व आपल्या हाताखालचे लोक यांमध्यें त्यांच्या पगाराइतकें अंतर राखण्याची तो दक्षता बाळगी. सुपरिंटेंडंटला सर्व अधिकार असतात ही गोष्ट खरी असली तरी मेजर जोन्सला नेहमीं वाटे कीं, सर्व मी आणि दुसरें कोणी नाहीं. एक निजाम और सब × × ×.

हा गृहस्थ येरवड्यांत आल्याबरोबर त्यानें वॉडर व शिपाई लोकांनीं कैद्यांना मारण्याचे अधिकार जे बळकावले होते ते काढून घेतले. त्यामुळें कैद्यांचें तीनचतुर्थांश दुःख कमी झालें. दुसरी गोष्ट. सायंकाळीं पांच वाजतां कोंडल्यावर कैद्यांना आपापसांत गप्पा मारणें, गाणीं म्हणणें, या गोष्टी करतां येत नसत. निमूटपणें आपल्या जागेवर सायंकाळीं सहा ते सकाळीं सहापर्यंत पडून राहावें लागे. पण जोन्सनें आठ वाजेपर्यंत गाण्याची, गप्पा मारण्याची, परवानगी दिली; यामुळें कैद्यांचें जीवन थोडेंफार सुखाचें होऊं लागलें होतें. पण यामुळें लहानमोठे अधिकारी जोन्सवर असंतुष्ट झाले. कारण त्यांची सत्ता गेली.

अशा स्थितींत मुळशीचे सत्याग्रही कैदी येऊं लागले. प्रथम त्याला वाटलें, कंपनी व शेतकरी यांच्यांत कांहीं हक्कांबद्दल तंटा आहे. म्हणजे हे कैदी राजकीय कैदी नव्हत. त्याचप्रमाणें हे गुन्हेगारहि नव्हत. म्हणून त्यानें मुळशीच्या लोकांना स्वतंत्र बरॅक देऊन त्यांना सौम्यपणें वागविलें. पण लवकरच सत्याग्रही व जोन्स यांच्यांत खटके उडूं लागले. सत्याग्रहींची संख्या जसजशी जास्त होऊं लागली तसतशी या मंडळींत बंडखोरांची संख्याहि फुगूं लागली. ह्या मंडळींत एक गुण किंवा दोष होता. ते कोणाला दबून राहाणारे नव्हते. अधिकारानें कोणी सांगूं लागला कीं हे हटकून कांहींएक न करणारे होते. नाहींतर गरिबीनें वागत. कपूर—पटवर्धन हे त्यांत प्रमुख. एक वेळ जोन्सनें या मंडळींना कांहीं काम देण्यास सुरुवात केली. जोन्सचा स्वभाव असा असे कीं, सुदृढ तरुण इसम पाहिला कीं त्याला पंपाचें किंवा चक्कीचें घाण काम द्यावयाचें. तें त्यानें निमुटपणें केलें कीं मग महिनाभऱ्यानें त्याला एकदम हलकें काम द्यावयाचें. १२४ अ कलमाखालीं एक तरुण आला होता. त्याला त्यानें ३५ पौंड चक्की दिली होती व दुसऱ्या सुदृढ उंच इसमाला पंपाचें काम दिलें होतें. दोघेहि कामांत हटले नाहींत

हें पाहून त्यानें एकाला धान्य निवडण्याचें व दुसऱ्याला आजाऱ्यांचा ताप पहाण्याचें काम दिलें. खुषींत आला तर वाटेल त्याला दूध लोणी देई. त्याच्याजवळ भांडे त्याला अन्याय करूनहि छळी.

जोन्स आपल्यावर अधिकार गाजवतो आहे असें पाहतांच सत्याग्रहींतल्य चारपांच मंडळींनीं बेफामपणें वागण्यास सुरुवात केली. कामच करूं नये, मध्येंच ओरडावें, महात्मा गांधीकी जय म्हणून ललकारी द्यावी. तो १९२२चा काळ. त्यावेळीं जेलमध्यें हे जयजयकार करणें म्हणजे केवढा भयंकर गुन्हा! पण जे जिवावर उदार झाले त्यांना कारागृहाचें भय काय, असें दिसून आलें. ही मंडळी सुदृढ असून चार पौंड सुद्धां दळीत नसत, व जितकें होतें तितकें करतों असें खुशाल म्हणत व बसून राहात. जोन्सनें प्रथम त्यांना सौम्य शिक्षा देण्यास सुरुवात केली. पण लौकरच खोड्यासारख्या शिक्षा तो देऊं लागला. पुढें पुढें तो पिसाळल्यासारखें करूं लागला. जो जो म्हणून मुळशी सत्याग्रही नवा येई त्याला शक्य तितकें चक्कींत भरडून काढण्याचा उपक्रम त्यानें सुरू केला. चक्की ही सामान्यतः तरुण, सुदृढ काया ज्याची असेल अशाच मनुष्याला देतात व त्यानें दळावयाचें धान्य क्रमाक्रमानें वाढवीत जावयाचें असतें. चक्की म्हणजे कांहीं आपल्या घरांतलें सामान्य जातें नव्हे. तें भलें भक्कम मणभर वजनाचें जातें असतें. जें पीठ दळावयाचें तें घरगुती पिठासारखें नसून सपीटासारखें अगदीं बारीक दळावें लागतें. दळल्यानंतर तें सपीटाच्या चाळणीनें चाळून राहिलेली कणी पुन्हा तशीच दळावी लागते. हें मात्र अतिकिचकट काम असतें. पुन्हा पीठ थोडें थोडकें का असतें? नाहीं. तब्बल ३५ पौंड. तें दळतांदळतां मनुष्य मेटाकुटीस येतो. असें हें काम सत्याग्रहींना एकदम देण्यांत येत असे. आज काम दिलें, उद्यां वर्दी झाली नाहीं कीं परवां त्याच्यावर खटला व्हावयाचा. हा निव्वळ सूड होता. ज्यांनीं जन्मांत कधीं जात्याला हात लावला नाहीं ते ३५ पौंड वर्दी एकदम कशी करणार? पण शक्य का अशक्य हा प्रश्न जोन्सपुढें नव्हता. मुळशीवाले आपला अधिकार न मानणारे आहेत ना? बरें आहे, दाण्यांसारखे भरडून काढतों, असा त्यानें पण केला होता. सत्याग्रही तरुण मंडळी मग हट्टासच पेटली. ते खोड्याच्या शिक्षा भराभर घेत पण जोन्सचें म्हणून ऐकत नसत. या तरुण सत्याग्रहींत थोडासा अर्वाच्यपणा होता ही गोष्ट जरी खरी असली तरी एवढ्या प्रचंड साम्राज्यसत्तेचा बालेकिल्ला जो येरवडा जेल, जेथें मनुष्याला छळण्याची सर्व सत्ता एका मनुष्याचे स्वाधीन, आपलें रक्षण करण्यास कोणी नाहीं, कारावासाचा अनुभव नाहीं, अशा स्थितींत त्या सत्याग्रहींनीं जें धैर्य प्रकट केलें

तें अवर्णनीय होतें. पायांत खोडा असून देखील ही तरुण मंडळी सारा दिवस हंसत व खेळत इतकेंच नव्हे तर थय थय नाचत. जुलमी सत्ता जी प्रथम हादरते ती तोफांच्या गडगडाटानें नव्हे तर असल्या धीरोदात्त वागणुकीनें. रावणाचा प्रथम नैतिक पराभव जो झाला तो अंगद, सुग्रीव, हनुमान यांच्या हल्ल्यानें नव्हे. तर सीतेनें दिलेल्या धैर्यशाली उत्तरानें रावण हादरला. सर्व मोठमोठ्या सेनानींची अशी साक्ष आहे कीं शत्रूचा पराभव प्रतिपक्षाच्या धैर्यानें जितका होतो तितका तोफाबंदुकांनीं होत नाहीं. ज्यांनीं कधीं लढाईच मारली नाहीं, ज्यांना सुखशय्या सोडायची इच्छा नाहीं, त्यांनीं म्हणावें कीं जवळ तोफा बंदुका नसतांना हे लढाई ते काय देणार?

जेलमध्यें डोक्यावर केस ठेवूं देत नसत—कारण उवा होतील. पण जेलचे वस्तरे व हजाम म्हणजे म्हशी भादरणारे लोक. यामुळें सत्याग्रही हजामत करावयाला नाखूष असत. जो नाखूष त्याच्या पाठीमागें न लागला तर तो जोन्स कसला? एक सत्याग्रही हजामत करण्यास नाखूष पाहून जोन्स त्याच्या पाठीमागें लागला. त्यानें सहा वॉर्डर आणले व त्याला पकडून त्याची हजामत केली व म्हणतो काय, 'केली ना हजामत?' तेव्हां तो सत्याग्रही उत्तरला, 'अहो साहेब, माझ्यासारख्या साध्या माणसाची हजामत करायला तुम्हांला सहा भक्कम वॉर्डर लागतात. आम्ही तीस कोटी लोक तुमच्या विरुद्ध आहोंत. यांना आवरायला तुम्ही काय १८० कोटी वॉर्डर आणणार काय?' असे प्रकार नेहमीं चालत.

हे सर्व प्रकार बापट निमूटपणें पहात होते व हे दंगे चालू होण्यापूर्वी बापट तुरुंगांत आले होते. त्यांना out-file चें म्हणजे बागेंतलें काम देण्यांत आलें होतें. बापटांचा मोठा गूण म्हणजे शिस्तशीर वागणूक. तीन वर्षेपर्यंत त्यांनीं साम सत्याग्रहानें वागावयाचें ठरविलें होतें. एकदां कार्यक्रम ठरला म्हणजे कसें वागावयाचें याचा आदर्श पहावयाचा असला तर गांधी अगर बापटांकडे पहावें. पुष्कळांची अशी समजूत असते कीं जोरानें बोललें, डोळे फाडले, मुठी वळल्या म्हणजे शौर्य गाजलें. खऱ्या शूराचा पराक्रम प्रत्यक्ष कृतींत दिसतो. वाणींतला पराक्रम हा नाटकांतच पहावा, कारण तेथें कृति करण्याला वावच नसतो. बापट तुरुंगांतील शिस्त कांटेकोरपणानें पाळीत. पहांटे उठत, गिणतीला व्यवस्थेशीर बसत, कांजी आनंदानें पीत व इतर कैद्यांबरोबर कुदळ, फावडें, भाकर घेऊन बाहेर बागेंत जात. तेथें खूप मेहनत करून बागेंत काम करीत. घायपात कुटावयाचें त्यांना काम करावें लागत असे. तें कामहि ते अगदीं मन लावून करीत. बरोबरच्या मंडळीशीं ते थट्टामस्करी करीत असतां आपण

मोठे विद्वान आहों, पुढारी आहों हा भाव त्यांच्यांत दिसून येत नसे. त्यांनीं आपल्याकरितां कांहीं विशेष सवलती घेतल्या नाहींत. सायंकाळीं परत आले, गिणती होऊन बरॅकमध्यें ते कोंडले गेले म्हणजे मग त्यांचे भोंवतीं सत्याग्रहींचा घोळका बसे. तेथें निरनिराळ्या विषयांवर चर्चा चाले. बापट या चर्चेंत भाग घेत पण पुढाऱ्यासारखा मोठा उपदेशाचा आव आणून घेत नसत. थट्टामस्करी करीत, आपले विचार सांगत, पुष्कळदां वाचीत पडत.

जेलमध्यें बातमी काढण्याचा मनुष्याला फार नाद असतो. हल्लींच्या जेल भाषेंत याला 'बंडल' अगर बुलेटिन म्हणतात. या बुलेटिनचे विषय सुटका केव्हां होईल, जेल बदली, काम बदली, असे असतात. कधीं कधीं अधिकाऱ्याची बदली, त्यांच्यामधलें भांडण किंवा बाहेरील चळवळ हेहि विषय असूं शकतात. पण या बातम्यांविषयीं बापट आतुर असे कधींच दिसले नाहींत. कोणी कोणी वॉर्डर आपण होऊन बातमी आणीत. कोणी कांहीं भाविकतेनें सांगूं लागला तर त्याचें म्हणणें बापट ऐकत पण त्यावर विश्वास ठेवीत नसत. एकदां मी त्यांना विचारलें, हा सुशिक्षित वॉर्डर रोज बातमी घेऊन येतो तो तुम्ही त्याला तसें सांगून ठेवलें होतें काय ? तेव्हां ते म्हणाले, मी कोणाला बातमीदार नेमलेला नाहीं. आतां कोणी आपण होऊन बातमी सांगूं लागला तर त्याला मी नाहीं म्हणत नाहीं एवढेंच. असल्या बातम्यांवर मी विश्वासहि ठेवीत नाहीं.

तुरुंगांत बातम्यांप्रमाणें चोरून पदार्थ आणविण्याची खोड पुष्कळांना असते. पण बापट यांनीं व्रत न घेतांनाहि अस्वादवृत्ति आचरलेली आहे. यामुळें बाहेरून चोरून पदार्थ आणण्याची त्यांना गरज पडत नाहीं. एकदां एकादशीला कोणीतरी चार भुईमुगाचे दाणे त्यांना आणून दिले ते त्यांनीं स्वीकारले व जवळच्या मंडळींत ते वांटून देऊन एक दाणा तोंडांत टाकला. अशा प्रसंगीं उगाच तत्त्वज्ञान सांगून ते निषेध करीत नसत किंवा हावरेपणाहि करीत नसत. यदृच्छया जें घडेल तें ठीक असें ते मानीत असत.

ते इतरांप्रमाणें हंसत खेळत असत पण त्यांचें सारें लक्ष सत्याग्रहींच्या वर्तणुकीवर असे. सत्याग्रही मंडळी अर्वाच्यपणा करीत म्हणून त्यांच्याकरितां त्यांनीं शांतिसप्तक तयार करून दिलें होतें. त्यांत ते म्हणतात—

कसाही छळो वैरि सत्याग्रहांत।
कसाही छळो वैरि कारागृहांत॥
अम्ही पांडवांसारखी शिस्त पाळूं।
मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं॥

त्याचप्रमाणें ते दुसऱ्या पद्यांत म्हणतात,

पाळावे कायदे शिस्तीचे सर्वलीनतेनें।
त्याज्य सर्वथा स्वैर वागणें शिस्तहीनतेनें।

मनुष्यानें शत्रूच्या राज्यांत असतां आपली वागणूक रुबाबदार ठेवली पाहिजे. पद्धतशीर जो वागतो त्याच्या वर्तनाचा शत्रूवर फार परिणाम होतो. नैतिक वर्तनाचा जेवढा दाब मनुष्यावर बसतो तेवढा अर्वाच्यपणाचा बसत नाहीं. आपल्या वर्तनाकडे जेलच्या लहानमोठ्या अधिकाऱ्यांमार्फत आपले शत्रू पहात असतात हें सदैव ध्यानांत ठेवलें पाहिजे.

सत्याग्रहींच्या वर्तनाकडे ज्याप्रमाणें त्यांचें लक्ष असे त्याप्रमाणें कोणाला कांहीं त्रास झाला, शिक्षा झाली, तर तिकडेहि ते बारकाईनें पहात. जर अन्याय झाला असेल तर मनांतल्या मनांत जळफळत; त्यांचा राग त्यावेळीं त्यांच्या मुखावर दिसे. बॅरकमधला कोणीहि सत्याग्रही खोड्याच्या शिक्षेमुळें उभा असला तर बापट तो मोकळा होईपर्यंत जेवत नसत.

## *बिस्मिल्ला किंवा गोपाळकाला*

रविवारीं सर्व सत्याग्रही एकत्र जेवत. कारण बाहेरील कामाला रविवारीं सुट्टी असे. रविवारीं दुपारीं २–३ वाजतां बॅरकमधले सर्व कैदी आपलें रॅशन घेऊन येत. कोणाला पोळी तर पुष्कळांना भाकरी असे. कोणाला घुगरी असे तर कोणाला भात मिळे. हे सर्व जिन्नस एकत्र करून नंतर सर्व भोजन करीत. याला बापट बिस्मिल्ला म्हणत. या जेवणांत जी गोडी येई ती समजावयाला जेलचाच अनुभव घ्यावयाला पाहिजे.

## *संयमाची कसोटी*

मागें सांगितलें आहेच कीं मेजर जोन्स हा अलीकडे ज्याला त्याला चक्की देऊं लागला होता. त्यामुळें सत्याग्रहींचे खटले रोज त्याच्यासमोर येत. तो कांहीं तरी कुजकें बोले नि मग सत्याग्रही त्याला सडेतोड उत्तरें देत. इतर कैद्यांच्या देखत ही बाचाबाची चालल्यामुळें अधिकाऱ्यांचा बोज कमी होऊं लागला. सत्याग्रहींची एक गंमत अशी असे कीं, ते नेटिव्ह अधिकाऱ्यांशीं खेळीमेळीनें वागत व युरोपिअन अधिकारी भेटला कीं त्याच्याबरोबर हुज्जत घेत. याच्या उलट इतर कैद्यांचें वर्तन असे. ते आपल्या लोकांशीं उर्मटपणें वागत पण साहेबांपुढें

नांगी टाकीत. सत्याग्रहींना म्हणत, 'तुमच्या या गमज्या कोठपर्यंत ? जोंपर्यंत वेत लागले नाहींत तोंवर. मोठमोठे धिप्पाड पठाण जेथें फटक्यांपुढें नम्र होतात तेथें तुमची काय कथा ?' या उद्गारांना कोणी शब्दानें उत्तर देत नसे पण कृतीनें उत्तर देण्याचा प्रसंग लवकरच आला. जोन्सचा अपमान रोज होऊं लागला. प्रत्येक सत्याग्रही मुद्दाम अपमान करीत असे असें नाहीं. पण कांहींजण त्याला जुमानीत नव्हते. खोड्याच्या शिक्षाहि ते खात. खोड्याची शिक्षा सात दिवसच एका वेळीं देतां येते पण हे लोक नम्र न झाल्यामुळें एकेका माणसानें त्यावेळीं चारचार खोडे खाल्लेले आहेत. पण कोणीहि हटेना. जोन्स दिवसेंदिवस पिसाळत चालला. शेवटीं त्यानें वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून फटके मारण्याची परवानगी आणवली. जेलमध्यें अधिकाऱ्यावर हल्ला केल्याशिवाय फटके देतां येत नाहींत. मुळशीचे सत्याग्रही अशा तऱ्हेचा दंगा करीत नसत. नम्र न होणें, आम्ही स्वतंत्र आहोंत या भावना दाखविणें, प्रसंगीं महात्मा गांधी की जय म्हणून ओरडणें हेच काय ते सत्याग्रहींचे गुन्हे. ते सामान्यतः सौम्य दिसत पण त्यांना नैतिक अधिष्ठान असे. शरीर दुबळें असलें तरी मी स्वतंत्रतेचा उपासक, भक्त आहें—

> **मराठे अम्ही श्रीशिवाजी प्रभूचे**
> **अम्ही पांग फेडूंच या आर्यभूचे।**
> **असे पंगु का आमुची राष्ट्रमाता**
> **अम्ही वर्म हें जाणतों पूर्ण आतां ॥**

असा विश्वास प्रत्येकाला वाटे. स्वातंत्र्याचें तेज पूर्णपणें ओळखणारा जोन्स, स्वातंत्र्याची चट लागल्यावर त्याचे परिणाम पुढें काय होतात हें समजणारा जोन्स, साम्राज्यशाहीचा पुरस्कर्ता जोन्स, कर्झनचें रक्त ज्याच्या नसानसांतून खेळत आहे असा जोन्स हें कसें सहन करणार ? व तेंहि साम्राज्याच्या बालेकिल्ल्यांत ? सत्याग्रहींच्या गमज्या चालू देणें म्हणजे उशाशीं सर्प ठेवून निजणें असें त्याला वाटे. ही स्वातंत्र्याची ठिणगी आज जर दडपून विझवली नाहीं तर या ठिणगीचा भडाग्नि होऊन १६६५ मध्यें जसें लंडन बेचिराख झालें तसें आपलें साम्राज्य जमीनदोस्त होईल. तें होऊं नये म्हणून आय. जी. ला जोन्सनें कळविलें कीं कायदाबियदा आतां कांहीं पाहूं नका. चक्की न पिसणें म्हणजे बंड करणें असाच अर्थ करा. हा बंडाचा प्लेग एकदां येरवड्यांत पसरला म्हणजे मग आटोपायचा नाहीं. जवळच महात्मा गांधी आहेत तेहि कदाचित्

यांत सामील व्हायचें. मग हा वणवा देशभर पसरावयाचा वगैरे वगैरे. आपल्या ताब्यांतला कैदी आणि आपलें ऐकत नाहीं हें ऐकतांच आय. जी. चें पित्त खवळलें आणि त्यानें फटके मारण्याची परवानगी दिली व स्वतः या शिक्षेच्या वेळीं हजर राहिला. ही परवानगी म्हणजे भस्मासुराला दिलेला वरच ठरला.

आतां मुळशीच्या लोकांना वठणीवर आणतों, असें जोन्सनें ठरविलें. इंग्रजी राज्यांत असा एक नियम आहे कीं कोणतेंहि काम सशास्त्र झालें पाहिजे. फटके मारावयाचे झाले तरी ज्याला फटके द्यावयाचे तो ते खावयाला शारीरिक दृष्टीनें समर्थ आहे कीं नाहीं हें डॉक्टरनें प्रथम तपासून नंतर तो तसा आहे असें ठरलें म्हणजे फटके मारतात. जोन्स जरी आय्. एम्. एस्. डॉक्टर होता तरी तो जेलचा मुख्य असल्यामुळें डॉक्टरचा अधिकार मेथा म्हणून सब् असिस्टंट सर्जन होता त्याला असे. त्यानें फटक्यांचे बळी तपासावयाचे असत. डॉ. मेथा म्हणजे काय, गुळाचाच गणपति, गुळाचाच नैवेद्य! जोन्सनें सांगावें व त्यानें ऐकावें, अशी स्थिति होती. सिव्हिल सर्जनच डॉक्टर असला तर गोष्ट वेगळी नाहींतर हे लहान डॉक्टर म्हणजे सुपरिंटेंडेंट अगर जेलरच्या ताटाखालचीं मांजरें असत. कायद्यानें डॉक्टरचे अधिकार मोठे आहेत. त्यानें दूध नापास केलें कीं दूध परत जातें. त्यानें अन्न वाईट म्हटलें कीं तें नापास, असा नियम खरा; पण डॉक्टरची छाती नाहीं जेल अधिकाऱ्यांच्या विरुद्ध जावयाची! एखाद्यानें जरा धीटाईचें वर्तन केलें तर त्याचा रिपोर्ट डॉक्टरच्या अधिकाऱ्यांकडे जावयाचा कीं हा कैद्यांना फूस देतो—व आमची शिस्त बिघडवितो. पोलिटिकल खात्यापुढें इतर खातीं नम्र, यामुळें डॉक्टरी खात्याचे वरिष्ठ आपल्या हाताखालील मनुष्याला तंबी देतात. जेलचा डॉक्टर म्हणजे अधिकाराशिवाय जबाबदारी असलेला मनुष्य. जेलच्या बाहेर तालुक्याच्या गांवीं अरेराव असणारे डॉक्टर जेलमध्यें कैद्याहूनहि कैदी बनतात. असो.

कोणाला फटके मारावयाचे हें जोन्सनें ठरवून ठेवलें. त्याची कुणकुण सत्याग्रहींना लागली होती. पण निश्चिती नव्हती. एके दिवशीं सकाळीं सर्व मुळशी कैद्यांना एकत्र करण्यांत आलें. त्यांतून पंधरावीस नांवें पुकारलीं. त्यांना हॉस्पिटलमध्यें नेलें. डॉ. मेथानें त्यांस बळी देण्यास योग्य ठरविलें. मग त्यांना तांबड्या दरवाजाजवळ नेलें. तेथें जोन्स व सर्व जेलांचा वरिष्ठ अधिकारी असे. खुर्च्या टाकून बसले होते. एक पठाण हातांत वेताच्या छड्यांचा जुडगा घेऊन आला. तो धष्टपुष्ट व उंचापुरा होता. त्याला पहातांच हाच तो सुमेरसिंग गारदी असें सत्याग्रहींना वाटलें. फटक्यांची सजा सुनावण्यांत आली. जेलचे फटके

म्हणजे शाळेंतील मास्तरांच्या हातावरच्या छड्या नव्हेत. प्रथम कैद्याला वस्त्र-विहीन करतात. नंतर शाळेंतल्या फळ्याचा जो तिकोनी घोडा असतो त्यावर त्या मनुष्याला उभा करून बांधून टाकतात. मग किती फटके मारावयाचे ते अधिकारी सांगतो व कोणच्या जागेवर फटका मारावयाचा तें डॉक्टर दाखवून देतो. हे फटके ढुंगणावर मारीत असतात व प्रत्येक फटक्याची जागा पाव इंचानें बदलतात. मारणारा जाड छडी घेऊन धांवत येतो व पवित्रा घेऊन जोरानें ढुंगणावर ती हाणतो. त्याबरोबर मनुष्य ओरडतो. जागा हिरवी पिवळीं होते. पुन्हा तो मनुष्य धांवत येतो व पहिल्या जागेच्या जरा खालीं दुसरा फटका हाणतो. ती जागाहि सुजते. असे फटके भराभर मारले जातात. कातडी पुढें फाटते. मनुष्य बेशुद्ध होतो अगर शुद्धीवर असला तरी १०–१५ फटक्यांच्या पुढें वेदना त्याला समजत नाहींत. फांशीपेक्षांहि तो प्रसंग कठीण, भीतिप्रद असा भासतो.

मनुष्य कितीहि धीट असला तरी पहिल्या प्रसंगीं कचरत नाहीं असा कोण आहे? सुभाषितकार म्हणतात, पंडितांच्या सभेंत व रणांत युद्ध सुरू करण्याच्या पूर्वीं क्षणभर कचरत नाहीं असा कोण आहे? लो. टिळकांनीं आपल्या धीटपणाची मीमांसा करतांना म्हटलें होतें: उपजत धीट, DareDevil असे लोक थोडेच असतात. विचारानें धीटपणा आणतां येतो. माझ्या पहिल्या कारावासाच्या वेळीं मलाहि थोडा विचारच पडला होता. पण आपलें स्थान सोडणें हें बरें नव्हे असा विचार केल्यावर मग पावलें नीट पडलीं. फटके मारावयास नेतांना मुळशी सत्याग्रहींचें काळीज धडधडलें नाहीं असें कसें म्हणतां येईल? पण एकदां घोड्यावर चढवल्यावर मग त्यांनीं जें धैर्य व सोशिकपणा दाखविला तो राष्ट्राला भूषणावहच ठरला. प्रत्येक फटक्याला राम राम असाच ध्वनि सत्याग्रही नाजुक कपूरच्या तोंडून निघत होता. १०–१५ फटके मारून झाल्यावर पुढें कपूरनें मान टाकली. घोड्यावरून खालीं काढल्यावर, पुन्हा असें करशील का? असें जोन्सनें विचारल्यावर, 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे शब्द कपूरनें उच्चारतांच त्याच्या मागून फटके खाणाऱ्या १०–१५ लहानमोठ्या मंडळींच्या अंगांत धैर्य संचारून त्यांनीं जोन्सचा नक्षा उतरवला. आज सत्याग्रहींची परीक्षा होती. सर्व जेल त्यांचेकडे पहात होता. आज फटके खाणारे राष्ट्राचे प्रतिनिधी होते. गोखले व रँगलर परांजपे यांनीं आपल्या बुद्धीचा प्रकर्ष विलायतेंत दाखवून राष्ट्राचा मान राखला तसाच मान मुळशीच्या बाळगोपाळांनीं आपल्या शौर्यानें राखला. राखला म्हणजे काय—

मुळशी सत्याग्रही काय करतात म्हणून पहाण्याकरितां कांहीं तरी कामाचें

निमित्त करून तिकडे गेलेले धीट गुन्हेगार कैदी आपल्या बरॅकमध्यें येतांच 'मुळशी पार्टीकी जय–मुळशीवाले बहादूर है' म्हणून ओरडत आले व नाचू लागले. शूरांचें कौतुक शूरच करूं जाणे !

हा सर्व प्रकार बापटांच्या डोळ्यांदेखत चालला होता. ते ज्वालामुखीसारखे बाहेरून शांत दिसत होते पण त्यांच्या हृदयांत क्रोधाचा नुसता डोंब पेटला होता. ते कोणाशीं बोलले नाहींत. सर्व मुळशी सत्याग्रही एकत्र झाले तेव्हां बापट म्हणाले, आज दुसरी मुळशी परिषद बरं का ? त्यावेळीं या बोलण्याचा अर्थ आमच्या ध्यानांत आला नाहीं. ते बाहेरून शांत दिसत होते पण ती वादळापूर्वीची शांतता होती. धर्मराजाच्या हृदयांतली, अभिमन्यु रणांत बेभान पडल्यावर त्याला जयद्रथानें लाथ मारली ही वार्ता ऐकून अर्जुनाच्या हृदयांतली, वीरनवालीवर जुलूम होऊन अपराधी मनुष्य कोर्टांत निरपराधी ठरतो हें एकून टिळकांच्या हृदयांत झालेल्या कालवाकालवीची कल्पना जर आपणाला होत असेल तरच बापटांच्या मनाची कल्पना आपण करूं शकूं. बापटांनीं जेलमधून जे जळजळीत संदेश बाहेर पाठविले त्यांचें उगमस्थान मुळशींतल्या फटक्यांसारखे प्रयोग होत. बापट त्यावेळीं कांहीं बोलले नाहींत. ते फक्त म्हणत,

अम्ही पांडवांसारखी शिस्त पाळूं।
मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं ॥

कोंडलेली वाफ, दाबलेला राग आणि गिळलेले अश्रू कोणीच पचवूं शकलेला नाहीं. त्यांचें निराळ्या तेजांत रूपांतर होतें व तें पुढें प्रगट झाल्याशिवाय राहात नाहीं. तसेंच बापटांच्या बाबतींत होणार हें त्यांच्या निरोपांवरूनच लोकांच्या ध्यानांत आलें. ते एका निरोपांत म्हणतात,

९०१८८

पुढें रक्त माझें रणीं या पडेल।
पुढें युद्ध शुद्ध-स्वरूपें घडेल ॥

फटक्यांचा प्रसंग संपला. सत्याग्रही मंडळी कांहीं दिवस आजारी पडून नंतर बरी झाली. यानंतर हें प्रकरण जास्तीच चिडीस गेलें. वाघाला एकदां रक्ताची चटक लागली म्हणजे तो माणसें मारीत सुटतो त्याप्रमाणें जोन्स उटल्यासुटल्या फटके देऊं लागला व मंडळीहि निर्ढावली. मेलें मढें आगीला भीत नाहीं अशी अवस्था सत्याग्रही मंडळींची झाली.

जोन्स पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें वागूं लागला. तो खुशाल खोट्या गोष्टी

बिनदिक्कत History Ticket च्या पुस्तकामध्यें लिही. लोकमान्याचे संपादक पां. वा. गाडगीळ यांनीं सात दिवस उपवास केला होता. उपवासांत त्यांचें वजन १३५ वरून शंभर पौंडांवर आलें. उपवास सोडल्यावर त्यांचें वजन साहजिकच झपाट्यानें वाढूं लागलें. त्यावर जोन्सनें असा शेरा मारला कीं या गृहस्थाचें उपवासांत वजन वाढत आहे. त्यावर गाडगीळांनीं सांगितलें कीं हें वजन उपवासांत वाढलेलें नाहीं—अन्न खाऊं लागल्यावर वाढलेलें आहे. जोन्स त्यावर म्हणतो, 'I don't care. जा चालता हो. मी नाहीं पहात अशा गोष्टी तपासून!' त्याबरोबर गाडगीळ रागावून म्हणाले, 'जर तुम्हाला पर्वा नाहीं तर मलाहि पर्वा नाहीं.' असे म्हणून त्यांनीं तें नोंद पुस्तक फाडून त्याच्या तोंडावर फेकलें—! केवढा निर्भयपणा हा ! या निर्भयपणाची लज्जत अधिकाऱ्याच्या भृकुटीची हालचाल पाहून वागणाऱ्या सत्तेच्या गुलामांना कशी कळणार ?

असल्या प्रसंगांमुळें बापटांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली कीं सामसत्याग्रहाचा काळ संपत आला आहे. त्यांचे याच वेळीं सत्याग्रहींबरोबर संदेशांवर संदेश बाहेर जात होते. त्यावेळीं सर्वांनाच सी क्लास होता. लेखन-साहित्य मिळत नसे. मग बापट आपल्याशींच कविता रचीत. ती स्वत: पाठ करीत आणि सुटणाऱ्या सत्याग्रहींना ती रोज थोडी थोडी शिकवून पाठ करून वेत. मग तो सत्याग्रही सत्याग्रही ऑफिसांत कविता—संदेश सांगे व मग ते प्रसिद्ध होत.

मनुष्य तुरुंगांत गेल्यावर कांहीं दिवसांनीं तुरुंगाच्या वातावरणांत गुंग होऊन आपण कोण, कशास्तव आलों याचें भान त्यास नाहींसें होतें, व मग अधिकाऱ्यांचे गुणदोष, अमूक वॉर्डर असा आहे, अमूक वॉचमन तसा आहे, अमक्यानें अमूक चोरून आणलें, अमूक कैदी असाच वागतो, वगैरे गोष्टींत त्याचें मन रंगून जातें. त्यांतच कामावरून, खाण्यावरून, भांडणें सुरू होतात. पांढरपेशा मंडळींत 'कुळंब्यासारखा भाकरीवरून काय भांडतोस ?' अशी म्हण आहे. पण खाण्याचे सर्व मार्ग बंद झाले म्हणजे हे पांढरपेशे लोकहि भाकरीवरून भांडतात असा अनुभव आहे. बापटांनीं आपलें पुस्तक नेहमीं वर ठेवलेलें असे. ते एकदां म्हणाले, घायपात कुटीत असतां प्रत्येक क्षणीं मी ब्रिटिश साम्राज्य कुटीत आहें असें मला वाटतें. गांधी म्हणतात कीं मी राजद्रोहाचाच श्वासोच्छ्वास करतों. तीच अवस्था बापटांची असे. त्याचप्रमाणें आपण मुळशी सत्याग्रहाचे पुढारी, सेनापति, अध्यक्ष आहोंत, याची स्मृति त्यांनीं कधीं गमावली नाहीं. बापट सुटण्याच्या आदल्या दिवशीं रविवार होता. बरॅकमधले सत्याग्रही एकत्र जमले, सर्वांचें अन्न

एकत्र झालें तरी बापट उठेनात. गंभीरपणें वाचीत पडले होते. मी एकदोनदां सूचना केली पण त्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. पांच वाजतांच ते एकदम उठले व हंसत म्हणाले, 'चला जेवायला.' ते इतका वेळ जवळजवळ दोन तास कां थांबले होते याचा बोध प्रथम झाला नव्हता. तो दुसऱ्या दिवशीं बापट सुटल्यावर झाला. बापट गेल्यावर सायंकाळीं एक गुन्हेगार कैदी मला म्हणाला, 'काय हो, तुमच्यापैकीं आज एक मोठा माणूस सुटला, नाहीं का?' मी म्हटलें, 'होय. पण तुला हें कसें कळलें?' तो म्हणाला, 'मला तसें सांगितलें नाहीं पण मीं तें ओळखलें. काल दुपारीं तुम्ही लवकर जेवलां नाहीं. पांच वाजल्यावर जेवलांत, त्यावेळीं तुमच्यापैकीं एकाला खोड्यावर ठेवला होता. पांच वाजतां त्याचा खोडा काढल्यावर मग तो मनुष्य जेवायला उठला. आपल्यापैकीं एक मनुष्य खोड्यावर असतां आपण जेवणें हें आपणास शोभणार नाहीं ही गोष्ट त्या पुरुषाच्या मनांत होती हें मी जेव्हां पाहिलें तेव्हां त्याची योग्यता मला समजली.' खरा मोठेपणा हा अज्ञानी मूक जनतेलाहि कळतो. त्यागाची भाषा सर्वांना कळते.

### *अनाथाचा कैवारी*

एकदां सायंकाळीं गिणती चालली होती. इतक्यांत बरॅकच्या वॉर्डरनें एका कैद्याला विनाकारण शिव्या देऊन त्याच्यावर हात उगारला. हात उगारण्याच्या अगोदर त्या दोघांत कांहीं कुरबुर चालली होती. ती बापट शांतपणें ऐकत होते. वॉर्डरनें दंडा उगारलेला पाहतांच बापटानीं चित्त्याच्या चपळाईनें उडी मारून वॉर्डरचा हात धरला व ते त्वेषानें म्हणाले, 'मी सर्व ऐकतों आहें. त्या माणसाचा कांहींहि गुन्हा नाहीं. तुला वाटलें तर त्याची तक्रार वर ने पण त्याच्यावर हात टाकूं नको—' हे शब्द त्यांनीं चिडून उच्चारले होते. नेहमीं प्रशांत असणारे बापट आज चवताळलेले पाहून वॉर्डर नरमला व म्हणाला, 'तुमचा गैरसमज झाला आहे.' बापट म्हणाले, 'तूं हात आवरलास ना? पुरे आहे. माझें काम झालें.' पुढें हा वॉर्डर त्यांचा मित्र बनला.

दवाखान्यांतले लहानसान अधिकारी बापटांना विश्रांतीकरितां दवाखान्यांत बोलावीत. बापटांचे दांत दुखत असूनहि ते दवाखान्यांत विश्रांति घेण्यास जात नसत. एक दिवस त्यांची दाढ भयंकर दुखूं लागली म्हणून बाहेर फाईलमध्यें असतांना ते रस्त्यावर दाढीला हात लावून बसले. तों त्या बाजूनें जोन्स आला. तो म्हणाला, 'बापट, काय होत आहे?' 'दाढ दुखते.' 'दवाखान्यांत कां जात

नाहीं ?' असें म्हणून त्यानें त्यांना दवाखान्यांत पाठवूनहि दिलें. तेथें ते अगदीं अनिच्छेनें गेले. देहाची ममता अशी त्यांनीं ठेवलीच नव्हती.

तुरुंगांत बापटांच्या जातीच्या पुरुषांचें वर्तन पिंजऱ्यांत पडलेल्या सिंहासारखें असतें. सिंहवाघ गंभीरपणानें पिंजऱ्यांत फेऱ्या घालीत असतात. आल्या गेलेल्याकडे ते ढुंकूनहि पहात नाहींत. खाण्याच्या वेळीं तेवढे अन्नाकडे पाहतील! नाहींतर माकडें—नाना चेष्टा करतील. क्षुल्लक फुटाणा दिसला कीं तो खाण्याकरितां धांवतील. धीर आणि उदात्त वर्तनाचा अधिकाऱ्यांवर परिणाम हा होतोच. तसा बापटांच्या वर्तनाचा जेलच्या अधिकाऱ्यांवर होई. त्यांनीं कधीं लाचारी केली नाहीं. त्याचप्रमाणें क्षुल्लक कारणानें ते कधीं कुत्र्यासारखे वस्कन् अंगावर येत नसत.

सोन्याची परीक्षा जशी अग्नींत होते त्याप्रमाणें पुरुषाच्या शीलाची परीक्षा जेलमध्यें होते. तेथें सर्व सुखसोईचा उन्हाळा असतो पण अनैतिक मार्गांनीं सुखसोई मिळूं शकतात. त्यामुळें पुष्कळ मोठे म्हणून प्रसिद्धीस आलेले लोक तुरुंगांत गेले कीं घाबरतात किंवा मोहांत सांपडतात. टिळक-गांधी यांच्या शेजारीं बसण्याची बापटांची योग्यता कशी आहे हें त्यांच्या तुरुंगांतील तपश्चर्येवरून समजून येतें. ऐरणीवर राहून घणाच्या घावानें ज्याचा चुराडा होत नाहीं त्यालाच हिरा म्हणतात व त्याचेंच मोल मोठें ठरतें.

## १५

# सेनापतींचे संदेश

युद्ध एकदां सुरू झालें म्हणजे सैन्याला उत्साहभरित करण्याकरितां रणवाद्यें असतात. भेरी-दुंदुभी-नगारे—हे मनुष्याचें मन उत्साहित करतात. यांच्या आवाजानें रक्त सळसळूं लागतें, नवा आवेश चढतो. तुतारी वाजली कीं आळस पळून जातो व एकदम जागृति येते. भगवद्गीतेच्या आरंभीं संजय धृतराष्ट्रास म्हणाला, युद्धारंभीं 'प्रतापी वृद्ध भीष्मांनीं मोठ्यानें शंख फुंकला. तत्क्षणीं शंख-भेर्यादि रणवाद्यें विचित्रपणें एकदम झडलीं-तेव्हां झाला शब्द भयंकर!' रणवाद्यें

कितीहि हृदय हालवणारीं असलीं तरी सेनापतींच्या संदेशाची व घोषणेची सर त्यांना यावयाची नाहीं. वाद्यें कितीहि झालीं तरी जडच–सेनापति जे शब्द उच्चारतो त्यांत भावना भरलेल्या असतात–ते शब्द हृदयापासून निघालेले असतात. त्या शब्दांत वंशाचा अभिमान, हजारों वर्षांचे वांशिक संस्कार ग्रथित झालेले असतात म्हणून सेनापतीच्या संदेशानें सैनिक व एकंदर जनता–ज्या जनतेंतून वीरपुरुष पुढें येतात ती जनता–हालून जाते.

सेनापति बापटांसंबंधीं कधीं कधीं असें म्हणण्यांत येतें कीं, ज्याच्याजवळ आज सेना नाहीं अशा माणसाला तुम्ही सेनापति कसा म्हणतां? एका दृष्टीनें गोष्ट खरी आहे. स्वतंत्र राष्ट्राच्या सेनेचें आधिपत्य स्वीकारणारांचें पद कायम नोकरीमुळें कित्येक वर्षें अखंड राहतें. तशी गोष्ट स्वातंत्र्याचा लढा लढणाऱ्या सेनापतीची नाहीं. तो कांहीं कोणाचा नोकर नसतो. गुलाम राष्ट्राजवळ खडें सैन्य कसें असणार? अशा स्थितींत स्वातंत्र्ययुद्धांत सेनापतीचें पद पुष्कळ वेळां मधूनमधून नाममात्र राहतें. अशा सेनापतीजवळ किती सैन्य आहे याचा विचार करावयाचा नसतो. तर सेनापतीच्या अंगीं जे गूण असावयास पाहिजेत ते त्याच्या अंगांत आहेत किंवा नाहींत याचें परीक्षण करून मग त्याचें पद सार्थ आहे कीं नाहीं तें ठरवावें लागतें.

सेनापतीच्या अंगीं धैर्य आणि शौर्य हे गूण प्रामुख्यानें हवेत. ते बापटांच्या अंगीं पूर्णपणें वसत आहेत हें आपण आतांपर्यंत पाहिलें. इतकेंच नव्हे तर ते पुढेंहि आपणास दिसणार आहेत; सेनापतीच्या अंगीं आपल्या सेनेला उत्साहभरित करण्याची शक्ति हवी. याशिवाय सैन्यभरती करण्याकरितां जनतेंत जागृति करण्याची कला त्याला अवगत हवी. या प्रकरणांत आपण बापटांच्या संदेशांचें परीक्षण करूं आणि शेवटचे दोन गूण त्यांच्या अंगीं किती आहेत तें पाहूं.

आपलें राष्ट्र गुलामगिरींत फार काळ असल्यामुळें स्वतंत्र राष्ट्रांतील सेनापति अगर प्रमुख राजपुरुष आपल्या जनतेंत उत्साह कसा उत्पन्न करतात त्याची गोडी आज आपण समजूं शकत नाहीं. राणी एलिझाबेथ किंवा नेपोलिअन बोनापार्ट यांचे संदेश राष्ट्रांत हां हां म्हणतां चैतन्य निर्माण करीत. नेपोलिअन तर आपल्या राष्ट्राला वीस वर्षें, आपल्या प्रभावी वाणीच्या जोरावर सारखा झुलवीत राहिला होता. फ्रेंच लोकांच्या नाडीवर नेपोलिअनचा हात होता. यामुळें कोणत्या शब्दानें, कोणत्या ऐतिहासिक संदर्भानें, फ्रेंच जनतेंत चैतन्य उत्पन्न करावें हें तो उत्कृष्ट रीतीनें जाणत असे. आजहि आपणाला गांधींमध्यें हेच गुण प्रतीत होतात.

१९३० सालीं दांडी मार्चच्या वेळीं गांधींच्या भाषणांत विलक्षण चैतन्य आलें होतें. १९४२ सालीं देखील देशांतलें चैतन्य त्यांनीं असेंच एकत्रित केलें आणि जे त्यांचे विरोधी होते त्यांना त्यांनीं आपल्या गोटांत ओढलें.

मुळशी सत्याग्रहाच्या मध्यावर बापट अध्यक्ष झाल्याबरोबर त्यांनीं जो नाशिक ते नागपूर दौरा काढला त्यावेळीं यांनीं काय भाषणें केलीं तीं आपणाजवळ नाहींत. पण ते जेथें जात तेथें लोकांत क्षणार्धांत चैतन्य उत्पन्न करीत असें म्हणतात. तीं भाषणें आपल्याला उपलब्ध नसलीं तरी तुरुंगांतून त्यांनीं धाडलेले संदेश आपणापुढें आहेत. ते एकामागून एक आपण पाहूं या.

### *निरोपाचा प्रसंग*

बापट १९२२ सालीं सप्टेंबरमध्यें दुसऱ्यांदां तुरुंगांत गेल्यावर पहिल्या तीन महिन्यांत बरीच मंडळी एकामागून एक येत होती. परंतु १९२२ अखेर सत्याग्रहींचा भर ओसरूं लागला. कारण मुळशी संग्रामाच्या पद्धतीबद्दल आतां दोन मतें होऊं लागलीं होतीं. कांहींचें मत असें होतें कीं हा संग्राम मावळ्यांना भरपाई मिळवून देऊन बंद करावा. कंपनी आतां भरपाई द्यावयास तयार होती पण जमीन मिळवून देण्यास तयार नव्हती. मावळ्यांचें खरें हित जमीन मिळण्यांत होतें. रोख पैसा अज्ञानानें खर्च होऊन गेला असता व शेतकरी हे मजूर बनले असते. दुसरा पक्ष म्हणे, सरकार हट्टी आहे; कंपनी बेगुमान आहे. राष्ट्राची लढण्याची शक्ति संपली तेव्हां शहाणपणानें भरपाई घेऊन मोकळें व्हावें. यावर 'जान का जमीन' हा प्रश्न उभा राहिला. जी गोष्ट रशियामध्यें स्टॅलिन व ट्रॉस्कीमध्यें झाली तीच येथें झाली. जान-जमीन पक्ष लढत राहिला व भरपाईवाला पैसे घेऊन मोकळा होत चालला. मावळे बोलूनचालून अशिक्षित. त्यांना जमीन प्रिय खरीच-पण भुलथापांना ते भुलले आणि त्यांनीं पैसा स्वीकारला. पुष्कळशा जमिनी सावकाराकडे होत्या. त्यांनीं प्रथम पैसा घेण्यास सुरुवात केली पण त्यामुळें मावळ्यांतला उत्साह कमीकमी होत चालला व १९२२ अखेर मावळे येण्याचे बंद होत चालले व हा लढा त्यांचा म्हणून बापट आणि त्यांचे मित्र लढूं लागले. यांतहि एक गोम होती. ती समजल्याशिवाय या संदेशांचें स्वारस्य व त्यांतला उद्वेग कळणार नाहीं.

### *पक्षभेदाची आंच*

गांधींनीं १९२० सालीं असहकारितेचा ठराव नागपूर कॉंग्रेसमध्यें पास करून

घेतला खरा पण देशांतल्या कौन्सिलवादी--नव्हे--कौन्सिलांत शिरून दरबारी राजकारण करण्याची आवड व कुवत ज्यांना होती अशा लोकांनीं हा ठराव कडू गोळी म्हणूनच स्वीकारला होता. गांधी तुरुंगांत गेल्यावर विधायक कार्यक्रमावर भर दिला गेला. सूर्य मावळल्यावर चांदण्या प्रकट होतात व चंद्र डौलानें मिरवूं लागतो, तसें आतां झालें. तात्त्विक-व्यावहारिक मतभेदांच्या पोटांत मत्सरहि होता. एका पक्षाचे धुरीण केळकर-भोपटकर होते तर दुसऱ्याचे काळकर्ते परांजपे होते. त्यांच्या पक्षाला बाळूकाका कानिटकर व स्वावलंबन पाठशाळेचे शिक्षक होते; हे लोक मत्सरी नसून युयुत्सु वृत्तीचे होते. यामुळें असहकारितेच्या ठरावांत कौन्सिल-प्रवेशापुरता फेर करावा असें केळकर कंपनी म्हणे तर फेर करूं नये असें परांजपे-प्रभृतींचें म्हणणें असे. या पक्षांना फेर व नाफेर पक्ष अशीं नांवें पडलीं होतीं. गया कॉंग्रेस जवळ आली होती. यामुळें या वादाला जोर चढला होता. मुळशींत पडलेली मंडळीसुद्धां या वादामुळें सत्याग्रहाकडे तितकेंसें लक्ष पुरवीत नव्हती.

बापटांना हातीं घेतलेलें कामच दिसत होतें. ह्या लढ्यांत ढिलाई झालेली पाहतांच ते अस्वस्थ झाले. रात्रंदिवस तळमळूं लागले. लोक आपली जबाबदारी सोडून भलत्याच फंदांत पडतात कसे, असें ते म्हणत.

सर्व मोठ्या माणसांचा एकच अनुभव आहे. एखादा ठराव सभेंत पास झाला कीं थोर लोकांना त्याचा ध्यास लागतो, पण सभोंवतालच्या मंडळींचें तसें नसतें. ठरावाची शाई वाळली कीं यांची आर्द्र भावनाहि वाळते व त्यांना इतर गोष्टी सुचतात. टिळकांना तर हा अनुभव फार वेळां येई. एखाद्या परिषदेंत ठरावाची भाषा ठरविण्याकरितां मंडळ नेमावें व मंडळ त्या कामाला लागलें असतां इतर विषयच निघून हातचें काम हातीं राही. मग टिळक चिडत. गांधींचा तोच अनुभव. वर्किंग कमिटींत सर्वच सभासद कांहीं क्षणाक्षणाचा हिशेब पहाणारे नसतात. समोरचें काम टाकून इतर गप्पा सुरू झाल्या कीं गांधी खूप चिडतात. बापटांनाहि या वेळीं असेंच झालें. पहिल्या निरोपांत त्यांनीं आपल्या मनांतील तळमळ व्यक्त केली आहे.

### *पहिला निरोप*

आपल्या सत्याग्रही मंडळींचें चित्त फेर--नाफेर वादांत गुंतलेलें आहे असें कानीं येतांच त्यांनीं प्रथम संस्कृत भाषेंत सत्याग्रही मंडळाला सैनिकभरती करा असा मृदु इशारा दिला आहे. त्या निरोपांत भावनेपेक्षां त्यांची तत्त्वज्ञानी वृत्ति जागृत झालेली आहे.

प्राचीन ऋषींचें अनुकरण करून मोठ्या विनम्र भावानें बापट म्हणतात,

'आपण शास्त्रचिंतन करून श्रद्धायुक्त अंतःकरणानें आपल्या सत्याग्रहरूपी कर्तव्यकर्माचें आचरण करा. कर्माकर्माविषयीं निर्णय देणाऱ्या सर्व शास्त्रांत गीता प्रमाणभूत शास्त्र आहे. आणि मुमुक्षु असा जो मी त्यानें गीताधर्माची गर्जना श्रवण करून त्याचें उत्तम तऱ्हेनें अध्ययन केलेलें आहे. सर्व भूतांच्या कल्याणाचा विचार हें गीतेचें प्रथम रहस्य असून दुसरें लोकसंग्रह हें आहे. साधूचें रक्षण, आततायी पुरुषांचा नाश आणि धर्माची संस्थापना या त्रिविध कर्माचें मुक्तीसाठीं आचरण करावें असा गीतेचा आदेश आहे.

सत्याग्रहव्रताचें परम उद्दिष्ट भगवत् प्रणीत वरील कर्मत्रय हेंच होय. परम श्रद्धेनें सत्याग्रहव्रताचें आचरण केलें असतां, कर्मापासून च्युत झालेल्या लोकांस धर्ममार्गावर आणण्यास तें समर्थ होतें.

मी फार फार विचार करून कांहीं याचना करीत आहें: हें वर्ष सुसंघटित अशा रणकृत्यांनीं भरलें जावें. सत्याग्रहाच्या तारखा जाहीर व्हाव्या व त्या तारखेस न चुकतां नांवें अगोदर प्रसिद्ध करून सत्याग्रहवीरांनीं सत्याग्रह करावा.

नवीन लोक येवोत न येवोत, प्रत्येक तारखेस जुन्यांनीं सत्याग्रह करावाच. असें केल्यानें संशयांत पडलेल्या, श्रद्धाहीन व कमकुवत मनाच्या लोकांची श्रद्धा व बुद्धि अंशतः जागृत होऊण त्यांचा उद्धार होईल अशी माझी समजूत आहे.

सत्याग्रहाच्या शाखा स्थापण्याचें कार्य फेब्रुवारींत पूर्णतेस न्यावें.

या पहिल्या निरोपांत सत्याग्रही सेनापतीचे सर्व गूण उतरले आहेत.

कार्यकर्त्यांजवळ ते विनम्र भावानें येतात व चलच्चित्त झालेल्या, हातीं धरलेल्या कामापासून दूर होऊं इच्छिणाऱ्या अनुयायांवर रागावून कसें भागेल ? पळणाऱ्या सैन्यावर गोळ्या घालून त्याला मागें परतविण्यापेक्षां हा मार्ग अचूक यशदायी आहे. विनम्र होऊन बापट येतात व सांगतात कीं मी फार दिवस चिंतन करून, उत्तम अध्ययन करून गीतारहस्य समजावून घेतलें आहे. आपल्या सत्याग्रहाचें व गीताधर्माचें उद्दिष्ट एकच होय, असें म्हणून त्यांनीं लोकांची श्रद्धा दृढ केली आहे; व पुन्हा म्हटलें आहे कीं धर्मभ्रष्ट लोकांस धर्ममार्गावर आणण्यास हाच मार्ग आहे. सत्याग्रहावर श्रद्धा ठेवा एवढेंच सांगून न राहतां सद्यःस्थितींत कोणी केव्हां सत्याग्रह करावा हें सांगून सत्याग्रहींची मालिका अखंड राहण्याकरितां सत्याग्रहाच्या शाखा सर्वत्र पसरण्याची आज्ञा दिली आहे.

## परिणाम

या निरोपाचा कार्यकर्त्यांवर परिणाम झाला. ज्यांना गया कॅाँग्रेसमध्यें फेर पक्षाचा पराभव करण्याशिवाय कांहीं दिसत नव्हतें, त्यांचे डोळे उघडले व सत्याग्रही येऊं लागले. लागोपाठ तीन आठवडे सत्याग्रही टोळ्या गेल्या. स्वावलंबन शाळेनें सर्वात मोठी संख्या दिली. जवळजवळ सत्याग्रहांत स्वावलंबन शाळेनें होमच केला, म्हणा ना!

हें कार्य कांहीं एकदम झालें नाहीं. बापटांच्या संदेशाचा खल झालाच. स्वावलंबन शाळेंतील किती मुलें द्यावीं यावर चर्चा झाली. संस्थारक्षणाचाहि विचार झाला. नंतर कांहींहि असलें तरी सेनापतींची आज्ञा पालन करणें हेंच आपलें कर्तव्य असें सर्वांस वाटलें. या ठिकाणीं तरुण, होतकरू पुढाऱ्यांनीं या प्रसंगापासून धडा घेण्यासारखा आहे. आपण केवढेहि पुढारी झालों व केवढ्याहि अधिकारावर असलों तरी आपला शब्द वेदवाक्य म्हणून एकदम मानला जात नाहीं. जो तो आपल्या बुद्धीप्रमाणें चर्चा करून नंतर सेनापतीचा शब्द मानतो. त्यांच्यावर आदेश लादून कांहीं होत नाहीं. आपल्या सामान्य संवयीच्या अगर विचारांच्यापेक्षां जरा निराळा विचार कोठूनहि आला तरी त्याला प्रथम विरोध होतोच. या विरोधानें मनुष्यानें चिडून जाऊं नये. आपल्या शब्दाच्या उपयुक्ततेवर व अनुयायांच्या प्रेमावर विश्वास ठेवून 'यथेच्छसि तथा कुरु' म्हणावें. गांधी जेव्हां जेव्हां नवीन विचार अगर योजना वर्किंग कमिटीपुढें ठेवतात त्यावेळीं तेथें त्यांना जितका विरोध होतो तितका कोठेंहि होत नाहीं. कॅाँग्रेसमध्यें मवाळांचें क्रीड मान्य करून शिरण्याच्या टिळकांच्या संकल्पाला मुंजे वगैरे लोकांनीं काय कमी विरोध केला? आपला निरोप सांगून अनुयायांना विचार करण्यास सोडून द्यावें. कांहीं विचारसरणीची उपयुक्तता व कांहीं ती सांगणारावरची श्रद्धा यामुळें आपला शब्द मानला जातो. ही श्रद्धा अनुयायांची सेवा करूनच मिळवितां येते. असो.

## निरोप दुसरा

पहिला निरोप संस्कृतांत आहे. तो गीताधर्माचा अभ्यास करणाऱ्या सत्याग्रहमंडळाच्या संचालकांस होता. त्याचें फळ दिसूं लागतांच बापटांना आनंद झाला. स्वावलंबन पाठशाळेनें होम करतांच बापटांच्या आशा पल्लवित झाल्या. इतरहि शाळेंतील मुलें येण्याचा त्यांस संभव वाटूं लागला. ते आतां

मुलांजवळ बोलूं लागत आहेत. बरोबरच्या शास्त्रीमंडळींत कर्माकर्मशास्त्राची शास्त्रीय संस्कृत भाषा सोडून, जसा एखादा शास्त्री घरांतल्या मुलांजवळ साध्या प्राकृत भाषेंत बोलूं लागतो तसे आतां बापट बोलूं लागत आहेतः

साहित्यसंमेलनांत आधुनिक काव्यावर इतकी चर्चा होते पण बापटांच्या या निरोपाचें रसग्रहण तेथें होत नाहीं. बरोबरच आहे. पृथ्वीच्या अंतरंगांत खळबळ उडून रसातळांतला लाव्हा ज्वालामुखींतून बाहेर पडतो. तो जमिनीच्या सुपीकपणाला कितीहि कारणीभूत होणारा असला तरी तो तप्त असतां त्याचें कौतुक करावयाला कोण पुढें येणार ? ज्या गोविंदकवीच्या काव्याची आज स्तुति होत आहे तीं काव्यें जेव्हां प्रथम बाहेर पडलीं तेव्हां हे साहित्यिक त्यांच्याजवळ उभे सुद्धां राहात नव्हते. तेजस्वी पद्यें इतिहासजमा झाल्यावर त्यांचें रसग्रहण होतें. हें सर्व नियतीला धरूनच आहे यांत संशय नाहीं.

आतां आपण विद्यार्थ्यांना धाडलेल्या निरोपाचा विचार करूं. प्रथम, हीं पद्यें संस्कृतांत नाहींत—मराठींत आहेत. त्यांचा छंद अनुष्टुभ् छंद नाहीं. अनुष्टुभ् छंद वाचावयास ठीक आहे. बापटांना आतां विद्यार्थ्यांत जागृति करावयाची होती. शाळेंत जाऊन हें काम होण्याजोगें नव्हतें. रस्त्यांत ओरडून हा संदेश सांगावा लागणार होता. या कार्याला योग्य असेंच वृत्त आतां बापट योजीत आहेत. याच वृत्तीनें समर्थांनीं महाराष्ट्र खडबडून जागा केला होता.

**भवाचे भयें काय भीतोस लंडी।**
**धरी रे मना धैर्य, धाकासि सांडी॥**

हा जागृतिसंदेश ज्या वृत्तांत महाराष्ट्रानें ऐकला त्याच वृत्ताचा बापटांनीं आतां उपयोग केला आहे.

पहांटेची वेळ आहे, वातावरण शांत आहे, हवा उत्साहवर्धक आहे. अशा या काळांत पहांटेला खड्या आवाजांत कोणी पुढील ओळी जर म्हटल्या तर आपल्या मनावर काय परिणाम करतील तें पहा.

**'चला, या, चला, श्रीहरी हांक देई।**
**चला, मूळशी-क्षेत्र युद्धांत भाई॥**

हे शब्द कानीं पडतांच आपल्या मनांत येतें कीं हे श्लोक म्हणणारा आपल्याला बोलावीत नसून भगवान् श्रीहरि आपल्याला बोलावीत आहे. हरि आपणाला बोलावीत आहे, पण कोठें व कशाकरितां ? कुंजवनांतल्या रासक्रीडेकरितां ? नव्हे

—नव्हे—मुळशीच्या क्षेत्रांत. कशाकरितां ? तर युद्धाकरितां. श्रीकृष्ण युद्धाकरितां बोलावणें केव्हां करतो ? जेव्हां सज्जनांचा छळ होतो तेव्हां ना ? आज कोणावर तरी जुलूम होतो आहे. श्रीकृष्ण आपणाला बोलावीत आहे. तेव्हां मी बिछान्यांत राहूं का एकदम बाहेर पडूं, असा विचार मनांत येतो न येतो तोंच

'चला श्रीहरी हा कसोटी पहात'

हे शब्द कानीं येतात. त्यामुळें पहिला निश्चय अधिकच दृढ होऊं लागतो.

कांहीं वेळ जावा तों पुढचा श्लोक कानीं पडतो—

'चला व्हा चला मूळशी कर्मयोगी।
चला व्हा चला बन्धनानन्दभोगी ॥'

मला या युद्धांत पडून काय फायदा आहे असा विचार मनांत येतो न येतो तोंच कर्मयोगी व्हा म्हणून खडा आवाज कानीं पडतो. कर्मयोग म्हणतांच कर्मयोगा-बरोबर अनासक्ति आलीच. निष्काम कर्म डोळ्यापुढें उभें राहतें इतक्यांत 'बंधनांत आनंद मानणारे चला' म्हणून शब्द कानीं पडतात. प्रसंग बिकट आहे, अशा वेळीं बंधनांत देखील आनंद मानला पाहिजे असें श्रीहरि आज सांगत आहे. श्रीहरीची मागणी कांहीं फार नाहीं, फक्त तीन हजारच आहे असें पुढील चरण सांगतो आणि लगेच पुढचा चरण बजावतो कीं

'नसे मागणी ही मराठ्यास फार।'

हा चरण कानीं पडतांच महाराष्ट्राचा इतिहास डोळ्यासमोर उभा राहतो, वीरश्री अंगांत संचरूं लागते, बाहू स्फुरण पावतात. तो तानाजी, तो दत्ताजी शिंदे, भाऊसाहेब पेशवे, वीरश्रीची जिवंत दीप्ति असें ज्याला म्हणतां येईल असा जनकोजी, बापू गोखले आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. आपल्याच मनांतले भाव आपणाला पुढील चरणांत व्यक्त केलेले आढळून येतात. इतक्यांत—

'उठा हो उठा सोडुनी मोह पाश।
पहा शत्रुंनीं मांडिलासे विनाश ॥'

हे शब्द ऐकतांच कोणता तरुण मराठा बिछान्यांत पडून राहील ? मनुष्य वरील श्लोक ऐकून कहीं तरी करण्याचा निश्चय करतो तोंच—

पुढें रक्त माझं रणीं या पडेल।'

हे शब्द कानावर आले कीं आपल्या डोळ्यासमोरचा श्रीहरि क्षणभर दूर होतो व बापट डोळ्यापुढें उभे राहतात. बापटांचें रक्त आम्ही जर सत्याग्रहांत गेलों नाहीं तर रणांत पडणार काय? आम्ही तें कसें सांडूं देऊं? आम्ही इतके तरुण जिवंत असतां व मागणी सारी तीन हजारांची असतां बापटांना रक्त सांडण्याचा प्रसंग येणार? शक्य नाहीं—असा तीव्र विचार मनांत येऊन सत्याग्रहांत उडी घेण्याचा तरुण निश्चय करतो तोंच आईबाप काय म्हणतील, गुरुजन परवानगी देतील काय? अशी शंका मनांत येऊं नये म्हणून बापट शेवटीं तरुणास असें बजावतात कीं, सत्य मार्गाचा अवलंब करीत असतांना, श्रीहरीच्या हांकेला ओ देण्याची वेळ आली असतांना, गुरुजनांच्या आज्ञेची वाट पहात बसूं नका. तुम्ही लहानपणापासून ध्रुवाची कथा ऐकली आहे ना? तिचें रहस्य आठवा आणि—

'चला आज या साम सत्याग्रहांत।
चला या चला आज कारागृहांत॥'

असें शेवटीं सांगून बापटांनीं संदेश पुरा केला आहे.

'चला या चला' या शब्दांची पुनरुक्ति अनेकदां करून बापटांनीं या संदेशाला तेज आणलें आहे. श्रीहरि हांक मारतो आहे असें म्हणून या कार्याला पावित्र्य आणलें आहे. शत्रूंनीं विनाश मांडला आहे असें म्हणून निद्रिस्त मनुष्यांच्या तोंडावर पाणी शिंपडलें आहे आणि 'तुम्ही ते मराठे—तुम्ही ते मराठे—' म्हणून वीरश्री जागृत केली आहे. या रणांत पुढें माझें रक्त पडणार असें सांगून युद्धाची भीषणता दाखवून लोकांच्या डोळ्यांत अंजन घातलें आहे. व शेवटीं ध्रुवाचें उदाहरण सांगून विद्यार्थ्यांना निःशंक कर्मयोगी बनविलें आहे. आणि हें सर्व साऱ्या सातआठ श्लोकांत. एखादा कुशल चित्रकार रंगाच्या थोडया हातानें कल्पनेंतील चित्र काढून व्यक्ततेला आणतो, त्याप्रमाणें अगदीं थोडया शब्दांत तरुण विद्यार्थ्यांत जागृति आणून त्यांना कार्यप्रवृत्त केलें आहे. हा संदेश ऐकून पुष्कळ विद्यार्थ्यांचीं हृदयें हललीं आणि बन्धनानन्द भोगण्याकरितां ते साम सत्याग्रहांत आले. यालाच म्हणतात प्रभावी वाणी.

बापटांच्या या संदेशानें महाराष्ट्र जागृत झाला, तो थोडासा हलला पण पुन्हा त्याच्या डोळ्यावर झापड आलीच. सर्पाच्या विषाची बाधा ज्यास झाली आहे

त्याच्या तोंडावर पाण्याचे हपके मारले किंवा कानाशीं ठणठणाट केला तर तो डोळे किलकिले करतो पण लगेच पुन्हा डोळे मिटून लुटकतो. त्याला या वेळीं झोंपच अत्यंत प्रिय असते. ही झोंप विश्रांति देऊन नवीन उत्साहास कारण होणारी नसून ती जीव घेणारी काळझोंप आहे, याची कल्पनाहि त्या विषबाधा झालेल्या मनुष्यास नसते. तसेंच या वेळीं महाराष्ट्राचें झालें होतें. फेरनाफेर वाद लढण्याचा कैफ महाराष्ट्रीयांवर कल्पनातीत चढला होता. यामुळें बापटांच्या संदेशाकडे जितक्या आत्मीयतेनें महाराष्ट्राग्रणींनीं पहावयास पाहिजे होतें तितकें न पाहिल्यामुळें बापटांना पुन्हा—

### *तिसरा निरोप*

पाठवावा लागला. त्या निरोपांत बापटांनीं महाराष्ट्रांतील लोकधुरीणांना विनंती केली कीं तुम्ही मंडळी श्री शिवाजीचा उत्सव, भजनपूजन करणारे आहांत. तेव्हां त्या शिवबाच्या मावळ्यांवर प्रसंग आला असतां कोणी हा लढा सुरू केला, याबद्दल चर्चा करीत न बसतां तुम्ही या रणांत उतरून हें युद्ध यशस्वी करा असें सांगून बापटांनीं शेवटीं म्हटलें आहे—

> "थोरापुढें लहानाचें बरें न बहु भाषण ।
> म्हणूनि थांबतों येथें पदीं मस्तक ठेवुन ॥ "

खरें पाहिलें असतां बापटांपेक्षां बुद्धीनें, त्याग–धैर्य इत्यादि गुणांनीं श्रेष्ठ असा दुसरा कोणी पुरुष महाराष्ट्रांत नव्हता. तरी देखील ज्यांच्या हातीं अनेक संस्था आहेत, जनमत तयार करण्याचें साधन जें वर्तनमानपत्र जें ज्यांच्या हातीं आहे, अशा लोकांस बापटांनीं विनयपूर्वक वरील प्रार्थना केली आहे. ज्यानें एकदां थोर कार्याचा भार शिरावर घेतला, त्याला असेंच पदोपदीं नम्र व्हावें लागतें. मुलीच्या बापाची लग्नांत जी स्थिति तीच रणांगणांत सेनापतीची अगर पुढाऱ्याची होते. पदोपदीं रुसणींफुगणीं चालतात व पदोपदीं मानापमानाचे प्रसंग येतात. नाहीं त्याचे पाय धरावे लागतात, राग आवरावा लागतो आणि पुन्हा वरतीं प्रसन्न वदन ठेवावें लागतें. कां ? तर विजयश्री आपल्या इच्छेप्रमाणें सज्जनांच्या घरीं नांदावी म्हणून. या निरोपाचा छंद पुन्हा बदलला आहे. या ठिकाणीं भुजंगप्रयाताचा रस्त्यांतून खड्या आवाजास योग्य असा छंद वापरला नाहीं. थोरांजवळ मागणें आहे, प्रार्थना आहे, पायां पडणें आहे, अशा प्रसंगाला उचित असा मोरोपंतांनीं केकावलींत वापरलेला पृथ्वीछंद बापटांचे तोंडांतून

या वेळीं निघाला. भावनेप्रमाणें छंद कसा बदलतो हें या निरोपांत सहज ध्यानांत येतें. शिवाय ही पुढारी मंडळीं भावनेच्या शब्दाला दाद देणारी नव्हती. व्यवहारांत पडून ज्यांचीं हृदयें घट्ट झालेलीं आहेत अशा लोकांचीं मनें वळवायचीं तर तीं विनंतीनें, नम्र भावानेंच वळूं शकतील. मुळशी सत्याग्रहांत 'भरपाई' घेतली नाहीं म्हणून कांहीं लोक क्रुद्ध झाले होते. अशा क्रुद्ध लोकांना जिंकण्याचा मार्ग सुभाषितकारांनीं सांगितला आहे तो असा—

'क्रुद्धं अंजलिकर्मणा—'

म्हणजे रागावलेल्याला हात जोडून वश करावा. बापटांचें मुत्सद्दीपण या निरोपांत व्यक्त झालेलें आपणास आढळून येतें.

थोर पुढाऱ्यांच्या पायां पडण्याचें शास्त्र केल्यावर बापट पुन्हा सर्वसामान्य लोकांना हांक मारण्याकरितां निघाले आहेत.

*निरोप चौथा*

या निरोपांत आपणाला असें दिसून येतें कीं, प्रत्येक निरोपांत पुढें पुढें बापटांच्या भावना तीव्र तीव्र होत गेलेल्या आहेत. मुळशीचा लढा हा अखिल भारतीय स्वातंत्र्यलढ्याचें मूळ होय अशी त्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली होती. हा लढा एकदां आपण जिंकला, स्वातंत्र्ययुद्धाला लागणारें धैर्य, त्याग, शौर्यादि गुणांची एकदां परीक्षा झाली—म्हणजे स्वातंत्र्ययुद्धाचें यश फार दूर नाहीं. एखादा शास्त्रज्ञ वैज्ञानिक आपल्या प्रयोगशाळेंत प्रयोग करीत असतो. त्या लहानशा जागेंत लहान प्रमाणावर प्रयोग एकदां सिद्ध झाला म्हणजे तो त्या प्रयोगाची व्यापकता आपल्या प्रतिभेनें पाहूं शकतो. ज्या दिवशीं एडिसनच्या प्रयोगशाळेंत लहानसा विजेचा दिवा लागला, त्याच दिवशीं त्याच्या प्रतिभेनें सबंध न्यूयॉर्क शहर लाखों दिव्यांच्या झगझगीत उजेडानें प्रकाशित झालेलें पाहिलें. बापट हे मुळशीच्या यशांत स्वातंत्र्ययुद्धाचें यश पहात होते म्हणून त्यांची एवढी तळमळ चालली होती. पण महाराष्ट्रीय पुढारी तिकडे कुठें लक्ष देत होते? त्यांना आपलीं भांडणें भांडावयाचीं होतीं. पुढाऱ्यांसंबंधानें निराश झाल्यावर बापट अखिल महाराष्ट्र जनतेकडे वळले आणि त्यांनीं हा चौथा निरोप महाराष्ट्रीयांस धाडला. ते म्हणतात—

'हरी हा उभा मूळशी क्षेत्रिं आज।
करायास कांहीं नवें धर्म-काज ॥'

हे महाराष्ट्रीयांनो, तुम्हांला माहीत आहे का? आज मुळशी क्षेत्रांत प्रत्यक्ष हरि येऊन उभा राहिलेला आहे. त्याला कांहीं अपूर्व कामगिरी आज करावयाची आहे. नवीन संकल्पानें तो आज नटला आहे. त्याची मुद्रा सौम्य नाहीं. त्याचें स्वरूप आज थोडें उग्र झालें आहे. कारण—

'अधर्मी जनीं मांडिलें घोर कर्म ।
हरीला नको जाहला हा अधर्म ॥'

हल्लीं जगांत जी अनीति चालू आहे ती हरीला पसंत नाहीं. तो हरि तुम्हाला अधर्मनाशार्थ बोलावीत आहे. तरी चला, आम्ही क्षुद्र माणसें आहों अशी कल्पना करून घेऊं नका. कारण—

"नरा वानरा ठेवुनी चाकरीला ।
बली दुर्जनाचा परामर्ष घ्यावा ॥"

अशा तऱ्हेचें वेड हरीला फार प्राचीन काळापासून लागलेलें आहे. तुम्ही स्वतःची चाकरी करतां, गृहाची चाकरी करतां, ठीक आहे; त्यांत कांहीं बिघडलें नाहीं. पण त्याबरोबरच—

'करा चाकरी कांहिं माझ्या हरीची ।'

कारण त्यामुळेंच तुम्हांला खरें शांतिसुख मिळणार आहे. म्हणूनच मी तुमची एवढी याचना करीत आहें. पुन्हा सांगतों, हरीनें एका नवीन महाकार्यास आरंभ केला आहे. तरी त्याच्या सैन्यांत दाखल व्हा. इतकें सांगितल्यावरहि जर तुम्हांला घरांत राहायचें असेल तर राहा बापडे ! असें म्हणून थोड्याशा उद्वेगानें बापटांनीं हा चौथा निरोप संपविला आहे. या त्यांच्या हांकेला ओ देऊन लोक आले, पण अगदीं थोडे. कारण युद्धाचें वातावरणच या वेळीं देशांत नव्हतें. भरती संपून ओहोटी लागल्यावर समुद्राचें पाणी आंत आंत जातें. किनारा उघडा पडतो. पाण्यावर चालणाऱ्या नावा वाळूंत रुतून बसतात. वारा पडलेला असतो व समुद्रांतल्या घाणीचा दर्प पसरून किनाऱ्याची प्रसन्नता पार मावळून जाते. तशी आज राष्ट्राची परिस्थिति झाली होती. त्यागाचें, उच्च भावनेचें वारें बंद झालें होतें; व एकमेकांचीं उणीं काढण्यांतच राष्ट्राचे नेते गुंतले होते. अशा वेळीं बापटांचे एकामागून एक कळवळून पाठविलेले निरोप अरण्यरुदनच ठरले. ज्या वेळीं काल प्रतिकूल होतो, सज्जनाचे उच्च विचार कोणी ऐकत

नाहींसें होतें, त्याच वेळीं प्रतिभाशाली पुरुषाच्या हृदयांत प्रचंड खळबळ माजते. प्रत्येक अपयशानें त्याचें हृदय खचत नाहीं व मग त्याच्या तोंडांतून विचाररत्नें एकामागून एक अशीं बाहेर पडतात कीं, तीं पाहून लोक चकितच व्हावेत. अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळीं चॅथम व बर्क यांनीं जीं भाषणें केलीं तीं विचाररत्नांनीं भरलेलीं आहेत इतकेंच नव्हे तर वक्तृत्वाचा अपूर्व नमुना म्हणून तीं आज इतकीं वर्षें टिकलीं आहेत. बापटांच्या या पुढच्या संदेशांत विचार व भावना यांचें सुंदर मिश्रण झालें आहे.

### *निरोप पांचवा*

सुरुवातच पहा या निरोपाची—'कृतज्ञतेची ध्वजा उभारा' असें बापट सुरुवातीसच पुण्याच्या लोकांना सांगत आहेत. शिवाजीमहाराजांनीं तुमची लाज एका काळीं राखली ना? त्या शिवाजीचे प्रिय सवंगडी जे मावळे, त्यांच्यावर जबरी होते आहे, इकडे लक्ष द्या. तुमची ऐतिहासिक परंपरा वीरांची आहे. लढतांलढतां मरूं पण हटणार नाहीं असें तुम्हां मराठ्यांचें ब्रीद जगांत गाजलें आहे ना? अन्यायाच्या विरुद्ध बंड करणारे म्हणून तुम्ही प्रसिद्ध असतांना—

'थंड आजला कसे उठा घ्या शत्रूची हजिरी।'

आज तुम्ही थंड कसे बसलां याचें नवल वाटतें. तुम्हांला अन्याची चीड येत नाहीं काय? बरोबर आहे. तुम्ही अहंकारानें—'मी थोर, तुम्ही लहान' या भावनेनें—भरून गेलेले आहांत, म्हणून तुमच्यांतली वीरश्री आज थंड झालेली आहे. रावणावर हल्ला करतांना वानरांच्या अंगांत जो आवेश होता तो आज नाहींसा होऊन त्यांच्या आज मर्कटचेष्टा सुरू झाल्या आहेत. बापहो, या मत्सरानें आपलें स्वातंत्र्याचें घर जाळलें आहे. शिवाजीची आठवण करा. त्यानें आपलीं खासगी वैरें विसरून मराठे एकत्र करून जुलमी लोकांवर तो घसरला नाहीं का? आठवा तो इतिहास. तुम्हांला किती ओरडून सांगूं? अहो, त्या शिवाजीच्या मावळ्यांवर आज जबरी होते आहे बरं!

### *निरोप सहावा*

पुण्याच्या मंडळींना पांचवा निरोप धाडला तोंच तुरुंगामध्यें पुष्कळ मंडळी जोन्सच्या जुलमाला कंटाळून जरा बेशिस्त वर्तन करीत होती. कांहीं लोक आपण कशाकरितां आलों हें विसरून सत्याग्रही वृत्तीला कमीपणा आणीत होते. त्यांना

आंवरणें कठीण असलें तरी आवश्यक होतें. म्हणून त्यांनीं हें शांतिसप्तक तयार केलें. त्यांत ते म्हणतात, आम्ही शिवाजीचे मराठे आहोंत. या आर्यभूचे पांग फेडण्याचें सामर्थ्य भीमाप्रमाणें आमच्या बाहूंत आहे. आम्ही जें साम सत्याग्रहाचें व्रत घेतलें तें विचारपूर्वकच घेतलें आहे. म्हणून—

'अम्ही पांडवांसारखी शिस्त पाळूं
मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं॥ '

मे. जॉन्स हा सत्याग्रहींना फटके मारतो व आम्ही ते निमूटपणें पाहतों. कां? आम्ही दुर्बल आहों म्हणून? नव्हे— नव्हे—, अखिल महाराष्ट्रीयांच्या सभेनें आम्हांला शांतियुद्धाची आज्ञा दिलेली आहे. या शांतियुद्धाला मर्यादा आहे. तीन वर्षें संपल्यावरहि जर मावळ्यांचा वैरी येथून हालला नाहीं तर मग तो आहे व आपण आहोंत. तुम्ही घाई करूं नका. तो प्रसंग येणार आहे व मग तुम्हांला शुद्ध सत्याग्रहाचें युद्ध खेळण्याची परवानगी मिळेल. तोंपर्यंत सर्व राग गिळून शांत रहा. पांडवांचें स्मरण ठेवा.

ऐतिहासिक संदर्भ एकदम आपल्याला त्या काळांत घेऊन जातात; व नव्या परिस्थितीचें चित्र डोळ्यापुढें उभें करतात. पांडवांची शांति म्हटल्याबरोबर तेरा वर्षांच्या अंतीं झालेलें भारतीय युद्ध डोळ्यासमोर उभें राहतें. अधर्माची बाजू घेऊन जो जो आला, त्याला त्याला—इच्छामरणी भीष्मांना, अस्त्रवेत्त्या द्रोणांना, वराच्या सामर्थ्यानें अजिंक्य बनलेल्या जयद्रथाला किंवा वासवी शक्तीनें बलाढ्य झालेल्या कर्णाला व शेवटीं सुईच्या अग्रावरची माती न देणाऱ्या दुर्योधनाला, वीरशयनच मिळालें—ते प्रसंग डोळ्यासमोर उभे राहून सत्याचा जय होतो असा विश्वास लोकांत बापटांनीं उत्पन्न करून शांति व शिस्त राखण्यास बजावलें आहे.

आपण एकामागून एक तेजस्वी निरोप पाठवीत आहोंत. पण नवीन सैन्यभरती होत नाहीं हें पाहून शेवटीं बापटांनीं निराश होऊन नवीन सत्याग्रहींच्या ऐवजीं जुन्या सत्याग्रहींना पुन्हा पाचारण सहाव्या निरोपांत केलें आहे. नवीन अन्न मिळेनासें होऊन उपास पडूं लागले म्हणजे जठराग्नि ज्याप्रमाणें आपल्या शरिरांतील मांस व वसा भक्षण करून प्राण जगवतो त्याप्रमाणें युद्धाचा अग्नि कायम ठेवण्याकरितां निर्वाणीचें अस्त्र म्हणून राखीव सैन्य बाहेर काढतांना सेनापतीला किती तरी यातना होत असतात. तें दुःख सातव्या निरोपांत ओतप्रोत भरलेलें आढळून येतें.

*सातवा निरोप*

संसारांतले अनेकविध मोहपाश तोडून तुम्ही आनंदानें मुळशीच्या धर्मकार्यांत येऊन तुरुंगांतील हालअपेष्टा सहन केल्यात. आपल्या बांधवांसंबंधींचें कर्तव्य करून तुम्ही आज बंधमुक्त झालां आहां तरी मी एक मागणें तुम्हांजवळ मागतों तें हें कीं, तुम्ही पुन्हा एकदां कारागृहांत या. मी भलत्याजवळ याचना करीत नाहीं. कारण तुम्ही मुळशीच्या युद्धांत किती रंगणारे होतां हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे.

ही याचना मी कां करतों? तर आज मला स्पष्ट दिसतें आहे कीं मोठमोठ्या लोकांनीं हा मुळशीचा प्रश्न एका बाजूला सारला आहे. तो तसा सारून कसें बरें भागेल? शत्रु जिवंत आहे—त्याचें घोर कर्म चालू आहे. हें सहन करणें महाराष्ट्रीयांना शोभत नाहीं. तुम्ही पुन्हा एकदां येऊन महाराष्ट्रीय तेजस्विता मेली नाहीं हें सिद्ध करा. तुम्ही जर आलां नाहीं तर मला उघड दिसतें आहे कीं हा लढा थांबेल—आणि महाराष्ट्र मेला असें होईल. नाहीं—नाहीं, महाराष्ट्र मरून भागणार नाहीं. आपल्याला पुढें केवढा तरी लढा द्यायचा आहे. त्याकरितां मराठे हे पाहिजेतच. हालअपेष्टा सहन करणें, वाटेल त्या त्यागास अखंड टिकणें हें मराठ्याविना कोण बरें करूं शकेल? कारण युद्ध हें मराठ्यांच्या रोमरंध्रांत खेळत आहे. मराठा हा

'खरा वीर वैरी पराधीनतेचा'

आहे. सतराव्या शतकांत जुलुमी मोंगल साम्राज्याला अखिल हिंदुस्थानांत जर कोणी कडवेपणानें सतत प्रतिकार केला असेल तर मराठ्यानेंच ना? मराठ्याची ही शक्ति पाहून मी म्हणतों–उगाच प्रांतीय अभिमानानें मी म्हणत नाहीं—कीं,

'महाराष्ट्र आधार या भारताचा।'

तरी हे वीरांनो, पुन्हा एकदां या आणि मुळशीचा लढा चालू आहे असें कृतीच्या गर्जनेनें सांगून महाराष्ट्राची झोंप घालवा—

बापटांची ही विनंती फुकट गेली नाहीं. पुष्कळ कोंवळीं कोंवळीं मुलें व पोक्त लोक बापटांचा—आपल्या सेनापतीचा—शब्द पाळून पुन्हा कारागृहांत आले. ते कसे आले? तर आज बाहेर पडले आणि पुढल्या आठवड्यांत परत आले—आणि तेहि हसत. हा असा तरुणांनीं केलेला त्याग पाहून बापट म्हणतात,

'विश्वसलें मन जिवंत आहे थोर महाराष्ट्र।
महाराष्ट्र निजतेजें उठविल अखिल हिंदराष्ट्र ॥'

बापटांच्या विनंतीवरून कांहीं लोक आले खरे; पण युद्ध चालविण्यास लागणारा प्रचंड भडाग्नि अशा चारसहा लांकडांनीं कसा टिकणार? म्हणून पुन्हा एकदां शेवटची प्रार्थना बापटांनीं केली आहे.

*निरोप आठवा*

या निरोपांत कृतज्ञतेची ध्वजा उभारण्यास पुन्हा एकदां विनंती करण्यांत आली आहे; आणि कौन्सिलप्रवेशावरून भांडणाऱ्या लोकांची जळजळीत शब्दात हजेरी घेतली आहे.

कौन्सिलांत शिरावें म्हणणाऱ्या पक्षाचा पराभव गया कॉंग्रेसमध्यें करून असहकारितेचें युद्ध चालू ठेवावें असें म्हणणारे तुम्ही नाफेरवालेहि कौन्सिलवाल्यांप्रमाणें स्वस्थ कसे? युद्धाचा ठराव करणें हीच का कृतार्थता? या गर्वाच्या आगीनें तुम्ही कृतज्ञतेचा पवित्र झरा आटून टाकला आहे.

बाबांनो, आपल्या महाराष्ट्रीयांचें ध्येय स्वातंत्र्य आहे ना? आणि तें स्वातंत्र्य समशेरीनेंच मिळणार हें तुम्हांला ठाऊक आहे ना? मग फेर–नाफेर वाद कसला करतां? ज्यांना कौन्सिलांत जायचें आहे त्यांना जाऊं द्या. लोक भिन्न रुचीचे असतात तरी—

'फेरवाद हा पुरे राहुं द्या ही हमरीतुमरी।
चला मूळशी–क्षेत्रिं उडी घ्या सत्याग्रहसमरीं॥

हे महाराष्ट्रीयांनो, मद आणि मत्सराचे दास होऊं नका. गीताधर्म हें तुमचें वंशपरंपरेचें पितृधन आहे, त्याचा आश्रय करा. श्रीकृष्ण, पार्थ, जनक, शिवाजी यांचें स्मरण करा कीं तुमची विकारवशता नाहींशी होऊन तुम्ही कर्तव्यतत्पर व्हाल.

तुम्हांला पुन्हा एकदां आठवण देतों. नुकतेच आपण मुळशी परिषदेंत जमलों होतों, नाहीं का? तेथें सर्व पक्ष आले होते. फेर-नाफेरवाले सर्वांनीं मुळशी संग्रामावर एकमत केलें नाहीं का? आपण काय ठराव केला? काय प्रतिज्ञा केली? जरा स्मरण करा. अहो, किमानपक्षीं तीन हजार सैनिक द्यावयाचा तुम्ही ठराव केला नाहीं का? कॉंग्रेसमध्यें सुद्धां स्वयंसेवकांचा आंकडा पन्नास हजारांवर

जमविण्याचा तुम्हीच ना निर्धार केला होता? त्यांतहि सात हजार महाराष्ट्रीयांचा वांटा येतो ना? असें असून तुम्ही अजून तो शब्द पुरा करीत नाहीं. काय सांगू तुम्हांला?

**'बरा न इतुका काल यावया तीन हजाराला।'**

शब्द किती साधे आहेत—पण हृदय कापणारे आहेत, नाहीं का?

पुन्हा बापट म्हणतात, चला, आपला शब्द राखा. तुम्ही मराठे वीर आहां ना? आणि वीर तर आपला शब्द खरा केल्याशिवाय राहात नाहीं. दिलेलें वचन पुरें करण्याची आठवण देऊन सावित्रीनें यमाच्या दाढेंतून सत्यवानाला बाहेर काढला! पण हा अमोघ बाणहि आज निष्फळ होत होता. हें पाहून शेवटीं निराश होत्साते बापट म्हणतात,

**'आंवरतों हें चन्हाट माझें मी हरिचा भाट।**
**माझ्या नीरस भाटपणाचा आहे बोभाट॥'**

बापहो, तुमचा काय दोष? माझ्याच वाणींत जागृति करण्याचें सामर्थ्य नाहीं, हें मी ओळखतों. पण काय करूं?

**'हरि हा हटकुन झटतो कधीं कधीं अंगा।'**

मनुष्य एखाद्या कार्यांत दंग झाला, त्याची एकतानता झाली, अशा वेळीं त्याला स्पष्ट कळतें कीं हें काम मी करीत नसून माझा हात कोणातरी अतर्क्य शक्तीच्या हातीं आहे. टिळक मुंबईहून विलायतेला निघण्याच्या रात्रीं अशीच भाषा शांतारामाच्या चाळींत रात्रीं बारा वाजतां बोलले होते. गांधी तर पुष्कळ वेळां अंतर्नादाचा उल्लेख करतात. बापटांच्या सर्व काव्यांतून हरि कर्ता हा ध्वनि अनस्यूत आहे. त्याला धरूनच बापट लिहितात—

**बोल हा हरिचा असे—**

तेव्हां माझ्या नीरस भाटपणाचा बोभाट असला तरी मला काय त्याचें? माझी वाणी कितीहि नीरस असो, तिकडे लक्ष देऊं नका. गृहमाया आवरून चला. फेरवाले चला, नाफेरवाले चला, गुलामगिरींतून मुक्त व्हावें असें ज्याला ज्याला वाटतें, ते चट्सारे चला, हें मी तुम्हांस सांगवेल तितक्या कळकळीनें हात उभारून सांगतों आहें.

जेवढें शब्दानें म्हणून सांगण्याजोगें होतें तेवढें बापटांनीं सांगितलें. त्यांच्या आदेशाप्रमाणें २६ जानेवारीला फार मोठ्या समुदायानें सत्याग्रह करण्यांत आला. नाफेरवादांतले सुप्रसिद्ध पुढारी देव-दास्ताने पुन्हा एकदां आपल्या मित्रांसह आले. हीच शेवटची मोठी टोळी ठरली. खडकीच्या संग्रामांत मराठ्यांच्या लहानशा टोळीनें जसा चांगलाच पराक्रम गाजवला, तसें या टोळीनें आपलें तेज प्रकट केलें. जोन्सनें अनेकांचे हाल करून देवांना क्षुल्लक कारणानें तीस फटके दिले! अनुयायांइतकाच कणखरपणा देव-दास्तान्यांनीं या वेळीं दाखविला. पुढें देवांशीं पुष्कळांचे मतभेद झाले पण त्यांची निर्भयता, शौर्य व त्याग पाहून त्यांच्या प्रतिपक्षाची मान लवली आहे. हें देवांचें तेज या मुळशी युद्धांत प्रथम दिसून आलें. जनकोजीचें शौर्य, इब्राहिमखानाची स्वामीनिष्ठा, भाऊसाहेबांची वीरवृत्ति, हीं पानिपतच्या युद्धांत कळसास गेलेलीं महाराष्ट्रानें पाहिलीं. युद्ध हरलें पण सद्गुण मागें राहिले. मुळशीचें युद्ध पुढें थांबलें, यश मिळालें नाहीं. पण यशाचा अर्थ जर सद्गुणांची कीर्ति असा केला तर मुळशीनें 'महाराष्ट्राची तेजस्विता मेली नाहीं' हेंच सिद्ध केलें. महाराष्ट्राच्या या तेजस्वी संग्रामांत बापट हे अभिमन्यूप्रमाणें चमकत होते, हें ज्यांनीं पाहिलें ते धन्य होत. याच वेळीं बापटांच्या शौर्याप्रमाणें त्यांच्या वाणींतहि अपूर्व तेज निर्माण झालें होतें. तें इतकें आकर्षक होतें कीं त्यावर कितीहि लिहिलें तरी तें थोडेंच वाटतें.

हे निरोप अजूनहि स्फूर्ति देतात. ते पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटतात. ते वाचीत असतांना हृदय हालत नाहीं, भावना उसळत नाहींत, बाहू स्फुरण पावत नाहींत, गृहमायापाश तोडण्यास मनुष्य तयार होत नाहीं, असें होतच नाहीं. हे संदेश म्हणजे महाराष्ट्राच्या तेजस्वी वाणीचा अखंड झरा आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य देण्याची यांत शक्ति आहे. नव तरुणांनीं हे कंठस्थ करावे अशी यांची योग्यता आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे गुलामगिरींत पडलेल्या राष्ट्राची ही संजीवनी आहे.

## *नववा निरोप*

हे निरोप एकामागून एक महाराष्ट्रीयांना पाठवीत असतां बापटांना आपल्या बंगाली मित्रांची आठवण झाली. म्हणून त्यांनीं बंगाली बंधूंस एक हिंदींत निरोप पाठविला.

त्यांत त्यांनीं आपल्या पूर्वस्नेहाचें, प्रतिज्ञांचें, उद्योगाचें स्मरण केलें आहे. वंगभंगानंतरच्या तातातुटीचा उल्लेख केला आहे. ह्या काळांतल्या बऱ्यावाईट

प्रसंगांचें स्मरण केलें आहे. शेवटीं म्हटलें आहे, तुम्ही आपल्या प्रकारें उद्योग करीत आहां, मीहि इकडे आपल्या ऐन तारुण्यांतील संकल्पाप्रमाणें कांहीं ना कांहीं करीत आहें. आपली ताटातूट झाली असली तरी दूर होतांना केलेले संकल्प व वाहिलेल्या आणाशपथा स्मरणांतून गेलेल्या नाहींत. असें म्हणून मुळशीचा संग्राम हा त्याच संकल्पाला धरून आहे असें सांगून शेवटीं बापट म्हणतात, 'बंधूंनो, या सहकाऱ्याचें तुम्ही शुभचिंतन करा, हीच तुमच्याजवळ प्रार्थना आहे.'

*सिंधूचा गंगेला निरोप*

एकाच मानस सरोवरांतून गंगा व सिंधु निघाल्या. कारणपरत्वें एक पूर्ववाहिनी तर दुसरी दक्षिणवाहिनी झाली. दोन्ही नद्या राष्ट्रीय दुर्गुण धुवीत, आपल्या गुणांचें अमृतपान करवून नवजीवन देत मोक्षसागराकडे गेलेल्या आहेत. प्रत्येकीचा मार्ग निराळा असला तरी उद्योग तोच आहे. अशी कल्पना करा कीं, सिंधूला गंगेची आठवण आली तर ती गंगेला काय निरोप पाठवील ? तशाच तऱ्हेचा निरोप बापटांनीं बंगाली लोकांना धाडलेला आहे. नदीच्या मार्गांतले सर्व प्रसंग राष्ट्रीय पुरुषाला अनुभवावे लागतात. त्यांचा उल्लेख बापटांनीं करून आपल्या बंधूंचा निरोप घेतला आहे. प्रसंग मोठा हृदय हालविणारा आहे. दोन नद्यांच्या संगमाचीं ठिकाणें क्षेत्रें बनत असतात तसें क्षेत्राचें पावित्र्य या निरोपाला आलेलें आहे. या तीर्थाचें आचमन करून, तें डोळ्याला लावून, आपण पवित्र होऊं या.

## १६

# मुळशीचा पूर्णविराम

**रण शांत युक्त खेळूं । रण शुद्ध मुक्त खेळूं ॥**

सेनापति बापट हे येरवड्याच्या तुरुंगांतून १९२३ च्या फेब्रुवारी महिन्यांत सुटले. मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांत जिकडेतिकडे मुळशी-

संबंधानें थंडपणा येऊन कौन्सिलप्रवेशाच्या वादाला ऊत आला होता. तें पाहून बापटांना वाईट वाटलें. मुळशीकरितां पैसा व माणसें यांची आवश्यकता होती. एकदां उत्साह ओसरला कीं पैशालाहि ओहोटी लागते. खजीनदारांनीं पैसा शिल्लक नाहीं असें म्हणतांच बापटांनीं प्रवासापुरते थोडेसे पैसे मित्रांकडून घेऊन दक्षिण महाराष्ट्रांत मुळशीसाठीं दौरा काढला. त्यांच्या दौऱ्याच्या पद्धतीचें वर्णन मागें केलेंच आहे. सकाळीं गांवाची सफाई, सायंकाळीं भेळा व व्याख्यान. या दौऱ्यांत बापटांना पैसा भरपूर मिळाला. माणसेंहि थोडींबहुत मिळालीं असतीं पण मध्येंच एक विघ्न उपस्थित झालें; त्यामुळें हा दौरा एकदम थांबून त्यांच्यावर खटला भरला गेला. त्याचें कारण असें.

बापट मुळशी सत्याग्रहांत जे येऊन मिळाले त्याला मावळ्यांवर झालेला जुलुम हें जरी प्रमुख कारण असलें तरी अखिल भारतीय स्वातंत्र्याकरितां करावयास लागणाऱ्या लढ्याचा तो एक भाग होता म्हणून मुख्यतः मिळाले. हा स्वातंत्र्याचा लढा कोणत्या पद्धतीनें करावयाचा, याबद्दलचे त्यांचे विचार ठाम झालेले होते. १९२० सालापासून गांधींच्या अहिंसामार्गाची छाप हिंदुस्थानावर पडलेली होती. या अहिंसामार्गाबद्दल बापटांचें असें मत होतें कीं, अहिंसेचा साम सत्याग्रहाचा मार्ग कांहीं एका मर्यादेपर्यंत यशस्वी होऊं शकेल परंतु सर्वच ठिकाणीं सर्वच बाबतींत निरपवाद अहिंसा अन्यायाच्या प्रतिकारार्थ उपयोगी पडेल असें त्यांस केव्हांहि वाटत नव्हतें. म्हणून मुळशी परिषदेंत त्यांनीं साम सत्याग्रहाला कालाची, माणसांची व द्रव्याची मर्यादा घालून घेतली होती. तीन वर्षेंपर्यंत लढा चालूनहि जर प्रतिपक्षानें माघार घेतली नाहीं तर काय करावयाचें ? या मर्यादेच्या पुढें बापट साम सत्याग्रहानें वागण्यास तयार नव्हते. स्वतःचें रक्त सांडून हा लढा चालवायचा त्यांचा संकल्प होता. यालाच ते शुद्ध सत्याग्रह म्हणत. येरवड्याच्या तुरुंगांत अधिकाऱ्यांकडून सत्याग्रहींचा जो छळ झाला, किंवा धरणावरतीं कंपनीच्या नोकरांनीं जें लज्जास्पद वर्तन केलें तें सर्व सहन करण्याविषयीं बापटांनीं आपल्या अनुयांना परोपरीनें बजावलें होतें, पण त्याच वेळीं हेंहि सांगितलें होतें कीं तीन वर्षें वाट पाहून मुळशींतून तेवढ्या वेळांत शत्रु जर हालला नाहीं तर

'तरी धर्मयुद्धीं करूं दोन हात'

असें आश्वासन त्यांनीं आपल्या सैनिकांना दिलें होतें. येरवडा सोडतांना बापटांची अशी खात्री होऊन चुकली होती कीं साम सत्याग्रहानें हा लढा मिटणारा नव्हे.

अजून तीन वर्षांची मुदत संपायची होती. म्हणून ते थोडा वेळ थांबले होते व साम सत्याग्रहाचाच प्रचार करीत होते. पण हृदयांतली खळबळ किती वेळ कोंडून राहणार? ती आपला मार्ग कोठून तरी काढणारच. सातान्याचा दौरा संपवून बापट बेळगांवास गेले. तेथें व्याख्यानाच्या ओघांत सत्याग्रहींच्या छळाची हकीकत निघाली. त्यावेळीं बेभान झालेले बापट बोलून गेले कीं, 'आतां बॉंब मारावयाची वेळ संपली असून बॉंब फेकण्याचे दिवस जवळ येत आहेत.' अशा अर्थाचीं भाषणें सरकार सहन करणें शक्य नव्हतें. बापटांचीं भाषणें हीं पीनल कोड पाहून केलेलीं नसतात. माझ्या भाषणाचा परिणाम काय होईल, मला त्रास किती भोगावा लागेल, याचा ते विचार करीत नाहींत. जें सत्य असेल, जें लोकहिताचें असेल तें तें सांगून टाकण्याला त्यांना केव्हांच दिक्कत वाटत नाहीं. त्यामुळें त्यांचीं भाषणें शब्दांच्या कसरतीचीं अशीं होतच नसत. बॉंब फेकण्याची वेळ आली आहे असें म्हणतांच सरकारनें त्यांच्याकडून चांगल्या वर्तनाचा जामीन मागितला. तो जामीन देणें बापटांना युक्त वाटत नव्हतें. तसा तो न दिल्या-कारणानें त्यांना एका वर्षाची सजा भोगावी लागली व ते पुन्हा येरवड्याच्या तुरुंगांत अडकून पडले. ही शिक्षा त्यांना उगीचच्या उगीच झाली असें कांहींचें म्हणणें आहे. शुद्ध सत्याग्रहाच्या प्रचाराचा तो दौरा नव्हता. तो साम सत्याग्रहाचा दौरा होता. अशा वेळीं, ज्या गोष्टी आज करायच्या नाहींत त्यांचा उल्लेख करून बापटांनीं आपणावर फुकट संकट ओढवून घेतलें असें कांहींचें म्हणणें पडलें. त्यावर बापट म्हणत, मला जें पुढें करावयाचें आहे त्याची नोटीस स्वजनांप्रमाणें परक्यांनाहि दिली ही पाहिजेच. अहिंसक युद्ध व हिंसक युद्ध हे दोन प्रकार भिन्न जातीचे, असें बापटांना वाटतच नाहीं. शुद्ध सत्याग्रह हा साम सत्याग्रहाचें परिणत स्वरूप आहे, असें त्यांना वाटतें. याच्या उलट गांधीवाद्यांना हिंसक युद्ध हें विजातीय वाटतें. यामुळेंच गांधीवादी व बापट यांच्यांत मधूनमधून कुरबुर चालते.

बापट तुरुंगांत तेवीस सालीं गेले ते चोवीसच्या ऑक्टोबर महिन्यांत परत आले. तोंपर्यंत तीन वर्षें संपलीं होतीं. साम सत्याग्रहाचा काळ आतां संपला आहे असें सांगून त्यांनीं सर्व महाराष्ट्रीयांना उद्देशून एक पत्रक काढलें. त्यांत आपली भूमिका त्यांनीं चांगली व्यक्त केली आहे. या पत्रकासंबंधीं ते म्हणतात, मी चार महिनेपर्यंत मौनव्रत पाळणार आहें. या मुहूर्तानंतर मग मुळशीसंबंधींच्या साम सत्याग्रहावर पडदा पडेल. यापुढें मुळशी मंडळाचें काम संपलें असें समजावें. शुद्ध सत्याग्रहाचा मार्ग हा ज्याला जमेल, पचेल, त्यानें आचरावा. मला तो

आचरतां येईल असें वाटतें. मी तसा आचरणार. या पत्रकाला त्यांनीं अर्धविराम असें नांव दिलें आहे. अर्थात् हें पत्रक पाठीमागचें आहे. त्या पत्रकांत आपला संकल्प जाहीर करण्याचें त्यांनीं जनतेला आश्वासन दिलें होतें.

## *मुळशीचा अर्धविराम*

मुळशीचा अर्धविराम या पत्रकांत त्यांनीं म्हटलें कीं, सामसत्याग्रह संपल्यानंतर पुढें काय करावयाचें तें मी चार महिने मौन पाळून जनतेस कळविणार आहें.

यानंतर ६-१२-२४ ला मुळशीचा पूर्णविराम हें पत्रक काढून त्यांत त्यांनीं आपल्या धोरणाचा सात कलमी जाहीरनामाच प्रसिद्ध केला आहे. त्यांत त्यांची स्थितप्रज्ञा उत्तम तऱ्हेनें व्यक्त झालेली आहे. हें पत्रक वाचून हा पुरुष कोणी महान् योगी आहे हें सहज ध्यानीं येतें. यांत भाषेचा कृत्रिमपणा नाहीं. जगत्संचालकाच्या नाटकाचें भव्य स्वरूप इतक्या थोड्या शब्दांत फारच थोड्या ठिकाणीं पहावयास मिळेल. भाषेच्या धावत्या ओघावरून विचारांचा जोर सहज प्रतीत होतो. एकाएकीं तें लिहिलेलें स्पष्ट दिसतें. सत्य सूर्यनारायणाच्या दर्शना-बरोबर बापटांचें अतिशुद्ध हृदयकमळ या पूर्णविरामांत पूर्णपणें विकसित झालेलें दिसेल. ह्या पत्रकाची थोरवी एकदम जरी ध्यानांत येत नाहीं तरी हें पत्रक वाचतांच चटकन् ध्यानांत येतें कीं, हें पत्रक लिहिणारी कोणी तरी असामान्य व्यक्ति आहे व तिनें आर्य तत्त्वज्ञानाचा नुसता अभ्यासच केलेला नसून त्यांत ती पुरी पुरी मुरलेली आहे.

पहिल्या कलमांत अर्धविराम पत्रकांत काय सांगितलें होतें तें सांगून दुसऱ्या कलमांत माझें काम चार महिन्यांच्या ऐवजीं एका महिन्यांत उरकलें आहे, यामुळें आपला संकल्प कळविण्यास मी तयार आहें असें म्हटलें आहे. तिसऱ्या कलमांत ते म्हणतात—

मी मुळशी पेठ्यांत मावळ्यांची सेवा करायला जात आहें. मावळ्यांची वस्ती धरणामुळें उठून तेथील ज्योतिरूपेश्वराचें देऊळ पाण्यांत बुडालें म्हणजे मीहि तेथेंच जलसमाधि घेईन आणि हें करीत असतां जर मला कोणी कायिक विरोध करील तर मी त्याचा कायिक विरोध करीन. या विरोधांत त्या व्यक्तीचा जरूर पडल्यास प्राण घ्यावयाचा अगर स्वतःचा द्यावयाचा, असा माझा संकल्प आहे.

चवथ्या कलमांत टाटा कंपनीस त्यांनीं पुन्हा एकदां विनंती केली आहे कीं हा पेटा तुम्ही आपल्या मालकीचा केला आहे. केला तर केला, पण ही जमीन तुम्ही पाण्याखालीं बुडवूं नका. मावळ्यांना तेथें राहूं द्या व त्यांचेकडून नमुनेदार

शेती करून घ्या. असें करण्यांत धरणापायीं तुमचा झालेला आजपर्यंतचा खर्च फुकट जाईल पण आपण केलेल्या पातकाच्या क्षालनार्थ तो कृष्णार्पण म्हणून समजा. यांत आपलें सर्वांचें हित आहे.

पण आपली सर्वांची दृष्टि अपूर्ण आहे. श्रीहरीच्या पूर्ण दृष्टीनें सर्वांच्या हिताची जी गोष्ट असेल ती घडून येईल. श्रीहरीच्या नाटकाचें हृद्गत पुढें सांगितलें आहे. त्यांत ते म्हणतात, व्यक्तीच्या किंवा समूहाच्या हिताचें जें असेल तें अनेकविध प्रसंगांनीं अनेक जन्म क्रमशः साधीत शेवटीं प्रत्येकास सरूप करणें हें संसार नाटकाचें हृद्गत आहे.

कंपनीनें काय करावें, त्यांत सर्वांचें हित आहे असें सांगतांना सुद्धां त्यांनीं एकच गोष्ट सुस्पष्ट केली आहे, कीं खरें हित कोणतें तें हरि जाणे! यांत त्यांची निरहंकार वृत्ति स्पष्ट दिसते.

पांचव्या कलमांत ते म्हणतात, सत्याची शुद्ध सेवा करणारानें अहिंसेचा आग्रह धरतां कामा नये. सत्यापेक्षां अहिंसा गौण असल्यामुळें, अहिंसा-परहिंसा यांकडे लक्ष न देतां जें योग्य दिसेल तें कर्म आचरलें पाहिजे. यालाच शुद्ध सत्याचा आग्रह म्हणतात. त्या सत्याग्रहाचें व्रत आज मी घेत आहें असा संकल्प पुढें केला आहे.

सहाव्या कलमांत सत्यासारखा परमधर्म नाहीं अशा अर्थाचें वचन उद्धृत केलें आहे.

सातवें म्हणजे शेवटचें कलम हें या पत्रकाचें सारसर्वस्व आहे. त्यांत बापट म्हणतात,

एकच एक ब्रह्म हें परात्पर सत्य आहे. याचे पोटांत अनेक अंगभूत सत्यें आहेत. यांचा गलबला म्हणजेच संसार. एका परम सत्याचीं हीं अंगभूत सत्यें आहेत हा अनुभव व त्यायोगें आनंद म्हणजेच मोक्ष. असें हें ब्रह्मसंसाराचें नाटक आहे.

या नाटकांतील आपली भूमिका ओळखून आपलें सत्य जाणून त्याची सेवा करावी हा मोक्षसाधक धर्म आहे. सत्साची सेवा कधीं अहिंसासाधक तर कधीं अहिंसाबाधक असेल. आजपर्यंत माझी सेवा अहिंसासाधक होती, पुढें बाधकहि ठरण्याचा संभव असेल. विश्वहित हें परमसत्य, मुळशीकरांचें हित हें दुसरें पूजनीय सत्य. त्या सत्याची आग्रहानें निरपेक्ष सेवा करणें हाच माझा शुद्ध सत्याग्रह. यानें लौकिक व परमार्थिक मुक्तीचा दिवस जवळ येईल.

प्रतिपक्षांतील कोणत्याहि व्यक्तीविषयीं माझ्या मनांत द्वेषभाव नाहीं, वैरभाव

नाहीं. त्यांच्याशीं माझ्या भूमिकेनुसार वैरपणाचा खेळ खेळावयाचा आहे. पण हा खेळ खेळत असतां माझ्या अंतरंगांत निर्वैरता नांदते.

विश्वहित अहिंसेनेंच साधेल वगैरे चकारपक्ष नाटकास रंग चढण्याकरितां नाटककारानें योजलेले आहेत, असें सांगून शेवटीं सत्याग्रही, सत्यस्वरूप श्रीहरि सर्वांस शीघ्र सत्यनिष्ठ करो, असें म्हटलें आहे.

हें पूर्णविरामाचें पत्रक वाचल्यावर आपल्यापुढें एखादा प्राचीन काळचा महान् ऋषि यज्ञदीक्षा घेतांना व्यापक दृष्टीनें, थोर मनानें, शुद्ध अंतःकरण करून परमेश्वरार्पण बुद्धीनें 'ॐ' हें पवित्र अक्षर उच्च स्वरानें उच्चारीत आहे असा देखावा आपल्या डोळ्यापुढें उभा राहतो. गीतारहस्यांत स्थितप्रज्ञाचें जें वर्णन आपण वाचतों व ज्या वृत्तीशीं एकरूप होणें मानवी मनाला कठीण आहे असें आपल्याला वाटतें, ती स्थितप्रज्ञाची वृत्ति बापटांच्या ठिकाणीं शुद्ध सत्याग्रहास आरंभ करतांना आपणाला दिसते. टिळकांच्या संबंधानें आपणाला अति पूज्यभाव आहे. ते थोर मनाचे मोठे देशभक्त होऊन गेले. त्यांच्या मनाच्या बैठकीचा पाया गीतेंतील साम्यवृत्ति हा होता असें आपण म्हणतों. परंतु टिळकांचें व बापटांचें चरित्र अवलोकन केल्यावर बापटांच्या इतकी उच्च भूमिका टिळकांना सुद्धां साधतां आली नाहीं असें म्हणावें लागेल. इतिहासाला ज्ञात अशा काळांत तरी बापटांची वृत्ति साधलेला मनुष्य फारच विरळा म्हटला पाहिजे. ते आपल्या अगदीं जवळ आहेत, आपल्यांत वसतात, उठतात. त्यांच्यांतले बारीकसारीक दोष आपण पाहूं शकतों, यामुळें त्यांच्या मनाच्या थोरवीची कल्पना आपल्याला होत नाहीं. त्यांची भावनाप्रधानता आपणाला दिसते पण त्यांची स्थितप्रज्ञता आकलन करणें आपल्या शक्तीबाहेरचें आहे. बापटांनीं ही वृत्ति दीर्घ तपश्चर्येनें कमावली असली तरी शेवटीं हें देणें ईश्वराचें आहे असेंच म्हटल्याशिवाय राहावत नाहीं. अनंत जन्मींच्या पुण्याचें तें फळ आहे असें तुकारामानें देखील बापटांना पाहून म्हटलें असतें. सनकादि ऋषि जरी आपल्यांत नाहींत तरी टिळक, गांधी, राजेंद्र अशांसारखी थोर मंडळी देखील बापटांचें हें वैराग्य, ही स्थितप्रज्ञता पाहून मान डोलावल्याशिवाय राहात नव्हते व नाहींत.

शुद्ध सत्याग्रहाची दीक्षा घेऊन बापट साम सत्याग्रहाच्या कचेरींतून म्हणजे बाळूकाकांच्या घरातून बाहेर पडले व त्यांनीं आपलें बिऱ्हाड, आपली कचेरी ३७५ सदाशिव पेठ, वैद्यांचा वाडा, येथें नेली. बाळूकाकांचें घर म्हणजे सदा माणसांनीं गजबजलेलें. त्यांच्या उंबरठ्याला आजपर्यंत लाखाच्या वर तरी पाय लागले असतील. तेथें लहानथोर, श्रीमंतगरीब, फेरनाफेरवाले, सर्व वृत्तींचे,

सर्व मतांचे लोक यायचे जायचे. मुळशीचा रणसंग्राम टाटांशीं (कंपनीशीं) जरी होता तरी अप्रत्यक्षपणें तो सरकारशींच ठरला. तरी पण त्याचें स्वरूप साम सत्याग्रह असल्यामुळें सर्व काम उघड चालत असे. हा सत्याग्रह सर्व मतांच्या लोकांस जरी पसंत नसला तरी त्याबद्दलची चर्चा करायला, तेथील काम पहायला, बालसत्याग्रहींची तेजस्वी वर्तणूक पाहून मन विरघळल्यामुळें देणगी देण्याला, भिन्नभिन्न रुचीचे लोक येत असत. आतां बापटांनीं आपली दिशाच बदलली. यामुळें अनुकूल वारा वाहेनासा झाला. आतां लाटांशीं व उलट्या वाऱ्याशीं झुंज द्यावयाची होती. पौर्णिमेच्या भरतीचें ताण संपून लढ्याला ओहोटी लागलेली होती, केव्हां नाव पुळणींत रुतून बसेल याचा नेम नव्हता. चांदणें जाऊन कृष्णपक्ष सुरू झाला होता. अशा वेळीं दूरच्या ताऱ्यांकडे नजर ठेवून आपली नाव बापटांना बाहुबलाच्या जोरावर वल्हवीत न्यावयाची होती. अशा वेळीं सुकाणू धरण्याला ते जरी खंबीर होते तरी वल्हीं मारायला कांहीं माणसांची गरज होतीच. वर सांगितलेल्या कारणांनीं अनेक लोक मुळशी कार्यापासून दूर दूर गेले. कोणाचा शुद्ध सत्याग्रहावर भरंवसा नव्हता तर कोणाच्या हृदयांत तेवढें धैर्य नव्हतें. यामुळें काय करावें हा प्रश्न बापटांपुढें होता. परंतु—

वर्ड्स्वर्थच्या 'हॅपी वॉरिअर' मधून जें स्थितप्रज्ञ शूराचें वर्णन केलेलें आहे त्याबरहुकूम बापटांचें यावेळीं वर्तन होतें. त्यांनीं आपली भूमिका निरनिराळ्या मंडळींना सांगितली. त्यांच्याजवळ एका लहानशा पिशवींत शुद्ध सत्याग्रहाचा कार्यक्रम असे. त्यांना जेथें जेथें म्हणून थोडेंसें तेज दिसे, त्या त्या इसमाला ते आपल्या वाड्यांत घेऊन जात व त्याला आपला कार्यक्रम वाचायला देत. तो तो वाचीत असतां त्याच्याकडे सूक्ष्म दृष्टीनें पहात; व आपल्या कार्यक्रमांत हा बसतो कीं नाहीं याची परीक्षा करीत. आग्रह, चर्चा, मन वळविणें. या गोष्टी बंद असत. लगेच तो कागद त्याच्या हातांतून घेत व त्याच्याजवळ इतर गप्पा मारून त्याला पोहोंचवून देत. अशी परीक्षा करतांकरतां त्यांच्या हातीं चारपांच इसम लागले. ते म्हणजे कुकडे, बामळे, गोरे, देव व मोडक. ही मंडळी गोरेशिवाय करून सामान्यतः पाहिली तर अत्यंत सालस, निगर्वी व चटकन् डोळ्यांत भरणारी अशी दिसत नाहींत. परंतु एखाद्या गरिबाच्या फाटक्या सदऱ्याच्या आड अपूर्व धैर्याचा ज्याप्रमाणें हृदयकुंज असतो त्याप्रमाणें या मंडळीच्या ठिकाणीं धैर्य, त्याग व निष्ठा या त्रयींचा अपूर्व असा ठेवा, ज्याचा ठाव अजून कोणाला लागलेला नाहीं, असा आहे. या मंडळींची बापटांवर

कल्पनातीत निष्ठा आहे. शिवाजी महाराजांना त्यांचे बालपणचे सवंगडी जसें म्हणत कीं, 'जेथें तुमचा शब्द तेथें आमचा जीव' तीच स्थिति या मंडळीची आहे. तुम्हाला बाह्य वर्तनावरून हे बापटांचे कट्टे अनुयायी असतील अशी कल्पनाहि यावयाची नाहीं. गुरु मध्यें बसलेले आहेत व हे शिष्य त्यांचें प्रवचन ऐकत आहेत किंवा पादसंवाहन करीत आहेत असा देखावा तुम्हांला दिसावयाचा नाहीं. गुरूचा उपदेश पुष्कळदां मनोमयच असतो. जुन्या काळच्या पतिव्रता आपलें पतिप्रेम ज्याप्रमाणें बोलून दाखवीत नसत, फार काय सांगावें, ज्याला आत्मसमर्पण केलें त्याचें नांवहि जिव्हेवाटे काढण्याचा संकोच करीत, त्याप्रमाणें या मंडळींचें बापटप्रेम आहे. बापटांच्या हालचालीवर यांचें लक्ष असे व त्याला अनुसरून हे आपल्या कार्याची दिशा बदलीत असत. या मंडळीची बापटांच्या मनाशीं इतकी एकतानता झालेली आहे कीं बापटांच्या इच्छा, आज्ञा, त्यांना नकळतच समजूं शकतात. बापटांनीं साम सत्याग्रह काढला तर त्यांच्या मागोमाग जायला तयार. शुद्ध सत्याग्रह काढला तर हे त्यांत आहेत. बापटांनीं झाडू हातांत घेतला तर हे त्यांनीं जमा केलेला केरकचरा टोपलींत भरायला पुढें. कोणी कोणी असें म्हणतात कीं, गुरु लाख भेटतील पण पक्का शिष्य एक मिळणें कठीण. पण बापटांचें भाग्य कीं त्यांच्याजवळ अशीं पुरुषरत्नें एकाहून अधिक आहेत. सृष्टींत लोखंड इतस्ततः पडलेलें आहे पण तें ओढून घेणारे लोहचुंबकच कमी, ही गोष्ट या मंडळींना पाहिल्यावर मनांत आल्याशिवाय राहातच नाहीं.

बापटांचा शुद्ध सत्याग्रहाचा संकल्प या मंडळींना कळला. बापटांनीं चार शब्दांत त्यांना मार्गदर्शन केलें. गोऱ्यांनीं साहित्य जमा करून आणलें. गोरे म्हणजे शिकारी चित्ता. सहसा कोणाला बधायचा नाहीं, पकडूं म्हणाल तर सांपडायचा नाहीं. केव्हां मृदु पायानें मागाहून येईल व मानगुटी पकडील याचा पत्ता लागायचा नाहीं. असा पुरुष बापटांचे पुढें अगदीं एखाद्या बिल्लीसारखा विनम्र असतो. कोल्हापूरच्या महाराजांनीं कांहीं चित्ते बाळगले होते. महाराज जेथें जात तेथें ते त्यांच्याबरोबर असत. इतरांना भयप्रद वाटणारे हे चित्ते शाहू महाराजांना अगदीं लाडक्या, निरुपद्रवी मुलांप्रमाणें वाटत. महाराजांनीं इषारा करतांच ते कुठलीहि कसलीहि शिकार चटकन् पकडून आणून महाराजांचे पायाशीं ठेवीत. तोच मासला गोरे यांचा होता. गोरे हे दिसायला उग्र आहेत. त्यांच्या डोळ्यांत सौम्यता क्वचितच आढळते. त्यांचा तो ताठ, रुक्ष देह, भेदक दृष्टि पाहून भेदरणार नाहीं असा मनुष्य विरळा. परंतु या सकंटक फणसाच्या आंत मधुर

रसाचे पेले भरलेले आहेत. पण गोरे हे भलत्यालाच वश होणारे नव्हत. त्यांना वश करणारा बापटांसारखाच मांत्रिक हवा.

### *अर्धविराम, पूर्णविराम आणि हल्ला*

मुळशीचा अर्धविराम हें पत्रक दि. ६–११–२४ ला प्रसिद्ध झालें, हें आपण पाहिलें आहेच. चार महिने मौन पाळून परिस्थितीचें अवलोकन करीन व पुढें काय करावयाचें तें ठरवीन असें या पत्रकांत म्हटलें होतें. परंतु विचारास इतका वेळ न घेतां एक महिन्यांतच त्यांनीं पूर्णविराम हें पत्रक काढून आपली कार्यपद्धति जाहीर केली. हें पत्रक प्रसिद्ध केलें आणि बापट त्याच दिवशीं बैलगाडींतून पौडला गेले. त्यांचे सहकारी श्री. गोरे, मोडक, बाभळे नि कुकडे हे त्यांचेबरोबर होते. गोरे यांनीं मोंगलाईतून हत्यारें आणून ठेवलीं होतीं. धुंडिराज देवांनीं अगोदर पुढें जाऊन उतरण्याची व्यवस्था व एका महिन्याची शिधासामुग्री घेऊन ठेवली होती. बापटांनीं शुद्ध सत्याग्रहाची म्हणजे सशस्त्र हल्ल्याची तारीख नऊ डिसेंबर ठरवून टाकली इतकेंच नव्हे तर कुठें कसा हल्ला चढवावयाचा हेंहि पौडला गेल्यावर ठरवून टाकलें. ता. ९ ला सकाळीं चिंचवडहून मजूर घेऊन एक आगगाडी मुळशीच्या धरणाकडे जात होती, ती अडविण्याचा बापट आणि त्यांच्या मित्रांनीं प्रयत्न केला. पण गाडी थांबण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां या मंडळींनीं गाडींत चढून मजुरांवर हत्यार चालविलें आणि श्री. गोऱ्यांच्या तरवारीचें पातें ऐन वेळेला मुठींतून निसटलें. बापटांचें पिस्तुल उडेना. गोऱ्यांनीं तें नीट करून बापटांना दिलें. ड्रायव्हरनें एंजिनमधील निखारे पावड्यानें घेऊन बापटांवर टाकण्याचा प्रयत्न केला पण थोडक्यांत बचावले. बापटांची गोळी मात्र एंजिन ड्रायव्हरच्या मांडीला लागली. इतरांना किरकोळ जखमा झाल्या. इतकें झाल्यावर बापटांनीं हल्ला थांबविला व म्हटलें, पुरे झालें गणेश-पूजन. हा सर्व प्रकार इतका जलद झाला कीं त्याचा उलगडा जनतेस त्या वेळीं व पुढें कोणाला झालाच नाहीं. एक महिन्यांत बापटांना शुद्ध सत्याग्रहाच्या बेताला कां यावें लागलें, मध्यें अनपेक्षित काय अडचणी आल्या, जबाबदार व्यक्तींवर हल्ला न होतां मजुरांवर कां झाला, हें सर्व उजेडांत यावयाला अवकाश असेल. स्वतः बापटच याचा पुढेंमागें उलगडा करतील तेव्हां खरें! क्रांतिकारकांचा सर्व इतिहास त्यांच्या जिवंतपणीं बाहेर कसा येणार?

हल्ल्यानंतर ही सर्व मंडळी पौड कचेरीजवळ गेली. लोकहि जमा होऊं लागले. हळुहळु मजूरहि तेथें भीतभीत आले. बापटांनीं नंतर सर्व प्रकार समजावून

सांगितला, आणि म्हटलें, 'तुम्हांला केली याहून अधिक शिक्षा करण्याचा बेत नाहीं.' पोलीसांना ते म्हणाले, 'तुम्ही थोडे आहांत म्हणून कांहीं घाबरूं नका. आम्ही कांहीं तुम्हाला दुखापत करीत नाहीं. पकडण्याचें तुमचें काय शास्त्र असेल तें आतां पुरें करा. आम्ही स्वस्थपणें आतां हरीची पुढची लीला पहाणार आहोंत.'

पोलिसांनीं मुख्य ठाण्यावर तार करून सर्व हकीकत कळवली. जास्त पोलीस आले व या सत्याग्रहींना पुण्यास नेण्यांत आलें. जवळजवळ सहा महिने ही मंडळी कच्च्या कैदेंत होती. पुष्कळ तपास वगैरे झाल्यावर या मंडळीवर खटला भरण्यांत आला. गुन्हा मोठा असल्याकारणानें तो सेशनमध्यें चालला. या ठिकाणीं बापटांनीं सर्व सहकाऱ्यांच्या तर्फे भाषण करून सांगितलें कीं, 'या वेळीं आम्ही साधी दुखापत करण्याचें ठरविलें होतें. खून करण्याचा आमचा वेत नव्हता. दुखापतीबद्दल काय शिक्षा द्यावयाची असेल ती द्या.'

ज्यूरीनें खून करण्याच्या प्रयत्नाबद्दलच्या आरोपांतून या सत्याग्रहींना दोषमुक्त केलें, आणि बिगरपरवाना हत्यारें बाळगल्याबद्दल दोषी ठरविलें. न्यायाधीशाला ज्यूरीचें मत पटलें नाहीं. तो या मंडळींना खून करण्याचा प्रयत्न करणारे समजत होता. म्हणून त्यानें ही केस हायकोर्टाकडे पाठविली.

हायकोर्टाला यूरोपिअन जज्जाचें म्हणणें पटलें, व त्यानें बापटांना सात, देवांना आठ, गोऱ्यांना पांच व मोडक, बाभळे, कुकडे यांना प्रत्येकीं चार वर्षें अशा सक्त मजुरीच्या शिक्षा दिल्या, व निरनिराळ्या तुरुंगांत त्यांची रवानगी केली. बापटांना सिंध हैद्राबादला म्हणजे पुण्यापासून शेकडों मैल दूर असें नेऊन ठेवण्यांत आलें. अशा रीतीनें या शुद्ध सत्याग्रहाचा आरंभ व शेवट झाला.

मुळशीचा लढा साम सत्याग्रहाबरोबरच कित्येकांच्या मतें संपला होता. पण बापटांच्या मतानें हा लढा चालूच होता; व तो लढा त्यांच्या मतानें अजूनहि संपलेला नाहीं. तरीपण त्यांना सात वर्षें शिक्षा झाल्यानें या लढ्यावर आतां दीर्घ काळपर्यंत पडदा पडला इतकेंच नव्हे तर बापट हे सात वर्षें पडद्याआड जाणार होते. ते तसे जातांना लोकांच्या मनोवृत्ति या शुद्ध सत्याग्रहासंबंधानें कशा होत्या हें पहाण्यासारखें आहे. त्या पाहून हें प्रकरण आपण संपवीत आणूं.

पूर्णविरामाच्या पत्रकाची प्रसिद्धी व शुद्ध सत्याग्रह या गोष्टी जवळजवळ एकाच काळीं घडल्या. युद्ध सुरू व्हावयाच्या वेळीं निर्वाणीचा खलिता (ultimatum) आणि सैन्याची स्वारी ही हल्लीं युध्यमान राष्ट्रांत जशी एकाच वेळीं होते, त्याप्रमाणें शुद्ध सत्याग्रहाचा संकल्प, स्वारी, प्रसिद्धी, एकाच वेळीं झाल्यानें

वर्तमानपत्रांत बापटांच्या पत्रकाच्या आधीं मजुरांवरच्या हल्ल्याची बातमी जनतेला अगदीं भडक रंगांत कळली. त्यामुळें वाचक थोडे बुचकळ्यांत पडले. बापट हे निरपवाद अहिंसेचे पक्षपाती नाहींत हें लोकांना ठाऊक होतें. त्याचप्रमाणें ते साम सत्याग्रह संपवून कांहीं तरी दुसरें करतील असें त्यांच्या मित्रांस वाटत होतें. ते कदाचित् मुळशीच्या धरणांत जलसमाधि घेतील अशीहि लोकांची कल्पना होती. कांहींना वाटत होतें, टाटा कंपनीच्या संचालकांशीं ते कदाचित् दोन हात करतील; पण मजुरांच्या गाडीवर ते हल्ला करतील अशी जवळजवळ कोणालाहि कल्पना नव्हती. व मजुरांवर शस्त्रानें हल्ला केला ही बातमी कानीं पडतांच, बापटांनीं हें काय केलें, असेच उद्गार बापटांच्या चहात्यांच्या तोंडून सर्वत्र निघाले. गरीब बिचाऱ्या मजुरांनीं त्यांचें काय घोडें मारलें होतें? ते अज्ञानी, पोटार्थी लोक. कुठून तरी भाडोत्री धरून आणलेले. त्यांना काय माहीत कीं, आपल्या कृतीनें अनेक शेतकऱ्यांच्या पोटावर आपण पाय आणीत आहोंत? गांवांतल्या मजुरांत एकमेकांबद्दल सहानुभूति असूं शकते. लहान गांवांत एक गडी काढला तर त्याचा भाईबंद त्याच्या जागेवर काम करायला येत नाहीं. पण मोठ्या गांवांत मजुरांत असें दळणवळण नसतें. त्याहूनहि परगांवचे भाडोत्री मजूर जेव्हां आणतात तेव्हां त्यांना तर कशाचीच कल्पना नसते. अशा अज्ञानी लोकांवर बापटांनीं हल्ला करावा हें कोणालाच बरें वाटलें नाहीं. ह्या हल्ल्याला सरकारी पत्रकांत भ्याडपणाचा हल्ला म्हटलें जातें. पण बापटांच्या धैर्याची, शौर्याची कल्पना ज्यांना होती ते या प्रयत्नास भ्याड म्हणावयास तयार नव्हते—तरी विक्षिप्त म्हणण्यास तयार होते. बापटांनीं आपल्या अनेक लोकविलक्षण कृतींनीं विक्षिप्त ही पदवी मिळवली होती. यामुळें बापटांनीं लहरीनें कांहीं तरी केलें. मजुरांबद्दल जनतेला जशी सहानुभूति वाटली त्याप्रमाणें बापटांविषयींहि वाटली. उद्वेगाच्या भरांत कांहीं जण बोलूनहि गेले कीं, शिकारच करावयाची होती तर उंदरामांजराची कां केली? या हल्ल्यांत दुखापतीशिवाय कांहींहि झालें नसल्यामुळें बापट फाशीं जात नाहींत हें ठरलेलें होतें. पण हल्ल्याबद्दल बापट आणि त्यांचे सवंगडी यांना शिक्षा होणार, दहापांच वर्षें ते जनसेवेला पारखे होणार, हें पाहून लोक हळहळले.

बापटांच्या सवंगड्यांची माहिती सत्याग्रही लोकांशिवाय फारशी कोणास नव्हती. तेव्हां मोडक, बाभळे हे कोण हा प्रश्न जो तो विचारी. देवांची माहिती वांईच्या प्राज्ञपाठशाळेच्या संबंधामुळें पुष्कळांना होती. प्राज्ञपाठशाळेचे ते अव्वल दर्जाचे विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असले तरी यांपैकीं कोणालाच वर्तमानपत्रांत

प्रसिद्धी नसल्यामुळें, हे पांच लोक कोण याबद्दल जो तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला. सरकारनें चौकशीसाठीं फार काळ घेतल्यामुळें बापट सहा महिने समाजाच्या दृष्टिआड झाले. शेवटीं चौकशीअंतीं शुद्ध सत्याग्रहाचें जाळें कांहीं दूरवर पसरलेलें नाहीं, या चारपांच जणांशिवाय इतरांचा या कार्यांत संबंध नाहीं, हें पोलिसांना कळून आल्यावर मग खटला भरण्यांत आला त्यावेळीं बापट हे जनतेपुढें पुन्हा आले. सेशनकोर्टांत बापटांनीं जें हृदयस्पर्शी, सडेतोड, तर्कशुद्ध असें भाषण केलें त्यामुळें कोर्टांतील लोकांचीं हृदयें हाललीं. सूर्याच्या मनस्वी तापानें वायुमंडळांत झंझावात सुटतो पण त्यामुळें फत्तर कांहीं हालत नाहीं. त्याप्रमाणें सहानुभूतिशून्य असे जज् व सरकारी वकील यांशिवाय बापटांचें तें अपूर्व तेज, निःस्वार्थी वृत्ति, व साधुत्व पाहून ज्यूरींतील लोकसुद्धां सद्गदित झाले. असा बुद्धिमान व कर्तृत्ववान मोहरा तुरुंगांत अनेक वर्षें गाडला जाणार म्हणून लोक खिन्न झाले. ज्यूरीनें एकमतानें खुनाच्या आरोपांतून त्यांस मुक्त केलें पण हत्यारें बाळगिल्याबद्दल दोषी ठरविलें. यांत न्यायाबरोबर सहानुभूतीचाहि ओलावा निकालांत होता. हिंदी लोकांनीं देशद्रोह अनेक वेळां केला असेल. इंडियन न्यायाधीशांनीं युरोपिअन न्यायाधीशांपेक्षां दोन दोन जन्मठेपा देऊन आपला नीचपणा व्यक्त केला असेल पण इंडियन ज्यूरीनें राजद्रोही खटल्यांत व स्वातंत्र्ययुद्धांत देशभक्तांचीच बाजू नेहमीं घेतलेली आहे. टिळकांना ज्यूरींतल्या इंडियन लोकांनीं निर्दोषीच ठरविलें होतें. परांजप्यांच्या बाबतींत स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन हे लेख लिहिले असल्यामुळें शिक्षा सौम्य द्यावी असा निकाल ज्यूरीनें दिला होता. ह्याहि बाबतींत थोडी फसगत झाली नाहीं तर परांजपे बहुमतानें 'निर्दोषी' ठरण्याची वेळ आली होती. देवांवर बंडाचा आरोप केला गेला होता व त्यांनीं तर खटला लढविण्याचें नाकारलें होतें. अशाहि स्थितींत ज्यूरीनें बंडाच्या बाबतींत देवांना निर्दोषी ठरविलें होतें. एकूण काय, इंडिअन ज्यूरीनें बापटांची बाजू राखवेल तेवढी राखली असेंच म्हटलें पाहिजे.

अशा रीतीनें हा साम व शुद्ध सत्याग्रह संपून मुळशी प्रकरण इतिहासांत जमा झालें.

चिरोलशीं लढा देण्यांत टिळक हरले पण चिरोलनें शेवटीं उद्गार काढले कीं, ह्या जगांत माझा हात धरून जाब विचारणारा कैसर व टिळकांशिवाय दुसरा कोणी मला भेटला नाहीं. त्याप्रमाणें टाटा कंपनीला कळून आलें कीं, सरकारी पाठिंबा किंवा पैशांचें बळ यावर महाराष्ट्रीय मधमाश्यांच्या पोळ्याला हात घालणें सोपें नाहीं. मरतांमरतां तुम्हांला चावूनचावून त्या इतकें सतावून सोडतील कीं नको तो

मध, असें होऊन जाईल. मधमाश्यांचीं पोळीं अनेकांनीं लुटलीं असतील पण तें काम सोपें नाहीं हा धाक मधमाश्यांनीं लुटारूंच्या मनांत इतका बसविला आहे कीं मध लुटण्यापेक्षां त्या पाळून त्यांच्याकडून युक्तीनेंच मध काढून घेणें इष्ट असें ठरलें. मुळशीनें १९३० सालच्या सत्याग्रही युद्धाकरितां महाराष्ट्र नांगरून ठेवला. इतकेंच नव्हे तर जुलमानें शेतकऱ्यांच्या धनाला हात घालणें महाराष्ट्रांत इष्ट नाहीं हा धडा भांडवलवाल्यांना मिळाला. मुळशीनें महाराष्ट्रतेजस्विता इतकी जागवलीं कीं, महात्माजीहि म्हणूं लागले कीं सबंध महाराष्ट्र माझ्या मागें येईल तर माझा कार्यक्रम मी हां हां म्हणतां यशस्वी करीन. संख्येच्या दृष्टीनें लहान पण परिणामाच्या दृष्टीनें मोठा असा हा संग्राम इतिहासांत अपूर्व ठरला.

# १७

# तत्त्वाकरितां तप

मागच्या प्रकरणांत शुद्ध सत्याग्रहाचें गणेशपूजन जें बापटांनीं केलें त्यांत त्यांना सात वर्षांची शिक्षा झाली. तत्पूर्वी त्यांना सहा महिने कच्च्या कैदेंत येरवड्यास काढावे लागले. त्यावेळीं त्यांना अंधारी विभागांत म्हणजे इतर सामान्य कैद्यांपासून स्वतंत्र विभागांत, भयंकर स्वरूपाचे गुन्हे करणारांस जेथें ठेवीत असतात तिथें, स्वतंत्र खोलींत कोंडून ठेवलें होतें. बापट हे शुद्ध सत्याग्रहाचे पुरस्कर्ते असले आणि गांधी हे निरपवाद अहिंसेचे पक्षपाती असले तरी सामान्य नित्याच्या वागणुकींत दोघांची वृत्ति एकसारखीच असते. दोघांचीहि तुरुंगांतील वागणूक स्वाभिमानाची, धीरगंभीर व हिंदु राष्ट्राच्या प्रतिनिधींना साजेशीच असते. सिंह पिंजऱ्यांत कोंडला तरी त्याची ऐट कमी होत नाहीं. श्वानाच्या लाळघोटेपणाचा अंश देखील त्यांचे ठिकाणीं आढळून यावयाचा नाहीं. जेलमधल्या मनुष्याला उगाच नसत्या चौकश्या करावयाची संवय असते. कुठें काय चाललें आहे, कोण कसा आहे, आपल्याला लागणाऱ्या वस्तू गुप्तपणानें कशा मिळतील याकडे कांहीं जणांचें लक्ष असतें. १९३२ सालीं आम्ही येरवड्यांत होतों. एके

रात्रीं दहा वाजतां नाशिकहून एक बी क्लासची पार्टी आली. त्यांतील एक मनुष्य माझ्या शेजारच्या खोलींत होता. खोली बंद होतांच त्यानें मला वॉर्डर, शिपाई, जमादार, डे. जेलर, जेलर इत्यादिकांचीं नांवें, त्यांचे स्वभाव इ. विचारण्यास प्रारंभ केला. पण मला असल्या माहितीची गरज भासली नव्हती. पण त्या गृहस्थाचे उद्योग निराळे होते. त्यानें ही माहिती मिळवून जेलचें घर बनविलें.

बापट आपल्या खोलींत नेहमीं वाचीत पडून राहात. कोणाशीं बोलणें नाहीं, चालणें नाहीं. नियमित वेळीं निसर्गविधी, स्नानभोजनापुरते उठत. त्यांच्यावर सतत पहारा करण्याकरितां क्रूर वृत्तीचे असे सिंधी पहारेकरी ठेवलेले असत. हे अधिकाऱ्यांच्या मर्जीतले असत. त्यांच्या हुकुमाबरोबर वाटेल तें करण्यास तयार असत. सिंधी वॉर्डर म्हणजे कैद्यांतला अत्यंत क्रूर प्राणी. सिंधमधल्या अशिक्षित, आडदांड, क्रूर, दांडग्या जातींतून हे लोक खून, दरवडे अशा गुन्ह्यां-करितां वीसवीस वर्षांची शिक्षा घेऊन आलेले असतात. उंचेपुरे सहज सहा फूट, दुहेरी हाडाचे, दाढीमिश्या झोकदार, डोळे विशाल पण क्रौर्य प्रतिबिंबित होणारे, गौरवर्ण, चालणेंबोलणें ऐटदार, भाषा व्यवहारापुरती उर्दू, शारीरिक शिक्षेला दाद न देणारे, असे सिंधी वॉर्डर असतात. त्यांची उद्दाम वृत्ति पाशवी उपायानें कह्यांत येत नाहीं असें पाहून त्यांना अधिकाराची जागा देण्यांत येते. हा अधिकार बजावण्यांत ते वरिष्ठांच्या फार उपयोगी पडतात. चुगल्या करणें, गुन्हे शोधणें, कायद्यापेक्षां जरबेवरच काम निभावून नेणें, अधिकाऱ्यांच्या पुढें पुढें करणें, असा हा सिंधी वॉर्डरांचा स्वभावच बनून जातो. यांना माफीच्या दिवसांचें मोठें आमिष असतें. खाणेंपिणें, तंबाखू इत्यादि बाबतींत त्यांना विशेष सवलती मिळतात.

अशा या सिंधी वॉर्डरांची योजना जेलमध्यें जे भयंकर म्हणून कैदी येतात त्यांच्यावर पहारा करण्याकडे केली जाते. या वॉर्डरांची भयंकर कैद्यांसंबंधानें अशी अपेक्षा असते कीं ते पळून जाण्याचा प्रयत्न करतील, विडीकाडी मागतील व त्याकरितां हांजी हांजी करतील किंवा अभद्र शिव्या देत सुटतील. पण त्यांच्या या अपेक्षा 'सोराज्यवाल्या' कैद्यांसंबंधानें फोल होतात. या 'सोराज्य'वाल्या कैद्यांचें नित्याचें जीवन गुन्हेगारी वृत्तीचें नसतें. ही मंडळी पुष्कळ वेळां अतिसालस, सोज्वळ, विद्वान, उच्च संस्काराची असतात इतकेंच नव्हे तर पूर्ण निर्व्यसनी आणि स्वाभिमानी असतात यामुळें राक्षसांच्या समुदायांत जशी सीता तिच्या पहारेकर-णींना वाटली तसे बापट या सिंधी वॉर्डरना वाटले. बापटांचें तें तपस्वी सरळ वर्तन पाहून त्यांना अचंबा वाटला. 'शरीफ आदमी दिखता है' असें ते आपसांत

म्हणूं लागले. नंतर 'अवलिया दिखता है—और सरकार इसकू बदमाष समजकर जेलखाने में लाता है. यह आदमी बदमाष नहीं—साली सरकार बदमाष है' असें बोलत. बराच काळ गेल्यावर त्यांचें हृदय बापटांच्या मौनानें पाघळलें व त्यांनीं मौन धारण करावें हें त्यांस सहन होईना. भिन्न भाषा, पोशाख, प्रांत यांनीं त्यांत अंतर पडलें असलें तरी चित् अशाची ओढ एकमेकांकडे लागणारच. त्याप्रमाणें एक दिवस ते बापटांना म्हणाले, 'महाराज, तुम्ही आमच्याजवळ कां बोलत नाहीं? आम्ही आपल्या कच्च्याबच्च्यांपासून दूर देशांत येऊन पडलों आहोंत ना? तुम्ही जर दोन शब्द बोलाल तर आम्हांला बरें वाटेल.'

## *सज्जनस्य हृदयं नवनीतम्*

परदुःख पाहून तें तत्काल द्रवतें. बापटांनीं हे शब्द ऐकतांच पुस्तक एका बाजूस सारून उठावें, मृदु स्मित करून त्यांची विचारपूस करावी. सिंधी वॉर्डरनीं म्हणावें, 'तुम्हाला लागेल तें आम्ही आणून देतों.' जेलमध्यें विडी, काडी, रोटी, गूळ यांनाच महत्त्व. बापटांनीं आभारपूर्वक या सत्कारास नकार द्यावा.

हळूहळू बापट अवलिया म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांना हिंदु-मुसलमान 'महाराज' म्हणून संबोधूं लागले. जेलमध्यें हिंदु कैदी तुळशी वृंदावनें तयार करून तुळशीला सकाळीं स्नान करतांच पाणी घालीत असतात. कांहीं तरी निमित्तानें एका अधिकाऱ्यानें कैद्यांना प्रिय अशीं वृंदावनें उखडलीं तेव्हां कैद्यांनीं संप केला. अन्नसत्याग्रह हेंच जेलमध्यें कैद्यांच्या हातांतलें एक हत्यार असतें. प्रथम अधिकारी त्यांना दाद देत ना! इतक्यांत बापटांच्या कानावर ही हकीकत घालण्यांत आली. जेलचें तारायंत्र फार चोख काम करतें. सरकार जेलचे विभाग पाडून, उंच भिंती उभारून, मध्यें कडक पहारे चौक्या बसवून भिन्न जातीच्या कैद्यांना अलग पाडीत असतें. अशाहि परिस्थितींत एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत जेलमधील बातमी विद्युत् वेगानें जाते. त्याकरितां योजना करावी लागत नाहीं. जेलमधल्या नित्य जीवनांत नावीन्य नसल्यामुळें जरा कुठें हालचाल झाली, फरक पडला, नवीन कोणी आला कीं, ऑफिसवरचे कैदी अगर ऑफिसकडे गेलेले इतर कैदी ही बातमी जेलभर पसरवितात. याला कोणीहि आळा घालूं शकत नाहीं. विशेष योग्यतेच्या कैद्याची अधिकाऱ्यांशीं ओळख लौकरच होते. ते कांहीं तरी निमित्तानें उच्च विचारांच्या कैद्यांशीं बोलण्याचा प्रसंग आणतातच. कोणी आपला अधिकार दाखविण्याकरितां, कोणी कांहीं लांच मिळेल म्हणून तर कोणी चांगल्या संगतीचा तेवढाच लाभ मिळावा म्हणून

बापटांसारख्या कैद्याशीं येऊन बोलतात. अशा भेटींत बापटांनीं वृन्दावनांचा अन्याय त्यांना दाखविला पण त्याची दाद त्यांनीं घेतली नाहीं. शेवटीं बापटांनीं उपवास करण्याचा धाक घालतांच हें प्रकरण आवरतें घेण्यांत आलें, वृंदावनें बांधून देण्यांत आलीं, सत्यनारायणाची परवानगी मिळाली. बापटांचें दर्शन सर्वांस घडविण्यांत आलें.

या प्रसंगानंतर येरवड्याहून बापटांना सिंध हैद्राबादमध्यें पाठविण्यांत आलें. हैद्राबादचा उन्हाळा म्हणजे सर्व हिंदुस्थानांत अतिकडक, टिळकांना देखील सिंधचाच दौरा बाधला असें केळकरांनीं म्हटलें आहे. तेथें सकाळीं जरा सौम्य वातावरण असतें. कजाग सासू जशी सुनेला पहिल्या दिवशीं सौम्य बोलते पण दुसऱ्या दिवसापासून तिचा शब्द कठोर होत जातो त्याप्रमाणें सिंधचा सूर्यताप सकाळपासून प्रतिक्षणीं वाढत जातो. अस्तमान झाल्यावरहि सूर्यकिरणानें तापलेले पदार्थ मनुष्याला सतावीत असतातच. रात्रीं उष्ण वारे वाहतात यामुळें सारखी तगमग होते. त्यांत बंदीखाना म्हणजे नुसती उकडहंडी. अंगावर फोड येतात. असें हें तप एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, सतत सहा वर्षें बापटांनीं केलें. या काळांत मराठी रचना कांहीं केल्याचें दिसत नाहीं. काम आणि उन्हाळा यामुळें तें शक्य झालें नसावें. हें सर्व सहन कां केलें ? तर आपल्या मनाच्या समाधानाकरितां.

'असे सत्य हिंसा प्रसंगीं स्वधर्म'

हें जगास कळविण्याकरितांच नाहीं का ? नाहींतर चार मजुरांस थोड्याशा जखमा करून का ते स्वराज्य घेणार होते ?

## १८

# तत्त्वाकरितां पुनश्च तप

बापटांना १९२५ सालीं सात वर्षांची शिक्षा झाली व त्यांना सिंध हैद्राबाद येथें पाठविण्यांत आलें हें आपण मागें पाहिलेंच. दर महिन्याला सक्त

मजुरीच्या कैद्याला चार दिवस माफी मिळत असते. शिवाय वर्षाच्या शेवटीं मध्यंतरीं कांहींएक शिक्षा न झाली तर वीस दिवस अधिक मिळतात. म्हणजे साधारणतः दर वर्षाला दोन महिने माफी मिळूं शकते. बापटांना अशा रीतीनें एक वर्ष माफी मिळाली व ते एकतीस सालच्या तेवीस मे ला सुटले. त्यांच्या या साडेपांच सहा वर्षांच्या गैरहजेरींत हिंदुस्थानच्या राजकीय वातावरणांत फार मोठा फरक झाला होता. ज्या देशांतील लोक आपली परिस्थिति बदलून घेण्याचा सारखा प्रयत्न करीत आहेत अशा देशांतला एखादा मनुष्य सहा वर्षांनीं जर पुनरपि आपल्या देशांत आला तर त्याला केवढा तरी फरक आढळून येईल. टिळकांना असेंच झालें होतें. पण टिळक ज्या वेळेला परत आले त्या वेळीं महाराष्ट्र एक थंड गोळा झाला होता. जिकडेतिकडे राजनिष्ठेस ऊत आला होता. लोकांचे पुढारी वाङ्मयाच्या उद्यानांत गर्क झाले होते. जे कवि पूर्वीं भैरवाच्या तांडवनृत्याचें वर्णन करण्यांत सार्थकता मानीत होते ते प्रेमरसाचें अभ्यंग स्नान करण्यांत धन्यता मानूं लागले होते. हा सर्व देखावा पाहून टिळकांचें मन विषण्ण झालें. पण बापट ज्या वेळीं लोकांत आले त्यावेळीं हिंदुस्थानचा कायापालट झालेला दिसला. १९२५ सालचें कुंद वातावरण आज नाहींसें झालें होतें.

'पक्ष पक्ष हे दक्षपणानें अन्योन्यां छळिती ॥'

ही स्थिति आज नाहींशी झाली होती. १९३० सालचा गांधींचा दांडीमार्च ही आज यक्षिणीची कांडी ठरली होती. सर्व हिंदुस्थानांतल्या आबालवृद्ध नर-नारींच्या अंगांत वीरश्री संचरली होती. जिकडेतिकडे उत्साह व त्याग यांचें भरघोस पीक आलें होतें. शत्रूंनींहि ज्यांच्या धैर्याचें तेज पाहून तोंडांत बोटें घालावीं असें धारास्नाच्या मिठागराचें युद्ध महाराष्ट्रीयांनीं लढविलें होतें. उत्साह व वीरवृत्ति यांच्या भरतीनें महाराष्ट्रांतला खळमळ पार धुवून गेला होता. स्वराज्य हाताजवळ आलें असें प्रत्येकाला वाटत होतें व गांधी-आयर्विन तहानें तर सर्वांवर कळस चढविला. बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याचा राजप्रतिनिधि हा लोकांच्या प्रतिनिधीबरोबर बरोबरीच्या नात्यानें तह करतो आणि हा प्रसंग निःशस्त्र युद्धानें येतो ही स्थिति हिंदुस्थानच्या इतिहासांत अहिंसेचा विजय म्हणून उल्लेखिली जाईल.

अशा या काळांत बापट सुटून आले. सुटून आल्याबरोबर एकंदर परिस्थि-तीचा विचार करतां त्यांना सुखहि झालें व दुःखहि झालें. सुख अशाकरितां कीं, राष्ट्र जागृत आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्याची त्याची शक्ति वाढत आहे.

तरुणांच्या टोळ्यांवर टोळ्या आत्मयज्ञ करण्यास सिद्ध आहेत. मुळशी दृष्टिआड झाली असेल पण राष्ट्रीय अन्याय दृष्टिआड झालेला नाहीं. थोराचें मन, तत्त्वज्ञाचें मन शब्द व स्थळ यांच्या अतीत जाऊं शकतें. या तत्त्वज्ञाच्या मनानें बापटांनीं तीस सालच्या कायदेभंगाच्या मोहिमेकडे व त्याच्या परिणामाकडे पाहिलें व त्यांच्या मतानें आशादायक अशा काळाचें बापटांना दर्शन घडवलें. यामुळें प्रसन्न होऊन मुळशी प्रकरणावर पडदा पाडावयाचा असें त्यांनीं थोर अंतःकरण करून ठरविलें. धर्मराजानें ज्याप्रमाणें वनवासाच्या अंतीं दुर्योधनाजवळ अर्ध्या राज्याच्या ऐवजीं पांच गांवें मागितलीं त्याप्रमाणें बापटांनीं टाटा कंपनीजवळ अगदीं साध्यांतलें साधें, नुसत्या पश्चात्तापाच्या दोन बोटी चिठ्ठीचें एक पत्र मागितलें; व तें पत्र कोणाला द्यायचें ? स्वतःला का ? नव्हे—म. गांधींना. सर्व जगांत वंद्य अशा पुरुषाजवळ नुसता पश्चात्ताप व्यक्त करा एवढी साधी बापटांची मागणी होती. पण तीसुद्धां पुरविली गेली नाहीं. त्यानंतर त्यांना जें आशादायक चित्र दिसत होतें, तिकडे त्यांनीं आपली दृष्टि वळविली. त्यावेळीं त्यांच्या मनाला वाटलें कीं देशसेवा करण्याला, स्वराज्याकरितां धडपड करण्याला, आतां संधि आहे. या संधीचा फायदा घेऊन मी कृतार्थ होईन असें म्हणून ते राष्ट्रसेवेकरितां मनानें सज्ज झाले. सेवकाचा वेष त्यांनीं लगेच धारण केला.

### *अखंड कैदी*

हिंदुस्थान देश अखंड गुलामगिरीच्या कैदेंत आहे. हिंदवासीयांना येरवडा तुरुंगांत असलें काय किंवा बाहेर असलें काय, सारखेंच! ही गोष्ट प्रतीत व्हावी, गुलामगिरीची सतत आठवण राहावी म्हणून त्यांनीं कैदी गणवेष तयार करवून तो घालण्यास सुरुवात केली. जरा लोकविलक्षणच हा वेष दिसे. पण थोरांची वृत्ति सामान्यांस कशी कळावी ? गांधींचा पंचा असाच लोकविलक्षण दिसतो. पण गांधी या पंच्याच्या रूपानें दरिद्री हिंदी लोकांच्या जीवनाशीं एकरूप होऊं इच्छितात, हें आपल्या ध्यानीं येत नाहीं. असो.

बापट अशा रीतीनें आपला काल व्यतीत करीत असतां, महाराष्ट्राचें नेतृत्व स्वीकारण्याची अपूर्व संधि त्यांस प्राप्त झाली. ही संधि एका अर्थानें सेवेला अनुकूल अशी दिसत होती. परंतु तिचें स्वरूप शेवटीं भयंकरच ठरलें आणि बापटांना तत्त्वाकरितां पुनश्च तप करण्याचा प्रसंग या संधीनें आणला.

१९३१ सालीं गांधी–आयर्विन तहानें कॉंग्रेसचें वजन देशांत भलतेंच वाढलें. अशा वजनदार संस्थेचीं अधिकारसूत्रें आपल्या हातांत असावीं याबद्दल महाराष्ट्रांत स्पर्धा सुरू झाली. ही स्पर्धा हितवर्धक (Healthy) नसून महत्त्वाकांक्षेच्या पोटीं उत्पन्न झालेली होती. यामुळें महाराष्ट्रांत वाईट वातावरण उत्पन्न होऊं लागलें होतें. अशा ह्या काळांत बापट सुटून आले होते. या संधीचा फायदा घेऊन कांहीं मंडळींनीं सुंदोपसुंदी थांबविण्याकरितां बापटांचें नांव पुढें केलें. बापटांबद्दल महाराष्ट्रांत खूप आदर होता. त्याग, बुद्धिमत्ता, उच्च ध्येयवादित्व, जें काम हातीं घेतील त्याचा पिच्छा पुरविण्याची शक्ति, यांमुळें बापटांचें नांव पुढें येतांच सर्वांना नवें स्फुरण चढलें. दोघेहि प्रतिस्पर्धी उमेदवार गप्प बसले म्हणण्यापेक्षां त्यांना गप्प बसावें लागलें. पण कांहीं जणांना बापटांचें हें आगमन धूमकेतूसारखें अनिष्टसूचक वाटलें. ते म्हणूं लागले कीं बापटांच्या गुणांबद्दल वादच नाहीं. ते जें अध्यक्षपद स्वीकारतील तें महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन स्वीकारणार नाहींत तर सेवाभावानें, ध्येयवादानें प्रेरित होऊन स्वीकारतील ही गोष्ट खरी असली तरी त्यांची विचारसरणी सशस्त्र क्रांतीला अनुकूल अशी आहे. कॉंग्रेसवर गांधींच्या अहिंसेची जी छाप आहे ती बापटांच्या वृत्तीला व तत्त्वज्ञानाला विसंगत अशी आहे. कॉंग्रेसचें तत्त्व ते कसोशीनें पाळतील पण लोकांना सांगतील कीं हा नित्यधर्म नव्हे. प्राथमिक हालचालीस हा धर्म उपयुक्त आहे पण शेवटीं तुम्हांला हातीं शस्त्र हें घ्यावें लागणारच ! असें त्यांनीं म्हटलें कीं, गांधींच्या विचारसरणीवर पाणीच फिरणार ! अशा मनुष्याला विरोध करावा तरी बरें नाहीं, लोकांत अप्रियता उत्पन्न होते. बरें, मान्यता द्यावी तर अहिंसक वातावरणांत विक्षेप येतो. शेवटीं बापटांची निवड झालीच. त्यांना कोणीहि विरोध केला नाहीं.

बापटांनीं अध्यक्षपद स्वीकारल्याबरोबर औपचारिक आभार वगैरे गोष्टींस त्यांनीं फांटा दिला व ते एकदम कामास लागले. त्यावेळीं कॉंग्रेसच्या अधिकारी मंडळांत ते खादीधारी आहेत कीं नाहीं हा वादविवादाचा प्रश्न असे. तो खादीधारी म्हणजे हातसुताची व हातविणीची खादी तो वापरतो का ? या प्रश्नाचा निकाल बापटांनीं खादीशास्त्र न पहातां एकदम दिला कीं, ‘ मनुष्य मी खादीधारी आहें असें म्हणतो आहे ना ? तर मग तो तसा आहेच.’ अशा तऱ्हेचा निर्णय हा, खादीनें स्वराज्य मिळेल अशी ज्यांची भावना होती त्यांना धक्का देणारा वाटला. बापटांचें

मन त्या वेळेला देशामध्यें पुन्हा चैतन्य कसें आणावें याकडे लागलेलें होतें. त्यांना या तांत्रिक गोष्टींची फारशी किंमत वाटत नव्हती. म्हणून त्यांनीं अशा तऱ्हेचे वाद भराभर निकालांत काढले. महाराष्ट्र प्रांतिकची सभा संपली, मंडळी घरोघर गेली, अध्यक्ष कोणी व्हावयाचें याबद्दलचे वाद मिटले व बापट एकदम कामाला लागले. गांधी-आयर्विन करारांत परदेशी कापडावर निरोधन करण्याचा प्रत्येक मनुष्याचा हक्क सरकारनें मान्य केला होता. गांधींची इच्छा अशी होती कीं या लहानशा निर्णयांतून शांततेनें फार मोठें कार्य करून घ्यावें. गांधी-आयर्विन तह हा दिसायला तसा अगदीं साधा आहे. लोकांनीं तहामध्यें महत्त्वाची अशी जर कोणती गोष्ट पाहिली असेल तर व्हाईसरॉय व लोकांचे पुढारी यांनीं बरोबरीच्या नात्यानें तह केला. गांधींना त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. कारण आयर्विननें हा जो तह केला तो गांधींच्या व्यक्तिमत्वावर खूष होऊन केला. गांधींना असें वाटत नव्हतें, कीं आपण आयर्विनला नमविलें. त्यांनीं एवढेंच पाहिलें कीं समुद्रकांठच्या लोकांना नैसर्गिक मीठ नेण्याचा हक्क या तहानें मिळाला आहे. त्याचप्रमाणें परदेशी कापडावर शांततेनें पिकेटिंग करण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. या दोन हक्कांतून गांधी प्रचंड संघटना निर्माण करणार होते. पण कॉंग्रेस-जनांचीं डोकीं या तहानें भडकलीं होतीं. आत्मविश्वासापेक्षां उद्दामपणाकडे त्यांचा कल होत होता आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांना गांधींनीं मिळविलेलें सर्व हिरावून घ्यायचें होतें. एवढेंच नव्हे तर कॉंग्रेसचा पुरा नायनाट करावयाचा होता. या दोन वृत्तींमुळें कुणाचाच फायदा झाला नाहीं आणि कॉंग्रेसला पुन्हा वनवासाचे दिवस आले.

बापटांनीं परदेशी कापडावरच्या निरोधनांत वर्धिष्णु शक्ति पाहिली—व तें कार्य त्यांनीं धडाडीनें हातीं घेतलें. ते स्वतःच कापडदुकानावर चारचार सहासहा तास बसून राहात. तीस सालच्या चळवळींत ज्या वेळेला दंगल माजत असे त्यावेळीं निरोधन करण्यास पुष्कळ स्वयंसेवक मिळत पण आजच्या एकतीसच्या निरोधनास बापटांसारखा पुढारी लाभला असतांना सुद्धां पाहिजे तेवढे लोक मिळत नसत. तरी पण त्यांनीं आपलें काम नेटानें चालू ठेवलें होतें.

१९०६ सालापासूनच वैयक्तिक खून बापटांना नापसंत होते. ते अनिष्ट असेंच त्यांना नेहमीं वाटे. पण राजकीय गोष्टीला प्राधान्य देऊन जो मनुष्य असल्या गोष्टी करतो त्यानें वकिली डावपेचांचा अंगिकार करूं नये. आपण जी गोष्ट केली ती उघड सांगावी. सार्वजनिक हितबुद्धीनें जी गोष्ट मनुष्य करील तिचे परिणाम त्यानें आनंदानें सोसले पाहिजेत. या विचारसरणीला धरून

बापटांनीं गोगट्यांना पत्र लिहिलें कीं, मी अपराध केला नाहीं, मी गोळी झाडली नाहीं, असें जें तूं कोर्टापुढें म्हणतो आहेस तें बरें नाहीं. तुझ्या मनोदेवतेला साक्ष ठेवून जी गोष्ट उच्च हेतूनें तूं केलीस ती देहरक्षणाकरितां लपविणें हा नैतिक अधःपात होय. लोकांना पटो वा न पटो, देहावर कोणतीहि आपत्ति कोसळो, आपल्याला जो नीतिपथ आवडला तो सोडून जाण्याचें केव्हांच कारण नाहीं. बापटांचें हें पत्र गोगट्यांना मिळालें नाहीं आणि त्यांनीं आपला अपराध कोर्टांत उघड सांगितला नाहीं. यामुळें बापट खूप अस्वस्थ झाले होते. अशा स्थितींत त्यांनीं नित्याचें काम सोडलें नाहीं. पिकेटिंगचा फैलाव महाराष्ट्रांत करण्याकरितां ते लौकरच दौऱ्यावर निघाले. बापटांचा दौरा हां हां म्हणतां लोकांत चैतन्य निर्माण करतो. हा दौरा असाच चालू राहाता तर—पण तर सांगून काय करावयाचें? दैवानें या त्यांच्या कार्याला निराळी कलाटणी दिली. बऱ्याच प्रतिकूल अशाहि परिस्थितींत बापटांच्या पिकेटिंगचा प्रभाव चांगला पडूं लागला आणि हें काम असेंच चाललें असतें तर बापटांच्या पिकेटिंगनें राष्ट्रांत गांधींच्या अपेक्षेप्रमाणें विराट स्वरूप धारण केलें असतें. पण एके दिवशीं बापटांच्या या उद्योगाला कलाटणी मिळण्याचा निराळाच प्रसंग आला.

### *गोगटे प्रकरण*

१९३० सालीं कायदेभंगाची मोहीम ज्या वेळेला सुरू होती त्या वेळीं मुंबईनें पराक्रमाची शर्थ केली होती. व्यापाऱ्यांनीं पैशाचा ओघ मुक्त हस्तानें सोडला होता. स्वयंसेवक तर लागतील तेवढे मिळत होते. हरताळ किती पाळावे याला सीमा नव्हती. या झाल्या साध्या गोष्टी. पण मुंबईंत जें नवें चैतन्य निर्माण झालें तें लाठीमारानें. आझाद मैदानावर स्वयंसेवकांनीं परेड करूं नये असा सरकारनें हुकूम काढला होता. या हुकुमाच्या अन्यायीपणाला तोंड देण्याकरितां काँग्रेसनें तो हुकूम तोडण्याचें ठरविलें होतें व स्वयंसेवकांच्या तुकड्यांवर तुकड्या पाठविण्यास सुरुवात केली होती. जी जी तुकडी आझाद मैदानावर जाई तिच्यावर पोलीस लाठीहल्ला चढवीत. इंडियन शिपायांचा हात कचरे आणि ते पुष्कळदां जमिनीवरच लाठ्या हापटीत. पण सार्जंट लोकांनीं आपल्या दंडुक्यांनीं तरुण-तरुणींचीं मस्तकें फोडून रक्तबंबाळ करावीं, असा प्रकार नित्य चाले. पण सत्याग्रही मागें हटेनात. यांत पुरुषांप्रमाणें स्त्रियाहि होत्या. याला उद्देशून लोकगीतांत एका ठिकाणीं म्हटलें आहे—

‘आझाद रणांगण गाजविलें।
महिलांनीं पुरुषां लाजविलें॥’

या प्रसंगानें अनेक लोकांचीं हृदयें विरघळून गेलीं. कॉंग्रेसपासून दूर दूर राहाणारे प्रतिष्ठित लोक धडाधड या युद्धांत सामील झाले. मुंबईनें, चैनीची चट असलेल्या मुंबापुरीनें, वैभवांत लोळणाऱ्या मुंबादेवीनें, आज महिषासुरमर्दिनीचें रूप धारण केलें होतें. रणचंडी हें नांव मुंबईच्या बाबतींत सार्थ झालें होतें. स्थितप्रज्ञ महात्माजी सुद्धां तीस सालचा मुंबईचा पराक्रम आठवून–विशेषतः महिलांनीं आझाद रणांगण जें गाजविलें त्याची आठवण होऊन—अजूनहि गहिंवरतात. सरकारच्या या अमानुष हल्ल्यानें कॉंग्रेसजन कचरत नसत. उलट त्यांच्या अंगांत अधिकाधिक वीरश्री चढत जाई. पण जी मंडळी दूर होती, ज्यांनीं हे वृत्तांत वृत्तपत्रांत वाचले किंवा ऐकले त्यांचीं मनें थरारून जात. सरकारच्या संबंधानें त्यांच्या मनांत चीड उत्पन्न होई. अधिकाऱ्यांना खाऊं का गिळूं असें कांहींना होई. मुंबईच्या लाठीमाराचा जनक हॉटसन या नांवाचा एक सरकारी वरिष्ठ अधिकारी होता. हा गृहस्थ पुष्कळ वेळां एखाद्या उंच बिल्डिंगवर उभा राही व तेथून खालील भीषण देखावा कौतुकानें पाही. दिल्लीस अठराव्या शतकाच्या मध्यावर ज्या वेळीं शहरांत भयंकर कत्तल चालली होती तेव्हां ती तैमूरलंग अशाच क्रूर नजरेनें पहात होता असें इतिहासकार सांगतात. हॉटसन पुढें गव्हर्नर असतांना एक दिवस पुण्याचें फर्ग्युसन कॉलेज पहायला आला. श्री. गोगटे नांवाच्या एका विद्यार्थ्याच्या मनांत फार दिवस खळबळ माजून राहिलेली होती. मुंबईचे लाठीहल्ले त्याला सहन होत नव्हते. त्यानें मनांत आणलें कीं या लाठीहल्ल्याचा सूड आपण घेतला पाहिजे! कोणालाहि त्यानें आपल्या या विचारांत सामील करून घेतलें नाहीं; व गव्हर्नर ज्या दिवशीं आला त्या दिवशीं संधि साधून हॉटसनवर गोळी झाडली. पण हॉटसन त्या दिवशीं आंत चिलखत घालून आला होता—यामुळें गोळी त्याच्या छातींत घुसूं शकली नाहीं. गोगटे पकडले गेले. ते चांगल्या संपन्न घराण्यांतील होते. त्यांचा खटला चालविण्याकरितां घरच्या मंडळींनीं अण्णासाहेब भोपटकरांना वकीलपत्र दिलें. अण्णासाहेब वकिलीच्या धंद्यांत अतिशय निष्णात. त्यांनीं या खटल्यांत, आपण गोळी झाडलीच नाहीं अशी कैफीयत देण्यास गोगटे यास सल्ला दिला व नंतर पुढची केस आपल्या कौशल्यानें व वक्तृत्वानें चांगलीच रंगवली. पण वकिली कौशल्य हें सत्य गोष्ट कशी लपविणार? आणि त्यांत प्रत्यक्ष गव्हर्नरवर

झालेला हल्ला. सरकारी पुरावा सबळ होता. यामुळें इंडिअन ज्यूरीला देखील गोगटेंना अपराधी म्हणून ठरवावें लागलें. खुनाचा प्रयत्न म्हणून गोगटेंना आठ वर्षांची शिक्षा देण्यांत आली.

### साधे प्रश्न व घातक उत्तरें

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें बापटांनीं पुणें, सातारा, नगर, सोलापूर, ठाणें, रत्नागिरी, कुलाबा या जिल्ह्यांतून परदेशी कापडाच्या उच्चाटनाचा प्रचार जोरानें सुरू केला. व्याख्यानें, मुलाखती, निरोधन, सीलबंदी, खासगी बैठकी, वगैरे उपायांचा त्यांनीं उपयोग केला.

अहिंसा-हिंसा, अस्पृश्योद्धार, स्वदेशी, हिंदुमुसलमान ऐक्य, स्वराज्याचा अर्थ या विषयांबद्दल त्यांच्यापुढें लोकांकडून सवाल टाकण्यांत येत. त्या प्रश्नांना बापट सडेतोड उत्तरें देत. तींच शेवटीं त्यांच्या प्रदीर्घ बंदीवासाला कारणीभूत झालीं.

'अहिंसात्मक कार्यक्रमाच्या उपयुक्ततेबद्दल जर कुणाचा माझ्याशीं मतभेद झाला आणि त्यानें तत्त्व म्हणून हिंसामार्गाचें अवलंबन केलें तर तो एक तत्त्वप्रेमी माणूस आहे म्हणून त्याच्या कृत्याचें समर्थन करणें हें मी माझें कर्तव्य समजतों. कारण माझ्या मतानें कोणत्याहि कृत्याचा बरेवाईटपणा त्या कार्याच्या मागें असलेला विचार आणि भावना यांच्यावर अवलंबून असतो,' असें ते सांगत.

बापटांनीं वरील विचार कित्येक ठिकाणीं खाजगी व जाहीर सभांतून बोलून दाखविण्यास आरंभ केला. तेव्हां अहिंसेच्या पुरस्कर्त्यांनीं त्यांना हटकून विचारलें कीं, आपण प्रांतिक कॉंग्रेसचे जबाबदार श्रेष्ठ अधिकारी आहां. कॉंग्रेसनें तर अहिंसेचा पुरस्कार केलेला आहे. तेव्हां हिंसात्मक गोष्टींचा आपल्या व्याख्यानांतून आपण कसा पुरस्कार करूं शकतां? यावर बापट म्हणत, 'प्रत्येकाला स्वतंत्र विचार करतां येतो. गीता ग्रंथाचा आपल्या बुद्धीप्रमाणें प्रत्येक जण अर्थ लावूं शकतो. त्याचें हें स्वातंत्र्य काढून घेण्याची इच्छा आपण करूं नये. ती हिंसा होईल. कॉंग्रेसची भूमिका मीं सोडलेली नाहीं. याउपर अध्यक्षपदावरून मला काढून टाकावें असा बहुमतानें जर निर्णय दिला तर तो मी मान्य करीन.'

यानंतर बापटांना कोणी सूचना करण्याच्या भानगडींत पडलें नाहीं. ठिकठिकाणीं बापटांचीं व्याख्यानें जारीनें चाललीं होतीं. त्या व्याख्यानांत ठिकठिकाणीं लोक नाना तऱ्हेचे प्रश्न विचारीत. हिंसाहिंसेचा प्रश्न निघाला म्हणजे मग बापट त्या प्रश्नांचीं तात्त्विक दृष्ट्या मीमांसा करीत आणि लोकांना सांगत कीं, कॉंग्रेसचा अहिंसक कार्यक्रमच आपण अंमलांत आणला पाहिजे.

एवढें सांगून बापट जर स्वस्थ राहते तर त्यांचा दौरा परदेशी कापडाच्या बहिष्काराच्या दृष्टीनें खूप यशस्वी झाला असता. पण तसें व्हावयाचें नव्हतें. जो क्षत्रिय आहे त्याला लढ्याचें आव्हान दिलें तर तें आव्हान स्वीकारल्याशिवाय तो कधींहि राहत नाहीं. मग हें आव्हान त्याच्या पूर्ण नाशास कारणीभूत होणार असलें तरी तो त्याची पर्वा करीत नाहीं. कारण,

'संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ।'

कारण जो संभवित आहे त्याला मरण पत्करतें पण अपकीर्ति पत्करत नाहीं. धर्मराजाला द्यूत खेळण्याबद्दलचें निमंत्रण अशाच वृत्तीमुळें नाकारतां आलें नाहीं. पुढचा प्रसंग, कौरवांचा डाव, त्याला कळला नव्हता असें नाहीं. त्याला तशा सूचनाहि देण्यांत आल्या होत्या. पण क्षत्रियानें द्यूताचें निमंत्रण नाकारावयाचें नाहीं हा बाणा कायम ठेवण्याकरितां सर्वनाशास कारण होणाऱ्या अशा द्यूतांत त्यानें शेवटीं भाग घेतलाच. बापटांना विचारण्यांत येणारे प्रश्न त्यांना पाशांत गोवणारे होते. आत्तां या अशा प्रश्नांची मीमांसा करीत बसूं नका. आपलें काम परदेशी कापडाच्या बहिष्काराच्या चळवळीचें आहे, असें त्यांस चिटणीसांनीं परोपरीनें सांगून पाहिलें. पण बापट म्हणत, मी आपण होऊन का हे प्रश्न उकरून काढतों आहें? लोकांनीं प्रश्न विचारले तर त्यांचीं सरळ उत्तरें देणें—माझ्या तात्त्विक मनाला जें पटतें तें सांगणें—माझें काम आहे, व तें मी केव्हांहि बजावल्याशिवाय राहणार नाहीं.

लोकोत्तराणां चेतांसि कोऽहि विज्ञातुमर्हति।'

लोकोत्तर बुद्धीचीं माणसें कोणत्या हेतूनें कामें करीत असतात याची कल्पना आपणाला कशी होणार?

याबाबत पं. जवाहरलाल नेहरूंचें उदाहरण सांगतां येईल. कॉंग्रेसच्या कौन्सिल निवडणुकी व्हायच्या होत्या व त्याकरितां जवाहरलालनीं पन्नास हजार मैलांचा दौरा काढला होता. हजारों लोक त्यांच्या सभेला येत. एकेका दिवसांत नऊनऊ सभा होत. खेड्यांतल्या लोकांना कॉंग्रेसच्या तत्त्वज्ञानानें भरलेलें व्याख्यान कुठें समजत होतें? लोकांची अपेक्षा एवढीच होती कीं जवाहरलालनीं दर्शन द्यावें, हार स्वीकारावे व कॉंग्रेसला मत द्या असा आदेश द्यावा. पण जवाहरलालनां एवढ्यावर समाधान नव्हतें. ते प्रत्यक वेळीं प्रत्येक ठिकाणीं पाऊण पाऊण तास कॉंग्रेसचें तत्त्वज्ञान समजावून सांगत. त्यांना जर सूचना केली कीं अशा रीतीनें

आपला कार्यक्रम पुरा होणार नाहीं, लोकांना इतकें लांब भाषण नको आहे, तर तें त्यांना मानवत नसे. प्रत्येक ठिकाणीं पूर्ण भूमिका सांगण्यानें फार वेळ जात असे. त्यांच्या शक्तीवर ताणहि पडत असे आणि कार्यक्रम लांबे. हें सर्व दिसत असून जवाहरलाल सर्व कष्ट सोसून, कार्यकर्त्यांची थोडीशी इतराजी पत्करून, कॉंग्रेसची भूमिका लोकांना ऐकवीतच. हें असें कां? इतका व्यवहारदक्ष पुढारी, लोकांच्या नाडीवर ज्याचा हात आहे, असा नेता कंटाळवाणीं भाषणें कां करतो हें सामान्य माणसाच्या बुद्धीच्या आटोक्यांत येत नाहीं. जवाहरलालनां कदाचित् असेंहि वाटत असण्याचा संभव होता कीं या हजारों लोकांत एकाला जरी माझा कॉंग्रेसचा संदेश, कॉंग्रेसची भूमिका, कॉंग्रेसचें तत्त्वज्ञान यथार्थ समजलें तरी पुरे. या एका माणसांतून पुढें हजारों माणसें निर्माण होतील. जिवंत दिव्यावर जिवंत दिवे लागतील. अर्धवट भाषणें, व्यवहार ओळखून वेळ मारून नेणें, यानें राष्ट्रांत जिवंत माणसें निर्माण होणार नाहींत.

बापटांनाहि असेंच वाटत असलें पाहिजे. मला प्राप्त झालेले मंत्र, मी कष्टानें संग्रहित केलेलें तत्त्वज्ञान, लोकांना सांगण्याची संधि आली असतां मी ती देहावर ओढवणाऱ्या आपत्तीच्या भयानें घालवूं का? मग मी सत्याचा खरा उपासक तो काय? अशी बहुधा बापटांची विचारसरणी असावी. म्हणून त्यांनीं पुढीलप्रमाणें आपले विचार रत्नागिरीच्या एका सभेंत परिणामांचा विचार न करतां मांडले. 'कॉंग्रेसचा अहिंसात्मक कार्यक्रम त्रिकालाबाधित आहे कीं नाहीं असें जर आपण विचाराल तर मला माझ्या अंतःकरणांतर्गत श्रीहरीच्या आज्ञेप्रमाणें आपणाला असें सांगावें लागेल कीं तो तसा नाहीं. इतिहासाची तशी शिकवणूक नाहीं. 'जरूर तर माझ्या देशबांधवांच्या रक्ताचा गंगानदीएवढा पूर मी वहायला लावीन' असें महात्माजींनीं गोलमेजांत इंग्लिश मुत्सद्यांना बजावलें. गोष्ट मला मान्य आहे. पण या गंगेशीं कधीं कधीं शत्रूच्या रक्ताच्या यमुनेचा व शत्रूला मदत करणाऱ्या स्वबांधवांच्या रक्ताच्या सरस्वतीचाहि संगम व्हावा लागतो असें प्राचीन तथा अर्वाचीन इतिहास सांगतो.' या भाषणाचा रिपोर्ट सरकारकडे गेला व त्यांना पुढें डहाणू–उंबरगांवाला अटक करण्यांत येऊन रत्नागिरीच्या कोर्टापुढें उभें करण्यांत आलें. तेथें कै. दादासाहेब करंदीकरांसारखे नाणावलेले वकील त्यांचा बचाव करण्याकरितां पुढें आले होते. पण बापटांनीं लगेच उभें राहून कोर्टाला सांगितलें, 'गुन्हा मला मान्य आहे, सुचेल ती शिक्षा द्या.' कोर्टानें बापटांच्या मनोवृत्तीचा यत्किंचितहि विचार न करतां एकदम सात वर्षांची सजा सुनावली–– व बापटांना पुन्हा तत्त्वाकरितां तप करण्याचा प्रसंग आला.

रत्नागिरी येथें त्यांनीं कांहीं वर्षे काढल्यावर त्यांना बेळगांवास नेण्यांत आलें; व सन १९३७ च्या जुलै महिन्यांत त्यांची मुक्तता कॉंग्रेस सरकारनें केली. कॉंग्रेस सरकारच्या हातांत अधिकार आल्याबरोबर त्यानें केलेलें हें पहिलें कार्य होय.

रत्नागिरीस बापटांनीं पुष्कळ लेखन केलें. आपल्या मुलांना त्यांनीं जीं पत्रें पाठविलीं तीं मोठीं उद्बोधक व त्यांच्या चारित्र्यावर प्रकाश पाडणारीं आहेत. या तुरुंगवासांतील त्यांच्या वाङ्मयाची चर्चा आपण स्वतंत्र प्रकरणांत करूं. आतां तत्त्वाकरितां तप या प्रकरणांत एक भाग राहिला आहे तेवढा आपण संपवूं या.

जगाच्या व्यवहारांत लढायांना स्थान आहे. इतकेंच नव्हे तर सशस्त्र युद्धें होतात त्यांना इंग्रज सरकार व त्यांचे हस्तक हे नेहमीं उचलून धरतात. राजकारणांत गांधींनीं सत्य व अहिंसा आणली म्हणून टाईम्स ऑफ इंडिया सारखीं पत्रें कुचाळी करतात; व त्यांची री पुष्कळ देशी पत्रेंहि ओढीत असतात. या पत्रांच्या टीकेचा आशय असाच नाहीं का कीं जगांत शस्त्र घेतल्याशिवाय शेवटचा निकाल लागत नाहीं? आणि असें अनेक वेळां म्हटलें गेलें असतांना या लोकांवर खटले कां भरले जात नाहींत? व तीच गोष्ट बापटांनीं सांगितल्यावर त्यांना सात वर्षांची शिक्षा होते. बापटांनीं या दौऱ्यांत हिंसाअहिंसेची नुसती चर्चा केली होती. अहिंसा मर्यादित आहे असें सांगितलें होतें. प्रत्यक्ष बंड कांहीं केलें नव्हतें. उलट कॉंग्रेसच्या अहिंसेचाच कार्यक्रम तुम्ही सध्यां उचला असें ते लोकांना बजावीत. अशा स्थितींत बापटांवरती सरकारी पाश कां पडले हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

टाईम्स पत्र अहिंसेची ज्या वेळीं टवाळी करतें त्याच वेळीं इंग्रजांच्या शस्त्रग्रहणाचा पुरस्कार करीत असतें. कांहीं देशी पत्रें अहिंसेची टिंगल करतांना इंग्रजी हिंसेला उचलून धरीत. या दोन्ही गोष्टी सरकारला अनुकूल अशाच असत. त्यामुळें या पत्रांकडे सरकार आपलेपणानें पाही. पण बापट ज्या वेळेला हिंसात्मक कार्यक्रम कधींकधीं हातीं घ्यावा लागतो असें जनतेला सांगत त्यावेळीं ते कांहीं जर्मनीविरुद्ध इंग्रजांनीं उपसलेल्या तलवारीचा पुरस्कार करीत नसत. तर स्वातंत्र्यप्राप्तीकरितां शेवटीं तलवार घेतली पाहिजे, असाच त्यांचा आशय असल्यामुळें, म्हणजेच पर्यायानें इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंड केलें पाहिजे, ही विचारसरणी सरकारला राजद्रोही वाटे. हिंसात्मक युद्धाला मान्यता देऊन लोकांना हा आपल्यावरच उलटायला शिकवतो आहे अशी सरकारची खात्री झाली म्हणूनच बापटांना सात वर्षें सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली. बापट अत्यंत प्रांजळ आहेत, तत्त्वाचे मोठे प्रणेते व महान् ऋषि आहेत याची पर्वा न्यायाधीश कशाला करील?

तो पीनल कोडांतील कलम पाहून त्यांतील प्रत्येक शब्दाच्या अर्थावर जोर देऊन शिक्षा देणार. मानवी मनोवृत्तींत शिरण्याचें त्याला काय कारण? ज्यांची त्यानें भाकरी खाल्ली त्यांची चाकरी त्यानें यथार्थ बजावली. दुसऱ्या बाजूला बापटांनीं हरीची चाकरी पत्करली होती व आपल्या मनोदेवतेला स्मरून ते वागत आणि असें वागण्यानेंच हरीची आपण चाकरी करतों असें त्यांना वाटे. इतकेंच नव्हे तर त्यामुळें त्यांना परमशांतीचा लाभ होतो असें त्यांनीं अनेक वेळां बोलून दाखविलें आहे.

दुराचारि ही चाकरी जो करील । तया शाश्वती शांति काळें वरील ॥
प्रतिज्ञा खरी ही खरी श्रीहरीची । मला लाभली शांति अभ्यंतरींची ॥

अशा या शांतिसुखाचा लाभ मिळविण्याकरितां सात वर्षांचा देहदंड सोसण्यास ते आनंदानें तयार झाले म्हणूनच या प्रकरणास तत्त्वाकरितां तप असें नांव दिलें आहे. या त्यांच्या आनंदाची कल्पना त्यांच्या मनाशीं एकरूप झाल्याशिवाय कशी बरें येणार?

'जळामध्यें मासा झोप घेतो कैसा
जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे।'

१९

# बलिदानाची उत्क्रांति

'तुझ्या गुणाब्धे सुकृता कराच्या। उदात्त इच्छा असणार साच्या ॥'

बापट हे सशस्त्र क्रान्तीचे पुरस्कर्ते असले तरी ते हिंसक वृत्तीचे, क्रूर, रक्तपिपासू प्राणी नव्हत.

राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां हिंदभूच्या सेवेप्रीत्यर्थ त्यांनीं आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षीं सायंकाळीं तलवारीवर हात ठेवून शपथ घेतली कीं, 'माझ्या

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं माझ्या सर्व शक्ती मी अर्पण केल्या आहेत व केव्हांहि प्राणार्पण करण्यास मी तयार आहें.' या शपथविधीच्या प्रसंगाविषयीं मागच्या एका प्रकरणांत आम्ही सविस्तर विवेचन केलें आहे. बापटांना तो दिवस अत्यंत मंगलमय असा वाटला. पतिव्रतेला विवाहाचा काल जितका पवित्र वाटतो, त्यावेळीं घेतलेल्या शपथेंतील प्रत्येक शब्द-नव्हे-प्रत्येक अक्षर तिच्या हृदयांत खोल खोल जाऊन बसतें, इतकेंच नव्हे तर तिच्या रक्ताच्या प्रत्येक कणांत तो शब्द जसा मिसळून जातो, त्याप्रमाणें बापटांचें शरीर, मन आणि बुद्धि यांच्या अंशाअंशांत हा शपथविधि भरून गेला. भरून गेला असेंच केवळ नव्हे तर तेथें तो ठाम झाला—वज्रलेप झाला. बाविसाव्या वर्षापासून बासष्ट वर्षापर्यंतच्या काळाची गणना केली म्हणजे चाळीस वर्षें होतात. या चाळीस वर्षांत म्हणजे ५०० महिन्यांत, १५००० दिवसांत असा एकहि क्षण गेला नसेल कीं ज्या वेळीं बापटांना आपल्या शपथेची आठवण झालेली नाहीं. ह्या शपथेंत तलवारीला साधनाचें स्थान जरी असलें तरी शपथेचा गाभा 'आत्म-बलिदान' हा आहे. सर्व शक्तींचें समर्पण आहे.

त्यांनीं ही शपथ भावनावश होऊन जरी घेतलेली असली तरी शपथेंतील महत्त्वाचा भाग कोणता आणि गौण कोणता याचा विवेक ते चांगला करूं शकतात. गौण भागाला प्रधान भागाचें स्थान त्यांनीं कधींच दिलेलें नाहीं. त्याबरोबर हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं आपलें ध्येय साध्य करण्याचें साधन ही समशेर आहे या त्यांच्या विचारांत अजून बदल झालेला नाहीं.

'आत्मसमर्पण' ही मुख्य गोष्ट. बलिदान हेंच शपथेंतील महत्त्वाचें बीज. बापट ह्यांची बुद्धि अर्जुनाप्रमाणें दैवी संपत्तीची असल्यामुळें त्यांचें साधन समशेर असून सुद्धां ते रक्तपिपासू बनले नाहींत आणि सबंध आयुष्यभर बलिदानाच्या कल्पनेवरच त्यांनीं अधिक जोर दिलेला आहे. आणि ही बलिदानाची कल्पना प्रसंगाप्रसंगानें उत्क्रान्त होत जाऊन शेवटीं—

'भारतीय प्राणयज्ञदला'चें अतिविशुद्ध स्वरूप तिनें आज धारण केलेलें आहे. आतां आपण ही कल्पना कसकशी उत्क्रान्त होत गेली हें पाहूं.

विलायतेंत ते जे गेले ते इंजिनिअर होण्याकरितां. त्या वेळेला त्यांनीं घेतलेली शपथ त्यांच्या मनांत जरी जागृत होती तरी आपण शिक्षणक्रम एकदम टाकून देण्याची त्यांची कांहीं पहिली कल्पना असेल असें दिसत नाहीं. एका प्रसंगानें इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील राज्याचें खरें स्वरूप त्यांना सांगावें लागलें. तें सांगत असतांना आपल्या शपथेची पूर्णता करण्याची किती आवश्यकता

आहे हें त्यांच्या ध्यानीं आलें. हें ध्यानीं येतांच आपल्या उपजीविकेचें साधन जी इंजिनिअरिंग विद्या, ती त्यांनीं दूर सारली. याचाच अर्थ यापुढें त्यांचा संसार उध्वस्त झाला आणि देशस्वातंत्र्याकरितां त्यांच्या बुद्धीस जो कार्यक्रम त्यावेळीं पटला त्या कार्यक्रमांत ते सामील झाले. जें काम हातीं घ्यावें त्यांत शक्तिसर्वस्व ओतावें, त्यांत उच्चांक गांठावा, असा तेजस्वी पुरुषाचा स्वभाव असतो. त्या स्वभावाप्रमाणें बापटांच्या डोक्यांत भारताच्या स्वातंत्र्याच्या नित्य आड येणाऱ्या व्यक्तींना कायमचे दूर करण्याची कल्पना आली. इंग्रजांच्या राज्याविषयीं त्यांनीं जो निबंध वाचला त्यावेळीं त्यांना कल्पना होती कीं आपली स्कॉलरशिप ह्यामुळें बंद होईल. पण ती गोष्ट त्यांनीं केली आणि तिचे परिणाम आनंदानें सोसले. त्याचप्रमाणें भारताचें राज्य करणाऱ्या व्यक्तींना दूर करतांना आपल्यावर प्राणसंकट येईल हें ते जाणून होते पण त्याला त्यांची तयारी होती. कां? तर देश स्वतंत्र करण्याच्या अनेक पायऱ्यांपैकीं ती एक पायरी होती. आपल्या कृतीनें लोकांना एक जबरदस्त धक्का देऊन खडबडून जागें करावें हीच ती मनीषा. पण ती पूर्ण झाली नाहीं. पुढें कित्येक वर्षांनीं ते अज्ञातवासांत असतांना गंगेच्या ललिता घाटावर बसले असतां त्यांच्या डोक्यांत असा विचार आला कीं श्रीहरीच्या चरणारविंदीं—म्हणजेच देशमातेच्या स्थंडि-लावर आपल्या देहाचें पुष्प वहाण्याकरितां गंगेच्या पात्रांत आपण एकरूप होऊन जावें. ह्यांत प्रत्यक्ष फायदा काय, याचा विचार त्यांनीं त्यावेळीं फारसा केला नाहीं. मनांत त्या विचाराची वीज मात्र चमकून गेली. ह्याच्यापुढें मुळशी सत्या-ग्रहांत साम सत्याग्रह चालू असतांना त्यांचा देह पंचत्वाप्रत जाण्याचा प्रसंग आला होता. पण त्यांनीं झुंज घेतांना एकहि पाऊल मागें घेतलें नाहीं. साम सत्याग्रहा-नंतर शुद्ध सत्याग्रह सुरू करतांना बलिदानाचा प्रसंग हा आलाच. पण ह्या बलि-दानांत शत्रूशीं शारीरिक झुंज होती. शत्रूचाहि प्राण घेण्याचा संकल्प होता. पण इतक्या थरावर गोष्टी आल्याच नाहींत. शत्रूला मदत करणाऱ्या अज्ञानी लोकांचें थोडेंसें रक्त सांडून त्यांनीं गणेशपूजन केलें. पुढच्या गोष्टी शेवटच्या थरापर्यंत गेल्या नाहींत म्हणून ते जगूं शकले. जगूं शकले म्हणजे त्यांचा प्राण फक्त जगला पण सात वर्षांच्या तपश्चर्येत त्यांनीं आपलें शरीर इतकें झिजविलें कीं पुढें ते कोणतेंहि धडाडीचें कार्य करूं शकले नाहींत.

दुसऱ्या वेळीं प्रत्यक्ष अशी कठीण कृति त्यांच्याकडून झाली नाहीं खरी. तरी पण सशस्त्र क्रांतीची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादिली आणि त्यामुळें त्यांना पुन्हा घोर तप करावें लागलें. आणि विश्वामित्रानें आपला देह शुष्क केला नसेल

इतका त्यांनीं आपला देह निःसत्त्व करून घेतला. यांत देह नाहींसा झाला नाहीं खरा, पण त्यांतलें सारसर्वस्व देण्यांत आलें. आपल्या रक्ताचें पाणी—नव्हे—दूध करून आपल्या बालकाला माता जशी संतुष्ट करते त्याप्रमाणें आपल्या राष्ट्राच्या चरणीं त्यांनीं आपलें रक्त खर्च केलें.

ह्या इतक्या प्रसंगांत त्यांच्या डोळ्यापुढें देशाचा परकीय राजप्रतिनिधि शत्रु म्हणून उभा होता. पण विचार करतांकरतां आज त्यांना कळून आलें कीं आपापसांतली दुही—हिंदु—मुसलमान, स्पृश्य—अस्पृश्य, ब्राह्मण—ब्राह्मणेतर, भांडवलदार—मजूर, ह्यांच्यांत क्षणोक्षणीं वाढणारी दुही—पसरलेली आहे. या दुहीचे तण काढून टाकल्याशिवाय स्वातंत्र्याचें पौष्टिक पीक वाढीस लागणार नाहीं. ही दुही काढून टाकण्याकरितां अनेकांनीं अनेक तऱ्हेचे प्रयत्न केले. वात झालेल्या मनुष्याची दांतखिळी बसते, हातापायाला तो झटके देतो पण त्याच्या कानींकपाळीं ओरडून त्याला जागें करूं म्हटलें तर तें शक्य होत नाहीं. अशा वेळीं एक तर त्या मनुष्याला डाग द्यावा लागतो किंवा तो खडबडून जागा होईल असा प्रचंड आवाज करावा लागतो. यापैकीं कांहीं तरी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी बापटांची खात्री झाल्यानें त्यांनीं अनेक दिवस साधकबाधक विचार केला आणि 'भारतीय प्राण यज्ञदला'ची कल्पना घेऊन ते १९३७ मध्यें तुरुंगाच्या बाहेर आले. याबाबत त्यांनीं रत्नागिरी तुरुंगांत ता. ३ एप्रिल १९३५ रोजीं निश्चय केला होता.

### *कल्पनेचा प्रचार*

भारतीय प्राणयज्ञ कल्पनेचा प्रचार करण्याकरितां त्यांनीं महाराष्ट्रांत एक दौरा काढला. प्रथम ते सेवगांवला गेले. म. गांधींना त्यांनीं आपली कल्पना सांगितली ती अशी. हिंदुस्थानांतील जाती व वर्गविषयक भांडणें मिटविणें दुरापास्त आहे. अशा वेळीं लोकांचे डोळे उघडावे म्हणून ठिकठिकाणीं प्रसिद्ध लोकांनीं ज्ञातींत एकी होत नाहीं तोंपर्यंत आम्हीहि जगत नाहीं, आम्ही आपला प्राण देशाला अर्पण करतों, असें म्हणून जलसमाधि घ्यावयाला निघावें. सरकारी कायद्याप्रमाणें आपल्याला पोलिसांनीं अडविलें तर जलाच्या ऐवजीं जेलसमाधि घ्यावी. ठिकठिकाणचे लोक आपले प्राण जर राष्ट्रीय एकीकरितां देऊं लागले तर देशांतील सात्त्विक तेज जागृत होऊन कोणी तरी ती एकी घडवून आणील.

ही कल्पना गांधींना पसंत पडली पण ते ती एकदम जाहीर करण्यास तयार नव्हते. त्यांना अधिक विचार करावयाचा होता. बापटांनीं सेवगांव सोडून

मोठमोठ्या शहरीं जाऊन आपल्याला किती मंडळी मिळतात हें पाहिलें. त्यांना लोकांहीं क मिळाले. या लोकांनीं आत्मयज्ञाच्या कल्पनेस मान्यता दिली पण या बाबतींत एक दौरा काढल्यावर त्यांनीं ह्या कामाला स्वतः सुरुवात करण्याचा निश्चय जाहीर केला. तारीख तेवढी ठरावयाची होती. इतक्यांत त्यांच्या दोन मुलांनीं त्यांना आडवें येऊन प्राणयज्ञाची तारीख दोन वर्षांवर पुढें ढकलविली. मध्यंतरीं कांहीं गोष्टी घडल्या. त्यानंतर त्यांनीं जलसमाधीचा निश्चय जाहीर केला. २३ जुलै १९३९ ही तारीख निश्चित केली. पण या तारखेस मार्गांत विघ्न येईल हें जाणून कोणाला न सांगतां मनांत दुसरीच तारीख ठरविली. त्या दिवशीं सकाळीं ते प्राणसमर्पणास निघाले. त्यांच्या कन्येला थोडी शंका आली म्हणून आत्मारामपंत मोडक वगैरे मंडळींना तिनें बापटांच्या मागें पाठविलें. बापट वासुदेवराव साठे यांच्याबरोबर पुढें गेले होते. मुळा–मुठा संगमावर पोहोंचल्यावर मोडक वगैरे मंडळींनीं म्हटलें कीं, तुम्ही आम्हांला न कळवतां संकल्पाची तारीख चुकवून कां आलां? आतां मागें चला व ठरवलेल्या तारखेस या. नाहीं तर आम्ही अगोदर उड्या घेतों. तें बापटांना पसंत नव्हतें. इतक्यांत वा. वि. साठे यांनीं बापटांना धरून ठेवलें व ते मोठमोठ्यानें ओरडूं लागले. बापटांना फार्स करूं द्यावयाचा नव्हता म्हणून ते न बोलतां मागें परतले. एकानें त्यांना याबद्दल विचारलें तेव्हां ते म्हणाले, 'जिवंत बापट त्या दिवशीं मेला–आतां फक्त कुडी आहे. देवाच्या मनांत मी बलिदान करावें असें दिसत नाहीं. नऊ वेळां मी प्रयत्न केला पण तो फसला. तेव्हां देवाची इच्छा निराळीच दिसते.

> **देवा खेळ खेळे तुझीये आवडी।**
> **न जाईन रडी कांहीं केल्या॥**

या त्यांच्या विचारसरणीनें ते स्वस्थ बसले असावेत.

भयानें, लोभानें, मोहानें ते मागें राहिले नाहींत, हें खास. विश्वांत जशीं अनेक कोडीं सुटावयाचीं राहिलीं आहेत त्यांतलेंच हें एक कोडें म्हटलें पाहिजे, असें बापटांचे कांहीं चहाते म्हणूं लागले म्हणून आम्ही बापटांची प्रत्यक्ष गांठ घेतली व या विषयाची चर्चा केली.

ते म्हणाले, 'माझी प्राणार्पणाची कल्पना ही वैतागानें उत्पन्न झालेल्या आत्महत्येच्या कल्पनेसारखी नाहीं. संकट पहावत नाहीं म्हणून डोळे मिटण्याचा हा प्रकार नाहीं. जातीय भांडणांत जनमन इतकें गुंग झालें आहे, त्याची विचारशक्ति

बंद झाली आहे, अशा वेळीं सामान्य व्याख्यानानें, उपदेशानें, जागृति उत्पन्न होईलसें दिसत नाहीं. दुर्धर रोगावर जरा कठीणच उपाय योजावा लागतो. अशा वेळीं देशांतल्या पुढाऱ्यांनीं प्रकटपणें लोकांना सांगून शांत वृत्तीनें एकामागून एकानें जलसमाधी घेतली तर जनतेवर विलक्षण परिणाम होईल. भाऊबंदकीचीं भांडणें भांडण्याची धुंदी उतरेल व लोक योग्य दिशेनें विचार करूं लागतील. या बाबतींत जनतेचें दोहोंपैकीं एक कर्तव्य आहे. आपल्या लोकांनीं एक तर भांडणें थांबवावीं अगर जलसमाधि घेणारास ती घेऊं द्यावी.' पण हें लोकांना समजलें नाहीं. त्यांनीं सभा भरवून, वर्तमानपत्रांत लिहून, बापटांना या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. जर बापट जिवंत राहावेत असें जनतेला वाटत होतें तर लोकांनीं सभा भरवून, प्रचार करून, भांडणें थांबविण्याची पराकाष्ठा करावयाला हवी होती, पण त्या काळांत जातीयतेची धुंदी लोकांच्या डोळ्यावर इतकी होती कीं भांडणें थांबवावीं असें फारच थोड्यांना वाटत होतें. मात्र बापटांचा जीव वांचावा म्हणून बलिदानाच्या कल्पनेला पुष्कळांनीं अव्यवहार्य ठरविलें. इतकेंच नव्हे तर लोकांना चुकवून ते जेव्हां संगमावर गेले त्यावेळीं त्यांच्या एका मित्रानें बापटांना वांचविण्याकरितां जेव्हां आरडाओरडा सुरू केला तेव्हां बापट मनांत खिन्न झाले. लोक भांडणें मिटवीत नाहींत व मला मरूंहि देत नाहींत, असें ते म्हणाले.

विष खाऊन अगर गुप्त तऱ्हेनें त्यांना मरतां आलें असतें पण याबाबत आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, बापटांचा मार्ग आत्महत्येचा नव्हता. त्यांत गुप्तता नव्हती. लोकांना बजावून ते जलसमाधि घेणार होते. पण लोक तसें करूं देईनात म्हणून लोकांना आपला हेतु कळला नाहीं असें मनांत म्हणून योग्य काळाची वाट पहात ते स्वस्थ बसले. पुष्कळ मंडळींना बापटांची कल्पना नीट कळलीच नाहीं. त्यांना एवढेंच कळत होतें कीं बापट बोलल्याप्रमाणें वागणारे आहेत—निर्भय आहेत. मग त्यांनीं या वेळीं आपला पाय मागें कां घेतला तें कळत नाहीं, असें ते म्हणत. कोणी असेंहि म्हणण्यास कमी केलें नाहीं कीं बापटांच्या चारित्र्यावर हा एक कलंक आहे. पुढाऱ्याच्या म्हणण्याचा अर्थ आपल्या बुद्धीप्रमाणें करून मग त्याप्रमाणें पुढारी वागला नाहीं म्हणून त्याला दोष देण्यास जे तयार होतात त्यांच्या तोंडास कोणी हात लावावा?

१९३२ सालीं रत्नागिरीच्या तुरुंगांत असतांना म. गांधींच्या उपासाला सहानुभूति दाखविण्याकरितां बापटांनीं उपवास सुरू केला. जेल अधिकाऱ्यांनीं कांहीं दिवस वाट पाहून शेवटीं बापटांना सांगितलें कीं, आम्ही बळजोरीनें

तुम्हाला दूध घालूं—व त्याप्रमाणें त्यांनीं रबराची नळी व तसराळें आणलें. बापट म्हणाले, हा सहानुभूतीचा उपवास आहे तेव्हां बळजोरीचें कारण नाहीं. तुम्ही जर बळजोरीच करीत असाल तर मी स्वतःच दूध घेतों. यावेळीं सुद्धां त्यांची कल्पना अधिकाऱ्यांनीं समजून घेतली नाहीं व हट्टी कैद्याला वागवितात तसें बापटांना वागविलें.

## फॉर्वर्ड ब्लॉकमध्यें

हरिपुर कॉंग्रेसच्या वेळीं सुभाषचंद्र अध्यक्ष झाले. वर्षभर त्यांचें व वर्किंग कमिटीचें विशेष जमलें नाहीं पण भांडणेंहि झालीं नाहींत. त्यानंतर १९३८ सालीं त्रिपुरी येथील कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां सुभाषचंद्रांनीं आपली उमेदवारी जाहीर केली त्यावेळीं वर्किंग कमिटीनें ते निवडून येऊं नयेत म्हणून बऱ्याच उशिरानें खटपट केली. तेथपर्यंत सुभाषांची तयारी होऊन चुकली होती. देशांतल्या तरुणांनीं सुभाषनां मतें देऊन निवडून आणलें तेव्हां वर्किंग कमिटीनें राजीनामा दिला व सहकार्य नाकारलें. त्यानंतर बऱ्याच भानगडी होऊन सुभाषनीं अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन कॉंग्रेसमध्यें एक फॉर्वर्ड ब्लॉक म्हणून पक्ष काढला.

कॉंग्रेस ही अधिकार स्वीकारल्यापासून दरबारी झाली आहे. तिचें क्रांतिकारक स्वरूप लुप्त झालें आहे. महायुद्ध सुरू झालें आहे त्याचा फायदा घेऊन कॉंग्रेसनें सत्याग्रह सुरू करावा असें सुभाषबाबूंचें म्हणणें होतें. कॉंग्रेसश्रेष्ठी म्हणत, सत्याग्रहाचें वातावरण दिसलें कीं चळवळ सुरू होईल—तोंपर्यंत थांबा. सुभाषबाबूंना तें पसंत नव्हतें. म्हणून त्यांनीं पुरोगामी पक्ष काढला व त्याचा प्रचार प्रचंड प्रमाणावर सुरू केला. सुभाषच्या सभेस हजारों—नव्हे—लाख लाख लोक जमत पण प्रत्यक्ष सभासद फार थोडे होत. या थोड्या लोकांत बापट मिळाले. त्यांनीं कॉम्रेड भुस्कुटे यांच्याबरोबर व्याख्यानाचा दौरा काढला. कम्युनिस्ट त्यावेळीं महायुद्धाला रशिया त्यांत नसल्यामुळें लोकयुद्ध म्हणत नव्हते. बापटांनीं पुरोगामी पक्षाची तत्त्वप्रणाली व्याख्यानांत सांगावी व सभेंत इंग्रजांच्या यूनिअन जॅकला म्हणजे राष्ट्रीय निशाणाला—एका वेळच्या स्वातंत्र्यप्रिय इंग्रजांच्या निशाणाला—वंदन करावें व लगेच एका वेळचें हें स्वातंत्र्यवादी निशाण दुसऱ्यांना आज गुलामगिरींत ठेवतें आहे म्हणून तें जाळण्यास योग्य आहे असें म्हणून जाळून टाकावें. हा क्रम फार दिवस चालणें शक्य नव्हतें.

फॉरवर्ड ब्लॉक ऊर्फ पुरोगामी पक्षाचा प्रचार करीत बापट मुंबईस जाणार होते. या पक्षाच्या जाहीर सभेस सरकारनें बंदी केली होती तरीहि सभा भरणार

होतीच. बापटांना मुंबईस जाऊंच द्यावयाचें नाहीं असा पोलिसांचा संकल्प होता. पोलिसांना हुलकावणी देऊन बापटांना सभेंत हजर करावयाचें असा कांहीं मंडळींचा बेत होता. बापट सभेच्या आदल्या दिवशीं कल्याणला होते. त्यांच्या निवासस्थानावर पोलिसांचा पहारा होता. पण तो पुढच्या दारावर होता. बापटच सांगत होते कीं, 'असल्या हुलकावण्या देण्याकडे माझा कल नाहीं. पण माझ्या मित्रांनीं म्हटलें कीं, चला मागल्या दारानें–पोलिसांची थोडी गंमत करूं.' कांहीं अनैतिक नसेल तर बापट मित्रांच्या तंत्रानें एखाद्या लहान मुलासारखे वागतात. त्या जन्मजात स्वभावाप्रमाणें त्यांनीं मित्रांना म्हटलें, 'बरें आहे, मला काय? पोलीसच्या पहाऱ्यांतून जाणारच तेव्हां तुमच्या पहाऱ्यांतून काय वाईट?' पुढें मोटारींतून त्यांना मुंबईस नेण्यांत आलें. मध्यंतरीं एका पोलिस ठाण्यावर चौकशी झाली. त्यांत बापटांच्या जवळ बसलेल्या गृहस्थांना पोलीसनें नांव विचारलें पण बापटांना विचारलें नाहीं. 'विचारलें नाहीं तर सांगा कशाला? मी आपला गप्प बसलों व आमची मोटार पुढें गेली.' ही गोष्ट बापटांनीं इतक्या सहज, बालकाच्या वृत्तीनें, मधुर निष्पाप स्मित करून सांगितली कीं प्रस्तुत लेखक ती हकीकत ऐकून आश्चर्यच करीत राहिला. निष्पाप वृत्ति म्हणतात ती याला.

पुढें ते मुंबईच्या सभेंत प्रकट झाले व भाषण करीत असतांना त्यांना अटक होऊन मागें सांगितल्याप्रमाणें तीन महिन्यांची शिक्षा झाली. त्यांतून सुटका झाल्यावर कांहीं तासांच्या आंत त्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. त्यावेळीं १९४० चा वैयक्तिक सत्याग्रह चालू होता. या खेपेलाच बापटांनीं काय तो जेलमध्यें बी क्लास मान्य केला. नाहीं तर मागील १७–१८ वर्षें त्यांनीं सी क्लासमध्यें काढलीं होतीं.

## जेलमधला भयंकर आजार

मागें कोणत्याहि काळांत आजारानें सतावलें नाहीं इतके या जेलच्या वेळीं बापट दुखण्यानें त्रासले होते. त्यांचे डोळे अधू झाले होते. कानानें ऐकायला कमी येऊं लागलें. त्यांना औषधोपचार करण्यांत आले पण विशेष गुण येईना. शेवटीं सरकारनें त्यांना सोडून दिलें. तेव्हांपासून ते स्वस्थ बसलेले दिसत. मधून-मधून कोणी बोलावलें तर जात पण सार्वजनिक जीवन शारीरिक दुर्बलतेमुळें बंद पडलें होतें. १९४२ च्या चळवळींत हजारों तरुण पडलेले पाहून त्यांना आनंद झाला व त्यांनीं वरळीच्या तुरुंगाजवळ जाऊन तेथून त्यांना आशीर्वाद

दिले. 'चले जाव' ची गांधींची घोषणा ऐकून त्यांना समाधान वाटलें. जी कल्पना, जी इच्छा डेक्कन कॉलेजमध्यें त्यांनीं धरली तिला या घोषणेच्या रूपानें राष्ट्रानें मान्यता दिलेली पाहून त्यांच्या अंतरात्म्याला समाधान वाटलें. आपल्याला स्वतः कांहीं करतां येत नाहीं म्हणून त्यांचा जीव तडफडत होता पण याहि वेळीं ते आंधळ्या बनलेल्या मिल्टन कवीप्रमाणें म्हणत,

Those also serve who stand and wait.

जे सेवा करण्यास तत्पर असून हुकुमाची वाट पहातात ते देखील सेवा करतात.

कोणी म्हणतात, १९४२ च्या चळवळींत बापटांनीं आपल्या परी पुष्कळ काम केलें. पण त्या कामाचें स्वरूप काय होतें हें समजलें नाहीं. बापटांच्या जीवनांतील अनेक प्रकरणें जशीं अज्ञात राहिलीं व राहणार त्याप्रमाणें हेंहि प्रकरण राहणारसें दिसतें. याबाबत असें म्हणतां येईल कीं बापटांची प्रकृति त्या काळांत हालचाल करण्यास जर समर्थ असती तर ते स्वस्थ बसणें शक्य नव्हतें; जर ती असमर्थ असेल तर ते मनानें चळवळींतल्या अनेक अंगांशीं एकरूप झाले असतील.

### *१९४५ मधील जेल*

१९४२ ते १९४५ या काळांत बापट स्वस्थ होते. पण मधूनमधून त्यांना कोणीतरी व्याख्यानाकरितां बोलावीत. अशाच तऱ्हेचें एक निमंत्रण त्यांना १९४५ मध्यें वऱ्हाडांतून कांहीं तरुणांनीं पाठविलें. सगळीकडे जुलूम चालू होता. प्रजा अन्नानें तडफडत होती. यामुळें बापटांच्या तोंडून जळजळीत उद्गार बाहेर पडले. ते राजद्रोही ठरून त्यांना पुन्हा एका वर्षाची सजा झाली. सर्व जनता हळहळली. पण मॅजिस्ट्रेटच केवळ नव्हे तर जेल अधिकारीहि बापटांशीं माणुसकीनें वागले नाहींत. लबाड माणसाला जेलमध्यें वाटेल तेवढ्या सवलती मिळवितां येतात. बापट पडले शिस्तीचे भोक्ते. म्हणून अधिकाऱ्यांनीं या काळांत जेलचा कायदा चांगलाच दाखविला. परवां नुकतीच त्यांची सुटका झाली आहे. ते शरिरानें पोखरले गेले आहेत. पण मन पूर्वीसारखेंच सतेज आहे.

### *हैद्राबाद सत्याग्रह*

स्कॉटकवीच्या एका खंडकाव्यांत, एका शूर सरदारानें आपल्या सहप्रवाशाला विचारलें कीं, 'का रे ! आपला जीव पुन्हा कां बरें तूं धोक्यांत घातलास !' त्यावर त्या वीराचें उत्तर मोठें मासलेवाईक आहे. तो म्हणतो, 'अरे, तूं वीर

असून असले प्रश्न विचारतोस, अश्चर्य आहे! व्यवहार पाहून का आपलीं पावलें पडतात? संकट दिसलें, आढळलें किंवा ऐकलें कीं तेथें आमची उडी पडलीच.'

बापट प्रदीर्घ कारावास भोगून आले होते. त्यांचीं इंद्रियें अधू झालीं होतीं. स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेण्याला लागणारें कणखर शरीर आतां त्यांचें राहिलें नव्हतें. पण तेजस्वी पुरुषाच्या बाबतींत वयाचा जसा प्रश्न नसतो त्याप्रमाणें शरिराचाहि नसतो अशी बापटांचें चरित्र पाहून खात्री वाटते.

१९३७ ते १९३९ सालीं कॉंग्रेस सरकार अधिकारारूढ झालें होतें त्यामुळें सामान्यतः सरकारशीं लढण्याचा प्रसंग कांहीं उद्भवला नाहीं. अशा वेळीं लोकांचें लक्ष संस्थानी जुलूम नाहींसा करण्याकडे लागलें होतें. इतर संस्थानांप्रमाणें हैद्राबाद संस्थानांत भाषणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, हीं नव्हतीं इतकेंच नव्हे तर सामान्य शाळा काढावयाची असली तरी सरकारची परवानगी लागे. हैद्राबाद संस्थानचे पूर्वींचे नबाब मोठे उदार मनाचे, हिंदुमुसलमानांना समानतेनें वागवणारे असे होते. पण हल्लींचे मालक हे धर्मनिष्ठ, साध्या राहणीचे असले तरी मुसलमान धर्माचे कडवे भक्त आहेत त्यामुळें मुसलमानधर्मीयांनाच बहुतेक अधिकाराच्या जागा देण्यांत येतात. तीनचतुर्थांशापेक्षां अधिक लोकांची भाषा मराठी, तेलगू किंवा कानडी असतांना सर्वांवर उर्दूची सक्ति करण्यांत येते. देवळें, मशीद वगैरे बांधण्याला परवानगी घ्यावी लागते पण देवळांना ती सहजासहजीं मिळत नाहीं. धर्मप्रसाराच्या बाबतींत असाच पक्षपात होतो. याच काळांत खालसामध्यें हिंदुमुसलमानांत तेढ वाढत होती. त्यामुळें या संस्थानांत त्याला उग्र स्वरूप येऊं लागलें. या सर्वांवर उपाय म्हणून हैद्राबाद संस्थानांतल्या मराठवाडा विभागांतील जागृत लोकांनीं पुढाकार घेऊन नागरिक स्वातंत्र्य, जबाबदार राज्यपद्धति वगैरे गोष्टी मिळण्याकरितां स्टेट कॉंग्रेस या संस्थेची स्थापना केली. ज्या हक्कांकरितां स्टेट कॉंग्रेस भांडणार होती ते हक्क हिंदूप्रमाणें मुसलमानांनाहि पाहिजे होते; यामुळें कांहीं स्वातंत्र्यप्रिय मुसलमान स्टेट कॉंग्रेसचे सभासद होऊं लागले.

### *स्टेट कॉंग्रेसचें बिकट काम*

स्टेट कॉंग्रेसचें काम राष्ट्रीय कॉंग्रेसपेक्षां बिकट होतें. संस्थानांत साधी सभा विना परवाना भरवितां येत नसे. तेव्हां संस्थानी लोकांनीं आपल्या परिषदा खालसांत पण संस्थानी हद्दीवर भरवाव्या व ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांची मदत मागावी. या बाबतींत गांधींनीं स्टेटमधल्या लोकांस एकदांच सांगून टाकलें



मराठी ... स्थळप्रत.

होतें कीं, याबाबत आम्ही सल्लामसलत देऊं, तुमच्या चळवळीला नैतिक पाठिंबा देऊं पण हक्कांकरितां जो लढा करावयाचा तो तुम्हीच केला पाहिजे.

याबाबत खूप वाद माजले होते. विशेषतः हैद्राबाद हिंदुसभा व कॉंग्रेस यांचे दृष्टिकोन नेहमींप्रमाणें भिन्न झाले. स्टेट कॉंग्रेसची तरुण मंडळी मोठी चिकाटीची व कॉंग्रेसश्रेष्ठींच्या विचारानें चालणारी होती. अर्जविनंत्या करून झाल्यावर जबाबदार राज्यपद्धति हीच स्टेटमधील अनेक दुःखांवर रामबाण ठरणार असा विचार करून स्टेट कॉंग्रेसनें जबाबदार राज्यपद्धति मिळण्याकरितां सत्याग्रह पुकारला. यांत धर्माचा संबंध नसल्यामुळें वर म्हटल्याप्रमाणें स्वातंत्र्यवादी मुसलमान त्यांत सामील होण्याचा संभव होता. स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहास चांगला पाठिंबा मिळत होता, इतक्यांत अनपेक्षित रीत्या हैद्राबाद संस्थानांत जातीयता विकोपास गेली.

### धर्मप्रसार व शुद्धि

मुसलमान चळवळ्ये आपल्या धर्मीयांची संख्या वाढवूं लागले. त्याबरोबर आर्य समाजाच्या नेत्यांनीं परधर्मांत गेलेल्यांची शुद्धि सुरू केली. त्यामुळें कांहीं मुसलमान चिडले व त्यांनीं आर्यसमाजाच्या मंडळींचीं अग्निकुंडें भ्रष्ट केलीं. हें तेजस्वी आर्य समाजाच्या मंडळींना सहन होणें शक्य नव्हतें. आर्य समाजाची संघटना अपूर्व अशी आहे. उत्तर हिंदुस्थानांत विशेषतः पंजाबांत हा समाज अत्यंत प्रभावी आहे. आपल्या समाजबांधवांस हैद्राबादेंत त्रास होतो आहे असें कळतांच त्यांनीं धार्मिक हक्कांकरितां सत्याग्रह करण्याचें ठरविलें. हिंदुसभेनें त्यांना साथ दिली. अशा रीतीनें जबाबदार राज्यपद्धतीच्या व्यापक मागणीचा सत्याग्रह व धार्मिक हक्कांबाबत सत्याग्रह असे दोन सत्याग्रह एकाच वेळीं सुरू झाले. यामुळें हिंदुमुसलमानांनीं मिळून करावयाच्या चळवळींत अडथळा येतो, जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणींत धार्मिक स्वातंत्र्य येतेंच तेव्हां कॉंग्रेसच्या सत्याग्रहास तुम्ही पाठिंबा द्या असें आर्य मंडळीस स्टेट कॉंग्रेसनें सांगून पाहिलें. पण त्यांना धार्मिक प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटत होता. विचारांपेक्षां भावना या फार जोरदार असतात तेव्हां स्टेट कॉंग्रेसची विचारसरणी आर्य समाजानें व हिंदुसभेनें मान्य केली नाहीं. अशा स्थितींत गैरसमज उत्पन्न होऊं नये म्हणून म. गांधी व नेहरूंच्या सल्ल्यानें स्टेट कॉंग्रेसनें आपला सत्याग्रह बंद केला व हिंदुसभेचा व आर्यसमाजाचा सत्याग्रह चालू राहिला. कांहीं महिने गेल्यावर निजाम सरकारनें असें जाहीर केलें कीं, कांहीं राजकीय सुधारणा आम्ही

लौकरच जाहीर करणार आहोत. एवढें आश्वासन सत्याग्रहींच्या नेत्यांस पुरेसें वाटून त्यांनीं सत्याग्रही चळवळ बंद केली. निजाम सरकारनें सत्याग्रही कैद्यांना सोडून दिलें. अशी ही हैद्राबाद सत्याग्रहाची कथा आहे. या घटनेंत बापटांचा काय भाग होता व तो कोणत्या तत्त्वावर होता हें आतां पाहूं.

हैद्राबादेंत जुल्म होतो आहे, हैद्राबादी लोक संस्थानची प्रजा असले तरी भारताचेच ते नागरिक आहेत, आपले बांधव आहेत, तेव्हां त्यांना आपण साहाय्य केलें पाहिजे. त्यांचीं दुःखें तीं आपलीं दुःखें असें समजलें पाहिजे व निजामावर प्रत्यक्ष व पर्यायानें ब्रिटिश सरकारवर वजन आणून त्यांना सत्तात्याग करावयास भाग पाडलें पाहिजे. इंग्रजाला प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष बोचणी लागेल असा कोणताहि प्रसंग आपण फुकट दवडतां कामा नये, अशा तऱ्हेची त्यांची विचारसरणी होती. म्हणून त्यांनीं हैद्राबाद सत्याग्रहाला साहाय्य करावयाचें ठरविलें. त्यांना स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह मान्य होता व तो स्थगित केला गेला हें त्यांना पटलें नाहीं. ते म्हणत, आर्यन लीगनें आर्यांना, हिंदुत्वनिष्ठांनीं संस्थानी हिंदूंना व कॉंग्रेसनिष्ठांनीं स्टेट कॉंग्रेसला साहाय्य करावें. कोठून तरी लोकांच्या प्रतिकारशक्तीचा उठाव करा. ते एका श्लोकांत म्हणतात,

**करा साथ जें शक्य तें सर्व सर्व**
**असे शुद्ध सत्याग्रही थोर पर्व ।**
**चला एक व्हा वांकवाया निजाम**
**कुणाचें कसेंही असो पक्षनाम ॥**

बापटांनीं या संबंधांत पुष्कळ पत्रकें काढलीं, आक्षेपांना उत्तरें दिलीं. ता. २३–९–३८ रोजीं ते आपले सहकारी घेऊन हैद्राबादेस गेले. पहिल्या खेपेस त्यांना अधिकाऱ्यांनीं सौजन्यानें वागविलें व परत जाण्याची विनंति केली. मी पुन्हा येणार आहें असें सांगून बापट पुण्याला आले. त्यानंतर ता. २९-११-३८ ला ते पुन्हा हैद्राबादला गेले. या वेळीं त्यांस शिक्षा झाली. ते गुलबर्ग्याच्या तुरुंगांत १-१२-३८ ते ८-१-३९ पर्यंत होते. पुढें संस्थानाबाहेरच्या मंडळीबरोबर बापटांना सोडण्यांत आलें. स्टेट कॉंग्रेसनें सत्याग्रह थांबविला त्याचा बापटांनीं निषेध केला. त्यांचा विचार आतां हा प्रश्न अखिल हिंदुस्थानचा करावा असा होता. कारण इतर संस्थानांपेक्षां हैद्राबादेंत जुल्म अधिक होता. पण बापटांचे विचार इतर मंडळींनीं उचलून धरले नाहींत. लवकरच हिंदु सत्याग्रहहि थांबला व देशांतील राजकारणाचे वारे निराळ्या दिशेनें वाहूं लागले.

## व्यक्तिगत

बापटांची माहिती त्यांच्या निकटवर्ति मित्रमंडळीस, कॉलेजमधील सहाध्यायांस आणि परदेशांतील समानधर्मीयांस १९०६ सालापूर्वी थोडीबहुत असली तरी १९०८ सालच्या बंगालमधील बॉम्बस्फोटानंतरच बापट हे बहुजनसमाजास माहीत झाले. पी. एम्. बापट या नांवाच्या कोणा एका महाराष्ट्रीय तरुणाचा बॉम्ब प्रकरणाशीं संबंध असून पोलीस त्याचा तपास करीत आहेत आणि तो तरुण अदृश्य झाला आहे अशी बातमी वृत्तपत्रांत ज्यावेळीं प्रथम आली त्यावेळीं बापटांकडे जनतेचें लक्ष विशेष वेधलें. त्यानंतर १९१५ सालीं ते जेव्हां पुण्यास येऊन समाजांत हिंडूं फिरूं लागले त्यावेळीं त्यांच्या कांहींशा विक्षिप्त वागणुकीमुळेंहि ते लोकांच्या नजरेंत आले. क्रांतिकारक तरुण कसा असतो हें पाहण्यासाठीं, बापट पुण्याच्या रस्त्यावरून चालले म्हणजे लोक मोठ्या उत्सुकतेनें खिडक्यांमधून उभे रहात.

## स्वरूप

बापट हे अगदीं सामान्य उंचीचे, अगदीं किरकोळ नसले तरी सामान्य बांध्याचेच गृहस्थ आहेत. त्यांची उंची फार तर पांच फूट चार इंच भरेल. त्यांचें वजन १००–१०५ पौंडांपेक्षां अधिक नाहीं. त्यांचा गौरवर्ण असला तरी अनेक वर्षांच्या बंदिवासामुळें आज त्या शरिरावर काळसरपणा आलेला आहे. शरीर धिप्पाड दिसत नसलें तरी तें काटक व अत्यंत चपल आहे हें सहज ध्यानांत येतें. आज त्यांचें वय ६५ वर्षांचें झालें असलें तरी शरिरांत स्थूलपणा आलेला नाहीं. त्यांचा चेहरा रुंद व कपाळ मोठें आहे. बापटांच्या सर्व स्वभावाचें दर्शन त्यांच्या घाऱ्या डोळ्यांवरून होऊं शकतें. डोळ्यांत विलक्षण तेज व आकर्षकपणा असून त्यांची दृष्टि भेदकहि आहे. बापटांना पाहिल्याबरोबर हा पुरुष विलक्षण बुद्धिमान व निग्रही असला पाहिजे असें सहज दिसून येतें.

## पोशाख

बापटांच्या पोशाखांत आज अनेक वर्षें थोडाफार बदल होत असला तरी त्यांत विलक्षण साधेपणा आहे. पोशाखाकडे त्यांचें टिळकांप्रमाणेंच लक्ष नाहीं. अंग झांकण्यास वस्त्रें असलीं म्हणजे झालें एवढेंच ते पहातात. विलायतेहून आल्यानंतर धोतर, सदरा आणि फेटा असा त्यांचा पोशाख होता. १९२१

सालानंतर ते शुद्ध खादीचा पोशाख वापरूं लागले. धोतर, सदरा आणि गांधी-टोपी असा त्यांचा पोशाख आजतागायत आहे. मध्यंतरीं आपण हिंदी लोक अखंड कैदी आहोंत ही भावना जागृत ठेवण्याकरितां ते कैद्याच्या पोशाखा-सारखा पोशाख कांहीं दिवस करीत होते.

पोशाखांत जसा त्यांचा साधेपणा तशी जेवणांतहि त्यांची अभिरुचि साधीच म्हणावी लागेल. त्यांच्या शरिरांत मधुमेह, अपचन वगैरे रोगांनीं ठाणें दिलेलें नसल्यामुळें त्यांना पथ्यावर राहावें लागत नाहीं. त्यामुळें त्यांचें जेवण चारचौघां-सारखेंच असतें. खाण्यापिण्याच्या बाबतींत लोकविलक्षण असें त्यांचें कांहींएक नाहीं. तुम्ही गोड पदार्थ पुढें ठेवले तरी ते नाहीं म्हणणार नाहींत. थालीपिठासारखे पदार्थ फराळासाठीं आणले तर थोड्या अधिक आवडीनें खातील. त्यांच्या विशेष आवडीचा पदार्थ म्हटला म्हणजे शेवमुरमुऱ्यांची भेळ. या भेळीला ते लेनिन मिक्श्चर असें म्हणत असतात. कारण हें गरिबांचें खाद्य आहे आणि लेनिन हा गरिबांचा प्रतिनिधि. असो. ज्यांचें चित्त मोठ्या गोष्टींत गुंतलेलें असतें त्यांच्या पोशाखाच्या व खाण्यापिण्याच्या बाबतींत आवडीनिवडी विशेष राहूंच शकत नाहींत असें दिसतें.

### *गृहस्थाश्रम*

बापटांचा गृहस्थाश्रम अगदींच लहान होता. त्यांचा विवाह ते मॅट्रिक होण्याच्या अगोदर जरी झाला होता तरी १९१३ च्या जानेवारींत ते घरीं आले तेव्हां जो कांहीं संसार त्यांनीं केला तेवढाच त्यांच्या गृहस्थाश्रमाचा काळ होय. त्यांचीं मातापितरें बहुतकाळपर्यंत हयात होतीं पण तीं बापटांजवळ राहात नसत. त्यांचे बंधूहि आपापल्या व्यवसायांत दूरच राहात. यामुळें बायको आणि दोन मुलें एवढाच त्यांचा छोटासा संसार पुण्यास होता. बापटांनीं जो अल्पकाळपर्यंत प्रपंच केला तोसुद्धां त्याच्यांत मन घालून असा कधींच केला नाहीं. त्यांचें मस्तक देशस्वातंत्र्याच्या कल्पनांनीं अखंड भरलेलें असल्यामुळें संसारांत त्यांचें चित्त असें कधींच नव्हतें. केसरी ऑफिसमध्यें ठरलेलें काम केल्यावर घरीं येऊन बायकोमुलांत संसारांतील सुखदुःखाच्या गोष्टी ते बोलले असें सहसा होत नसे. इतकेंच नव्हे तर घरांत काय हवें काय नको, याकडेहि त्यांनीं कधीं पाहिलें नाहीं. त्यांची पत्नी ही एक अत्यंत गरीब, सालस, पतिपरायण स्त्री होती. पतीला जेणेंकरून सुख होईल तें करावें हीच तिची महत्त्वाकांक्षा. तिला बापटांच्या देशस्वातंत्र्याच्या कल्पनेची कल्पना नव्हती. बौद्धिक दृष्ट्या दोघांत कल्पनातीत अंतर होतें.

आपटांचेंच असें होतें असें नव्हे तर त्यांच्या काळचे बहुतेक ध्येयवादी पुरुष आणि त्यांच्या बायका यांच्या बौद्धिक उंचींत फार अंतर असे. बापट हे सामान्य ग्रॅज्युएट नव्हते. त्यांनीं यूरोपखंडाचा प्रवास केला होता. दोन्ही संस्कृतींचें स्वरूप समजावून घेतलें होतें. आपल्या देशाच्या परिस्थितीचा विचार केला होता व आपलें या काळांत प्रथम कर्तव्य काय हें निश्चित करून टाकलें होतें. देशाचें स्वातंत्र्य प्रथम, नंतर इतर गोष्टी व त्या स्वातंत्र्याकरितां बलिदान केलेंच पाहिजे ही निष्ठा. बलिदान म्हणजे शत्रूच्या गोळींसमोर उभे राहाणें एवढाच बलिदानाचा अर्थ असता तर ती गोष्ट अगदींच निराळी होती. गोळी खायला धीटपणा लागतो पण स्वातंत्र्याच्या युद्धांत अनेक वर्षे व त्रिविध ताप सहन करणें याला नुसता धीटपणा पुरेसा होत नाहीं. द्रव्याची अडचण, नातेवाईकांकडून उपेक्षा, मनुष्य सतत सहन करूं शकत नाहीं. म्हणून जीवनांतील प्रत्येक क्षणाला होणाऱ्या त्रासास जे सज्ज होतात त्यांचा मानसिक दर्जा केवढा तरी थोर असतो. त्या मानानें घरांतील मंडळी जर नसली तर विषम विवाहाचे परिणाम पतिपत्नींना भोगावे लागतात. वधूवरांच्या वयांतील विशेष अंतर हें किती जाचक होतें या विषयावर अनेकांनीं लेखन केलें आहे पण ध्येय आणि बौद्धिक उंची यांतील अंतर हें जास्त कष्टप्रद होतें. रानडे यांनीं कष्ट घेऊन आपल्या सहचरीला आपल्याबरोबर आणली. त्यामुळें रमाबाईंची फरफट झाली नाहीं. टिळकांचा असाच विषम विवाह होता पण आपल्या दुःखाचा पत्ता त्यांनीं कोणालाच लागूं दिला नाहीं. कडू गोळ्या वाईट तोंड न करतां त्यांनीं गिळल्या. रे. टिळकांच्या पत्नी लक्ष्मीबाई या महत्त्वाकांक्षी, धीट स्वभावाच्या असल्यामुळें त्यांनीं पतीची पाठ सोडली नाहीं. बापटांच्या बाबतींत असें कांहीं झालें नाहीं. बापट हे वरील थोर पुरुषांच्यापेक्षां निराळ्या स्वभावाचे गृहस्थ आहेत. बाई अधिक सुशिक्षित म्हणजे बी. ए. जरी असत्या तरी बापटांबरोबर धांवणें अत्यंत कठीण होतें. आपला पति असा लोकविलक्षण कां वागतो याची कल्पनाच कित्येक दिवस बाईंना आली नसेल. आपला पति स्वार्थी नाहीं, क्रूर नाहीं, व्यसनी नाहीं, याची कल्पना त्यांना सहज आली असेल. शेवटीं बापट-जीवनरहस्य आकलन न झाल्यामुळें आपला पति माथेफिरू आहे असा त्यांनीं कयास बांधला असेल.

अत्यंत तीव्र भावनेच्या पुरुषाचें असेंच होतें. रामदासांनीं दासबोधांत याचें थोडेंसें वर्णन केलें आहे.

पुतें कोणाकडे पाहेना । पुतें कोणाशीं बोलेना ।
पुतें येके स्थळीं राहेना । उठोनि जातो ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना ।
आपली स्थिति अनुमाना । येवोंच नेदी ॥

ध्येयानें डोकें भारुन गेलेल्या, भावनाप्रधान पुरुषांचें जीवित त्यांच्या ऐन तारुण्याच्या काळांत तरी फार कठीण होतें. धड मोकळेपणानें हे लोक घरांत बोलत नाहींत. काय हवें तें सांगत नाहींत, संसारांत चित्त नाहीं व बायका स्वावलंबी नाहींत, यामुळें प्रपंच चालवावयाचा कसा हा प्रश्न उभा राहतो. सामान्य स्त्रीचें लक्ष विवाहानंतर प्रपंच थाटण्याकडे व मुलांचें संगोपन करण्याकडे असतें. ह्या कामाला पतीनें मदत करावी अशी त्यांची अपेक्षा. पण त्यांच्या पतींना हीं कामें महत्त्वाचीं वाटत नाहींत. मग एक तर खटका उडतो नाहीं तर अबोला होतो.

पावसाळ्यापूर्वीं कांहीं दिवस हवा कुंद व उष्ण अशी होऊन ज्याप्रमाणें जीव-मात्रांचा कोंडमारा होतो तशी स्थिति कांहीं देशभक्तांच्या प्रपंचाची होते. त्यांत लहानमोठीं मुलें असलीं तर मग काय विचारावें ? मुलांना कांहींच न उमजून तीं गांगरतात. आई रागावली तर बापाची बाजू घेतात व बाप रागावला तर आईचा पाठपुरावा करतात. बापटांचें आपल्या मुलांवर विशेष प्रेम असे. मुलांना त्यांनीं कधीं मारलें नाहीं, धाक दाखवला नाहीं. त्यांचे साधले तेवढे लाडच केले. बापटांचें करणें सर्वच विलक्षण. त्यांना दोन मुलें—एक मुलगा वामन व एक मुलगी कमळी अशीं होतीं. वामन जरा हट्टी व कमळी आईसारखी गरीब. या मुलांनीं हट्ट घ्यावा तो बापटांनीं पुरवावा. पुष्कळ वेळां या मुलांना तीं सहासात वर्षांचीं झाल्यावर सुद्धां आपल्या दोन खांद्यांवर दोघांना बसवून भर बाजारांतून ते खुशाल जात. व्याख्यान देतांना सुद्धां मुलांना खांद्यावर टाकीत. पण हें प्रेम, हे लाड, देशकार्याच्या आड कधींच आले नाहींत. रात्रीच्या गाडीनें जर जावयाचें असलें तर शेवटच्या घटकेपर्यंत मुलांना खेळवीत पण वेळ होतांच त्यांना टाकून एकदम निघत. वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि हे शब्द बापटांच्या संसारांत प्रत्यक्ष दिसत. बाकी त्यांचा संसार म्हणजे तुकोबाचाच संसार होता. घरांत आवश्यक गोष्टीहि आणलेल्या नसावयाच्या. मिळणारा पगार मित्रांच्या गरजा पुरविण्यांत अगर देशकार्यांत खर्च होऊन कांहीं शिल्लक राहिला तर घरीं यावयाचा.

थोर पुरुष सांगतील तसें वागावें, त्यांच्या आचाराचें अनुकरण करूं नये.

देशभक्तानें संसारांत आसक्ति ठेवूं नये पण प्रपंचांतल्या करावयाच्या गोष्टींकडेहि दुर्लक्ष करूं नये. देशाचा संसार जसा अंगावर घ्यावयाचा त्याचप्रमाणें अवलंबित असलेल्या माणसांच्या पालनपोषणाची जबाबदारीहि आपण स्वीकारली पाहिजे. नुसतें धान्य आणून टाकून भागत नाहीं तर त्यांची आध्यात्मिक, मानसिक भूकहि भागविली पाहिजे. रामदास म्हणतात,

आधीं प्रपंच करावा नेटका।
मग घ्यावें परमार्थ विवेका॥

याचा अर्थ असा नव्हे कीं देशकार्य टाकून मनुष्यानें शेतवाड्या करीत राहावें. कर्मीत कमी गरजांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आयुष्यांत एखादे वेळीं असा प्रसंग येतो कीं, अवलंबित माणसांना, तुमचें तुम्ही पहा असें म्हणावें लागतें. पण हा प्रसंग आयुष्यांत क्वचितच येतो. या बाबतींत टिळकांचें उदाहरण घेण्याजोगें आहे.

## *शारीरिक गुण*

बापटांमध्यें बाहुबलापेक्षां मानसिक शक्ति मोठी आहे. तरीपण शरीर दुबळें नाहीं. त्यांत चिवटपणा व तडफ फार आहे. लहानपणीं ते खूप खेळ खेळले आहेत. बोटिंग, टेनिस, दांडगाई याची त्यांना फार आवड. जोर, जोडी, कुस्ती यापेक्षां खेळांचीच त्यांना आवड. यामुळें त्यांच्यांत चापल्य फार आलें. ह्याचा उपयोग त्यांना अज्ञातवासांत शिरतांना व मुळशी संग्रामांत झाला. त्याचप्रमाणें सफाई कामांत हेच गुण त्यांच्या उपयोगी पडले. एकदां कामाला लागले म्हणजे मध्यें विसांवा न घेतां तें ते तडफेनें पुरें करतात. प्रवासास निघाले म्हणजे चालतातहि पुष्कळ.

## *मानसिक गुण*

मनाच्या गुणांबद्दल बोलावयाचें म्हणजे ते पूर्णपणें निर्भय आहेत. ही निर्भयता कांहींशी उपजत तर कांहीं विचारानें प्राप्त झालेली आहे. लहानपणापासून दंगामस्ती, मैदानी खेळ, यांची त्यांस आवड असल्यामुळें साहजिकच शारीरिक धैर्य त्यांच्या अंगीं आलें. पण ह्या धैर्यापेक्षां मानसिक धैर्याची योग्यता फार श्रेष्ठ आहे. देशसेवा करावयाचें ठरलें व तीसुद्धां समशेरीनें. तेव्हां त्यांना अनेक लहानमोठ्या संकटांना तोंड द्यावें लागलें. शिक्षण सोडावें लागलें, सरकारच्या

दूतांचा ससेमिरा लावून घ्यावा लागला, तुरुंगाच्या अनेक यात्रा कराव्या लागल्या, अखंड दारिद्र्यांत दिवस काढावे लागले! हें सर्व सोसण्याला काय सामान्य धैर्य लागतें? बापटांनीं एकंदर एकोणीस वर्षें तुरुंगांत काढलीं व तींहि स्वखुषीनें. दुसऱ्यानें पकडून नेऊन त्यांना तुरुंगांत डांबलें असें घडलें नाहीं. तत्त्वाकरितां जें तप त्यांनीं केलें तें एका मानसिक बळावर, नाहीं का? हें मानसिक बळ आपल्या कार्यावरच्या निष्ठेनें मिळतें. म्हणून बापटांच्या मध्यें धैर्याबरोबर निष्ठा अगर भक्ति हा विशेष गुण आहे.

**भक्त ऐसे जाणा। जे देहीं उदार।**
**गेले आशापाश। निवारोनी॥**
**विषय तो त्यांचा झाला नारायण।**
**नावडे हे जन मातापिता॥**

देशभक्ति ही देवभक्तीपेक्षां कांहीं निराळी नसते. भक्त हा निरिच्छ असावा लागतो. अहंकाराशीं त्याचें वांकडें असतें. मानसन्मान तो इच्छीत नसतो. किनखापी रथांतील मिरवणुकीचा तो गर्व वहात नाहीं, लोकांनीं दिलेले हार मोजीत नाहीं, आपल्या गुणांची इतर देशभक्तांच्या गुणांशीं तुलना करीत नाहीं. बापटांना घ्यावयाला लोक स्टेशनवर गेले आणि हार घालूं लागले तर ते चटकन् म्हणतील, 'हें शास्त्र आतां मागें पडलें आहे, बरं का!' इतर देशभक्तांची कोणी निंदा करूं लागला तर त्यांत ते सामील होणार नाहींत व उलट त्याचा गुणच सांगतील. मन शांत असतां निंदा न करणें ही गोष्ट एक वेळ साध्य होईल पण चीड आणण्यासारखे प्रकार झाले असतां मन शांत ठेवणें ह्याला अनेक दिवसांची तपश्चर्या लागते. एकदां बापट व त्यांची कन्या यांवर पुण्याच्या शिवाजी मंदिरांत हल्ला झाला. वीर सावरकरांच्या अध्यक्षत्वाखालीं सभा चालू होती. बापटांवर हल्ला होत असतां सावरकरांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं व ते आपल्या परिवारासह निघून गेले. बापटांना त्यांच्या मित्रांनीं सोडविलें. हा प्रकार अन्यायाचा प्रतिकार सक्रिय करणाऱ्या सदूभाऊ गोडबोले यांनीं पाहिला व हल्ला करणारांचीं व त्यांना उत्तेजन देणारांचीं डोकीं फोडण्यास त्यांनीं सुरुवात केली. बापटांना हें कळतांच ते मध्यें पडले व हें हत्याकांड त्यांनीं थांबविलें.

## द्रव्यव्यवहार

बापटांचा द्रव्यव्यवहार लक्षांत घेण्यासारखा नाहींच. त्यांचें शिक्षण समाप्त

होण्याच्या अगोदरच ते राज्यक्रान्तीच्या उद्योगांत पडले. त्यांच्या चहात्यांनीं त्यांचा खर्च भागविला. त्यांच्या स्वतःच्या अशा गरजा फारच थोड्या आहेत. त्यामुळें त्यांना साहाय्य करणारांना त्यांचा भार असा कधींच वाटत नाहीं. अज्ञातवासांतून बाहेर आल्यावर टिळकांच्याकडे ते मराठ्याचे एडिटर म्हणून जवळजवळ तीन वर्षे होते पण तीहि नोकरी त्यांनीं नंतर सोडली व ज्ञानकोशांत नोकरी धरली. तेथें त्यांस साठपासून सुरुवात होऊन ते ११० पर्यंत वाढले. डॉ. केतकरांच्या मनांत त्यांचा पगार वाढवून त्यांना कोशाच्या कामांत कायमचें गुंतवायचें होतें पण बापट मुळशी सत्याग्रहांत पडल्यामुळें कोशांतील नोकरी त्यांनीं सोडली. पगाराला ते नेहमीं कवड्या म्हणतात व नोकरी ही भाकरीकरितां करतों असें सांगतात. मुळशीनंतर त्यांनीं पुढें नोकरी अशी केली नाहीं. अशा तुटक केलेल्या नोकरीमुळें त्यांचा सांसारिक खर्च भागण्यास अडचण पडे. पण ती तशीच निभावून जाई.

सार्वजनिक द्रव्यव्यवहार मुळशी सत्याग्रहाच्या वेळीं व तोहि अखेरअखेर करावा लागला. बापट दौऱ्यावर निघाले कीं पैशाला तोटा नसतो. पैसा ते सहज कमावतात व तितक्याच मुक्त हस्तानें देऊन टाकतात. मुळशीचा साम सत्याग्रह संपतांच मुळशीचा सर्व पैसा त्यांनीं राष्ट्रीय शाळांना देऊन टाकला—व थोडासा मुळशीचा इतिहास लिहिण्याकरितां राखून ठेवला होता. पुढें शुद्ध सत्याग्रह सुरू होणार होता. त्याला पैशांची आवश्यकता होती. तरी ज्या कामाकरितां पैसा मिळविला त्याच कामाला लावण्यावर त्यांचा कटाक्ष आहे. यालाच नीति म्हणतात. सत्याची ही मोठी उपासना आहे. साम सत्याग्रह व शुद्ध सत्याग्रह यांत बापटांच्या दृष्टीनें अंशाचा फक्त फरक आहे, तत्त्वाचा नाहीं. तरी सुद्धां जनतेला तसें वाटत नाहीं तोंवर साम सत्याग्रहाचा पैसा शुद्ध सत्याग्रहाकडे वापरावयाचा नाहीं हें त्यांनीं ठरवून टाकलें.

ते पैशाचे हिशेब चोख व तडकाफडकी करून टाकतात. चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू झाली कीं त्यांत गांवचीं गटारें मिळणारच. अशा वेळीं ते शांत राहून जग हें असें आहे व तें असेंच असावयाचें असें म्हणून स्वस्थ बसतात व आपलें काम जोरानें चालवितात. बापटांच्या प्रामाणिकपणाबद्दल लोकांचा कल्पनातीत विश्वास आहे. निःस्पृहपणावरून एक प्रसंग आठवतो आहे. एकदां बापट पुण्यास आपल्या मित्राच्या घरावरून चालले होते. मित्रानें त्यांना बोलावून दूध प्यायला दिलें व त्यांनीं तें घेतलें. दुसऱ्या दिवशीं तोच प्रकार झाला. तेव्हां ते म्हणाले, तुम्ही जर मला असें मुद्दाम दूध देत असाल तर या बाजूला मी

फिरायला येणार नाहीं. प्रेमाकरितां कोणी कांहीं दिलें तर ते सहसा नाहीं म्हणत नाहींत. पण नित्य कोणी त्यांस मदत करूं लागला तर मात्र ती ते स्वीकारीत नाहींत.

### पर्स

१९४६ च्या फेब्रुवारींत बापट अकोल्याच्या तुरुंगांतून सुटल्यावर त्यांना कांहीं हजारांची थैली अर्पण करण्यांत आली. त्यांनीं त्या थैलीला स्पर्श न करतां आपली लहानशी रक्कम त्यांत घालून सुभाषवाङ्मय प्रसिद्ध करण्याकरितां डॉ. पटवर्धन वगैरे कार्यकर्त्यांच्या स्वाधीन केली.

**त्याला कशाला मशाला दुशाला।**
**सहज रूपें शयन करी पांघरी दिशांला ॥**

### सामाजिक

बुद्धि चिकित्सक व मन उदार यामुळें सामाजिक सुधारणेकडे त्यांचा नेहमीं कल असतो. शिवाय विलायतेंत त्यांचें वास्तव्य झालें असल्यामुळें सामाजिक सुधारणेचे फायदे त्यांना कळून आले आहेत. स्त्रीपुरुषांना शिक्षण दिलें पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष आहे. १९१३ सालीं अज्ञातवास संपवून ते पारनेरला राहायला आले त्यावेळीं बहुजनसमाजापुढें प्रवचनांत ते समान शिक्षणाचा उपदेश करीत. डॉ. केतकरांचा विवाह युरोपिअन स्त्रीशीं झाला त्यावेळीं बापटांनीं पुरोहिताचें काम केलें होतें व सवड असती तर त्यांनीं इंग्लंडमधील सुशिक्षित परोपकारी स्त्रीबरोबर विवाह केला असता. आंतरजातीय विवाहास ते अनुकूल असले तरी एकपत्नीव्रतावर त्यांचा कटाक्ष दिसून आला आहे. पहिली पत्नी हयात असतांना दुसरा विवाह त्यांनीं प्रयत्नपूर्वक टाळला व पत्नी निवर्तल्यावरहि विधुरावस्था त्यांनीं संयमपूर्वक निष्कलंक अशी कंठून पुढाऱ्यांना धडा घालून दिला आहे. रँगलर परांजप्यांनीं टिळकांसंबंधानें जें एका ठिकाणीं म्हटलें आहे तेंच बापटांसंबंधानेंहि म्हणतां येईल. बापटांच्या बरोबर स्वातंत्र्ययुद्धांत पडलेल्या कित्येक लोकांच्या वर्तनांत जो सैलपणा आढळला तो बापटांच्या ठिकाणीं नांवापुरता सुद्धां दिसला नाहीं. मोहाचे प्रसंग त्यांच्यावर आले नाहींत असें नाहीं पण त्या मोहावर अखेर त्यांनीं मातच केली. बापटांच्यामध्यें जसें शारीरिक धैर्य आहे त्याचप्रमाणें त्यांच्यामध्यें अद्वितीय मनोबल असल्यामुळें त्यांना स्वातंत्र्यवीर

ही पदवी जशी साजते त्याप्रमाणें वैराग्यवीर ही पदवीहि साजते. वैराग्य हें द्रव्यदाराविषयकच असतें असें नाहीं तर कीर्तीसंबंधानेंहि तसेंच म्हणतां येईल. समाजांत पुढें येण्याची त्यांची इच्छा नाहीं. सभेंतील उच्चासनाकडे त्यांचा ओढा नसतो. एकदां एक महाराष्ट्रीय पुढारी मला म्हणाले, बापट निःस्पृह दिसतात खरे पण परवां एका सभेंत ते मागच्या रांगेंत असतांना मुद्दाम पुढें येऊन अध्यक्षांच्या जवळ येऊन बसतांना मी पाहिलें. मी लगेच त्यांना सांगितलें, हा तुमचा गैरसमज झाला आहे. बापटांना हल्लीं ऐकूं कमी येतें. यामुळें ते वक्त्याच्या जवळ जाऊन कधींकधीं बसतात. पुढें बसावें हा त्यांत हेतु नसतो.

### *धार्मिक*

धार्मिक बाबतींत ते गीताधर्माचे अनुयायी आहेत व विधीबद्दल त्यांचा निषेध अगर आग्रह नाहीं. विधीबद्दल ते सहिष्णु आहेत. पण अस्पृश्यतेबाबत ती काढून टाकण्यावर त्यांचा कटाक्ष आहे. मानवतेला ते आपला धर्म समजतात. जर कोठेंहि कोणी कोणावर जुलूम केला तर ते त्यावर वाघासारखे तुटून पडतात (जेलमधला प्रसंग, हैद्राबाद सत्याग्रह, तुळशी वृंदावनें इ.).

ते सकाळीं पूजासंध्या करतांना दिसणार नाहींत पण कुलदैवत जें मोरया त्याचें नामस्मरण करतांना पहांटे आढळतील. नित्यनेमानें देवदर्शनास जाणार नाहींत पण मूर्ति म्हणजे फत्तर आहे असेंहि म्हणणार नाहींत. खाण्यापिण्यांत संयम असला तरी कांदा वर्ज्य, अमूक पदार्थ सोडला, असें ते करीत नाहींत. पण आपले अनुयायी उपाशी असतां ते जेवणार नाहींत. जें योगायोगानें प्राप्त होईल तें सेवन करून ते जीवितयात्रा कंठतात. पाण्यांत राहून पाण्याचा स्पर्श होऊं देत नाहीं, अशा कमळाप्रमाणें बापटांचें जीवन आहे. कमळाचा जन्म पाण्यांत, वाढ पाण्यांत, हें खरें; पण पाण्याचा तें स्वतःच्या अंगाला स्पर्श होऊं देत नाहीं, त्यामुळें तें कुजत नाहीं. आपण संसारांत जन्मतों, वाढतों, पण या मायेचा स्पर्श जर आपल्या अंतरंगाला झाला तर आपलें जीवित कुजून जाईल म्हणून मनुष्यानें विरक्तपणानें वागावें हें तत्त्वज्ञान बापटांनीं आत्मसात् केलें आहे.

बापटांच्या नित्यधर्मांत सफाईचा कार्यक्रम येतो. आपल्या देवळांतून प्रक्षाळ-पूजा म्हणून सफाईचा कार्यक्रम असतो. बापटांची प्रक्षाळपूजा व्यापक स्वरूप धारण करते. ते कुठें दौऱ्यावर गेले कीं ज्या घरांत ते उतरतात तें घर स्वच्छ करून नंतर गांवचे रस्ते साफ करतात. हीच त्यांची देवपूजा आहे. मूळची

सफाईची आवड आणि त्यांत इंग्लंड देशांत वास. त्यामुळें येथल्या गलिच्छ राहणीचा त्यांस उद्वेग येऊन हें सफाईचें काम नित्यधर्म म्हणून ते करतात. लोकांच्या आचारांत क्रांति घडवून आणावयाची तर श्रेष्ठ पदावर असणारांनीं हातीं खराटा घेतला पाहिजे.

### *अभिरुचि*

बापटांना कोणत्याहि कलेची अभिरुचि असेल असें प्रथम क्षणीं वाटत नाहीं. परंतु तसें नाहीं. त्यांना संगीत, चित्रकला यांची आवड दिसत नाहीं पण कवितेची आवड मात्र फार दिसते. त्यांचीं मुळशीकरितां निघालेलीं पत्रकें सोडलीं व बाकीचें इंग्रजीमराठी वाङ्मय पाहिलें तर तें सर्व कविताबद्ध आहे. आमचे संत जसे आपला उपदेश काव्यद्वारां करीत त्याप्रमाणें बापटांचें लेखन बहुतेक काव्यमय आहे. उत्तेजनात्मकच लेखन कवितेंत आहे असें नव्हे तर सामान्य उपदेशहि रामदासाप्रमाणें कवितेंतच आहे. मराठीप्रमाणेंच ते इंग्रजींतहि कविता करतात. असें धाडस सहसा कोणी हिंदी माणूस करीत नाहीं. पद्यात्मक भाषांतर एक तेलंगांनीं व दुसरें बंगाली साहित्यिक कै. बाबू रमेशचंद्र दत्त यांनीं केलेलें प्रसिद्ध आहे. रवींद्रांनीं आपलीं काव्यें भाषांतरलीं आहेत पण गद्यांत, पद्यांत नव्हे. बापटांच्या इंग्रजी कवितेबद्दल मत प्रदर्शित करण्याचा आपला अधिकार नव्हे पण मराठी आमची मायबोली तेव्हां त्यासंबंधीं सविस्तर चर्चा इतरत्र केली आहे. तेव्हां येथें इतकेंच म्हणतों कीं त्यांची मराठी कविता ही सरळ, निर्मळ, वेगवती सरिता आहे. यामुळें ती वाचणाराचें हृदय तेव्हांच काबीज करते. हरि, मला काव्यकला दे व ती कुसरीची दे, असें त्यांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे.

### *आदर्श पुरुष*

बापटांना ज्यांच्याबद्दल निस्सीम आदर वाटतो असे पुरुष म्हणजे श्रीकृष्ण, लेनिन, टिळक व गांधी.

श्रीकृष्ण गीतेचा प्रणेता व 'विनाशाय च दुष्कृताम्' म्हणून अवतार त्यांना मान्य आहे. लेनिन गरिबांचा कैवारी. टिळकांच्या बद्दलचा आदर एका कवितेंत त्यांनीं चांगला व्यक्त केला आहे. टिळक ज्या वेळेला विलायतेला जाऊन परत आले त्यावेळीं त्यांच्या स्वागतार्थ ही कविता केलेली आहे. त्यांत ते म्हणतात,

'लोकमान्य, जन चंचल भारी। स्थैर्य, धैर्य गुणही न उभारी।
सर्वेही विफल, हें शिकवाया। आग्रहें झिजविली निजकाया॥

टिळक बोलल्याप्रमाणें वागणारे आहेत हें सांगतांना ते म्हणतात,

'जें जना निजमानस तेंच। सांगणें तर गुरुपण हेंच॥

शेवटीं ते म्हणतात,

आठवूनि तुमच्या चरितातें। साधितील निजलोक हितातें॥

टिळकांच्या अनेक मार्गांविषयीं तीव्र मतभेद असतांना बापटांनीं आपली सुमनांजलि टिळकांना वाहिली आहे यावरुन टिळकांच्या विषयीं त्यांच्या मनांत आदर किती होता हें दिसून येतें.

म. गांधींबद्दलचा आदर त्यांच्या अहिंसेच्या मार्गाशीं मतभेद ठेवूनहि, त्यांनीं रत्नागिरीच्या तुरुंगांत उपवास करून दर्शविला आहे. या आदराचें कारण दोघांमध्यें समानधर्म मोठ्या अंशाचा आहे. सत्याग्रही युद्ध, खादी, सफाई, अस्पृश्यतानिवारण यांत ते व गांधी एकरूप आहेत.

## कुटुंब

बापटांची पत्नी पुण्यास १९२० ऑगस्टच्या चार तारखेच्या—लोकमान्यांच्या अस्थींच्या मिरवणुकीच्या तारखेच्या—सुमारास म्हणजे बापटांच्या अडतिसाव्या वर्षी ऐन तारुण्यांत वारली. तिच्याजवळ बापटांनीं सात वर्षेच संसार केला. त्यांना दोन अपत्यें झालीं. मुलगा वामन व मुलगी कमल. वामन वडिलांप्रमाणेंच बुद्धिवान, निग्रही व देशभक्त आहे. एंजिनिअरिंगचा अभ्यास बनारस युनिव्हर्सिटीमध्यें करून ती परीक्षा तो उत्तीर्ण झाला. शाळा-कॉलेजांतून होणाऱ्या चळवळींतून तो आघाडीवर असतो. त्याचप्रमाणें १९३२ च्या चळवळींत तो तुरुंगांत जाऊन आला होता. त्याचीं मतें मात्र कम्युनिस्ट पक्षाच्या बाजूचीं आहेत. १९४० ते १९४१ त्याला स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें. हल्लीं तो मुंबईस एंजिनिअर म्हणून नोकरीस आहे.

मुलगी कमल ही स्वभावानें अधिक सौम्य व प्रेमळ होती. तिनें आयुर्वेद-विशारद परीक्षा देऊन विवाह केला व नंतर तिला एक अपत्य झालें आहे. पण दुर्दैवानें ती नुकतीच निवर्तली.

बापटांच्या तुरुंगवासांत मुलांच्या मावशीनें त्यांचा अत्यंत काळजीपूर्वक संभाळ केला. आजहि बापटांच्या वृद्धापकाळीं त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था त्याच करीत असतात. १९१३ सालापासून त्या बापटांच्या जवळच आहेत.

## घर

बापट हे हल्लीं सदाशिव पेठेंत ३५४ केसकरांचा विठोबा या देवळाच्या आवारांत असलेल्या घरांत राहतात. दोनच खोल्या त्यांच्याकडे भाड्यानें आहेत. स्वयंपाकाकरितां तळ मजल्यावर एक व वरच्या मजल्यावरच्या खोलींत त्यांचें बसणें उठणें असतें. मंडळी भेटावयाला आली तर तेथेंच भेट होते. भेट गुप्त वगैरे कांहींएक नसते. सर्व कारभार खुला असतो.

## *कार्यक्रम*

त्यांचा नित्यनेमाचा असा कार्यक्रम आंखलेला नसतो. कार्यक्रम आंखीव नसला तरी तो भोंगळहि नसतो. अमूकच वाजतां उठावयाचें असें ठरलेलें नसलें तरी सूर्योदयापूर्वीं ते अंथरुणांतून उठतात. अंथरुणांतून उठतात असें म्हणण्याचें कारण ते झोपेंतून बराच वेळ अगोदर जागे झालेले असतात. पांघरूण घेऊन ते पडलेले असले तरी त्यांचें त्यावेळीं चिंतन चाललेलें असतें. मुळशीचीं सत्याग्रही पद्यें, निरोप, हे तुरुंगांत जे तयार झाले ते या पहांटेच्या समयांतच. दिवसा ते ध्यानधारणा करीत बसत नाहींत पण त्यांच्या आयुष्यक्रमावर जी वैराग्याची छाप आहे व विचारांत जें तेज आहे तें अध्यात्मचिंतनाशिवाय कसें येणार ? दिवसा तर ते चिंतन करीत नाहींत तेव्हां रात्रीं, पहांटे, ते तें करीत असले पाहिजेत. थोर पुरुषांत हा प्रकृतिभेद असतो. टिळक व बापट हे एका कोटींत येतात व गांधी हे दुसऱ्या कोटींत पडतात. गांधी आपली आध्यात्मिक प्रगति व आपलें यश अपयश सदरेवर मांडतील तर टिळकबापटांच्या आध्यात्मिक प्रगतीचा सुगावा फळावरून लागतो.

> **कामी असंयमी भोगी—रोगी ते कार्यनाशक।**
> **निकामी क्रांतिकार्यांत—असोत बहु भाषक॥**

अशासारख्या त्यांच्या लेखनावरून त्यांच्या मनाची ठेवण व तयारी लक्षांत येते.

## उपसंहार

अशा रीतीनें सेनापति बापटांचें दर्शन मला जसें घडलें तसें वाचकांपुढें ठेवलें आहे.

हिंदी राष्ट्र पारतंत्र्याच्या खोल गर्तेत पडलें आहे. गजेंद्राचा पाय मकरानें धरल्यावर त्याला ओढून काढावयास त्याचे अनेक सगेसोयरे झटूं लागले तसे भारतमातेचे अनेक सुपुत्र आपल्या परी भारताला स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रत्येकाच्या प्रयत्नाचें वैशिष्ट्य आहे त्याप्रमाणें बापटांच्या कार्याचें वैशिष्ट्य कोणतें हें पाहण्याजोगें आहे. मनुष्याच्या सेवेचे दोन प्रकार असूं शकतात. एक नैतिक व एक व्यावहारिक. राष्ट्रामध्यें ज्यांनीं कारखाने काढले त्यांनीं देशी उद्योगधंद्यांना हातभार लावून देशांतला पैसा देशांत ठेवण्याला मदत केली. त्यांचें कार्य व्यावहारिक म्हणतां येईल. पण टिळकांच्या कारावासाला नैतिक स्वरूप आहे. त्यांनीं राष्ट्राला अमूक एक गोष्ट मिळवून दिली असें नाहीं पण त्यांनीं राष्ट्रांत निर्भयता आणली व त्यागपूर्वक सेवा करण्याचा धडा घालून दिला. न्यू स्कूलच्या आद्य संस्थापकांच्या कार्याला यामुळेंच नैतिक किंमत आहे. सेनापति बापटांचें कार्य पुष्कळसें नैतिक स्वरूपाचेंच आहे. त्यांनीं कौन्सिलमध्यें जाऊन जनहितानुकूल असा कायदा पास करून घेतला नाहीं किंवा म्युनिसि-पालिटींत जाऊन, सॅनिटरी चेअरमन होऊन, स्वच्छतेची मोहीम काढून, पुण्यां-तले डांस किंवा मलेरिया नाहींसा केला असेंहि नाहीं.

ते क्रांतिकारक समशेर पक्षाचे आहेत. बॉम्ब करण्याची कृति ते शिकून आले आहेत. तरी त्यांनीं बॉम्बचा कारखाना काढला किंवा समशेर घेऊन गांवावर स्वाऱ्या केल्या असें घडलें नाहीं. मुळशी सत्याग्रहाच्या शेवटीं त्यांनीं मित्रां-समवेत एकदांच गाडीवर हल्ला केला व कांहींजणांना अल्पशी दुखापत केली. त्यावेळीं अनेकांचे बळी घेणें त्यांना शक्य होतें पण ते हिंसक वृत्तीचे नाहींत. उगाच रक्तपात त्यांना मान्य नाहीं. त्यांना त्यावेळीं एवढेंच दाखवावयाचें होतें कीं सत्याग्रहांत शस्त्राचें हत्यारहि चालूं शकतें.

राजकारणी असून ते कौन्सिलमध्यें जात नाहींत. क्रांतिकारक असून शस्त्रांची मोठी जमवाजमव करून एक मोठें बंड ते उभारीत नाहींत. समाजसेवक असून समाजसेवेची त्यांनीं संस्था काढून सेवामंडळ तयार केलेलें नाहीं. लेखनाची शक्ति असून वर्तमानपत्र अगर मासिक त्यांनीं चालविलें नाहीं. मग बापट आहेत तरी कोण? या पुस्तकाच्या प्रारंभीं, बापट हे अनेक लोकांना एक कोडें

होऊन बसले आहेत असें म्हटलें आहे. त्यांची सहानुभूति अनेक पक्षांशीं या नाहीं त्या रीतीनें असून ते कोणत्याच पक्षाशीं एकरूप होत नाहींत. मग ते एकांडे शिलेदार आहेत कीं काय?

एकांडे शिलेदार हा अहंकारी लहरी पुरुष असतो. बापट तसे नाहींत. जेथें जेथें अन्याय दिसेल तेथें ते न बोलावतां जातील. पुण्यास शस्त्रदिन साजरा करण्याचें कांहीं मंडळींनीं ठरविलें. हें पहातांच हे आपली झाडूफाईल घेऊन त्यांच्या मिरवणुकींत सामील झाले. गांधींनीं हरिजनांच्या हक्कांकरितां उपवास सुरू करतांच बापट त्या उपासांत मिळाले. टिळकांशीं त्यांचे मतभेद झाले होते पण त्यांच्या स्वागताच्या वेळीं बापट उपस्थित झालेच. सावरकरांशीं त्यांचें जमण्याजोगें फार थोडें, तरी त्यांचे जुने मित्र म्हणून त्यांच्या सत्कार-समारंभांत बापट येतात. बापटांची भूमिका समजण्याला कठीण असली तरी त्यांच्या मनाची ठेवण एकदां कळली म्हणजे ती आपणाला समजू शकते.

बापट हे आध्यात्मिक अर्थानें निःस्पृह आहेत. अमूकच हवें असा त्यांचा आग्रह नाहीं. बाळपणीं खेळ कोणता खेळावयाचा याबद्दल त्यांचा आग्रह नसे. कोणताहि खेळ खेळा पण खेळा, एवढेंच त्यांचें म्हणणें. त्यांत माझा जयच झाला पाहिजे असाहि आग्रह नाहीं. दांडगाई करायला दिली तर दमेपर्यंत. खेळावयास मिळालें म्हणजे झालें. खेळ नसला तर अभ्यास. त्यांतहि ते तितकेच रमत. म्हणजे काय ? स्थितप्रज्ञतेचीं लक्षणें त्यांच्यांत उपजतच आहेत. तीं अनुभवानें, विचारानें व वाचनानें विकसित व दृढ झालीं आहेत.

ते एका ठिकाणीं म्हणतात,

**देवा खेळ खेळ तुझिये आवडी।**
**न जाईन रडी कांहीं केल्या ॥**

'न जाईन रडी कांहीं केल्या' हें बोलणें सोपें आहे. पण प्रसंग आला, मनाच्या विरुद्ध कांहीं गोष्टी होऊं लागल्या कीं पुष्कळांचा वेताळ पूर्वस्थळावर येतो. बापटांची बुद्धि स्थिर असून परमेश्वरी योजनेवर त्यांचा इतका दृढ विश्वास आहे कीं मोठमोठ्या प्रसंगींहि त्यांची बुद्धि चल पावत नाहीं. मुळशीला माघार घ्यावी लागली तेव्हांही त्यांतहि त्यांनीं हरीचा हात पाहिला, मुळामुठा नदींत प्राणयज्ञ करण्याचें ठरवून, आपल्या बेताला प्रसिद्धी देऊन, त्यांना तो बेत रहित करावा लागला. संभावित मरण पत्करील पण कीर्ति जाऊं देणार नाहीं. अशा वेळीं त्यांनीं बेत मागें घेण्याचा कडु बदाम गिळला कारण त्यांतहि त्यांना

हरीचा हात दिसला. सरते शेवटीं त्यांची प्रिय कन्या ऐन तारुण्यांत एकाएकीं निवर्तली त्या वेळीं सुद्धां त्यांची ही बुद्धि स्थिरच राहिली. यालाच म्हणतात स्थितप्रज्ञ.

हरीचा हात त्यांना सर्वत्र दिसतो यामुळें त्यांचा आग्रह असा कोणत्याच गोष्टींत नसतो. आग्रह नसतो म्हणजे हातचें काम ते कसें तरी करतात असें नाहीं. आग्रह नसतो म्हणजे माझ्याच हातून हें घडलें पाहिजे असा त्यांचा आग्रह नाहीं. यामुळेंच ते काँग्रेसचे अगर कोणत्याहि संस्थेचे पदाधिकारी नाहींत. हरीच्या योजनेवरच्या विश्वासाचा परिणाम असा झाला कीं त्यांच्यांत बुद्धि व कर्तृत्व असून ते राष्ट्रीय उलाढालींत फारसे नाहींत. ते फक्त सेनापतीच आहेत. त्यांना सेनापति ही पदवी मुळशी सत्याग्रहाच्या वेळीं मिळाली. युद्ध म्हटलें म्हणजे त्यांचा पाय नेहमीं पुढें. पण अन्यायाशीं झुंजणारे ते सेनापति आहेत. उगाच कांहीं तरी कुरापती काढून नेहमीं लढत राहाण्याचा त्यांचा स्वभाव नाहीं. त्यांना पुराणिक गुरुजींनीं वैराग्यवीर असें म्हटलें आहे व तें यथार्थ आहे. त्यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा पाया वैराग्य हा आहे. आपलें राष्ट्र स्वतंत्र व्हावें हेंच ध्येय व त्याकरितां सर्वस्व अर्पण करण्याची त्यांची तयारी आहे. सर्वस्व हे शब्द उच्चारावयास गोड व मधुर आहेत पण प्रत्यक्ष प्रसंग येतो त्या वेळीं सर्वस्वाचा अर्थ कमींत कमी असा होतांना आपण पाहतों. कोणी आपल्या आवडीनिवडी-करितां, कोणी मुलांलेकरांकरितां, पैशांकरितां आपलें ध्येय सोडतो. पण बापटांवर अत्यंत कठीण असे अनेक प्रसंग आले आहेत पण त्या प्रत्येक प्रसंगाला त्यांनीं धैर्यानें व आपलें सर्वस्व अर्पण करून तोंड दिलें आहे.

शेवटीं असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, बापटांनीं राष्ट्राकरितां काय ठेवलें? ज्या स्वातंत्र्याकरितां ते इतके झटले तें त्यांनीं मिळवून दिलें काय? नाहीं! मग त्यांचें आयुष्य फुकट गेलें काय?

थोर उद्देश धरून केलेली तपश्चर्या फुकट कशी जाईल? लेनिनच्या अगोदर अनेक उदार थोर महात्म्यांनीं रशिया स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला, तो फसला; म्हणून त्यांचें कार्य फुकट गेलें असें नाहीं. लेनिनचा प्रयत्न योग्य वेळीं योग्य दिशेनें झाल्यामुळें व पुढें ती क्रांति टिकून राहाण्याला लागणारी योजना पुढें असल्यामुळें लेनिन यशस्वी झाला. पण तें यश मिळण्याला पूर्वींचे प्रयत्न फार उपयोगी पडले. बापटांनीं जें मिळविलें व राष्ट्राला दिलें तें तळहातावर घेऊन दाखवितां येण्याजोगें नाहीं. पण मनाला पटणारें, बुद्धीला विकसविणारें असें तें आहे यांत संशय नाहीं.

बापटांनीं पुरातन ऋषींचा आदर्श आपल्या प्रत्यक्ष आचरणानें लोकांना दाखविला. दाढी न वाढवतां किंवा, पर्णकुटींत न राहतांहि ते ऋषि आहेत हें कुणीहि मान्य करील. त्यांनीं गीताधर्माचें तंतोतंत पालन करून दाखविलें आहे. हिंदुस्थानची जी मुख्य आध्यात्मिक संपत्ति तिचें त्यांनीं रक्षण करून ती पुढील पिढ्यांना दिली आहे.

राजकीय दृष्ट्या सर्व जातींविषयीं प्रेम बाळगून हिंदुस्थानच्या अखंडत्वास मदत केली आहे. स्वातंत्र्याची लढाई हाच हिंदुस्थानचा आजकालचा मुख्य धंदा. तो त्यांनीं जन्मभर केला आहे. हा करीत असतांना मनाची व कृतीची शुद्धता त्यांनीं राखलेली आहे. समानधर्मीयांशीं त्यांनीं उगाच भांडणें केलीं नाहींत, त्यांचा मत्सर किंवा द्वेष केला नाहीं. आलेल्या संकटांना शांतपणें तोंड देऊन त्याबद्दल परिस्थितीला अगर लोकांना दोष दिला नाहीं. कांहीं राष्ट्रभक्त असे असतात कीं ते अव्यक्त राष्ट्राची पूजा करतात पण त्या राष्ट्रांत राहणाऱ्या लोकांच्या सुखदुःखांशीं त्यांची सहानुभूति नसते. ते राष्ट्रप्रेमी नसून परकीय सत्तेचे फक्त द्वेष्टे असतात. द्वेषाच्या पायावर उभारलेली राष्ट्रभक्ति शेवटीं स्वकीयांत भांडणें लावून देण्यास कारणीभूत होते हें आपण नित्य पाहतों. बापटांची राष्ट्रभक्ति सगुण आहे. जेव्हां इंग्रजांशीं युद्ध नसेल तेव्हां बापट आपली शक्ति स्वकीयांची सेवा करण्यांत घालवितात. या व इतर अनेक बाबतींत त्यांचें महात्मा गांधींशीं फार साम्य आहे. महात्माजींप्रमाणें बापट हे सत्याचे उपासक आहेत. खोटें, लबाड्या, डावपेंच नेहमीं लढवीत राहाणें हें मला आवडत नाहीं व साधतहि नाहीं असें त्यांनीं एकदां प्रस्तुत लेखकाजवळ म्हटलें आहे. त्यांच्या नांवावर अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत पण त्या दंतकथाच आहेत असें ते सांगतात. गांधींच्या व बापटांच्या विचारसरणींत फरक निःसंशय आहे पण सत्यप्रीतीच्या बाबतींत दोघांची जात एकच आहे.

देशाच्या स्वातंत्र्याचा अखंड ध्यास दोघांना सारखाच आहे. आपलें स्वतःचें आचरण अधिक अधिक पवित्र करण्याचा दोघांचाहि उद्योग सततचा आहे. दोघेहि राष्ट्राची सगुणोपासना करणारे आहेत. म्हणून सफाई, हरिजनसेवा दोघांनाहि प्रिय वाटते.

अशा बाबतींत दोघे जवळजवळ आले तरी दोघांमध्यें फरकहि तसाच मोठा आहे. गांधी दुसऱ्यांची सेवा करतील व दुसऱ्यांकडून करूनहि घेतील; पण बापट टिळकांप्रमाणें स्वतः सेवा करतील पण लोकांकडून सेवा करून घेणार नाहींत.

व्रतें घेणें, नियम धरणें हें गांधींना आवडतें. बापटांचीं व्रतें बाहेर दिसून येणारीं नाहींत. आंतरत्यागी, बहुसेवी असे बापट आहेत.

उद्योगाचा पसारा बनविण्याची गांधींना हौस आहे व मधूनमधून या पसाऱ्याचा त्यांना वीट येतो व ते आपले उद्योग उधळून टाकतात. तरी नवे निर्माण होतच असतात. उद्योगी, पराक्रमी जनतेचा पिच्छा गांधीजी सोडणार नाहींत. बापट प्रसंग आल्याशिवाय मंडळी जमवीत बसणार नाहींत. पुष्कळदां ते योगनिद्रेंत असतात.

दोघेहि भावनाप्रधान आहेत पण एकाची भावना आगगाडींतल्या एंजीन-मधल्या नळ्यांमध्यें जाऊन चाकांना गति देतें व अनेक गाड्या चालविते पण बापट हे सुरुंगासारखे आहेत. तेथील दारूची वाफ प्रचंड खडक फोडून त्याचे राईएवढाले तुकडे करून टाकील. दोघांची शक्ति मोठी पण एक अधिक संममित तर दुसरा अधिक प्रखर. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सामान्य शक्ति जेथें थंड पडते तेथें डायनामाईटप्रमाणें बापट आपल्या अनेकविध शक्तींनीं अडचणीचा खडक फोडून टाकतात. संध्यावंदनाचे वेळीं आपण अनेक देवतांना वंदन करतों. जलदेवता, स्थलदेवता, वास्तु देवता, अशा अनेक देवता जगांत आहेत. त्यांना नम्रभावानें वंदन करून त्यांच्या शक्तीचा आपल्या जीवितकार्याला उपयोग व्हावा असें आपण इच्छितों त्याप्रमाणें टिळक-गांधी-बापट अशांसारख्या अनेकविध शक्तिशाली पुरुषांना आपण वंदन करूं या. त्यांनीं आजपर्यंत दिलेल्या प्रसादाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून पुढेंहि आपल्यावर कृपादृष्टि असूं द्यावी असें मागणें या निष्पाप, उदार महात्म्यांजवळ आपण मागूं या. त्यांचे उदार विचार, विशुद्ध आचरण, अनन्य देशभक्ति आपल्याला मार्गदर्शक होऊन आपल्या हातून त्यांनीं आरंभिलेल्या कार्याला मदत होवो, असें आपण इच्छूं या.

टिळक-गांधी-बापट यांचीं चरित्रें लिहिणें व वाचणें हें ऋषिपूजन आहे. तें करून त्यांच्यांतील शुद्ध निष्ठेचा प्रसाद आपण मागूं या. या प्रसादाच्या साहाय्यानें मातृभूमीचे क्लेश निवारण होणार आहेत.

राष्ट्र स्वतंत्र करण्याच्या पद्धतींत स्वभाववैशिष्ट्यामुळें फरक असला तरी टिळक-गांधींबरोबरच बापटांना स्थान देऊन या त्रैमूर्तीचा जयजयकार आम्ही करणार नाहीं का ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थलप्रत
१०९९६
(स्थल प्रत)